CMYK

सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा

SOLAPUR TARUN BHARAT

सोलापूर, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित

सोलापूर | शनिवार, २१ डिसेंबर २०२४ । युगाब्द ५१२५ । वर्ष ४१ वे अंक ४५ । पाने १२ । किंमत रु. ६/-

| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |

ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही

dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

## महत्त्वाचे

### मोठ्या घसरणीने हादरला शेअर बाजार



**मुंबई :** देशांतर्गत शेअर बाजारात मोठ्या घसरणीसह आठवडा संपला. शुक्रवारी सपाट सुरुवात झाल्यानंतर बाजारात मोठी घसरण झाली आणि सलग पाचव्या दिवशी बाजार एक महिन्याच्या नीचांकी पातळीवर बंद झाला. निर्देशांकात तब्बल ११७६ अंकांची घसरण झाली आणि निफ्टी ३६४ अंकांनी खाली आला. जागतिक बाजारातील घडामोडींचे पडसाद म्हणून या घसरणीकडे पाहिले जात आहे. फेडरल रिझर्व्हच्या भूमिकेतील बदल बाजारातील पडझडीला कारणीभूत ठरला. या घडामोडीमुळे अनेक गुंतवणूकदारांनी पडेल किमतीत शेअर्स विक्रीचा सपाटा लावला. याशिवाय डॉलरच्या तुलनेत रुपयाची ऐतिहासिक नीचांकी पातळी नोंदविण्यात आली. याचाही गुंतवणूकदारांच्या मानसिकतेवर परिणाम झाला.

### गुगलमध्ये मोठी नोकरकपात

**न्यू यॉर्क :** गुगलचे सीईओ सुंदर पिचाई यांनी एक मोठा निर्णय घेत कंपनीतील दहा टक्के व्यवस्थापकीय कर्मचाऱ्यांना नोकरीवरून काढले आहे. पिचाई यांचा हा निर्णय गुगलच्या दीर्घकाळापासून सुरू असलेल्या कार्यक्षमता वाढवण्याच्या योजनेचा एक भाग असल्याचे बोलले जात आहे. ही कपात प्रामुख्याने व्यवस्थापक, संचालक आणि उपाध्यक्ष पदावर करण्यात आली आहे. अर्थात, यापैकी काही जणांना 'इंडिव्हिज्युअल कॉंट्रीब्युटर' म्हणून पुन्हा घेतले जाणार असल्याचेही संकेत पिचाई यांनी दिले आहेत.

### बिहारमध्ये २७,९०० कोटी गुंतवणार अदानी समूह

**पाटणा :** अदानी समूहाने बिहारमध्ये थर्मल पॉवर, स्मार्ट मीटर, सिमेंट, लॉजिस्टिक्स, गॅस वितरण आणि कृषी-लॉजिस्टिक्ससह अनेक क्षेत्रांमध्ये २७,९०० कोटी रुपयांची गुंतवणूक करण्याची घोषणा केली आहे. सुमारे ५३,५०० लोकांना रोजगार उपलब्ध होणार आहे. या घोषणा शुक्रवारी 'बिहार बिझनेस कनेक्ट इन्व्हेस्टर समिट २०२४' मध्ये अदानी एंटरप्रायझेसचे व्यवस्थापकीय संचालक (कृषी, तेल आणि वायू) आणि संचालक प्रणव अदानी यांनी केल्या.

### आसाम पोलिसांनी दोन बांगलादेशींना परत पाठवले

**गुहावाटी :** बेकायदेशीर भारतात प्रवेश करण्याचा प्रयत्न करीत असताना आसाम पोलिसांनी दोन बांगलादेशी नागरिकांना त्यांच्या देशात परत पाठवले, असे मुख्यमंत्री हिमंता बिस्वा सरमा यांनी सांगितले. ब्युटी बेगम आणि जस्मिन खातून अशी या दोन घुसखोर महिलांची ओळख पटली आहे. आसाममधून १७० हून अधिक घुसखोरांना मागे ढकलण्यात आले. शेजारच्या देशात अशांतता निर्माण झाल्यापासून ईशान्येकडील १,८८५ किमी लांबीच्या भारत-बांगलादेश सीमेवर सतर्कता वाढवण्यात आली आहे.

### तुमचे दोन्ही उपमुख्यमंत्री आमच्याच मंत्रिमंडळातले

**नागपूर :** सत्ताधारी सरकार राज्याची कायदा सुव्यवस्था राखण्यास अपयशी ठरले आहे. कापूस, सोयाबीन, तूर उत्पादक शेतकऱ्यांना त्यांनी देशोधडीला लावले आहे. जनतेचे हित न साधता स्वतःचे हित जपणारे हे स्वार्थी व अकार्यक्षम सरकार आहे, अशी बोचरी टीका विधान परिषदेचे विरोधीपक्ष नेते अंबादास दानवे यांनी अंतिम आठवडा प्रस्तावावरील भाषणात केली. तसेच, सत्ताधारी पक्षाचे मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री यांनी राज्यपाल यांच्या भाषणावर उत्तर देताना आमचे सरकार असे आहे, त्यांचे सरकार तसे होते असं म्हटलं. पण दोन्ही उपमुख्यमंत्री त्या काळात आमच्या मंत्रिमंडळात सहभागी होते हे ते सोयीने विसरले, असे रोखठोक विधानही केले. राज्य थांबणार नाही, हे ब्रीदवाक्य सरकार सतत म्हणत आहे. पण ५ डिसेंबरला शपथविधी होऊन सरकारला खाते वाटप करता आले नाही. मागच्या अधिवेशनाची परिस्थिती पाहिली तर राज्य कोणत्या क्षेत्रात पुढे गेले? असा प्रश्न सर्वसामान्य माणसांच्या मनात आहे. गेल्या आठवड्याभरात राज्यातील विविध जिल्ह्यात घडलेल्या घटनांकडे सरकारने पाठ फिरवली. राज्यातील शिक्षण आरोग्य, उद्योग विभागाची परिस्थिती भयावह आहे. राष्ट्रीय गुन्हे नोंद विभागाने जाहीर केलेल्या आकडेवारीत गुन्हेगारीत पहिला क्रमांक उत्तर प्रदेशचा असून महाराष्ट्र दुसऱ्या क्रमांकावर आहे. महिला अत्याचाराच्या घटना नोंदवल्या असून सायबर गुन्ह्यात राज्य चौथ्या क्रमांकावर आहे.

# मराठी माणसांवर अन्याय होऊ देणार नाही

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची ग्वाही | कल्याण येथील हल्ला प्रकरणाची घेतली दखल

◆ **नागपूर, २० डिसेंबर**

मुंबईतील कल्याण येथील एका सोसायटीत मराठी माणसांवर झालेल्या हल्ला प्रकरणाची राज्य शासनाने दखल घेतली असून, दोषींवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे आणि पुढील कार्यवाही केली जात आहे. मराठी माणसांवर कुठल्याही परिस्थितीत अन्याय होऊ देणार नाही, अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानपरिषदेत दिली.

कल्याणमधील मराठी कुटुंबावर झालेल्या हल्ल्याप्रकरणी विधानपरिषद सदस्य ॲड. अनिल परब यांनी नियम २८९ अन्वये उपस्थित केलेल्या चर्चेला मुख्यमंत्री फडणवीस यांनी उत्तर दिले. या चर्चेत सदस्य शशिकांत शिंदे, भाई जगताप, सचिन अहिर यांनी सहभाग घेतला.

मुख्यमंत्री म्हणाले, कल्याण येथील सोसायटीत अखिलेश शुक्ला व त्याच्या पत्नीने भांडणात मराठी माणसांचा अवमान केला. या प्रकरणी खडकपाडा पोलिस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला असून, शुक्ला हा 'एमटीडीसी'चा कर्मचारी आहे. त्यास निलंबित करण्याची कार्यवाही सुरू आहे.

देशाची आर्थिक राजधानी असलेल्या देशभरातील अनेक समाजबांधव मुंबईमध्ये येतात. महाराष्ट्र मराठी माणसाची अस्मिता आहे. सर्व जाती, धर्माचे नागरिक येथे शांततेने राहतात. उत्तरप्रदेशातून आलेले अनेक लोक उत्तम मराठी बोलतात तसेच सर्व मराठी सण-उत्सव साजरे करतात. काही लोकांमुळे सामाजिक सलोख्याला गालबोट लागण्याचे प्रकार खपवून घेतले जाणार नाहीत, असेही ते म्हणाले. (तभा वृत्तसेवा)

#### कायद्यानुसार कारवाई होणार



एखाद्या व्यक्तीचा आहार कोणत्या पद्धतीचा असावा, याचे स्वातंत्र्य संविधानाने प्रत्येकाला दिले आहे. मात्र, कोणाचाही आहार रोखण्याचा कोणालाही अधिकार दिला गेलेला नाही. यासंदर्भात तक्रारी आल्यास कायद्याप्रमाणे कारवाई केली जाईल, असेही मुख्यमंत्री म्हणाले.

# संसदेच्या हिवाळी अधिवेशनाचे सूप वाजले

### संसदभवन परिसरात धरणे आणि निदर्शने करू नका : ओम बिर्ला

◆ **नवी दिल्ली, २० डिसेंबर**

संसदेच्या हिवाळी अधिवेशनाचे आज सूप वाजले. आज शेवटच्या दिवशी कामकाजाला सुरुवात होताच विरोधी पक्ष सदस्यांच्या गोंधळामुळे सभापती ओम बिर्ला यांनी सभागृहाचे कामकाज अनिश्चित काळासाठी स्थगित केले.

आज लोकसभेच्या कामकाजाला सुरुवात होताच काँग्रेस आणि अन्य विरोधी सदस्य घोषणाबाजी करू लागले. या गोंधळातच बिर्ला यांनी एक देश एक निवडणुकीबाबतची दोन्ही घटनादुरुस्ती विधेयके संयुक्त संसदीय समितीकडे पाठवण्याची घोषणा करायला विधि आणि न्याय मंत्री अर्जुनराम मेघवाल यांना सांगितले.



मेघवाल यांनी याबाबतची घोषणा करताच विरोधी सदस्यांची घोषणाबाजी वाढली. संसदेची मर्यादा आणि प्रतिष्ठा कायम ठेवणे ही आमच्या सर्वांची जबाबदारी आहे, संसदभवन परिसरात निदर्शन करणे तसेच धरणे देणे योग्य नाही. सर्वांनी यासंदर्भातील नियमांचे काटेकोरपणे पालन केले पाहिजे, असे आवाहन करीत बिर्ला म्हणाले की, सर्व सदस्यांनी ही सूचना गांभीर्याने घ्यावी आणि संसदभवन परिसरात धरणे देऊ नये, निदर्शन करू नये, असे माझे आवाहन आहे. याचे कोणीही उल्लंघन केले तर कठोर कारवाई केली जाईल. सभागृहातील गोंधळ थांबत नसल्यामुळे बिर्ला यांनी कामकाज अनिश्चितकाळासाठी स्थगित करण्याची घोषणा केली. वंदेमातरम्‌ने अधिवेशनाचे सूप वाजले.

राज्यसभेतही अशीच गोंधळाची स्थिती होती. त्यानंतर अध्यक्ष जगदीप धनकड यांनी सभागृहाचे कामकाज अनिश्चित काळासाठी तहकूब करण्याची घोषणा केली. (तभा वृत्तसेवा)

### 'पारले-जी' महागणार

**मुंबई :** कित्येक पिढ्यांपासून लोकप्रिय असणारे पारले जी बिस्किट आता महागणार आहे. खाद्य उत्पादने बनवणारी देशातील सर्वांत मोठी एफएमसीजी कंपनी पारले प्रॉडक्ट्स जानेवारीपासून त्यांच्या उत्पादनांच्या किमती पाच टक्के वाढविणार आहे. चॉकलेट, स्नॅक्स आणि इतर खाद्य पदार्थांच्या किमती वाढल्यामुळे ही वाढ करण्यात येणार आहे. किंमत वाढण्यासह बिस्किटाच्या पाकिटाचे वजनही कमी होण्याची शक्यता आहे.

# 'एक देश एक निवडणूक' जेपीसीकडे

### लोकसभेचे २७, राज्यसभेचे १२ सदस्य

◆ **नवी दिल्ली, २० डिसेंबर**

'एक देश एक निवडणूक' विधेयक सरकारने संयुक्त संसदीय समितीकडे पाठवले आहे. या समितीत लोकसभेचे २७ तर राज्यसभेचे १२ असे ३९ सदस्य आहे.

लोकसभेत विधि आणि न्याय ... नावांची घोषणा केली. समितीतील सदस्यांच्या नावांबाबतचा प्रस्ताव मेघवाल यांनी आज दोन्ही सभागृहात मांडला आणि तो आवाजी मतदानाने पारित करण्यात आला.

या समितीत लोकसभेतील भाजपाचे अनुराग ठाकूर, संजय जयस्वाल, पुरुषोत्तम रूपाला, पी. पी. चौधरी, संबित पात्रा, अनिल बलुनी, बांसुरी स्वराज, भर्तुहरी मेहताब, ... श्रीकांत शिंदे, उबाठाचे अनिल देसाई, अजित पवार गटाच्या सुप्रिया सुळे याशिवाय सुखदेव भगत, छोटेलाल, हरीश बालयोगी, चंदन चौहान, टीएम सेल्वागणपती, के. राधाकृष्णन्, सांभवी आणि बालशौरी वल्लभनेनी यांचा समावेश आहे.

समितीत राज्यसभेतील घनश्याम तिवाडी, भूवनेश्वर कलिता, के. लक्ष्मण, कविता पाटीदार, संजयकुमार

# सदस्यांनी आपल्या वर्तनाचे आत्मपरीक्षण करावे : धनकड

◆ **नवी दिल्ली, २० डिसेंबर**



राज्यसभेच्या कामकाजाला सुरुवात होताच काँग्रेस आणि अन्य विरोधी सदस्य आपल्या जागेवर उभे होत मोठमोठ्याने बोलू लागले. या गोंधळातच अध्यक्ष जगदीप धनकड यांनी आवश्यक कागदपत्रे सादर करून घेतली. नियम २६७ नुसार काही सूचना आपल्याला मिळाल्या, पण त्या नियमानुसार नसल्यामुळे त्या फेटाळत असल्याचे धनकड यांनी म्हटले. यावरून विरोधी सदस्य संतप्त झाले आणि घोषणाबाजी केली.

विरोधकांच्या या घोषणाबाजीवर धनकड यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. गोंधळामुळे सभागृहाचे कामकाज प्रभावित होते, याकडे लक्ष वेधत, सदस्यांनी आपल्या वर्तणुकीचे आत्मपरीक्षण करावे तसेच जबाबदारीने वागावे, असे आवाहन त्यांनी केले. संपूर्ण जग आपल्या लोकशाहीकडे मोठ्या आशेने बघते, पण आम्ही आमच्या बेजबाबदार वागणुकीने लोकांची निराशा करतो. सभागृहात होणारा गोंधळ लोकांचा विश्वास आणि अपेक्षांची खिल्ली उडवतो. परिश्रमपूर्वक जनतेची सेवा करणे हे आमचे मौलिक कर्तव्य आहे. सभागृहात तर्कसंगत चर्चा व्हायला पाहिजे, तर नुसता गोंधळ होतो, ही खेदाची बाब आहे. प्रत्येक खासदाराने मग तो कोणत्याही पक्षाचा असो, आपल्या दायित्वाचे भान ठेवले पाहिजे, आत्मपरीक्षण केले पाहिजे, असे आवाहन त्यांनी केले. शपथ घेताना आमच्याकडून ज्या जबाबदारीच्या आचरणाची अपेक्षा असते, त्याचे दर्शन सदस्यांनी सभागृहात घडवले पाहिजे. यातून आमच्या लोकशाहीचे तसेच देशातील जनतेचे कल्याण होईल, असे धनकड म्हणाले.

गोंधळ वाढत असल्याचे पाहून धनकड यांनी कामकाज १२ वाजेपर्यंत स्थगित केले. सभागृहाचे नेते जे. पी. नड्डा आणि विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खडगे यांना त्यांनी आपल्या दालनात चर्चेसाठी बोलावले. दुपारी १२ वाजता कामकाज सुरू झाल्यानंतर पुन्हा गोंधळ सुरू झाला, त्यामुळे त्यांनी सभागृहाचे अनिश्चितकाळासाठी स्थगित केले. (तभा वृत्तसेवा)

# गोंधळामुळे संसदेच्या कामकाजाची उत्पादकता कमी : किरेन रिजिजू

◆ **नवी दिल्ली, २० डिसेंबर**



हिवाळी अधिवेशनादरम्यान दोन्ही सभागृहात झालेल्या गोंधळामुळे संसदेच्या कामकाजाची उत्पादकता कमी झाली. लोकसभेत ५७.८७ टक्के तर राज्यसभेत ४०.०३ टक्के कामकाज झाले, असे संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांनी सांगितले.

संसदेच्या हिवाळी अधिवेशनाचे सूप वाजल्यानंतर संसदभवन परिसरात आयोजित पत्रपरिषदेत रिजिजू म्हणाले की, विरोधी सदस्यांच्या मर्यादाहिन वागणुकीमुळे तसेच गोंधळामुळे संसदेच्या प्रतिष्ठेला तर धक्का बसलाच, दोन्ही सभागृहांचे कामकाजही प्रभावित झाले. संसदेच्या कामकाज उत्पादकतेत घट झाल्यामुळे आम्ही चिंतित आहोत. दोन्ही सभागृहांच्या कामकाजाची क्षमता १०० टक्क्यापेक्षा जास्त आहे, पण विरोधी सदस्यांच्या गोंधळामुळे कामकाजात अडथळा येतो, असे ते म्हणाले.

प्रश्नोत्तराच्या तासात सदस्यांच्या प्रश्नांना उत्तर देण्यासाठी मंत्री अभ्यास करून येतात, पण विरोधकांच्या गोंधळामुळे त्यांना उत्तर देता येत नाही. सदस्यांनाही पूरक प्रश्न विचारता येत नाही. एकप्रकारे विरोधी सदस्य इतर सदस्यांच्या अधिकारावर आपल्या वागणुकीने घाला घालतात, असे ते म्हणाले.

संसदेचे कामकाज सुरळीत चालावे म्हणून आमच्या परीने खूप प्रयत्न केले, पण त्याला यश आले नाही. आता संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात तरी विरोधी पक्षांनी गोंधळ घालू नये, असे आमचे त्यांना आवाहन असल्याचे ते म्हणाले. (तभा वृत्तसेवा)

#### लोकसभेत २०, राज्यसभेत १९ बैठका



हिवाळी अधिवेशनाच्या काळात लोकसभेच्या २० तर राज्यसभेच्या १९ बैठका झाल्या. लोकसभेत पाच तर राज्यसभेत चार विधेयके सादर करण्यात आली. यापैकी दोन्ही सभागृहात वायुयान विधेयक पारित झाले. भारतीय संविधानाच्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त २६ नोव्हेंबरला संसदभवनात एका विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. संसदेच्या दोन्ही सभागृहात संविधानावर चर्चा झाली. लोकसभेत १३ आणि १४ डिसेंबरला, तर राज्यसभेत १६ आणि १७ डिसेंबरला ही चर्चा झाली. लोकसभेत १५ तास ४३ मिनिटे झालेल्या चर्चेत ६२ सदस्यांनी भाग घेतला. राज्यसभेत १७ तास ४१ मिनिटे चाललेल्या चर्चेत ८० सदस्य सहभागी झाले. लोकसभेत या चर्चेचे उत्तर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी, तर राज्यसभेतील चर्चेचे उत्तर गृहमंत्री अमित शाह यांनी दिले, असे रिजिजू म्हणाले. यावेळी सांसदीय कामकाज राज्यमंत्री अर्जुनराम मेघवाल आणि मुरुगन उपस्थित होते.

### ८ कोटींची विदेशी सिगारेट जप्त

**ऐझवाल, २० डिसेंबर**

आसाम रायफल्सच्या जवानांनी पूर्व मिझोरामच्या चंफई आणि राज्याच्या दक्षिणेकडील लाँगतलाई जिल्ह्यात भारत-म्यानमार सीमेजवळ दोन वेगवेगळ्या कारवायांमध्ये ८ कोटी रुपयांची तस्करी केलेली विदेशी सिगारेट व बर्मिज सुपारी जप्त केली.

बुधवारी लाँगतलाई जिल्ह्यातील चेरहलून परिसरात बुधवारी मिझोरम पोलिसांच्या मदतीने निमलष्करी दलाच्या जवानांनी केलेल्या कारवाईत म्यानमारमधून तस्करी केलेले विदेशी सिगारेटचे ६00 बॉक्सेस जप्त केले, असे आसाम रायफल्सच्या अधिकाऱ्याने सांगितले. जप्त केलेल्या सिगारेट्सची किंमत सुमारे ७.८ कोटी रुपये आहे. त्याच दिवशी शेजारच्या हन्थियाल जिल्ह्यातील थिंगसाई गावात जप्त केलेल्या सिगारेट राज्य पोलिसांना सुपूर्द करण्यात आल्या, असे तिने सांगितले. आणखी एका कारवाईत, आसाम रायफल्स आणि सीमाशुल्क विभागाच्या अधिकाऱ्यांच्या पथकाने बुधवारी चंफई जिल्ह्यातील हम्मेल्था येथे ४,४00 किलो तस्करीच्या बर्मिज सुपारी जप्त केल्या.

# नाराज आमदारांची शिंदेंनी काढली समजूत

◆ **नागपूर, २० डिसेंबर**



राज्यात महायुतीची सत्ता आली, त्यानंतर मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्रिपदाची शपथदेखील घेण्यात आली. पण, मंत्रिपदाची शपथ त्या-त्या पक्षातील आमदारांनी घेतल्यानंतर महायुतीमध्ये पुन्हा एकदा नाराजीनाट्याची सुरुवात झाली.

शुक्रवारी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी नाराज आमदारांची भेट घेतली. त्यानंतर प्रसार माध्यमांशी बोलताना पुन्हा एकदा मंत्रिमंडळात खांदेपालट होण्याची शक्यता असल्याचे संकेत दिले. एकनाथ शिंदे यांनी शिवसेनेचे आमदार विजय शिवतारे आणि प्रकाश सुर्वे यांची नाराजी भेटून दूर केली, असे त्यांनी पत्रपरिषदेत सांगितले. ते म्हणाले की, ज्या आमदारांना मंत्रिपद दिले, त्यांची क्षमता आहे आणि ज्यांना मंत्रिपद देण्यात आले नाही, त्यांची क्षमता नाही, असे मुळीच नाही. आपल्याकडे जास्त लोकं निवडून आले आणि मंत्र्यांची संख्या कमी आहे. त्यामुळे श्रद्धा, सबुरी ठेवणे गरजेचे आहे. पण, मी विश्वासाने सांगतो की, जे पहिल्या टप्प्यात मंत्री झाले नाही, त्यांना दुसऱ्या टप्प्यात संधी मिळेल, असे म्हणत त्यांनी नाराज आमदारांची समजूत काढण्याचा प्रयत्न केला आहे. (तभा वृत्तसेवा)

### नगरविकास, आरोग्य विभागाच्या पुरवणी मागण्या मंजूर

◆ **नागपूर, २० डिसेंबर**

नगरविकास व सार्वजनिक आरोग्य विभागाच्या २०२४-२०२५ या वर्षासाठीच्या ३ हजार ४६२ कोटी १७ लाख रुपयांच्या पुरवणी मागण्यांना विधानसभेत मंजुरी देण्यात आली. त्यात नगर विकास विभागाच्या २ हजार ७७४ कोटी ४३ लाख आणि सार्वजनिक आरोग्य विभागाच्या ६८७ कोटी ७४ लाख रुपयांच्या पुरवणी मागण्यांचा समावेश आहे.

**३,४६२ कोटींची तरतूद**

उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले की, पुरवणी मागणीवरील चर्चेत काही सदस्यांनी महानगरपालिका, नगरपालिकांच्या अखत्यारीत असलेले प्रश्न उपस्थित केले. या खेरीज सामान्य प्रशासन, गृह, महसूल व वन, शालेय शिक्षण व क्रीडा, वित्त, जलसंपदा, विधी व न्याय, ग्राम विकास, अन्न नागरी पुरवठा यासह विविध विभागाच्या पुरवणी मागण्याही विधानसभेत मंजूर करण्यात आल्या. (तभा वृत्तसेवा)

# एक देश एक निवडणूक जेपीसीकडे

### समिती सदस्यांच्या नावांचा प्रस्ताव आवाजी मतदानाने पारित

#### लोकसभेचे २७, राज्यसभेचे १२ सदस्य

◆ **नवी दिल्ली, २० डिसेंबर**

'एक देश एक निवडणूक' विधेयक सरकारने संयुक्त संसदीय समितीकडे पाठवले आहे. या समितीत लोकसभेचे २७ तर राज्यसभेचे १२ असे ३९ सदस्य आहे.

लोकसभेत विधि आणि न्याय मंत्री अर्जुनराम मेघवाल यांनी हे विधेयक संयुक्त संसदीय समितीकडे पाठवण्याचे संकेत दिले होते. त्यानुसार मेघवाल यांनी गुरुवारी रात्री या संसदीय समितीतील सदस्यांच्या नावांची घोषणा केली. समितीतील सदस्यांच्या नावांबाबतचा प्रस्ताव मेघवाल यांनी आज दोन्ही सभागृहात मांडला आणि तो आवाजी मतदानाने पारित करण्यात आला.

या समितीत लोकसभेतील भाजपाचे अनुराग ठाकूर, संजय जयस्वाल, पुरुषोत्तम रूपाला, पी. पी. चौधरी, संबित पात्रा, अनिल बलुनी, बांसुरी स्वराज, भर्तुहरी मेहताब, बिष्णुदत्त शर्मा, बैजयंत पांडा, सी. एम. रमेश, विष्णुदयाल राम, काँग्रेसतर्फे प्रियांका वढेरा, मनीष तिवारी, तृणमूल काँग्रेसचे कल्याण बॅनर्जी, शिवसेना एकनाथ शिंदे गटाचे श्रीकांत शिंदे, उबाठाचे अनिल देसाई, अजित पवार गटाच्या सुप्रिया सुळे याशिवाय सुखदेव भगत, छोटेलाल, हरीश बालयोगी, चंदन चौहान, टीएम सेल्वागणपती, के. राधाकृष्णन्, सांभवी आणि बालशौरी वल्लभनेनी यांचा समावेश आहे.

समितीत राज्यसभेतील घनश्याम तिवाडी, भूवनेश्वर कलिता, के. लक्ष्मण, कविता पाटीदार, संजयकुमार झा, रणदीप सुर्जेवाला, मुकुल वासनिक, साकेत गोखले, संजयसिंह, पी. विल्सन, मानसरंजन मंगराज आणि व्ही. विजय साईरेड्डी यांचा समावेश आहे. (तभा वृत्तसेवा)

# जयपूरमध्ये एलपीजी टँकरचा भीषण स्फोट

### प्रवासी बस जळाली, १३ ठार, ३५ जखमी

**जयपूर, २० डिसेंबर**

जयपूरमध्ये एलपीजी टँकरच्या स्फोटात स्लीपर बसही जळाली. यात १३ जणांचा मृत्यू झाला असून, ३५ जण जखमी झाले. १४ प्रवासी आणि ड्रायव्हर-कंडक्टर बेपत्ता आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या घटनेवर तीव्र दुःख व्यक्त केले असून, मृतांच्या कुटुंबीयांच्या दुःखात आपण सहभागी असल्याचे म्हटले आहे.

टँकरच्या स्फोटानंतर लागलेल्या आगीच्या ज्वाळा इतक्या मोठ्या होत्या की, वर उडणारे अनेक पक्षीही यात दगावले. बस आणि ट्रकसह महामार्गावरील अनेक वाहनांनाही आग लागली.

आगीच्या उकाड्यामुळे दुचाकीस्वाराचे हेल्मेट पिघळून चेहऱ्याला चिकटले आणि त्याचे डोळेही भाजले. शुक्रवारी सकाळी दिल्ली पब्लिक स्कूलजवळ एलपीजी टँकर आणि ट्रक यांच्यात झालेल्या भीषण टक्करमध्ये १३ जण जिवंत जळाले. या अपघातात ३५ जण भाजले. अपघातानंतर अनेक तासपर्यंत लोकांच्या डोळ्यात जळजळ जाणवत होती.

एलपीजीने भरलेला टँकर अजमेरहून जयपूरला येत होता. डीपीएस शाळेसमोर टँकर यू-टर्न घेत होता. जयपूरकडून येणाऱ्या ट्रकने गॅस टँकरच्या नोझलला धडक दिली. नोझलमधून सुमारे १८ टन वायू हवेत पसरला आणि २०० मीटरचा परिसर गॅस चेंबर बनला. काही सेकंदांनंतर टँकरमध्ये मोठा स्फोट झाला आणि आग जवळच्या वाहनांपर्यंत पसरली. अपघातस्थळापासून १00 मीटर अंतरावर तेलाची पाईपलाईन आहे. मात्र, ती सुरक्षित आहे. बसच्या मुख्य गेटलाही कुलूप होते. त्यामुळे लोकांना बाहेर येण्यास उशीर झाला आणि अनेकांचा मृत्यू झाला. या अपघातात बस चालकाला पहिला फटका बसला. घटनास्थळी २ ते ३ किलोमीटर परिसरात रस्त्यावर उभी असलेली सर्व वाहने आगीच्या भक्ष्यस्थानी पडली. पेटलेल्या वाहनांची संख्या ३५ च्या आसपास असल्याचे समजते. यानंतर सुमारे तासभर स्फोटांचे आवाज ऐकू येत होते. वेगाने पसरणाऱ्या वायूमुळे अपघाताची तीव्रताही जास्त होती. शेजारी राहणाऱ्या लोकांनी सांगितले की, स्फोट ऐकून ते बाहेर आले, तेव्हा लोक इकडे तिकडे धावत होते. बरेच लोक जळणारे कपडे काढण्याचा प्रयत्न करीत होते. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या घटनेवर तीव्र दुःख व्यक्त केले असून, मृतांच्या कुटुंबीयांच्या दुःखात आपण सहभागी असल्याचे म्हटले आहे.



# ताम्हिणी घाट बस अपघातातील मृतांना ५ लाखांची मदत जाहीर

**रायगड, २० डिसेंबर**

ताम्हिणी घाटातील बस दुर्घटनेतील मृतांच्या कुटुंबियांना प्रत्येकी पाच लाख रुपयांची आर्थिक मदत देण्यात येईल, अशी घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस यांनी विधानसभेत केली आहे. पुणे येथून महाडकडे जाणाऱ्या बसला ताम्हिणी घाटात (दि.२०) अपघात झाला. ही दुर्घटना अत्यंत दुर्दैवी असल्याचेही मुख्यमंत्री म्हणाले.

रायगड जिल्ह्यातील माणगाव तालुक्यातील ताम्हिणी घाटात एका खाजगी बसच्या झालेल्या अपघातात ५ प्रवाशांचा मृत्यू झाल्याची घटना अतिशय दुर्दैवी आहे. त्यांना मी भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करतो. या घटनेत २७ जखमी जण जखमी असून त्यांच्यावर उपचार करण्यात येत आहे, त्यांच्या प्रकृतीत लवकर सुधारणा होवो, अशी मी ईश्वरचरणी प्रार्थना करतो. या अपघातातील मृतांच्या वारसांना ५ लाख रुपये आर्थिक मदत राज्य सरकारतर्फे देण्यात येईल, अशी माहिती राज्याच्या विधानसभेत देवेंद्र फडणवीस यांनी दिली. ताम्हिणी घाटात कोंडेसर गावाजवळ खाजगी बसचा अपघाता झाला, यात ५ जणांचा मृत्यू झाला आणि २७ लोकं जखमी झाले आहेत. मृतांच्या नातेवाईकांना मदत मिळावी यासाठी सभागृहात निवेदन केले आणि मुख्यमंत्र्यांनी याला मान्यता दिली असल्याचे भरत गोगावलेंनी सांगितले आहे. प्रत्येक मृताच्या नातेवाईकांना पाच लाख रुपये मदत देण्यात येणार आहे. अपघात कुठेही झाला तरी महाराष्ट्रातील जनता आहे त्यांना मदत करणे आपले कर्तव्य आहे ते मुख्यमंत्र्यांनी पार पडले असल्याचेही गोगावले म्हणाले. अपघातात एकूण ४५ प्रवाशी प्रवास करत होते.... २५ हून अधिक प्रवाशी जखमी असल्याची प्राथमिक माहिती आहे.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## महत्त्वाचे

### राष्ट्रीय नेमबाजीत हरयाणाच्या सुरुचीला तिहेरी सुवर्णपदक




**नवी दिल्ली :** येथील डॉ. करणी सिंग शूटिंग रेंज येथे सुरू असलेल्या ६७ व्या राष्ट्रीय नेमबाजी अजिंक्यपद स्पर्धेत शुक्रवारी महिलांच्या एअर पिस्तूल स्पर्धेत हरयाणाच्या किशोरवयीन नेमबाज सुरुचीने तिहेरी सुवर्णपदकांचा मान पटकावला. सुरुची आजच्या दिवसाची तारा ठरली. दुहेरी ऑलिम्पिक कांस्यपदक विजेत्या मनू भाकेरच्या समान श्रेणीत पाच वर्षांपूर्वी नेमबाजीच्या खेळाला सुरुवात करणाऱ्या झज्जर येथील लष्कराच्या दिग्गजाच्या मुलीने महिलांच्या १० मीटर एअर पिस्तूलच्या अंतिम फेरीत २४३.१ गुणांसह आपले पहिले-वहिले वरिष्ठ राष्ट्रीय विजेतेपद पटकावले. यापूर्वी तिने कनिष्ठ गट राष्ट्रीय विजेतेपद व युवा गटाचे विजेतेपद पटकावले आहे. सुरुची आठ महिलांच्या अंतिम फेरीत इन-फॉर्म नेमबाज म्हणून ५८५ गुणांसह अव्वल स्थानी राहिली. चंदीगडच्या सैन्यमने सुरुचीला कनिष्ठ गटाच्या अंतिम फेरीत कडवी झुंज दिली, तरीही सुरुचीने २४५.१ असा विजय मिळवला. युवा गटात सुरुचीने (२४५.५) उत्तर प्रदेशच्या संस्कृती बानावर मात करून सुवर्णपदक पटकावले.

### वर्ल्ड टेनिस लीगमध्ये सुमित नागल चमकला

**अबू धाबी :** भारताचा अव्वल एकेरी टेनिसपटू सुमित नागलने टीएसएल हॉक्स म्हणून दुहेरीत चांगली कामगिरी केली. सलामीच्या सामन्यात नाट्यमय सुपर शूटआऊटमध्ये जोरदार मुसंडी मारत नागलने होनो एफ एक्स ईगल्सचा २१-१४ असा पराभव केला. येथील प्रतिष्ठित इतिहाद एरिना येथे वर्ल्ड टेनिस लीग तिसऱ्या हंगामात शुक्रवारी आर्यना सबालेन्का व मिरा ॲण्ड्रीव्हाने महिला दुहेरीत उत्कृष्ट समन्वय दाखवून होनो एफएक्सच्या इगा स्वियातेक व पॉला बडोसाविरुद्ध वर्चस्व गाजवले.

### सातनदुधनी येथे ६६ हजारांची घरफोडी

**अक्कलकोट, २० डिसेंबर -**

तालुक्यातील सातनदुधनी येथे गुरुवारी रात्री सव्वाएकच्या सुमारास अज्ञात चोरट्याने बंद घराचे कडी-कोयंडा उचकटून रोख रक्कम ४० हजार तसेच २६ हजारांचे सोन्याचे दागिने असा ६६ हजार रुपयांचा मुद्देमाल चोरुन नेला. याबाबत अज्ञात चोरट्याविरुद्ध दक्षिण पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल झाला आहे. फिर्याद आप्पाराव तिपण्णा देवकते (वय ५४) यांनी दक्षिण पोलीस स्टेशन येथे फिर्याद दिली. फिर्यादी हे शेती करतात. त्यांची पत्नी हेमलता या गावातच अंगणवाडी सेविका म्हणून नोकरी करतात. राहते घर जुने झाल्याने गावातील लमाण तांडा रोडलगत नवीन घराचे बांधकाम सुरु केलेले आहे. १९ डिसेंबर रोजी रात्री ९ च्या सुमारास फिर्यादी व पत्नी असे जुन्या घरात जेवण करुन घर बंद करुन नवीन घर बांधकामाचे ठिकाणी मुक्कामास गेले होते. मध्यरात्री सव्वाएकच्या सुमारास मोबाईलवर शेजाऱ्यांनी चोरीची फोनवर माहिती दिली. अज्ञात चोरट्याने कपाटातील ड्राव्हरमध्ये ठेवलेली रोख रक्कम ४० हजार, कानातील सोन्याचे वेल ५ ग्रॅम २० हजार, टेलीफोन व शोले आदी सहा हजार असे एकूण ६६ हजार रूपयाचा ऐवज चोरून नेला.

### उडगी येथून मोटारसायकलची चोरी

**अक्कलकोट, दि. २० डिसेंबर-**

तालुक्यातील उडगी येथे १९ डिसेंबर रोजी रात्री १० वा. पासून दि. २० डिसेंबर रोजी सकाळी ६ वा. पूर्वी घरासमोर लावलेली २५ हजार रूपये किंमतीची मोटारसायकल (क्र. एम. एच. १३/ डी. एल. ७६०१) अज्ञात चोरट्याने चोरून नेली. याबाबत शेतकरी पंडीत गुरुनिंगप्पा म्हेत्रे (वय ५०) यांनी फिर्यादी दिल्याने चोरट्याविरोधात दक्षिण पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल झाला आहे. रात्री उडगी गावातील घरासमोर हँडल लॉंक करुन लावलेली मोटारसायकल कोणीतरी अज्ञात चोरट्याने चोरुन घेऊन गेला.

# जय शाह, आशिष शेलार यांच्या जागी नवीन निवड होणार

## बीसीसीआयची विशेष सार्वजनिक सभा १२ जानेवारी रोजी मुंबईत

**नवी दिल्ली, २० डिसेंबर**

या महिन्याच्या सुरुवातीला जय शाह आणि आशिष शेलार यांची दोन पदे रिक्त झाल्यानंतर बीसीसीआय १२ जानेवारी रोजी मुंबईत विशेष सर्वसाधारण सभा (एसजीएम) घेऊन आपले नवीन सचिव आणि खजिनदार निवडणार आहे.

बीसीसीआयच्या घटनेत असे नमूद केले आहे की, कोणतेही रिक्त पद ४५ दिवसांच्या आत विशेष सर्वसाधारण सभा बोलावून भरले जावे. बीसीसीआयची आगामी एसजीएम अंतिम मुदतीच्या ४३ दिवसांच्या आत होणार आहे.

होय, गुरुवारी सर्वोच्च परिषदेच्या बैठकीनंतर, संलग्नित राज्य संघटनांना एसजीएमच्या तारखेबद्दल अधिसूचना पाठविण्यात आली असून ही बैठक बीसीसीआय मुख्यालयात १२ जानेवारी रोजी होणार आहे, असे राज्य संघटनेच्या अध्यक्षांनी वृत्तसंस्थेला सांगितले.

जय शाह यांनी यापूर्वीच १ डिसेंबर रोजी आयसीसीचे सर्वात तरुण अध्यक्ष म्हणून पदभार स्वीकारला आहे आणि भाजपाचे अनुभवी राजकारणी शेलार यांनी नुकत्याच स्थापन झालेल्या महाराष्ट्र सरकारमध्ये कॅबिनेट मंत्री म्हणून शपथ घेतली आहे.

सर्वोच्च न्यायालयाने स्वीकारलेल्या लोढा समितीच्या सुधारणांनुसार एका व्यक्तीला दोन पदे भूषवता येणार नाहीत. अनिवार्य कूलिंग ऑफ कालावधीपूर्वी बीसीसीआयच्या कार्यकाळात एक वर्ष शिल्लक असलेल्या शाह यांनी आवश्यकतेनुसार आपले पद सोडले.

शेलार हे महाराष्ट्र भाजपाचे अध्यक्ष आहेत, त्यांना बीसीसीआयचे पद सोडावे लागले कारण लोढा रिफॉर्म्स कोणत्याही मंत्री किंवा लोकसेवकाला पदाधिकारी बनू देत नाहीत. मानद सचिव व मानद खजिनदार ही पदे रिक्त झाल्यामुळे, ती उर्वरित कालावधीसाठी निवडणुकीच्या मार्गाने विशेष सर्वसाधारण सभेत निवड होणे आवश्यक आहे.

या संदर्भात, सर्वोच्च परिषदेला भारताचे माजी मुख्य निवडणूक आयुक्त अचल कुमार ज्योती यांची विशेष सर्वसाधारण सभेत बीसीसीआयच्या निवडणुका घेण्यासाठी निवडणूक अधिकारी म्हणून नियुक्तीला मान्यता देण्याची विनंती करण्यात आली आहे, असे त्यात नमूद करण्यात आले आहे.

७१ वर्षीय अचल कुमार ज्योती हे १९७५ बॅचच्या गुजरात कॅडरच्या निवृत्त आयएएस अधिकारी आहेत. त्यांनी जुलै २०१७ ते जानेवारी २०१८ पर्यंत भारताचे मुख्य निवडणूक आयुक्त म्हणून काम केले.

सध्या, आसामचे देवजित सैकिया हे बोर्डाच्या अंतरिम सचिवाची जबाबदारी पार पाडत आहेत, तर खजिनदाराचे पद रिक्त आहे. सचिव व खजिनदार या दोघांची निवड एकमताने होईल, अशी आशा आहे. (वृत्तसंस्था)

# भारतीय महिला अंतिम फेरीत

## आशिया चषक १९ वर्षांखालील क्रिकेट

### फिरकीपटू आयुषी शुक्लाचे ४ बळी



सामनावीर आयुषी शुक्लाचे अभिनंदन करताना सहकारी

**सिंगापूर, २० डिसेंबर**

भारताच्या १९ वर्षांखालील कनिष्ठ महिलाक्रिकेट संघाने आपली विजयी घोडदौड कायम राखत एसीसी १९ वर्षांखालील महिला आशिया चषक क्रिकेट स्पर्धेच्या अंतिम फेरीत धडक मारली. शुक्रवारी अखेरच्या सुपर फोर सामन्यात भारताने श्रीलंकेवर ३१ चेंडू शिल्लक ठेवत ४ गड्यांनी विजय मिळविला. १० धावांत ४ बळी टिपणारी आयुषी शुक्ला सामनावीर पुरस्काराची मानकरी ठरली.

कर्णधार निकी प्रसादने गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतल्यानंतर डावखुऱ्या फिरकीपटू आयुषी शुक्लाने आपल्या चार षटकांत केवळ १० धावा देत ४ बळी टिपलेत. भारताने श्रीलंकेला ९ बाद ९८ धावांवर रोखले. डाव्या हाताने फिरकी गोलंदाजी करणारी पारुनिका सिसोदियाने २ बळी, तर शबनम शकील व दृथी केसरीने प्रत्येकी एक बळी टिपला. भारताचे वर्चस्व इतके होते की श्रीलंकेचे केवळ दोन फलंदाज- सुमुदु निसानसाला (२१) आणि कर्णधार मनुडी नानायककारा (३३) दोन अंकी धावा करू शकल्या. या दोघींनी पाचव्या गड्यासाठी २२ धावांची भागीदारी केली. सलामी जोडी संजना कविंदी (९) व हिरुनी हंसिका (२) केवळ १२ चेंडूंपर्यंत सोबत राहिल्यामुळे श्रीलंका संघाची सुरुवात वाईट झाली.

विजयासाठी ९९ धावांचा पाठलाग करताना तिसऱ्या सलामीवीर ईश्वरी अस्वारेने शून्यावर बाद झाल्यामुळे भारताची सुरुवात वाईट झाली. मात्र त्यानंतर जी. कमलिनी (२८) व गोंगडी त्रिशाने (३२) दमदार फलंदाजी करत भारताच्या विजयाच्या आशा पल्लवीत केल्या. मिथिला विनोद (१७) व आयुषी शुक्लाने (१) नाबाद खेळी करत भारताचा विजय साकार केला. भारताने १४.५ षटकांत ६ बाद १०२ धावा केल्या. श्रीलंकेकडून डावखुरी फिरकीपटू चामोडी प्रबोडाने १६ धावांत ३ बळी टिपलेत.

भारताने आपल्या सलामीच्या सामन्यात पाकिस्तानला नऊ गडी राखून पराभूत केले होते. नंतर बांगलादेश व श्रीलंकेचा पराभव केला होता, तर नेपाळविरुद्धच्या लढतीत कोणताही निकाल लागला नाही. (वृत्तसंस्था)

# सोलापूरचे संभाव्य जिल्हा कबड्डी संघ जाहीर

## सांगलीतील सांगवाडी येथे होणाऱ्या राज्य स्पर्धेत भाग घेणार

**सोलापूर, दि. २० डिसेंबर-**

जिल्ह्याचे संभाव्य कुमार कबड्डी संघ जाहीर करण्यात आले. टकारी समाज संघटनेने आयोजित केलेल्या टकारी चषक सोलापूर जिल्हा अजिंक्यपद कुमार व कुमारी कबड्डी स्पर्धेतून अंतिम संघ निवडण्यात आले. कुमार संघ निवड समिती सदस्य योगेश माने, अंबादास गायकवाड, संजीव शिंदे व प्रवीण जाधव तर कुमारीचे संघ प्राध्यापक सुवर्णा कांबळे, विनोद जाधव, समीर बिजापुरे यांनी निवडले. राज्य स्पर्धा सांगवाडी (जि. सांगली) येथे २८ डिसेंबर ते १ जानेवारी दरम्यान होणाऱ्या राज्य अजिंक्यपद निवड चाचणी स्पर्धेत भाग घेतील

**संभाव्य जिल्हा संघ : कुमारी :** कीर्ती माने, धनश्री तेली, पूजा जाधव, प्रगती वायदंडे, पायल पवार, साक्षी गोरे, अनुराधा अजनेरी, नीरजा गौडा, अबोली भंडारी, वैष्णवी खोसे, शुभ्रा चव्हाण, दामिनी हजारे, संजीवनी गुरव, सपना माशाळे.

**कुमार :** वेदांत चोरमुले, आदित्य वाकसे, शिवांग आंबट, शुभम राठोड, आदित्य नरळे, समर्थ जाधव, संकेत कोटी, केशव गायकवाड, समर्थ पवार, पवन फुलारी, विनय अलकुंटे, राज गाडे, शुभम हुलके, सोहम गायकवाड, सक्षम गायकवाड.

# मनस्वी सोनके हिस दुहेरी मुकुट

## बाल मैदानी स्पर्धेचा बक्षीस वितरण उत्साहात

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २० डिसेंबर-**

बाल मैदानी स्पर्धेत मनस्वी सोनके हिने चौथीच्या गटात ५० मीटर धावणे व शटल रनमध्ये प्रथम क्रमांक पटकावित दुहेरी मुकुट संपादिला.

राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष व श्री स्पोर्टस अकॅडमी यांच्या संयुक्त विद्यमाने शरदचंद पवार प्रशाला येथे ज्येष्ठ नेते शरदचंद्र पवार यांच्या ८५व्या वाढदिवसानिमित्त इयत्ता नर्सरी ते सातवीच्या खेळाडूंच्या या स्पर्धेचे आयोजन केले होते. या स्पर्धेचे बक्षीस वितरण शहराध्यक्ष सुधीर खरटमल, माजी उपमहापौर नाना काळे यांच्या हस्ते देण्यात आली. यावेळी शंकर पाटील, आप्पासाहेब सपाटे, चंद्रकांत पवार, प्रशांत बाबर, अक्षय जाधव, मनीषा माने, नाना भोईटे, निशांत सावळे आदी उपस्थित होते. या स्पर्धेत ८४ खेळाडूंनी आपला सहभाग नोंदवला होता. या स्पर्धेत प्रथम तीन खेळाडूंना चषक, पदक व प्रमाणपत्र



देऊन गौरविण्यात आले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी श्री स्पोर्ट्स अकॅडमीचे अतुल सोनके, स्वप्नाली सोनके, शौनक गलगली यानी परिश्रम घेतले.

**अंतिम निकाल (प्रथम, द्वितीय, तृतीय) : ५० मीटर धावणे :** नर्सरी गट : सानवी धूत, नूरवी बलदवा, शिवांश काळे. एलकेजी गट : आरुष धूत, शिवम पाटणे रिदान राखा (संयुक्त द्वितीय), प्रीशा लाहोटी, राजवीर पवार (संयुक्त तृतीय). युकेजी गट : ऋत्विक कांबळे, रियांश चाकोते, हर्षवर्धन जाधव. इयत्ता पहिली गट : श्रीशा थोरात, आनंदी व्यवहारे, शिवन्या पाटणे. इयत्ता दुसरी गट : निकुंज दूत, राधिका भोसले, कैवल्य फेगडे. इयत्ता चौथी गट : मनस्वी सोनके, जय भगत, शिवरुद्र कारंडे. इयत्ता पाचवी ते सातवी : सिद्धी उमाप ,भावन्या उंडेली, रणजीत मोरे.

**शटल रन :** नर्सरी गट : नुरवी बलदवा, सानवी दूत, शिवम देशमुख, एलकेजी गट : रीधान राका, कैवल्य भोसले, अनुश्री काळे. युकेजी गट : अन्वी भट्टड, लासवी टेनका, इरा शेळके. इयत्ता पहिली गट- शिवण्या पाटणे, आनंदी व्यवहारे, श्रीशा थोरात. इयत्ता दुसरी गट : ऋतुजीत मोरे, निकुंज दूत, राधिका भोसले. इयत्ता तिसरी गट : सिद्धार्थ वेद, राहीशा निकंबे, इयत्ता चौथी गट : मनस्वी सोनके, हर्षदा जाधव, जय भगत. इयत्ता पाचवी ते सातवी गट : रणजीत मोरे, भावन्या उंडेली, सिध्दी उमाप.

# मिळाले दागिने अन् आजीबाई हसल्या

## चोरीला गेलेले दागिने समारंभपूर्वक परत

### नातेपुते पोलिसांची कामगिरी

**तभा वृत्तसेवा,**
**नातेपुते, दि. २० डिसेंबर-**

प्रवासासाठी बसमध्ये चढताना एका ८१ वर्षांच्या आजीबाईचे दागिने अज्ञात चोरट्यांनी चोरले. त्याचा गुन्हा दाखल झाला. पोलिसांनी तपासाची चक्रे फिरवून चोरांना गजाआड तर केलेच. त्यांचे चोरीला गेलेले दागिने हस्तगत केले. न्यायालयाची परवानगी घेतली आणि त्या ज्येष्ठ माऊलीला समारंभपूर्व दागिने प्रदाने केले. हा सगळा कौतुक सोहळा पोलिस ठाण्यात रंगला तेव्हा आजीबाई खुदकन हसल्या. इतरांनीही पोलिसांचे कौतुक केले.



२१ ऑगस्ट रोजी नातेपुते बसस्थानकातून ८१ वर्षांच्या आजीबाई भामाबई लक्ष्मण कर्चे (वय ८१, रा. पिंपरी, ता. माळशिरस) या नातेपुते बसस्थानकातून दहिवडी बसमध्ये चढत असताना गर्दीचा व वयस्कर असल्याचा फायदा घेऊन त्यांच्या गळ्यातील जवळपास १ तोळा वजनाचे ४० हजार रुपये किंमतीचे जुने वापरातील त्यांच्या गळ्यातील दोन डोरले व मणी मंगळसूत्र चोरून नेले होते. त्याबाबत नातेपुते पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला होता. त्याचा तपास पोनि महारुद्र परजने यांच्या मार्गदर्शनाखाली पोहेकॉ संदेश पवार हे करत होते. त्यांनी सदर गुन्ह्यात आरोपी राधाबाई रामदास शिंदे, रुक्मिणी छगन भोसले (दोन्ही रा. अंमळनेर, बीड), विमल कुमार लोखंडे (रा. बारामती) यांना अटक करून त्यांच्याकडे चोरीला गेलेला मुद्देमाल जप्त केला. चोरीतील मुद्देमाल माळशिरस कोर्टाचे प्रथम वर्ग न्याय दंडाधिकारी यु. बी. पेठे यांनी मूळ फिर्यादी यांना परत देण्याबाबत आदेश दिल्याने मूळ फिर्यादींना समारंभपूर्वक परत केला. त्यामुळे ८१ वर्षांच्या आजीबाईंनी पोलीस व न्यायालयाचे आभार व्यक्त केले. यावेळी प्रभारी अधिकारी महारुद्र परजने, पोलीस हवालदार रवींद्र गायकवाड, नवनाथ माने, सोमनाथ मोहिते, राहुल वाघमोडे, नेहा बोंदर, वैशाली शेंडगे आदी उपस्थित होते.

**आमच्या जमान्यात विश्वास होता, आता...?**

आमच्या जमान्यात एकमेकांवर विश्वास होता. असे बेविश्वासू लोक नव्हते. माझ्या जुन्या आठवणीचे मंगळसूत्र माझेच मला परत मिळाले. त्याचा आनंद शब्दात सांगता येत नाही. पोलिसांनी बहाद्दूर कामगिरी केली आहेत. अन्य चोरी किंवा गुन्ह्यांचा तपास करण्याची ताकद देवांनी द्यावी, अशा भावना भामाबाई कर्चे यांनी व्यक्त केल्या.

# अवैध वाळू वाहतूक; दोन ट्रॅक्टरसह वाळू जप्त

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. २० डिसेंबर-**

तालुक्यातील मुंढेवाडी ते कल्कर्जाळ रस्त्यावर कल्कर्जाळ फाट्याजवळ १९ डिसेंबर रोजी अडीच वाजण्याच्या सुमारास व कल्लकर्जाळ बसस्थानकजवळ पहाटे साडेपाचवाजता अवैध वाळू वाहतूक करणारे दोन ट्रॅक्टर पकडून दहा लाख ६४ हजार रुपये किंमतीचा मुद्देमाल पोलिसांनी ताब्यात घेतला आहे.

दोन वाहनांचे अज्ञात चालक, मालकांनी त्यांच्या ताब्यातील आरटीओ पासिंग नंबर नसलेल्या ट्रॅक्टरच्या ट्रॉलीमध्ये सीना नदी पात्रातून चोरुन वाळू भरुन त्याची विनापरवाना बेकायदेशिररित्या पर्यावरणाचा ऱ्हास होईल हे माहित असतानादेखील स्वत:च्या अर्थिक फायद्याकरीता वाहतूक करीत असताना मिळून आल्याने त्या अज्ञात ट्रॅक्टरचे चालक व मालकाविरुध्द अक्कलकोट दक्षिण पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल झाला आहे. पोहेकॉ शिवानंद मोसलगी व पोहेकॉ अनंत कोळी यांनी फिर्याद दिली. १८ डिसेंबर रोजी पोलिस निरीक्षक महेश स्वामी यांच्या आदेशान्वये अवैध वाळू वाहतुकीवर कारवाई करण्याकरीता सपोनि सुरवसे, पोहेकॉ कोळी, पोहेकॉ शिवानंद मोसलगी हे करजगी दूरक्षेत्र हद्दीत कल्लकर्जाळ रोडने सरकारी वाहनाने पेट्रोलिंग करीत असताना कल्लकर्जाळ येथील सीना



नदी पात्रातून अवैधरित्या एक वाळूने भरलेला ट्रॅक्टर येत आहे अशी बातमी मिळाली. पंचासहित मुंढेवाडी ते कल्लकर्जाळ रोड फाट्याजवळ व बसस्थानक जवळ थांबले असताना ट्रॅक्टर अवैध वाळू करताना दोन ट्रॅक्टर आढळून आले. ट्रॅक्टर चालकाने सदरचा ट्रॅक्टर कल्लकर्जाळ फाट्याजवळ रोडच्या बाजूला व स्टँन्ड बाजूला थांबवून पळून गेले. पाच लाख साठ हजार रूपये किंमतीचे ट्रॅक्टर व सातहजार रू.किंमतीचे हायड्रोलिक ट्रेलरच्या हौदामध्ये एक ब्रास वाळू जप्त केले. पहाटे चार लाख नव्वद हजार रूपये किंमतीचे ट्रॅक्टर व एक ब्रास वाळू असा दहा लाख ६४ हजारांचा मुद्देमाल ताब्यात घेतला. कलम ३०३ (२) व पर्यावरण संरक्षण अधिनियम कायदा कलम ९,१५ प्रमाणे गुन्हा दाखल झाला.

# ऊस वाहतूक वाहन, कारचा अपघात

## एकाचा मृत्यू, दोघे जखमी

**तभा वृत्तसेवा,**
**मंगळवेढा, दि. २० डिसेंबर-**

मंगळवेढा शहरातून ऊस वाहतूक करणार्या ट्रॅक्टरची व स्विफ्ट कारची जोराची धडक झाल्याने यामध्ये उमेश अशोक आवताडे (वय ३९, रा. खंडोबा गल्ली) यांचा जागीच मृत्यू झाला तर पोलीस हवालदार दौलतराया तळवार, अज्ञात एकजण असे दोघे गंभीर जखमी झाल्याची घटना शुक्रवार दि. २० रोजी पहाटे १.१७ वाजता घडली असून याची मंगळवेढा पोलीसात नोंद झाली आहे.

मंगळवेढा शहरातून दि.२० डिसेंबर रोजी रात्री १.१७ वाजता ट्रॅक्टर (क्र. एम. एच. ४५/ ए. एल. ६९१५) हा उसाचा असून स्विफ्ट कार (क्र. एम. एच. १२/ जे. के. ३८२५) या दोन्ही वाहनांची धडक झाल्याने उमेश आवताडे हे मयत झाले, तर कार मधील पोलीस हवालदार दौलतराया तळवार व अन्य एकजण गंभीर जखमी झाले आहेत. यामध्ये पोलीस हवालदार तळवार यांच्या पायास,डोक्यास, पोटास,हनुवटीवर मार लागला असून त्यांना पंढरपूर येथील खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. दरम्यान त्यांची प्रकृती गंभीर असल्याचे सुत्रांकडून सांगण्यात आले. अनोळखी व्यक्तीस डोक्यास,शरिरास गंभीर जखमी झाल्या आहेत. तो कार मध्ये अडकला होता. अपघाताची माहिती कळताच पोलीसांनी धावत जावून अडकलेल्या व्यक्तीला बाहेर काढले. हा अपघात वीरशैव मंगलकार्यालयासमोर झाला आहे. दरम्यान अपघातानंतर अज्ञात ट्रॅक्टर चालक फरार झाल्याचे सांगण्यात आले. याची खबर पोलीस नाईक कृष्णा जाधव यांनी पोलीसात दिली आहे. मागील दोन आठवड्यापुवी इंग्लिश स्कूलच्या गेट समोर ऊसाची दोन वाहने पलटी झाल्याची घटना होवूनही नगरपालिका प्रशासन व पोलीस प्रशासन मुग गिळून गप्प असल्यामुळेच हा बळी गेल्याची तक्रार नागरिकांची आहे. यापुर्वी प्रांताधिकारी व पोलीस अधिकारी लोकांच्या बळीची वाट पाहते काय? या मजकूराखाली वृत्त छापूनही कुठलीच दखल न घेतल्यामुळे ही दुर्घटना घडल्याने शहरवासीयांमधून प्रशासनाच्याविरुध्द संतापाची लाट उसळली आहे. आता तरी प्रशासनाला जाग येणार का? कमानीची उंची कमी करुन अवजड वाहने शहरातून बंद होणार का? असा संतापजनक सवाल विचारला जात आहे.

# मंद्रुप पोलिस ठाण्यात भरली शेतकऱ्यांची 'शाळा'

## सपोनि मनोज पवारांसह कृषी तज्ज्ञांनी केले मार्गदर्शन

**तभा वृत्तसेवा,**
**मंद्रुप, २० डिसेंबर-**



मानवी आरोग्य उत्तम राखण्यासाठी सेंद्रिय शेतीशिवाय पर्याय नाही. रासायनिक खतांच्या अतिवापरामुळे मानवी व प्राण्यांच्या आरोग्याला धोका निर्माण झाला आहे म्हणून सेंद्रीय शेती काळाची गरज आहे. शेतकरी जगला तरच जग जगेल अशी भावना व्यक्त करून येत्या काळात मंद्रुप परिसरातील शेतकऱ्यांसाठी शेती कार्यशाळेचे आयोजन करणार असल्याचे मंद्रुप पोलीस ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक मनोज पवार यांनी सांगितले.

मंद्रुप पोलिस ठाणे येथे सेंद्रीय शेती कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी मंद्रुपचे कृषी मंडळ अधिकारी किरण सावंत, मंद्रुपचे कृषी सहाय्यक अधिकारी रमेश फरताडे, निंबर्गीचे कृषी सहायक अशोक राठोड यांची प्रमुख उपस्थित होती. यावेळी सेंद्रीय शेतीबद्दल सविस्तर माहिती देताना अशोक राठोड यांनी देशांमध्ये शेतीविषयक झालेल्या बदलाचा आलेख सांगितले. या कार्यशाळेला मोठ्या प्रमाणात शेतकरी उपस्थित होते. मंद्रुप पोलिस ठाण्यात पहिल्यांदाच शेतकऱ्यांसाठी कार्यशाळा आयोजित केल्याबद्दल शेतकऱ्यांच्या वतीने मंद्रुप पोलिसांचे आभार व्यक्त करण्यात आले. यावेळी जावेद आवटे, सिकंदर मकानदार, सिकंदर आवटे, रविशंकर म्हेत्रे, महिबूब पठाण, सचिन फडतरे, बिळेणी सुंटे, विजयकुमार वाघमोडे, मौला मकानदार, बबलू शेख, शकिल कुडले व मंद्रुप परीसरातील शेतकरी उपस्थित होते. यावेळी महमद शेख यांनी सेंद्रीय शेतीबद्दल माहीती दिली.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## महत्त्वाचे

### दिल्लीतील अनेक शाळांना ई-मेलद्वारे बॉम्बच्या धमक्या

**नवी दिल्ली** : दिल्लीतील अनेक शाळांना शुक्रवारी बॉम्बच्या धमक्याचे ई-मेल प्राप्त झाले. गेल्या ११ दिवसांत अशा प्रकारची ही सहावी घटना घडली, असे अधिकाऱ्यांनी सांगितले. सुरक्षा कर्मचाऱ्यांनी शाळांमध्ये शोधमोहीम राबवली, पण काहीही संशयास्पद आढळले नाही. पोलिस, अग्निशमन विभाग, बॉम्ब शोधक पथके आणि श्वान पथक या शोध मोहिमेत सहभागी झाले होते. द्वारकामधील सुमारे पाच शाळांसह इतर जिल्ह्यांतील काही शाळांना असेच ईमेल प्राप्त झाले आहेत. काही ठिकाणी विद्यार्थ्यांना शाळेत न येण्यास सांगण्यात आले, तर काहींनी धमकी मिळाल्यानंतर ऑनलाईन वर्ग सुरू केले.

# बीड प्रकरणी पोलिस अधीक्षकांची बदली

### मुख्यमंत्री फडणवीस यांची घोषणा

### आरोपींवर मोक्का कायद्यांतर्गत कारवाई

◆ **नागपूर, २० डिसेंबर**

बीडमधील मस्सजोग गावाचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येप्रकरणी बीड जिल्ह्याच्या पोलिस अधीक्षकांवर कारवाईचा बडगा शासनाने उगारला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पोलिस अधीक्षकांची तत्काळ बदली करण्याची घोषणा सभागृहात केली.

संतोष देशमुख हत्या प्रकरणातील आरोपींना हुडकून काढणार असून, सूत्रधार कोणीही असला तरी, त्याच्यावर मोक्का कायद्यांतर्गत कारवाई केली जाईल, असे फडणवीस यांनी विधानसभेत शुक्रवारी स्पष्ट केले.

मुख्यमंत्री फडणवीस यांनी विधानसभेत परभणी हिंसाचार आणि बीडमधील संतोष देशमुख प्रकरणावर निवेदन सादर केले. ते म्हणाले की, मस्साजोगचे प्रकरण अतिशय गंभीर आहे. संतोष देशमुख यांच्या हत्येची पाळेमुळे खणावी लागतील. प्राप्त माहितीनुसार एव्हाडा एनर्जी यांनी बीडमध्ये पवनचक्कीमध्ये गुंतवणूक केली आहे. यातून काही लोकांना रोजगार मिळत



आहे. आम्ही सांगतो तोच दर द्या, अन्यथा खंडणी द्या, असा प्रकार सुरू आहे. अशोक घुले, नारायण घुले, प्रतीक घुले हे आरोपी दुपारी तिकडे गेले. तेथील वॉचमनला मारहाण केली. पीडितांनी सरपंचांना बोलाविले. आरोपी बाजूच्या गावचे होते. सरपंच देशमुख आणि अन्य काही जण तिथे पोहोचले, त्यांना चोप दिला. याचा व्हिडीओ व्हायरल झाला. ९ डिसेंबरला संतोषअण्णा चारचाकी वाहनातून गावी परत जात होते, ते एकटेच होते. पेट्रोल पंपावर आतेभाऊ भेटले, त्यांना सोबत घेऊन निघाले. टोल नाक्याजवळ काळ्या रंगाची स्कॉर्पिओ व एक गाडी वाट पाहत होती. नाक्यावर जाताच त्यांची गाडी अडवली. काच फोडून त्यांना बाहेर काढले आणि स्कॉर्पिओ गाडीत टाकून मारहाण केली. काही दिवसांनी त्यांची हत्या झाल्याचे समोर आले.

या प्रकरणात कुणीही सूत्रधार असला तरी, त्याच्यावर मोक्का कायद्यांतर्गत कारवाई केली जाणार असल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले. या प्रकरणाच्या चौकशीसाठी पोलिस महानिरीक्षक पातळीवरील एसआयटी स्थापन केली आहे.

◂(तभा वृत्तसेवा)

# नितीन गडकरी यांना डॉ. पंजाबराव देशमुख स्मृती पुरस्कार

### भाऊसाहेबांच्या जन्मदिनी २७ डिसेंबरला सोहळा

◆ **अमरावती, २० डिसेंबर**

श्री शिवाजी शिक्षण संस्थेतर्फे दिल्या जाणाऱ्या प्रतिष्ठेच्या डॉ. पंजाबराव देशमुख स्मृती पुरस्कारासाठी यावर्षी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांची निवड करण्यात आली आहे. पाच लाख रुपये रोख, स्मृतिचिन्ह, मानपत्र, शाल व श्रीफळ असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. शिक्षणमहर्षी डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांच्या १२६ व्या जयंती उत्सवानिमित्त २७ डिसेंबरला आयोजित मुख्य सोहळ्यात हा पुरस्कार प्रदान करण्यात येणार असल्याची माहिती श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख यांनी शुक्रवारी पत्रकार परिषदेत दिली.

या पुरस्काराव्यतिरिक्त यावर्षीपासून विदर्भातील दोन उत्कृष्ट शेतकरी महिलांना या सोहळ्यात पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येईल, असेही त्यांनी यावेळी



सांगितले.

भाऊसाहेबांच्या जन्मदिनी शुक्रवार २७ डिसेंबरला सकाळी ९ वाजता जयंती उत्सवाचा मुख्य सोहळा श्री शिवाजी शारीरिक शिक्षण महाविद्यालयाच्या भव्य प्रांगणात आयोजित करण्यात आला आहे. या सोहळ्याला केंद्रीय मंत्री नितीन गडकरी मुख्य अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत. खासदार शरदचंद्र पवार यांनी दिलेल्या दाननिधीतून विदर्भातील उत्कृष्ट शेतकरी महिलेला 'शारदाबाई पवार उत्कृष्ट महिला शेतकरी पुरस्कार' आणि श्री शिवाजी शिक्षण संस्थेच्या वतीने 'श्रीमती विमलताई देशमुख उत्कृष्ट महिला शेतकरी पुरस्कार' असे दोन पुरस्कार उत्कृष्ट महिला शेतकऱ्यांना दिला जाणार आहेत. रोख १,११,१११ रुपये, स्मृतिचिन्ह, सन्मानपत्र, केंद्र सरकारने डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या १२५ व्या जयंतीप्रीत्यर्थ प्रसारित केलेले १२५ रुपयांचे नाणे, साडी, चोळी, शाल व श्रीफळ असे शारदाबाई पवार उत्कृष्ट महिला शेतकरी पुरस्काराचे स्वरूप आहे, तर ५१,००० रुपये रोख, स्मृतिचिन्ह, साडी, चोळी, शाल व श्रीफळ असे 'श्रीमती विमलताई देशमुख उत्कृष्ट महिला शेतकरी पुरस्काराचे स्वरूप आहे.

या सोहळ्यात माध्यमिक शाळेतील खेळाडू विद्यार्थी व विद्यार्थिनीला क्रीडा क्षेत्रातील उल्लेखनीय प्रावीण्याबद्दल 'डॉ. पंजाबराव देशमुख क्रीडारत्न पुरस्कार' देखील प्रदान करण्यात येईल, असे त्यांनी सांगितले. पत्रकार परिषदेला संस्थेच्या कार्यकारणीचे सदस्य उपस्थित होते.◂(तभा वृत्तसेवा)

### नातवाचा ताबा मिळण्यासाठी अतुलची आई सुप्रीम कोर्टात

**नवी दिल्ली** : एआय अभियंता अतुल सुभाषची आई अंजू मोदी यांनी आपल्या चार वर्षांच्या नातवाच्या ताब्यासाठी सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली आहे. त्यांनी न्यायालयात हेबियस कॉर्पस याचिका दाखल केली आहे. मुलगा सुभाषची पत्नी निकिता आणि अटक करण्यात आलेले सासरे नातवाबाबत काही सांगत नसल्याचा दावा करण्यात आला आहे. सध्या नातवाचा ठावठिकाणा आमच्याकडे नाही. निकिताने बंगळुरू पोलिसांच्या चौकशीत सांगितले की, मुलगा काका सुशील सिंघानिया यांच्या ताब्यात आहे. त्याचे नाव फरीदाबादमधील एका बोर्डिंग स्कूलमध्ये नोंदवले गेले आहे. याठिकाणी सुशीलने मुलाबद्दल कोणतीही माहिती नसल्याचे सांगितले आहे. ■

### बेपत्ता झालेल्या ७ वर्षांच्या मुलाचा शोध सुरू

**मुंबई** : दोन दिवसांपूर्वी नीलकमल या प्रवासी फेरी नौका आणि नौदलाच्या स्पीड बोटदरम्यान झालेल्या अपघातानंतर बेपत्ता झालेल्या ७ वर्षीय मुलाचा शोध घेण्यासाठी नौदलाच्या नौकांनी सुरू केलेली शोधमोहीम शुक्रवारीही सुरूच होती, असे एका अधिकाऱ्याने सांगितले. गुरुवारी सायंकाळी ४३ वर्षीय व्यक्तीचा मृतदेह सापडला असून १८ डिसेंबरच्या दुर्घटनेतील मृतांची संख्या आता १४ वर पोहोचली आहे. नौदलाने शहराच्या बंदर क्षेत्रातील सर्वांत प्राणघातक अपघातांपैकी एकाची चौकशी सुरू केली आहे. शोध आणि बचाव मोहिमेचा भाग म्हणून बेपत्ता प्रवाशांचा शोध घेण्यासाठी नौदल व तटरक्षक दलाचे नौदल हेलिकॉप्टर व बोटी तैनात करण्यात आल्या आहे, असे अधिकाऱ्याने सांगितले. दोन्ही जहाजातील ११३ जणांपैकी १४ जणांचा मृत्यू झाला आणि दोन जखमींसह ९८ जणांना वाचवण्यात यश आले. नौदलाच्या नौकेत सहा जण होते, त्यापैकी दोन जण वाचले, असे अधिकाऱ्याने सांगितले. इंजिन ट्रायल करत असताना वेगवान नौदलाच्या नौकेवरील नियंत्रण सुटले व मुंबई किनाऱ्याजवळ 'नीलकमल' या प्रवासी फेरीला धडकल्याने ही दुर्घटना घडली.

# सौदी अरबला मिळाले 'पांढरे सोने'

◆ **नवी दिल्ली, २० डिसेंबर**

किंगडमचे क्राऊन प्रिन्स मोहम्मद बिन सलमान यांनी तेल आणि वायूवर आधारित सौदी अरबच्या अर्थव्यवस्थेत विविधता आणण्याचा एक नवीन मार्ग शोधला आहे. सौदी अरबला अलिकडेच समुद्राजवळील तेलक्षेत्रात लिथियमचे साठे सापडले आहेत.

सौदी अरब लवकरच लिथियम खाणकामाला चालना देण्यासाठी व्यावसायिक पायलट कार्यक्रम सुरू करेल, असे सौदीचे खाण व्यवहार मंत्री खालिद बिन सालेह अल-मुदैफर यांनी जाहीर केले. ते म्हणाले की, किंग अब्दुला विद्यापीठात विज्ञान आणि तंत्रज्ञानासाठी विकसित केलेल्या नवीन तंत्रज्ञानाद्वारे लिथियम काढले जात आहे आणि हे काम वेगाने सुरू आहे.

लिथियम हे आज कोणत्याही देशासाठी महत्त्वाचे आहे. लिथियमचा वापर प्रामुख्याने इलेक्ट्रिक वाहने, लॅपटॉप आणि स्मार्टफोनच्या बॅटरीमध्ये केला जातो. तेल क्षेत्रातून सोडल्या जाणाऱ्या मिठाच्या पाण्यातून लिथियम काढण्याचा खर्च मीठ प्रकल्पातून लिथियम काढण्याच्या पारंपारिक पद्धतीपेक्षा जास्त आहे. मात्र, लिथियमच्या किमती वाढल्यास हा प्रकल्प लवकरच फायदेशीर ठरू शकेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

**लिथियम हे जागतिक ऊर्जेचे भविष्य**

जगभरात जीवाश्म इंधनाचे साठे कमी होत आहेत. अशा परिस्थितीत लिथियम तेल आणि पारंपारिक जीवाश्म इंधन बदलण्यासाठी तयार आहे. लिथियम हा एक दुर्मिळ धातू आहे, ज्याला 'पांढरे सोने' असेही म्हटले जाते. इलेक्ट्रिक कार, लॅपटॉप आणि स्मार्टफोनपासून आपत्कालीन दिवे, खेळणी आणि दररोजच्या वापरत असलेल्या जवळजवळ प्रत्येक इलेक्ट्रॉनिक गॅझेटला ऊर्जा देण्यासाठी लिथियम-आयर्न बॅटरी वापली जाते. ◂(तभा वृत्तसेवा)

### रशियाच्या कॅन्सर लसीची किंमत २.५ लाख रुपये

**मॉस्को** : रशियाच्या कर्करोगावरील लसीच्या घोषणेनंतर जगभरातील कर्करोगाच्या रुग्णांमध्ये आशा निर्माण झाली आहे. रशियन आरोग्य मंत्रालयाच्या रेडिओलॉजी मेडिकल रिसर्च सेंटरचे संचालक आंद्रेई कॅप्रिन यांच्या म्हणण्यानुसार, ही रशियन कर्करोगाची लस वेगवेगळ्या प्रकारच्या रुग्णांसाठी वेगळ्या पद्धतीने बनवली जाईल. या फीचरमुळे त्याची किंमत सुमारे २.५ लाख रुपये असेल. रशियन नागरिकांना ही लस मोफत मिळणार आहे. मात्र, ही लस उर्वरित जगामध्ये कधी उपलब्ध होणार याबाबत कॅप्रिन यांनी कोणतीही माहिती दिलेली नाही. ही लस प्री-क्लिनिकल चाचण्यांमध्ये प्रभावी ठरली आहे. ■

### युगांडात पसरला डिंगा-डिंगा विषाणू

**कंपाला** : आफ्रिकन देश युगांडात ३०० हून अधिक लोकांना डिंगा डिंगा विषाणूची लागण झाली आहे. यामध्ये बहुतांश महिला व मुली आहेत. युगांडातील बुंदीबाग्यो जिल्ह्यात या गूढ आजाराचा सर्वांत मोठा परिणाम दिसून आला आहे.

जेव्हा रुग्णाला या विषाणूची लागण होते तेव्हा त्याच्या शरीरात तीव्र थरकाप सुरू होतो. हा थरकाप इतका तीव्र असतो की रुग्ण नाचत असल्यासारखे दिसते. संसर्ग गंभीर असल्यास, रुग्णाला अर्धांगवायू देखील होऊ शकतो. बुंदीबाग्यो जिल्हा आरोग्य अधिकारी कियिता क्रिस्टोफर यांच्या मते, हा विषाणू पहिल्यांदा २०२३ मध्ये आढळला होता. तेव्हापासून युगांडा सरकार याची पडताळणी करत आहे. ■

# दोन जहाल माओवाद्यांचे आत्मसमर्पण




आत्मसमर्पित माओवाद्यांसह पोलिस अधिकारी, कर्मचारी

### ८ लाखांचे होते बक्षीस

◆ **गडचिरोली, २० डिसेंबर**

गडचिरोली पोलिस दलाच्या आत्मसमर्पण योजनेला प्रतिसाद देत शुक्रवारी दोन जहाल माओवाद्यांनी गडचिरोली पोलिस व सीआरपीएफ दलासमोर आत्मसमर्पण केले आहे. रामसू दुर्गु पोयाम ऊर्फ नरसिंग (एसीएम) रा. गट्टानेली, ता. धानोरा, जि. गडचिरोली व रमेश श्यामू कुंजाम ऊर्फ गोविंद ऊर्फ रोहित (दलम सदस्य) रा. वेडमेट्टा, जि. नारायणपूर (छत्तीसगड) अशी आत्मसमर्पित माओवाद्यांची नावे आहेत. शासनाने त्यांच्यावर ८ लाख रुपयांचे बक्षीस जाहीर केले होते.

रामसू दुर्गू पोयाम ऊर्फ नरसिंग हा १९९२ मध्ये टिपागड दलममध्ये सदस्य पदावर भरती होऊन सन १९९५ पर्यंत कार्यरत होता. १९९५ मध्ये काकूर दलममध्ये राहून सन १९९६ पर्यंत माओवाद्यांच्या प्रशिक्षण कार्यक्रमांना सुरक्षा देण्याचे काम करीत होता. १९९६ ते १९९८ पर्यंत पुन्हा टिपागड दलममध्ये कार्यरत होता. १९९८ मध्ये माड एरिया (छत्तीसगड) येथे बदली होऊन सप्लाय टीममध्ये सन २००१ पर्यंत तो कार्यरत होता.

२०१० ते आजपर्यंत कुतूल आणि नेलनार दलममध्ये एरिया कमिटी मेंबर (एसीएम) पदावर कार्यरत होता. त्याच्यावर एकूण १२ गुन्हे दाखल असून त्यामध्ये ६ चकमक, ५ खुन, १ दरोडा यामध्ये त्याचा समावेश होता.

रमेश श्यामू कुंजाम ऊर्फ गोविंद ऊर्फ रोहित हा २०१९ मध्ये मिलिशिया म्हणून माओवाद्यांची कामे करत होता. २०२० मध्ये चेतना नाटए मंच (सिएनएम) येथे सदस्य पदावर भरती होऊन कार्यरत. २०२१ मध्ये कुतूल दलममध्ये सदस्य पदावर भरती होऊन आजपर्यंत कार्यरत होता.

महाराष्ट्र शासनाने रामसू याच्यावर ६ लाख तर रमेश याच्यावर २ लाख रुपयांचे बक्षीस जाहीर केले होते. आत्मसमर्पणानंतर पुनर्वसनाकरिता केंद्र व राज्य शासनाकडून रामसूला एकूण ४.५ लाख रुपये तर रमेशला एकूण ४.५ लाख रुपये बक्षीस जाहीर केले आहे.

सदर माओवाद्याचे आत्मसमर्पण घडवून मुख्य प्रवाहात आणण्याबाबतची कारवाई विशेष पोलिस महानिरीक्षक संदीप पाटील, पोलिस उप-महानिरीक्षक अंकित गोयल, सीआरपीएफचे पोलिस उपमहानिरीक्षक अजय कुमार शर्मा, पोलिस अधीक्षक नीलोत्पल, ३७ बटालियनचे प्रभारी समादेशक सुजित कुमार यांच्या मार्गदर्शनाखाली पार पाडली. ◂(तभा वृत्तसेवा)

# पोलिसांना घरे बांधून द्या : सदाभाऊ खोत

◆ **नागपूर, २० डिसेंबर**

ग्रामीण भागात पोलिसांना घरे नाहीत. इस्लामपूर येथील पोलिस लाईनमध्ये पोलिसांना राहण्यायोग्य घरे नाहीत. त्यामुळे जिल्हा, तालुका स्तरावर पोलिसांना चांगली घरे बांधून द्यावी, अशी मागणी आमदार सदाभाऊ खोत यांनी शुक्रवारी विधानपरिषदेत केली. पुरवण्या मागण्यांवर बोलताना सदाभाऊ खोत म्हणाले, काशीराव पोलिस ठाण्याला जागा मिळालेली नाही. पोलिस ठाणे भाड्याच्या घरात आहे. ज्या शाळांना सीबीसीची मान्यता मिळाली आहे, त्या शाळा नामांकित ठरविल्या गेल्या आहेत. परंतु, चांगल्या शाळांमध्ये मुलांना प्रवेश मिळत नाही. दीड-दोन लाख रुपये भरून मुले शाळेत प्रवेश घेऊ शकत नाहीत. ओबीसीमध्ये अनेक घटक असून, सर्व घटकांना योजनांचा लाभ द्यायला पाहिजे तसेच पारधी समाजातील मुलांसाठी चांगली योजना आणायला पाहिजे. गरज पडल्यास पारधी समाजासाठी महामंडळ निर्माण करावे, अशी मागणी त्यांनी केली.

**हिंगोली आगाराला नवीन बसेस द्या : आ. प्रज्ञा सातव**

हिंगोली आगारात बसेसची संख्या अपुरी असल्याने प्रवासी वाहतुकीसाठी नवीन बसेस उपलब्ध करून द्या, अशी मागणी आमदार प्रज्ञा सातव यांनी शुक्रवारी विधानपरिषदेत केली.

पुरवण्या मागण्यांवर त्या बोलत होत्या. प्रवासी संख्या वाढली असताना आगाराला एकही नवीन बस मिळालेली नाही. केवळ ४१ बसेसवर आगाराचा कारभार चालतो. सोमवार ते शनिवारदरम्यान प्रवाशांची गैरसोय होते. शाळेच्या दिवशी कमीतकमी बसेसमधून प्रवास करावा लागतो. प्रवाशांना चांगल्या सुविधा देण्यासाठी अतिरिक्त बसेस उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. याशिवाय आगारातील अनेक बसेसच्या खिडक्या, आसन व्यवस्था दयनीय झाली आहे. त्यामुळे हिंगोली आगाराला नवीन बसेस उपलब्ध करून देण्याची नितांत गरज आहे. याशिवाय हिंगोली जिल्ह्यातील आरोग्य विभागाला ग्रहण लागले आहे. प्राथमिक आरोग्य केंद्रात अनेक समस्या असल्याने आरोग्य विभागातील रिक्त पदे भरण्यात यावी, अशी मागणी त्यांनी केली. ◂(तभा वृत्तसेवा)



### हरयाणाचे माजी मुख्यमंत्री ओमप्रकाश चौटाला यांचे निधन

**पंतप्रधानांनी व्यक्त केला शोक**

**गुरुग्राम, २० डिसेंबर**

हरयाणाचे माजी मुख्यमंत्री आणि भारतीय राष्ट्रीय लोकदलाचे अध्यक्ष ओमप्रकाश चौटाला यांचे शुक्रवारी निधन झाले. ते ८९ वर्षांचे होते. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी त्यांच्या निधनावर दुःख व्यक्त केले आहे.

माजी उपपंतप्रधान देवीलाल यांचे पुत्र असलेले ओमप्रकाश चौटाला पाच वेळा हरयाणाचे मुख्यमंत्री होते. आज सकाळी त्यांना हृदयविकाराचा तीव्र झटका आला. त्यांना तातडीने मेदांता रुग्णालयात नेण्यात आले. मात्र, उपचारापूर्वीच त्यांचा मृत्यू झाला, अशी माहिती त्यांच्या पक्षाच्या प्रवक्त्याने दिली. त्यांचा जन्म १ जानेवारी १९३५ रोजी झाला होता.

चौटाला यांना वृद्धापकाळाशी संबंधित अनेक आजारांनी ग्रासले होते. यावर उपचार करण्यासाठी त्यांना अनेकदा रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. त्यांच्या मागे दोन मुले, तीन मुली आणि बराच मोठा आप्तपरिवार आहे. त्यांच्या पत्नी स्नेह लता यांचे पाच वर्षांपूर्वीच निधन झाले होते. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि हरयाणाचे मुख्यमंत्री नायब सिंह सैनी यांनी त्यांच्या निधनावर तीव्र दुःख व्यक्त केले. हरयाणाच्या राजकारणात ते अनेक वर्षे सक्रिय होते आणि त्यांचा राज्यातील राजकारणावर प्रचंड प्रभावही होता, असे मोदी यांनी 'एक्स' या समाजमाध्यम मंचवर म्हटले आहे. विविध राजकीय पक्षांच्या नेत्यांनीही त्यांच्या निधनावर दुःख व्यक्त केले आहे.



# भोपाळच्या जंगलात कारमधून मिळाले ५२ किलो सोने, ९ कोटी रोख

### आयकर विभागाचे मोठे यश

**भोपाळ, २० डिसेंबर**

मध्यप्रदेशची राजधानी भोपाळजवळ असलेल्या जंगलात आयकर विभागाने मोठी कारवाई करताना, एका कारमधून ५२ किलो सोने आणि ९ कोटी रुपये रोख जप्त केले. इतक्या मोठ्या प्रमाणात आढळलेले सोने आणि रोकड पाहून आयकर अधिकारी चकित झाले होते.

सूत्रांच्या मते, भोपाळजवळील मेंडोर जंगलात एक इनोवा बेवारस कार असल्याची आणि त्यात आठ ते नऊ बॅग पडून असल्याची माहिती मिळाल्यानंतर आयकर विभागाच्या अधिकाऱ्यांनी तिथे छापा टाकला. या कारमध्ये ९.८६ कोटी रुपये आणि ५२ किलो सोने लपवून ठेवण्यात आले होते. आयकर विभागाच्या या छापेमारीत १०० पेक्षा जास्त पोलिस सहभागी झाले होते. यापूर्वी आयकर विभागाने इंदूर येथील एका बांधकाम व्यावसायिकाच्या ५१ ठिकाणांवर छापेमारी केली होती.

इतक्या मोठ्या प्रमाणात पैसा आणि दागिने कुठून आले आणि ते कुणाचे आहेत, याचा तपास पोलिस करीत आहेत. हा सर्व पैसा आणि दागिने आयकर विभागाने आपल्या ताब्यात घेतले आहेत, अशी माहिती पोलिस उपायुक्त प्रियांका शुक्ला यांनी दिली.

अलिकडील काळात राज्यात आयकर विभाग आणि लोकायुक्त कार्यालयाकडून काळ्या पैशाचा शोध घेण्यासाठी मोठ्या प्रमाणात छापेमारी केली जात आहे. यापासून हा पैसा आणि दागिने वाचविण्यासाठी कुणीतरी ते सर्व कारमध्ये ठेवून, ती कार जंगलात लपवली असण्याची शक्यता आयकर विभागाने वर्तवली आहे.




### टाटा, येचुरी, पंकज उधास आणि आता झाकिर हुसैन...

# अनेक दिग्गजांनी घेतला जगाचा निरोप!

२०२४ या वर्षी जगातील अनेक मोठ्या व्यक्तींनी निरोप घेतला आहे. राजकारण असो, क्रीडा असो वा चित्रपट उद्योग, अनेक दिग्गज आपल्यापासून दूर गेले. या सेलिब्रिटींच्या जाण्याने लाखो चाहते दुःखी झाले. यावर्षी रतन टाटा, झाकिर हुसैन, सीताराम येचुरी आणि मुनव्वर राणा यांच्यासह अनेक सेलिब्रिटींनी जगाचा निरोप घेतला.

**रतन टाटा**



भारतातील सर्वांत मोठे औद्योगिक घराणे टाटा समूहाला उंचीवर नेणारे रतन टाटा यांनी नुकताच जगाचा निरोप घेतला. २०२४ या वर्षातील सर्वांत मोठी हानी म्हणून रतन टाटांचे जाणे, या घटनेचा उल्लेख करता येईल. ९ ऑक्टोबर रोजी त्यांनी अखेरचा श्वास घेतला. रतन टाटा हे केवळ व्यावसायिक जगतात त्यांच्या उत्कृष्ट कार्यासाठी ओळखले जात नाहीत, तर समाजसेवेसाठी करीत असलेल्या कार्यासाठीही त्यांची सर्वत्र चर्चा असायची. रतन टाटा यांच्या नेतृत्वाखाली टाटा समूहाने ब्रिटिश ऑटोमोटिव्ह दिग्गज जग्वार आणि लॅण्ड रोव्हर, अमेरिकन लक्झरी हॉटेल चेन रिट्झ कार्लटन आणि इटालियन एरोस्पेस निर्माता पियाजिओ यांचे अधिग्रहण केले.

**झाकिर हुसैन**



भारताला शास्त्रीय संगीतात वेगळी ओळख देणारे प्रसिद्ध तबलावादक झाकिर हुसैन यांचे निधन झाले. ते ७३ वर्षांचे होते. झाकिरने वयाच्या ७ व्या वर्षी मोठमोठ्या कार्यक्रमांमध्ये परफॉर्म करण्यास सुरुवात केली. ते उत्तम तबलावादक तर होतेच, पण त्यांनी अनेक चित्रपट गीतांना संगीतही दिले. हुसैन यांना अनेक पुरस्कारही मिळाले होते. त्यांना चार ग्रॅमी पुरस्कार मिळाले, १९८८ मध्ये पद्मश्री, २००२ मध्ये पद्मभूषण आणि २०२३ मध्ये पद्मविभूषण.

**सीताराम येचुरी**

ज्येष्ठ राजकारणी आणि माकपचे सरचिटणीस सीताराम येचुरी यांचे १९ ऑगस्ट रोजी निधन झाले. येचुरी फुफ्फुसाच्या आजाराने त्रस्त होते. सीताराम येचुरी हे डाव्या राजकारणातील



प्रमुख चेहरा होते. येचुरी १९७४ मध्ये स्टुडंट्स फेडरेशन ऑफ इंडियामध्ये सामील झाले. १९७५ मध्ये त्यांनी माकपमध्ये प्रवेश केला. राजकारणात जबरदस्त प्रभाव असलेले येचुरी २००५ मध्ये पश्चिम बंगालमधून राज्यसभेवर निवडून येऊन संसदेत पोहोचले. येचुरी यांना २०१५ मध्ये माकपचे पाचवे सरचिटणीस बनवण्यात आले होते. यानंतर येचुरी यांना २०१८ आणि २०२२ मध्ये पुन्हा सरचिटणीस बनवण्यात आले.

**सुशील कुमार मोदी**

बिहारच्या राजकारणाचे केंद्र म्हणून ओळखले जाणारे सुशील कुमार मोदी यांचे १३ मे रोजी निधन झाले. बिहारच्या



राजकारणात पाच दशके वेगवेगळ्या भूमिका बजावणारे सुशील कुमार मोदी हे बिहारचे माजी उपमुख्यमंत्रीही आहेत. ते कॅन्सरशी झुंज देत होते. सुशील कुमार १९९० मध्ये पाटणा मध्य विधानसभा मतदारसंघातून निवडणूक जिंकून विधानसभेत पोहोचले. त्यानंतर १९९५ आणि २००० मध्येही त्यांनी याच जागेवरून निवडणूक जिंकली होती. २००४ मध्ये त्यांनी भागलपूर लोकसभा मतदारसंघातून निवडणूक जिंकली. २००५ मध्ये त्यांनी खासदारकीचा राजीनामा दिला आणि विधान परिषदेतून निवडून आले आणि उपमुख्यमंत्री झाले.

**पंकज उधास**



ज्येष्ठ गायक पंकज उधास यांचे यावर्षी २६ फेब्रुवारी रोजी निधन झाले. ते बरेच दिवस आजारी होते. उधास यांच्या निधनाचे वृत्त ऐकून संपूर्ण गायन उद्योगासह सर्वांनाच अश्रू अनावर झाले. पंकज उधास यांनी वयाच्या सहाव्या वर्षी गायला सुरुवात केली. 'चिट्ठी आई है...', 'चांदी जैसा रंग है तेरा, सोने जैसे बाल...' या हिट गाण्यांप्रमाणेच सर्वांच्या मनावर राज्य केले.

**अंशुमन गायकवाड**

माजी भारतीय क्रिकेटपटू आणि टीम इंडियाचे प्रशिक्षक



अंशुमन गायकवाड यांचे ३१ जुलै रोजी निधन झाले. गायकवाड यांनी २७ डिसेंबर १९७४ रोजी कोलकाता येथे वेस्ट इंडिजविरुद्धच्या कसोटी सामन्यातून पदार्पण केले. १९८४ च्या शेवटच्या दिवशी त्याने इंग्लंडविरुद्ध शेवटची कसोटी खेळली होती. गायकवाड हे ब्लड कॅन्सरने ग्रस्त होते आणि त्यांच्या उपचारात कपिल देव, मदन लाल यांच्यासह अनेक दिग्गज खेळाडू मदतीसाठी पुढे आले.

**मुनव्वर राणा**

प्रसिद्ध कवी मुनव्वर राणा यांचे १४ जानेवारी रोजी वयाच्या ७१ व्या वर्षी निधन झाले.



मुनव्वर यांचा जन्म २६ नोव्हेंबर १९५२ रोजी रायबरेली, उत्तरप्रदेश येथे झाला. मुनव्वर राणा उर्दू कवी होते, परंतु त्यांनी मुख्यतः अवधी आणि हिंदी शब्दांचा वापर त्यांच्या दोह्यांमध्ये केला, ज्यामुळे त्यांना भारतीय लोकांमध्ये लोकप्रियता मिळाली. मुनव्वर यांनी केवळ उर्दूच नव्हे तर हिंदी आणि अवधी शब्दांचाही मोठ्या प्रमाणावर वापर केला, त्यामुळेच त्यांनी भारतीयांच्या हृदयावर राज्य केले. त्यांची कविता खूप गाजली.

**शारदा सिन्हा**



प्रसिद्ध लोकगायिका शारदा सिन्हा यांचे वयाच्या ७२ व्या वर्षी नोव्हेंबर रोजी निधन झाले. त्यांच्या निधनाने बिहारच्या लोकसंस्कृतीने आपले एक मौल्यवान रत्न गमावले. शारदा सिन्हा यांना पद्मभूषण देऊन गौरविण्यात आले होते. ■

### कायदे महिलांच्या हितासाठी, पतीची पिळवणूक करण्यासाठी नाही

**नवी दिल्ली, २० डिसेंबर**

महिलांच्या हितासाठी तयार करण्यात आलेल्या कायद्यांचा वापर पतीला धमकावण्यासाठी, त्याचा छळ करण्यासाठी किंवा खंडणीचे साधन म्हणून होऊ नये, असे सर्वोच्च न्यायालयाने म्हटले आहे. यावेळी न्यायालयाने असेही स्पष्ट केले की, पोटगी म्हणजे विभक्त पती आणि पत्नीला अर्थिकदृष्ट्या एकाच पातळीवर आणण्याचे साधन नाही. पोटगीची तरतूद अवलंबून असलेल्या महिलेला योग्य पद्धतीने जगता यावे, यासाठी करण्यात आली आहे.

काही दिवसांपूर्वी बंगळुरूतील तंत्रज्ञ अतुल सुभाष यांनी पत्नीने मानसिक आणि अर्थिक छळ केल्याचा आरोप करीत आत्महत्या केली होती. अतुल सुभाष यांच्या विभक्त पत्नीने त्यांच्याकडे सुरुवातीला मासिक दोन लाख रुपये आणि नंतर वार्षिक ३ कोटी रुपयांच्या पोटगीची मागणी केली होती. त्या पृष्ठभूमीवर सर्वोच्च न्यायालयाचे वरील निरीक्षण महत्त्वाची ठरते. पती



त्याच्या विभक्त पत्नीला त्याच्या सध्याच्या अर्थिक स्थितीच्या आधारे अनिश्चित काळासाठी आधार देण्यास बांधील असू शकत नाही. हिंदू विवाह हा व्यावसायिक उपक्रम नसून, कुटुंबाचा पाया म्हणून त्याकडे पाहिले जाते. यावेळी न्यायालयाने महिला आणि त्यांच्या कुटुंबीयांनी पतीकडून मोठ्या अर्थिक मागण्या पूर्ण करण्यासाठी फौजदारी तक्रारींचा गैरवापर केल्याची अनेक उदाहरणे दिली. संबंधित प्रकरणाच्या सुनावणीत न्या. बी. व्ही. नागरत्ना आणि न्या. पंकज मिठा यांच्या न्यायासनाने म्हटले की, महिलांनी हे लक्षात घेतले पाहिजे की, त्यांच्यासाठी बनवण्यात आलेले कायदे त्यांच्या कल्याणासाठी आहेत. ते पतीला धमकावणे, त्याच्यावर वर्चस्व गाजवणे किंवा त्याची पिळवणूक करण्यासाठी नाहीत. न्यायालयाने एका जोडप्याच्या घटस्फोट प्रकरणाचा निर्णय देताना, अंतिम तोडगा म्हणून पतीने विभक्त पत्नीला कायमस्वरूपी पोटगी म्हणून १२ कोटी रुपये देण्याचा आदेश दिला.

## अग्रलेख...

# काँग्रेसची संसद भवनातील गुंडागर्दी

संसद हे लोकशाहीचे सर्वोच्च मंदिर मानले जाते, पण लोकशाहीच्या या मंदिरात गुरुवारी जे झाले, त्यामुळे लोकशाहीवर प्रेम करणाऱ्या या देशातील कोट्यवधी लोकांची मान लज्जेने खाली झुकली. हेचि फळ काय मम तपाला असे म्हणण्याची वेळ त्यांच्यावर आली. जगातील काही देशातील संसदेत हाणामाऱ्या झाल्याचे याआधी वाचण्यात आणि पाहण्यातही आले होते. पण सुदैवाने आपल्या देशातील संसदेच्या सभागृहात असा प्रकार घडला नाही, म्हणून समाधान मानायचे की, सभागृहाबाहेर म्हणजे संसद भवन परिसरात असा प्रकार घडला म्हणून आपले कपाळ बडवायचे ते समजत नाही. काही असले तरी या घटनेने संसदीय लोकशाहीला काळिमा फासला गेला, हे कुणीही नाकारू शकत नाही. एखाद्या चौकात मवाल्यांनी दारू पिऊन जशी गुंडागर्दी करावी, वा महाविद्यालयीन निवडणुकीत टारगट मुलांनी जसा गोंधळ घालावा, तसा सर्व प्रकार लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्या नेतृत्वात काँग्रेसच्या खासदारांनी केला. या घटनेचे काँग्रेस खासदारांचा नंगानाच वा आधीच मर्कट त्यात मद्य प्याला, या शब्दातच वर्णन करावे लागेल. यासाठी त्यांचा करावा तेवढा निषेध कमी आहे. एखाद्या व्यक्तीवरचा राग प्रदर्शित करण्यासाठी वा त्याच्याबद्दलची तीव्र नाराजी व्यक्त करण्यासाठी 'दहा माराव्या आणि एक मोजावी', असे म्हटले जाते. पण या घटनेच्या बाबतीत तर शंभर माराव्या आणि एकही मोजू नये, असे म्हणायला हरकत नाही. राहुल गांधी आणि जबाबदारी या दोन परस्परविरोधी गोष्टी म्हणायला हरकत नाही. राहुल गांधींनी आपल्या संपूर्ण राजकीय आयुष्यात एकही गोष्ट जबाबदारीची केली नाही. त्यांची संपूर्ण वागणूक नेहमीच बेजबाबदारपणाची असते. संसदेत पहिल्यांदाच निवडून आलेल्या खासदारांनी एखादवेळ असे वर्तन केले असते तर ते खपण्यासारखे नसले तरी समजण्यासारखे होते. पण संसदेत सलग पाचव्यांदा निवडून आलेल्या राहुल गांधींनी इतके बेजबाबदार आणि मवाल्यासारखे वर्तन करावे, ते समजण्यापलीकडे आहे. राहुल गांधींनी केलेल्या धक्काबुक्कीत भाजपाचे दोन खासदार खाली पडून गंभीर जखमी झाले. यापैकी एकाचे डोके फुटले, संसद भवनाच्या पायऱ्यांवर रक्त सांडले. प्रतापचंद्र सारंगी आणि मुकेश राजपूत यांना डॉ. राममनोहर लोहिया रुग्णालयात दाखल करावे लागले. याहीपेक्षा गंभीर आणि आक्षेपार्ह प्रकार म्हणजे राहुल गांधींनी भाजपाच्या नागालॅण्डमधील खासदार फांगनोन कोन्याक यांच्याशी केलेले गैरवर्तन. याबाबतची लेखी तक्रार त्यांनी राज्यसभेचे अध्यक्ष जगदीप धनकड यांच्याकडे केली तसेच राज्यसभेत आपबितीही सांगितली. कोन्याक यांनी स्पष्ट शब्दांत म्हटले नसले तरी राहुल गांधी यांनी आपला विनयभंग केला, असाच त्यांच्या तक्रारीचा एकूण सूर होता. किमान एका महिलेशी कसे वागावे, संसदेचे सदस्य असलेल्या महिलेशी कसे वागावे, याचे भान राहुल गांधी यांना राहू नये, याचे आश्चर्य वाटते. महिला मग सर्वसाधारण गृहिणी असो, शाळेत जाणारी मुलगी असो की महाविद्यालयात जाणारी विद्यार्थिनी असो तिचा आदर आणि मानसन्मान सर्वांनी केलाच पाहिजे. आदर करता येत नसेल तरी एकवेळ चालेल पण आपल्याकडून तिचा अपमान आणि विटंबना होऊ नये, याची काळजी तर सर्वांनी घेतलीच पाहिजे. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याबाबत केलेल्या विधानाचा काँग्रेस सदस्यांनी विपर्यास केला, त्यावरून शाह आणि भाजपाला अडचणीत आणण्याचा, आरोपीच्या पिंजऱ्यात उभे करण्याचा प्रयत्न केला. काँग्रेसची ही कृती पूर्णपणे अश्लाघ्य अशीच आहे. घटनाकार डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा जेवढा अपमान काँग्रेसने आपल्या शासनकाळात, अगदी पंडित जवाहरलाल नेहरू पंतप्रधान असतानापासून केला, तो लपला नाही. त्याचे ढीगभर पुरावे आहेत. काँग्रेसजनांनी डॉ. आंबेडकर यांच्याबाबतीत जी काही कारस्थाने रचली, लोकसभा निवडणुकीत ते जिंकू नये म्हणून जी षडयंत्रे केलीत, ती वाचली आणि पाहिली की काँग्रेसच्या नेत्यांच्या कुटिलतेची आणि पाताळयंत्रीपणाची आपण कल्पना करू शकतो. नेहरूंमुळे आंबेडकरांना केंद्रीय मंत्रिमंडळातून राजीनामा द्यावा लागला. मात्र त्याची कोणतीच खंत आणि वेदना नेहरूंना झाली नाही. उलट आपली एक कटकट दूर झाली, अशी तेव्हाची त्यांची भूमिका होती.

आज तेच काँग्रेसवाले अमित शाह यांनी डॉ. आंबेडकरांचा अपमान केला म्हणून जेव्हा ऊर बडवत विधवा विलाप करतात, तेव्हा आपल्याच कपाळावर आपलाच हात मारून घ्यावा लागतो. काँग्रेसवाल्यांची ही कृती 'सौ चूंहे खांके बिल्ली हज को चली'सारखी म्हणायला पाहिजे. अमित शाह यांचे डॉ. आंबेडकरांबाबतचे विधान काँग्रेस नेत्यांनी संदर्भ सोडून वापरले, यातून लोकांच्या मनात अमित शाह आणि भाजपाबद्दल कटुता निर्माण करण्याचा त्यांचा प्रयत्न स्पष्टपणे दिसून येतो. अमित शाह यांचे विधान मागच्या पुढच्या संदर्भासह आपले डोके जागेवर ठेवत कोणत्याही पूर्वग्रहदूषित भावनेशिवाय ऐकले तर त्यात काहीही आक्षेपार्ह नाही, शाह यांनी जे म्हटले ते शंभर टक्के बरोबर आहे, असे समजून येईल. राहुल गांधींकडून तर संयमाच्या आणि जबाबदारीच्या वागणुकीची अपेक्षाच करता येत नाही, पण काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष आणि राज्यसभेतील विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खडगे यांनीही तीच भाषा वापरावी याचे आश्चर्य वाटते. 'छोटे मियां तो छोटे मियां, बडे मियां सुभानअल्ला', असे खडगेंकडे पाहून म्हणावेसे वाटते. खडगेंबद्दल तसेच त्यांच्या वयाच्या आणि प्रदीर्घ संसदीय कारकीर्दीचा पूर्ण आदर बाळगूनही खडगे यांना म्हातारचळ तर झाला नाही, असे वाटून जाते. अन्यथा त्यांनी राहुल गांधी यांच्या सुरात आपला सूर मिसळला नसता. मी भाजपा सदस्यांना धक्काबुक्की केली नाही, उलट त्यांनीच संसद भवनात जाण्याचा माझा रस्ता अडवला आणि मला तसेच खडगे यांना धक्काबुक्की केली, असा उलटा आरोप राहुल गांधींनी करत 'चोर तर चोर वर शिरजोर'पणाचा परिचयही करून दिला. संसद भवन परिसरात काँग्रेस आणि इंडिया आघाडीतील घटक पक्ष हिवाळी अधिवेशनाच्या पहिल्या दिवसापासूनच निदर्शने करत आहेत. विरोधी पक्ष म्हणून सरकारी धोरणाचा निषेध करण्याचा, त्यांच्याविरुद्ध निदर्शने करण्याचा काँग्रेसला पूर्ण अधिकार आहे, तो कोणी नाकारणार नाही. पण सत्ताधारी पक्षाच्या विरोधात निदर्शने करण्याचा जसा अधिकार विरोधी पक्षांना आहे, तसाच अधिकार विरोधी पक्ष चुकीचा वागत असेल, समाजाच्या आणि देशाच्या विरोधात भूमिका घेत असेल तर त्यांच्याविरुद्ध निदर्शने करण्याचा, जनतेला त्याची जाणीव करून देण्याचा अधिकारही सत्ताधारी पक्षाला आहे, याचे भान राहुल गांधींनी आणि अन्य काँग्रेस नेत्यांनी ठेवले पाहिजे. सत्ताधारी पक्षाचे सदस्य निदर्शने करत असताना त्यांच्यासमोर जाण्याचा आणि त्यांना धक्काबुक्की करत आत शिरण्याचा प्रयत्न हा राहुल गांधींच्या उद्दामपणाचे तसेच काँग्रेस खासदारांच्या गुंडागर्दीचे द्योतक म्हणावे लागेल. राहुल गांधी खासदार असल्यामुळे त्यांना संसद भवनात प्रवेश करण्याचा तसेच सभागृहाच्या कामकाजात सहभागी होण्याचा पूर्ण अधिकार आहे, तो कोणी नाकारू शकत नाही. पण संसद भवनात जाण्याचा राहुल गांधींचा हेतू प्रामाणिकपणाचा असता तर संसद भवनात प्रवेश करण्यासाठी एकूण सहा प्रवेशद्वारे आहेत. मकरद्वारावर भाजपा सदस्य निदर्शने करत होते, पंतप्रधानांसाठी राखीव एक द्वार वगळले तरी उर्वरित चार द्वारातून ते आत सहजपणे जाऊ शकत होते. पण राहुल गांधी आणि काँग्रेसच्या सदस्यांचा आग्रह मकरद्वारातूनच आत जाण्याचा होता. त्यासाठी भाजपा सदस्यांना धक्काबुक्की करण्यापर्यंत तसेच महिला सदस्यांचा अप्रत्यक्षपणे विनयभंग करण्यापर्यंत त्यांची मजल गेली. लोकसभा असो की विविध राज्यात झालेल्या विधानसभा निवडणुका असो देशातील जनता वारंवार नाकारत असतानाही राहुल गांधींना शहाणपण येत नाही, यात नवल नाही, कारण त्यांचा आणि शहाणपणाचाही दूरदूरपर्यंत कोणताही संबंध नाही. पण त्या पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष असलेल्या मल्लिकार्जुन खडगेंसारख्या अनुभवी, संयमी आणि वयोवृद्ध नेत्यालाही शहाणपण येत नाही, याचे आश्चर्य वाटते. राहुल गांधींमागे फरफटत जात काँग्रेस पक्ष आपले कधीही भरून न निघणारे नुकसान करून घेत आहे, यात संशय नाही.

## यंगिस्तान

**जयेश शत्रुघ्न मेस्त्री**

# अण्णू गोगट्या लोकशाहीचा मारेकरी!



महाराष्ट्राचं लाडकं व्यक्तिमत्त्व पु. ल. देशपांडे यांनी महाराष्ट्राच्या ओठावर हसू फुललेलं राहील याची काळजी घेतली. 'व्यक्ती आणि वल्ली' हा मराठीतला सर्वात प्रसिद्ध कथासंग्रह मानला जातो. या पुस्तकात अंतू बरवाची कथा येते. कुणी पडलं तर अंतू बरवा ओरडतो, ''अण्णू, झाला काय रे?'' रत्नागिरीत अण्णू गोगटे वकील प्रत्येक वेळी म्युनिसिपालिटीच्या निवडणुकीत पडायचे. म्हणून पु. ल. म्हणतात, अण्णू गोगट्या होणे म्हणजे 'पडणे' हा अंतूने मराठी भाषेला बहाल केलेला वाक्प्रचार आहे. तसंच याबाबतीत काँग्रेसचे सुद्धा आभार मानणे क्रमप्राप्त आहे. कारण काँग्रेसनेही देशाला एक राष्ट्रीय 'अण्णू गोगट्या' दिलेला आहे. होय, तुम्ही अगदी बरोबर ओळखलंत. मी ५४ वर्षांचे स्वयंघोषित नेते राहुल गांधी यांच्याबद्दल बोलत आहे. राहुल गांधी राजकारणात लाँच झाल्यापासून पडत आहेत. त्यांच्या नेतृत्वाखाली लढलेल्या अनेक निवडणुकांत काँग्रेसचा वाईट पराभव झाला. तरी सुद्धा आताचा पराभव मागच्या पराभवापेक्षा बरा होता, अशा आविर्भावात ते पराभवालाच आपला विजय मानतात. ही त्यांची निरागसता नसून हा त्यांचा माजोरडेपणा आहे. काँग्रेस आणि देश आपल्या मालमत्ता असल्यासारखे ते वागत असतात.

तसेच राहुल गांधी हे अत्यंत खोटारडे देखील आहेत. ते वारंवार राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आणि स्वा. सावरकरांबद्दल खोटी विधाने करत असतात. अशा विधानांसाठी त्यांना कोर्टात माफी मागावी लागते. पण ते बाहेर येऊन पुन्हा निर्लज्जाप्रमाणे खोटी विधाने करतात. आता लोकसभेत भाषण करताना त्यांनी पुन्हा खोटारडेपणा केला. ते म्हणाले, ''सावरकरांनी स्पष्टपणे लिहिले आहे की आपल्या राज्यघटनेत भारतीय काहीही नाही. हा देश मनुस्मृतीनुसार चालला पाहिजे. त्यामुळे तुम्ही (भाजपा) राज्यघटनेचे रक्षण करण्याचा दावा करता, तेव्हा तुम्ही सावरकरांची खिल्ली उडवत आहात, त्यांची बदनामी करत आहात.'' राहुल गांधींनी हे विधान केले खरे पण त्याचा पुरावा त्यांनी दिला नाही. सावरकरांनी असे कुठे लिहिले आहे आणि कधी म्हटले आहे, हे राहुल गांधींना आयुष्यात कधीच सांगता येणार नाही. कारण सावरकरांनी असे कोणतेच विधान केले नव्हते. उलट सावरकर हे खऱ्या अर्थाने पुरोगामी होते. कोणताही धार्मिक ग्रंथ हा केवळ पूजनीय असतो, तो पूर्णपणे अनुकरणीय असेल असे नाही, असे सावरकरांचे मत होते. सावरकरांनी मनुस्मृतीचा अभ्यास करून त्यातल्या कालबाह्य गोष्टी लोकांच्या नजरेस आणून दिल्या आहेत. पण राहुल गांधींना या गोष्टी कळू शकत नाहीत. कारण ते मूर्ख आणि माजोरडे आहेत. हे दोन अवगुण जेव्हा एकत्र येतात त्यावेळी माणूस पराकोटीचा अहंकारी होतो. म्हणजे आपण कोणतेच ज्ञान मिळवू शकत नाही ही आपल्या बुद्धीची मर्यादा असते, पण आपण अत्यंत श्रीमंत आणि सत्ता असलेल्या कुटुंबात जन्मले असतो, तेव्हा कोणत्याही कर्तृत्वहीन माणसामध्ये माजोरडेपणा येतो आणि बुद्धीच्या मर्यादेवर सत्तेचं आणि श्रीमंतीचं आवरण घातलं जातं. मग निर्बुद्धपणालाच बुद्धी, ज्ञान अशी खोटी लेबलं लावत तो माणूस हिंडत राहतो. त्यांचे चेले देखील सत्तेत राहण्यासाठी, मर्जित राहण्यासाठी मूर्खपणाला 'वाह वाह' म्हणत दाद देत बसतात.

या वादात आता उद्धव ठाकरेंनी उडी घेतली आहे. आता पालिकेच्या निवडणुकीसाठी हिंदुत्वाची कातडी पांघरल्यामुळे त्यांनी राहुल गांधींचा समाचार घेत असल्याचा खोटाच आव आणला. त्यांच्या मते काँग्रेस आणि भाजपाने सावरकर-नेहरू करणे बंद केले पाहिजे. पण उद्धव ठाकरे यांना मुद्दाच कळलेला नाही. राहुल गांधी किंवा काँग्रेस सावरकरांवर टीका करत नाहीत, त्यांच्या वक्तव्याचे खंडन करत नाहीत तर ते सावरकरांवर खोटे आरोप करतात, त्यांची बदनामी करतात. जे सावरकर कधी बोललेच नव्हते, ते बोलले आहेत असं म्हणतात. भाजपाच्या नेत्यांनी सप्रमाण नेहरूंची चूक दाखवून दिली आहे. त्यास ऐतिहासिक पृष्ठभूमी आहे. खंडन करणे आणि विनाकारण बदनामी करणे यातला फरक कळायला हवा. त्यामुळे ठाकरेंनी आधी मुद्दा समजून घेतला पाहिजे, त्यानंतरच वक्तव्ये केली पाहिजे.

आता राहुल गांधींचा अहंकारी स्वभाव पुन्हा समोर आला आहे. संसदेबाहेर आंदोलनावेळी राहुल गांधींनी मुकेश राजपूत या भाजपा खासदाराला ढकललं आणि ते भाजपाचे वयोवृद्ध खासदार प्रतापचंद्र सारंगी यांच्यावर जाऊन पडले, त्यामुळे त्यांना दुखापत झाली. मुकेश राजपूत यांना रुग्णालयात दाखल करण्यात आलं. तिथे उपस्थित लोकांनी गांधींना जाब विचारला तेव्हा ते निर्लज्जपणे आणि उर्मटपणे बोलून तिथून निघून गेले. हा राहुल गांधींचा खरा चेहरा आहे. राहुल गांधी हे पप्पू नसून पप्पूच्या वेशात वावरणारे भयावह वृत्तीचे व्यक्ती आहेत, असे कोणी म्हटले तर खोटे ठरणार आहे का? काँग्रेस हा पक्ष राहुल आणि सोनिया गांधींच्या पूर्णपणे आहारी गेल्यामुळे आता या पक्षाची निष्ठा देशाबद्दल राहिली नसून त्यांनी ती सोनिया आणि राहुल चरणी वाहिली आहे. त्यामुळे लोकशाही आणि संविधानाला बाधा पोहोचेल अशा गोष्टी ते करत असतात. त्यात राहुल हे त्यांचं प्रमुख नेतृत्व अत्यंत अहंकारी असल्यामुळे सबंध काँग्रेस पक्ष हा अहंकारी झालेला आहे.

अमित शाह यांच्या भाषणातला छोटा भाग काढून त्यांनी महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा अपमान केला असा खोटा आरोप काँग्रेस राहुल गांधींच्या नेतृत्वात करत आहे. त्यांचा सर्वोच्च नेताच खोटारडा, माजोरडा आणि अहंकारी असेल तर बाकी त्यांच्या ताटाखालचं मांजर झालेले त्यांचे इतर नेते दुसरं काय करणार? त्या भाषणात खरं तर अमित शाह यांनी बाबासाहेबांचा गौरव केला असून काँग्रेसने या महामानवाला कसा त्रास दिला हे पुराव्यानिशी सिद्ध केलं आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सुद्धा काँग्रेसवर टीका केलेली आहे. मात्र सत्य परिस्थिती न जाणून घेता किंवा मान्य न करता राहुल गांधी आणि त्यांचे चेले देशात अराजकतेचे वातावरण निर्माण होईल अशी परिस्थिती निर्माण करत आहेत. टूलकिट प्रकरणातही त्यांनी अशीच भूमिका घेतली होती. मग राहुल गांधी डीप स्टेटच्या साहाय्याने भारताचा बांगलादेश करायला निघाले आहेत अशी शंका जर कुणी व्यक्त केली तर त्यात काही वावगे ठरणार आहे का? प्रत्येक भारतीयांना राहुल गांधींच्या निष्ठेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करण्याचा अधिकार संविधानाने दिला आहे. सावरकरांसारख्या देशभक्ताला बदनाम करून राहुल गांधी देशात अस्थिरतेचं वातावरण निर्माण करत आहेत. आता हीच वेळ आहे काँग्रेसने या अहंकारी व्यक्तीला पक्षातून काढून संविधान आणि लोकशाहीचं रक्षण केलं पाहिजे. नाहीतर ड्युप्लिकेट गांधी कुटुंबाचा हा अण्णू गोगट्या काँग्रेसची पूर्ण वाताहत करून टाकेल, तसेच या गोष्टी देशासाठी, लोकशाहीसाठी व संविधानासाठीही घातक ठरतील. सरकारने देखील राहुल गांधींच्या अशा खोट्या वक्तव्यांसाठी आणि वर्तणुकीसाठी त्यांना शासन केले पाहिजे.

writerjayeshmestry@gmail.com

## वेध

**हेमंत सालोडकर**

# लाडक्या भावाची वेडी माया

महाराष्ट्र विधिमंडळाचे हिवाळी अधिवेशन नागपुरात सुरू आहे. पहिले मुख्यमंत्री आणि दोन उपमुख्यमंत्र्यांच्या शपथविधीनंतर काही दिवसांच्या अंतराने सुमारे ३९ आमदारांनी मंत्रिपदाची शपथ घेतली आणि १६ डिसेंबरपासून विधिमंडळाचे अधिवेशन सुरू झाले. पहिल्या दिवसापासूनच महायुतीच्या सरकारने कामाचा धडाका लावला आणि सर्वच क्षेत्रांना भरपूर निधी दिला. यात युवकांपासून तर उद्योगापर्यंत, शेतीपासून तर सिंचनापर्यंत सर्वांचा समावेश होता. पण ज्या योजनेमुळे महायुतीला भरघोस मताधिक्य मिळाले आणि दणदणीत विजय झाला, त्या योजनेच्या शिल्पकार असलेल्या लाडक्या बहिणींना काही आनंदवार्ता मिळत नव्हती. त्यामुळे विरोधकांनीही आता या योजनेचे काय होणार, असा कांगावा सुरू केला. निवडणुकीपूर्वी पाच महिन्यांचे ७५०० रुपये जमा झाले आणि लाडक्या बहिणींनी महायुतीच्या पारड्यात मतांचे भरभरून दान दिले. अर्ज करणाऱ्या सर्वच महिलांना याचा भरपूर लाभ झाला. ज्यांची आर्थिक स्थिती चांगली होती, त्यांनीही याचा लाभ घेतला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितल्याप्रमाणे काही पुरुषांनी खाती उघडून लाडकी बहीण योजनेचा लाभ घेतला. समाजात प्रामाणिक लोकांसोबत अप्रामाणिक लोकही असतात. त्यांच्याकडून दुसरी अपेक्षा करता येणार नाही. काही दिवसांपूर्वी या योजनेसाठी सर्वेक्षण करून गैरफायदा लाटणाऱ्या लोकांना योजनेतून हद्दपार करणार असे ऐकण्यात आले. बेईमानी करून बहिणींच्या नावावर पैसे लाटणाऱ्यांची चौकशी केली जाईल, असे मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले. निवडणुकीत १५०० च्या ऐवजी २१०० रुपये देण्यात येईल, अशीही घोषणा झाली. त्यामुळे महिलांच्या आनंदाला तर उधाण आले आणि त्यांनी महायुतीला भरघोस मतांनी विजयी केले. ज्या विरोधकांनी या योजनेला विरोध केला, त्यांनीही आम्ही निवडून आल्यास ३००० रुपये देऊ अशी घोषणा करून टाकली. महायुतीचे सरकार निदान १५०० रुपये देत होते, पण विरोधक कुठून पैसे देणार याची आकडेवारी त्यांनी दिली नाही आणि लाडक्या बहिणींनी त्यांना विरोधात बसवले. नुसते बसवलेच नाही तर विरोध करायला नेताही शिल्लक ठेवला नाही. तुमचा नेताही नको आणि पैसेही नको अशी स्थिती महिलांनी विरोधकांची केली.

निवडणुका झाल्यानंतर मात्र लाडक्या बहिणींना आपले पैसे कधी मिळणार याची हुरहूर लागली. पण निवडणुकीपूर्वी दिलेल्या आश्वासनानुसार, महायुती सरकार हिवाळी अधिवेशन संपताच बहिणींच्या खात्यात पैसे जमा करणार असे खुद्द मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीच घोषित केले. त्यामुळे लाभार्थी महिला आनंदल्या. पात्र महिलांना पैसे मिळतील यात गैर काही नाही, पण काही श्रीमंत लोकही या योजनेचा लाभ घेत असतील तर त्यांची चौकशी करून त्यांना बाद केले पाहिजे आणि सरकारवरील आर्थिक बोझा कमी केला पाहिजे.

काही पुरुषांनी या योजनेचा लाभ घेतल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले. अशा 'लाडक्या भाऊ' आणि 'लाडक्या जावईबापूंचीही' चांगली 'सोय' लावली पाहिजे. विधानसभेत सांगितल्याप्रमाणे त्यांची चौकशी होईलच. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचा सहावा हप्ता काही दिवसांतच मिळणार आहे. मुख्यमंत्री फडणवीस राज्यातील महिलांना आणि सभागृहाला आश्वस्त करताना म्हणाले, कोणतीही शंका मनात ठेवू नका, जी जी आश्वासने आम्ही दिलेली आहेत, ज्या योजना आम्ही लागू केल्या आहेत, त्यातील एकही योजना बंद होऊ देणार नाही. ज्या लाडक्या बहिणींनी महायुतीवर विश्वास दर्शवला आणि मतांचं भरभरून दान दिलं, त्यांच्या खात्यात हे अधिवेशन संपल्याबरोबर डिसेंबर महिन्याचा हप्ता टाकणार आहोत. सोबतच लाडकी बहीण योजनेचे कोणतेच निकषही बदलले नाहीत, असेही त्यांनी ठामपणे सांगितले. पण हे सांगताना त्यांनी काही जणांची पोलखोलही केली. ते म्हणाले की, काही जणांनी चार चार खाती उघडल्याचे लक्षात आले आहे. अशा लोकांवर त्यांनी संतापही व्यक्त केला. समाजात चांगल्या प्रवृत्ती असतात, तशा काही वाईट प्रवृत्तीही असतात. एखादी योजना चुकीच्या पद्धतीने वापरत असेल तर जनतेचा पैसा आहे, तुमची आमची जबाबदारी आहे, तो योग्य प्रकारे गेला पाहिजे. माणसांनीच ९ खाती काढलीत त्याला लाडकी बहीण कसे म्हणायचे, असा सवालही त्यांनी सभागृहात केला. बहिणींच्या पैशांवर ज्याचा डोळा आहे, तो लाडका भाऊ कसा? अशी विचारणा मुख्यमंत्र्यांनी केली. सोबतच शेतकरी, युवक, ज्येष्ठ नागरिक, वंचितांच्या संदर्भात दिलेली आश्वासने महायुती सरकार पूर्ण करेल, असे वचनही त्यांनी दिले. या घोषणेमुळे त्यांची बहिणींवरील माया लक्षात येते. त्यामुळे आता लाडक्या बहिणींना प्रतीक्षा आहे ती देवाभाऊंनी खात्यात ओवाळणी टाकण्याची.

९८५०७५३२८१

## थेट विधिमंडळातून

**नागेश दाचेवार**

# सामान्यातील असामान्य व्यक्तिमत्त्व!



दुसऱ्यांच्या शेतात सालकरी गडी म्हणून, मोलमजुरी करून आयुष्य घालवणाऱ्या शेतमजूर असलेल्या शंकरराव शिंदे यांच्या गरीब कुटुंबातील, धनगर समाजातील एक पोर आता राज्याच्या सर्वोच्च सभागृहाचा प्रमुख झालाय!... त्याचं नाव आहे प्रा. राम शिंदे... अत्यंत हालाखीच्या परिस्थितीतून जडघडण झालेल्या, चौंडी विकास प्रकल्पाचे सदस्य, सरपंच ते आमदार असा प्रवास असणाऱ्या राम शिंदेंची आता विधान परिषदेच्या सभापतिपदी निवड झाली आहे.

पुण्यश्लोक अहल्यादेवी होळकर यांच्या माहेरचे नववे वंशज. माजी मंत्री, आमदार, प्राध्यापक राम शिंदे या संघर्षवीराचा जन्म अहल्यानगर (पूर्वीचे अहमदनगर) जिल्ह्यातील कर्जत जामखेड तालुक्याच्या चौंडी या अत्यंत छोट्याशा अर्थात त्याकाळी दोन पाचशे लोकसंख्या असलेल्या आणि आजही दोन, चार हजारापलीकडे लोकसंख्या नसलेल्या गावी १ जानेवारी १९६७ रोजी शेतमजूर असलेल्या शंकरराव शिंदे यांच्या घरी झाला. घरातलं अठराविश्व दारिद्र्य असलेल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह हा एक प्रश्न उभा ठाकला असताना, घरच्या परिस्थितीवर मात करत राम शिंदे यांनी उच्च शिक्षण घेतले. एम.एस्सी., बी.एड. पर्यंत शिक्षण पूर्ण केल्यानंतर त्यांनी बीड जिल्ह्यातील आष्टी येथील एका महाविद्यालयात सुरुवातीच्या काळात १९९२-९३ मध्ये प्राध्यापक म्हणून काम केले. दरम्यान, १९९५ मध्ये युतीचे सरकार आले तेव्हा तत्कालीन मुख्यमंत्री मनोहर जोशी आणि उपमुख्यमंत्री गोपीनाथ मुंडे पुण्यश्लोक अहल्यादेवी होळकर यांच्या पुण्यतिथी कार्यक्रमानिमित्त चौंडी येथे आले होते. तेव्हा त्यांनी चौंडी विकास प्रकल्पाचा पाया ठेवला. आणि या प्रकल्पानेच महाराष्ट्राला दिला चौंडीच्या मातीतील हा हिरा...

पण हा प्रवास राम शिंदेंसाठी काही सोपा नव्हता. चौंडी विकास प्रकल्पासाठी नोकरी सोडून स्वतःला वाहून घेतले. त्यानंतर १९९७ साली भाजपाने पंचायत समिती लढविण्याची संधी शिंदेंना दिली. मात्र, त्यांचा या निवडणुकीत पराभव झाला, यश मिळू शकले नाही. तब्बल तीन वर्षांनंतर २००० साली चौंडी ग्राम पंचायतीच्या निवडणुकीत मात्र यश मिळाले. त्यानंतर सलग पाच वर्षे ते सरपंच राहिले. पण यादरम्यान, लढविलेल्या बाजार समितीच्या निवडणुकीत पराभव झाला. नंतर जिल्हा परिषदेचं तिकीट कापलं गेलं. आणि त्यापाठोपाठ २००५ मध्ये ग्राम पंचायतीतदेखील पराभवाला सामोरे जावे लागले. राजकारणात उतरती कळा लागल्याचे वाटू लागले असताना, २००७ च्या पंचायत समिती निवडणुकीत राम शिंदे यांच्या पत्नी आशाताई शिंदे या विजयी झाल्याने, शिंदेंना थोडासा दिलासा मिळाला. या राजकीय खडतर प्रवासादरम्यान, राम शिंदेंनी २००४ ते २००६ भाजपा युवा मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष, २००६ ते २००९ भाजपा जामखेडचे तालुकाध्यक्ष, अशा जबाबदाऱ्या निभावल्या. त्यानंतर भाजपाने २००९ साली शिंदे यांना नव्याने तयार झालेल्या कर्जत-जामखेड या विधानसभा क्षेत्राची उमेदवारी दिली आणि प्रा. राम शिंदे यांचा विधानसभेत विजय होऊन, राज्याच्या राजकारणात उदय झाला. विरोधात असतानादेखील या भागात केलेल्या विकास कामांच्या जोरावर राम शिंदे २०१४ च्या विधानसभेतदेखील सलग दुसऱ्यांदा मोठ्या फरकाने विजयी झाले. २०१४ मध्ये महायुती सरकार महाराष्ट्रात आलं. या सरकारमध्ये २०१४-२०१६ या काळात गृह, कृषी, आरोग्य व पर्यटन विभागाच्या राज्यमंत्रिपदाची जबाबदारी शिंदेंनी सांभाळली. यावेळी त्यांनी एक जागरूक गृहराज्यमंत्री म्हणून आपली ओळख निर्माण केली. त्यापाठोपाठ सन २०१६-२०१९ या दरम्यान जलसंधारण, राजशिष्टाचार, ओबीसी कल्याण, वस्त्रोद्योग व पणन या विभागाचे कॅबिनेट मंत्री म्हणून त्यांची बढती झाली. याच दरम्यान त्यांनी संघटनात्मक जबाबदाऱ्यादेखील पार पाडल्या. २०१० ते २०१२ अहल्यानगर जिल्हाध्यक्ष, २०१३ ते २०१५ भाजपाचे राज्याचे सरचिटणीस, २०२१ प्रदेश उपाध्यक्ष, २०२२ भाजपा कोअर कमिटी सदस्य म्हणून प्रभावी काम केले. बऱ्याच काळानंतर राम शिंदेंना पुन्हा एकदा २०१९ च्या विधानसभा निवडणुकीमध्ये पराभवाला सामोरे जावे लागले. पराभव झाल्यानंतर शिंदे यांना पक्षाने विधान परिषदेवर पाठविले. दरम्यान, शिंदे विधान परिषदेचे आमदार असताना त्यांनी २०२४ ची विधानसभा लढविली मात्र, त्यात देखील अपयश आले. मात्र, आपल्या कर्तृत्वाचा ठसा तर त्यांनी आधीच उमटवला होता. त्यामुळे विधान परिषदेच्या १९ व्या सभापतिपदी प्रा. राम शिंदे यांची एकमताने निवड करण्यात आली. पक्षाने विधान परिषदेसारख्या वरिष्ठ सभागृहाच्या सभापतिपदी निवड करत एका सामान्य कुटुंबातल्या उच्चशिक्षित व्यक्तीचा सन्मान केला. राम शिंदे हे पुण्यश्लोक अहल्यादेवी होळकर यांच्या माहेरचे नववे वंशज, परिवारातील सदस्य, अर्थात अहल्यादेवींचे वडील मानकोजी शिंदे यांच्या नवव्या पिढीतील वारसदाराच्या रूपानं, राजमाता, राष्ट्रमाता अहल्यादेवींच्या ३०० व्या जयंतीसारख्या महत्त्वाच्या वर्षी या सर्वोच्चपदावर बसले आहेत. हा एकप्रकारे अहल्यादेवींचाच सन्मान असल्याची भावना आता व्यक्त केली जात आहे.

राम शिंदे यांच्या या नियुक्तीच्या निमित्ताने आणि त्यांच्या खडतर प्रवासाच्या निमित्ताने सामान्यातून असामान्य व्यक्तिमत्त्व कसं घडतं याचं उत्तम उदाहरण महाराष्ट्राला बघायला मिळालं. आता सभागृहाला, सभागृहातील सदस्यांना आणि त्या माध्यमातून राज्यातील जनतेला न्याय देण्याची मोठी जबाबदारी राम शिंदेंच्या खांद्यावर आली आहे. पुण्यश्लोक अहल्यादेवींचे वारस म्हणून अहल्यादेवींचा जो बाणा होता, त्याच बाण्याने काम करत या महाराष्ट्राला विकसित महाराष्ट्राकडे नेण्याचा शिवधनुष्य पेलायचा आहे.

९२७०३३३८८६

## वाचक पत्रे

### डॉ. आंबेडकरांच्या विचारांचा हा अपमानच नव्हे काय?

डॉ आंबेडकरांनी संविधान सभेत मसुदा समितीचे अध्यक्ष म्हणून केलेल्या भाषणात, जॉन स्टुअर्ट मिल आणि आयरिश देशभक्त डॅनियल ओ'कॉनेलच्या विधानांचा संदर्भ देऊन म्हटले होते की, देशासाठी आयुष्यभर सेवा देणाऱ्या महापुरुषांप्रति कृतज्ञता बाळगण्यात गैर काहीच नाही. पण कृतज्ञतेला मर्यादा आहेत ही खबरदारी बाळगणे इतर कोणत्याही देशांपेक्षा भारताच्या बाबतीत कितीतरी जास्त आवश्यक आहे. कारण जगातील इतर कोणत्याही देशाच्या राजकारणात घेतल्या जाणाऱ्या भूमिकेच्या तुलनेत भारतात भक्ती किंवा ज्याला व्यक्ती-पूजेचा मार्ग म्हटले जाऊ शकते, ती महत्त्वपूर्ण भूमिका बजावते. धर्मातील भक्ती हा आत्म्याच्या मोक्षाचा मार्ग असू शकतो. पण राजकारणात, भक्ती किंवा व्यक्ती-पूजा हा अधोगतीचा आणि लोकशाहीसाठी धोक्याचा मार्ग आहे. भारताच्या स्वातंत्र्यपूर्व काळात होऊन गेलेल्या महान व्यक्तिमत्त्वांनी आपले विचार समाजात रुजवले आणि त्या विचारांनी प्रेरित होऊन घडलेल्या जनमानसाने भारताला आजचे सार्वभौमत्व प्राप्त झाले. मात्र स्वातंत्र्योत्तर काळात या महनीयांच्या विचारांचे डोळस अनुकरण आणि अनुसरण होण्याऐवजी केवळ त्यांचे प्रतिमा पूजनाला समाजातील बहुतांश घटकांकडून प्राधान्य दिले गेले. भारतात या महापुरुषांच्या पुतळ्यांच्या संख्येवरून आपल्याला हे सहज लक्षात येईल. काल संसदेत झालेला प्रकार संविधान निर्मात्यांनी त्यावेळी दिलेल्या धोक्याच्या सूचनेचा प्रत्यय देणारा आहे. बाबासाहेबांच्या त्या विचारांचा आपल्याला विसर पडला आहे का ? आणि कां?

**प्रसाद पोफळी**/९८२२५६९६४८

### धर्मप्रेमी लोकप्रतिनिधींचे त्रिवार अभिनंदन

नुकत्याच महाराष्ट्रात विधानसभा निवडणुका होऊन हिंदुत्ववादी सरकार सत्तेत आले. सध्या हिवाळी अधिवेशन सुरू आहे. त्यानिमित्ताने 'धर्मप्रेमी लोकप्रतिनिधींचा सत्कार सोहळा' महाराष्ट्र मंदिर संघ आणि हिंदू जनजागृती समितीच्या वतीने आयोजित करण्यात आला. यापूर्वी अशा प्रकारच्या कार्यक्रमाचे आयोजन झाल्याचे बघण्यात आले नव्हते. या शानदार आयोजनासाठी आयोजक समितीचे मनःपूर्वक आभार! हिंदुत्वनिष्ठ संघटनांनी केलेला प्रचार, संतांचे आशीर्वाद आणि जागृत मतदारांनी केलेल्या मतदानामुळे राज्यात हिंदुत्वनिष्ठ सरकार झाले. या निवडणुकीत 'व्होट जिहाद विरुद्ध धर्मनिष्ठ शक्ती' असे स्पष्ट समीकरण होते, ज्यात महायुतीला भरघोस यश मिळाले, ते त्यांनी हिंदुत्वाचा मुद्दा खंबीरपणे मांडल्यामुळे. आता या यशानंतर, लोकप्रतिनिधींनी दिलेल्या आश्वासनांना जागून त्या आश्वासनांची पूर्तता होणे अपेक्षित आहे. धर्मांतरण, लव्ह जिहाद, मंदिरांचे सरकारीकरण यासारख्या प्रलंबित विषयांवर त्वरित कठोर कायदा लागू करावा. तसेच लॅण्ड जिहाद रोखण्यासाठी वक्फ बोर्ड कायदा रद्द करण्यात यावा. या दिशेने सरकारने ठोस पावले उचलावीत, अशी अपेक्षा आहे.

**प्रिया बागडदेव**/छिंदवाडा

### पुन्हा सोलापूरच्या पदरी निराशाच

महायुतीचे सरकार आले आणि येथे परत एकदा सोलापूरकरांच्या आशा पल्लवीत झाल्या. ४ आमदार भाजपाला निवडून दिले आहेत. निदान या वेळेस तरी मंत्रिमंडळात सोलापूरला स्थान मिळेल अशी आशा होती. सोलापूरला विमानतळ झाले. आता तरी फरक पडेल. तसेच आमदार मंत्री झाले तर सोलापूरच्या विकासात अजून भर पडली असती.

औद्योगिक वसाहत 'जैसे थे'च आहे. त्यात वाढ करणे गरजेचे आहे. सोलापूरचा विकास हा नगरसेवक, आमदार, खासदार यांच्या इच्छाशक्तीच्या जोरावर होत असतो. काळाचा रोख बघता केंद्रीय सरकार बघून सोलापूरकरांनी भाजपाच्या पदरात मत टाकून त्यांच्यावर जबाबदारी टाकली आहे. मुख्यमंत्र्यांनी विशेष लक्ष घालून सोलापूरच्या विकासात हातभार लावावा. तसेच विद्यमान आमदारांनीही तसे प्रयत्न करावे. सोलापूर जिल्ह्यातील मतदारांनी विश्वास टाकला आहे त्याचे सार्थक करावे.

**श्रीपाद अशोक महाजन**/सोलापूर

### बुद्धिबळपटू डी. गुकेशचे यश युवांसाठी प्रेरणा

भारताचा युवा बुद्धिबळपटू डी. गुकेश याने जागतिक बुद्धिबळ स्पर्धेच्या महाअंतिम सामन्यात चिनी ग्रॅण्ड मास्टर डिंग लिरेन याला नमवत इतिहास घडवला. अवघ्या १८ व्या वर्षी जागतिक स्पर्धा जिंकून गुकेशने आपणच बुद्धिबळाच्या पटावरील नवा राजा असल्याचे सिद्ध केले. ग्रॅण्डमास्टर विश्वनाथन् यांच्यानंतर अशी कामगिरी करणारा तो दुसरा भारतीय बुद्धिबळपटू आहे. अवघ्या अठराव्या वर्षी ही कामगिरी करून डी. गुकेशने जगातील सर्वात तरुण विश्वविजेता होण्याचा मान मिळवला आहे. त्याची कामगिरी पाहून अनेक जण बुद्धिबळाकडे वळतील. डी. गुकेशची कामगिरी भारतीयांसाठी अभिमानाची बाब आहे. विश्वविजेता डी. गुकेशचे मनापासून अभिनंदन!

**श्याम ठाणेदार**/९९२२५४६२९५

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com

## संक्षिप्त वृत्त



### अय्यप्पास्वामी अन्नदान सेवा संघाच्या शिबिरात १२५ जणांचे रक्तदान

**सोलापूर, दि.२० डिसेंबर-**

अक्कलकोट रोड एमआयडीसी येथील अय्यप्पास्वामी अन्नदान सेवा संघातर्फे गुरुवारी घेण्यात आलेल्या रक्तदान शिबिरात १२५ जणांनी रक्तदान केले. या संघातर्फे सालाबादप्रमाणे अय्यप्पा स्वामींचे ४१ दिवसांचे सामूहिक अनुष्ठान सुरू आहे. अनुष्ठान कालावधीत वेगवेगळे सामाजिक उपक्रम राबविले जातात. याअंतर्गत गुरुवार दि. १९ डिसेंबर रोजी रक्तदान शिबिर घेण्यात आले. मल्लिकार्जुन ब्लड बँकेचे विश्वस्त सत्यम गायकवाड यांच्या हस्ते शिबिराचा प्रारंभ करण्यात आला. शिबिरात एकूण १२५ जणांनी रक्तदान केले. यावेळी संघाचे संस्थापक अध्यक्ष सत्यनारायण भंडारी, रचन भंडारी, अरविंद जिल्ला, प्रकाश चन्ना, भूमण्णा कोंडी, राकेश गरदास, नरेश भंडारी, श्रीनिवास राव, विकास पुल्ली, आयलेश यल्ला, अनिल चिप्पा, श्रीनिवास सुरा वासुदेव शेरला श्रीनिवास म्याना, सिद्धार्थ भंडारी, संतोष माटेटी, प्रकाश भंडारी, नागराज म्याना आदी उपस्थित होते. वृक्षारोपण तसेच शालेय साहित्य वाटप कार्यक्रम घेतले जाणार आहे.



### प्रशिक संस्थेतर्फे संत गाडगे महाराजांना अभिवादन

**सोलापूर, दि.२१ डिसेंबर-**

थोरला राजवाडा मिलिंद नगर बुधवार पेठ येथील मध्यवर्ती बुद्ध विहार येथे प्रशिक सामाजिक संस्थेच्या वतीने थोर समाज सुधारक संत गाडगे महाराज यांच्या स्मृती दिनानिमित्त पुष्पहार अर्पण करून सामुदायिक बुद्ध वंदना घेऊन अभिवादन करण्यात आले. यावेळी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष सुशील सरवदे, प्रमुख सल्लागार शिवम सोनकांबळे, श्रीनिवास सरवदे,सचिन गायकवाड,सुहास लोंढे, बाळू गायकवाड, शेषकुमार सरवदे, विश्वास बाबरे, नेहाल बाबरे, सागर साबळे,अनिकेत जगताप, बब्बर सोनकांबळे,प्रथमेश गायकवाड, रोहन कांबळे, करण बाबरे, बापू कापुरे,सोनू बाबरे, आप्पा तळभंडारे, अभिषेक जगझाप व पदाधिकाऱ्यांची उपस्थिती होती.

### ६७ हजारांचे ऐवज असलेली पर्स लंपास

**सोलापूर, दि.२० डिसेंबर -**

शहरातील अक्कलकोट रोडवरील शांती चौकात अक्कलकोटला जाणाऱ्या एस टी बसमध्ये चढणाऱ्या महिलेची पर्स गर्दीचा फायदा घेत चोरट्याने चोरून नेली. या पर्समध्ये ६७ हजारांचे सोन्या-चांदीचे दागिने होते. याबाबत लक्ष्मीबाई अनिल मुलगे (वय ४०, रा. किर्ती नगर, अक्कलकोट रोड, सोलापूर) या महिलेने दिलेल्या फिर्यादीवरुन जेलरोड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. लक्ष्मीबाई मुलगे या २० डिसेंबर रोजी सकाळी ११ च्या सुमारास अक्कलकोट रोडवरील शांती चौकातील बस स्टॉप येथून सोलापूर येथून अक्कलकोटकडे जाण्यासाठी एस टी बसमध्ये चढत होत्या. त्यावेळी गर्दीचा फायदा घेऊन अज्ञात चोरट्याने लक्ष्मीबाई यांची पर्स चोरून नेली. या पर्समध्ये सोन्याची बोरमाळ, सोन्याचे मणी मंगळसूत्र, चांदीची लहान चैन, चांदीचे शिवलिंग, चांदीचा छल्ला व रोख १२५० रुपये असा ६७ हजार १५० रुपयांचा ऐवज होता. याबाबत जेलरोड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिस हवालदार बाबर पुढील तपास करीत आहेत.

# शिक्षणासाठी व्यवस्था बाधक नव्हे तर साधक असावी

**सरसंघचालक डॉ. मोहन भागवत**

**पाषाण येथील लोकसेवा ई स्कूलचे उद्घाटन**



**पुणे, दि. २० डिसेंबर-**

शिक्षणासाठी व्यवस्था बाधक नाही तर साधक असायला पाहिजे. शैक्षणिक व्यवस्थेचे स्वरूप केवळ नियमन करणारे असू नये, तर ते शिक्षणासाठी पोषक ठरायला हवे, असे आग्रही मत राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ. मोहन भागवत यांनी व्यक्त केले. पाषाण येथील लोकसेवा ई स्कुलच्या नवीन इमारतीच्या अनावरण कार्यक्रमात ते बोलत होते.

'कार्यक्रमाला माजी सनदी अधिकारी अविनाश धर्माधिकारी, शास्त्रीय संगीत गायक महेश काळे, भारतीय जैन संघटनेचे संस्थापक शांतीलाल मुथ्था, कॉसमॉस बँकेचे अध्यक्ष मिलिंद काळे, उद्योजक पुनीत बालन, लोकसेवा प्रतिष्ठानचे संचालक ॲड. वैदिक पायगुडे, माजी संचालक निवेदिता मडकीकर आदी उपस्थित होते. 'शिक्षणाचा विषय चौकटीत अडकू नये म्हणून तो समाजाधारित असावा. त्यासाठी समाजाने त्याचे पोषण करावे, अशी भूमिका डॉ. मोहन भागवत यांनी मांडली. ते म्हणाले, साक्षरता आणि शिक्षण यात फरक आहे. पोट भरणे म्हणजे शिक्षण नाही. तर माणूस होण्यासाठी शिक्षणाची गरज आहे. माणूस घडविण्याची प्रक्रिया म्हणजे शिक्षण होय. त्यामुळे शिक्षण हा व्यवसाय नसून एक व्रत आहे, सेवा आहे. नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या प्रभावी अंमलबजावणीतून राष्ट्राला पाहिजे तसे व्यक्ती निर्माण होईल, अशी आशा सरसंघचालकांनी व्यक्त केली. शांतीलाल मुथा म्हणाले, स्वातंत्र्यानंतर प्रथमच सर्वोत्कृष्ट शैक्षणिक धोरण निर्माण झाले आहे. ज्यातून नवभारत निर्माण होईल. धोरण जरी चांगले असले तरी त्याची प्रभावी अंमलबजावणी करण्याची गरज आहे. कारण पाश्चिमात्य संस्कृतीच्या आक्रमनामुळे मूल्य शिक्षण आणि कुटुंब व्यवस्थेसमोर आता अनेक आव्हाने उभी राहत आहेत. कार्यक्रमाच्या सुरूवातीला नेताजी सुभाषचंद्र बोस सैनिकी शाळेच्या विद्यार्थ्यांनी शिस्तबद्ध पथसंचलन करत मान्यवरांना अभिवादन केले.

#### पाठ्यपुस्तकांवर अजूनही वसाहतवादाची छाप

स्वातंत्र्यानंतर आजही आपल्या पाठ्यपुस्तकांवर वसाहतवादी मानसिकता असल्याची खंत अविनाश धर्माधिकारी यांनी व्यक्त केली. ते म्हणाले, पाठ्यपुस्तकातून आजही आपल्या देशाचा आणि संस्कृतीचा अशास्त्रीय आणि सत्याला धरून नसलेला इतिहास शिकविला जात आहे. भारत आणि भारतीय संस्कृतीला विरोध करणाऱ्या शक्तींचा वैचारिक व व्यावहारिक ठसा आजही पाठ्यपुस्तकांद्वारे पुढील पिढ्यांपर्यंत जात आहे. सरकार नावाची व्यवस्था काय करेल यावर न थांबता आपण आपल्या शुद्ध बुद्धीला जाणवेल असे विचार मांडले पाहीजेत. भविष्याला दिशा देणारी आपली सनातन संस्कृती आणि आधुनिक शास्त्र यांचा मेळ घालायला हवा, असेही धर्माधिकारी म्हणाले.

## डॉ. सरवडीकरांचे सवाई गंधर्व भीमसेन संगीत समारोहात गायन

**तभा वृत्तसेवा, सोलापूर, दि. २० डिसेंबर-**

प्रख्यात गायक व आपल्या सोलापूरचे सुपुत्र डॉ अतिंद्र सरवडीकर यांना यंदाच्या अत्यंत प्रतिष्ठीत सवाई गंधर्व भीमसेन संगीत समारोह पुणे येथे गायन सादर करण्यासाठी आमंत्रित करण्यात आले आहे. समारोहाच्या शेवटच्या दिवशी, रविवारी दि. २२ डिसेंबर रोजी अंतिम सत्रात त्यांचे सादरीकरण असणार आहे. आपल्या प्रतिभा संपन्न तसेच सौंदर्यपूर्ण कलाविष्कारामुळे डॉ अतिंद्र सरवडीकर यांना वर्तमान संगीत जगतात विशेष स्थान प्राप्त झाले आहे. मातोश्री श्रीमती वृंदा सरवडीकर, स्व दत्तूसिंग गहेरवार या सोलापुरातल्या गुरुंच्या मार्गदर्शनाबरोबरच विश्वविख्यात गायिका स्वरयोगिनी पद्मविभूषण डॉ प्रभा अत्रे यांच्याकडून त्यांनी जवळपास २१ वर्षे गुरुकुल पद्धतीने संगीत अध्ययन केले आहे. जगभरातल्या प्रतिष्ठित स्वर मंचावरून डॉ अतिंद्र यांनी अनेक वेळा आपली कला प्रस्तुत केली आहे. नव्या संगीत रचना, संशोधन, लेखन अशा क्षेत्रातही त्यांनी मोठे कार्य केले आहे. मुंबई विद्यापीठाने प्रदान केलेली सगळ्यात पहिली संगीत विषयातली डॉक्टरेट पदवी प्राप्त करण्याचा बहुमान त्यांना प्राप्त आहे. यंदाच्या सवाई गंधर्व भीमसेन संगीत समारोहात डॉ अतिंद्र सरवडीकर यांचा सहभाग ही सोलापूरकरांसाठी अत्यंत अभिमानास्पद घटना आहे.



## जुना घरकुलमध्ये नेत्र तपासणी, आरोग्य शिबीराचे आयोजन

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २० डिसेंबर-**

थोर स्वातंत्र्यसेनानी स्व. भाई छन्नुसिंग चंदेले यांच्या ४०व्या स्मृतिदिनानिमित्त राष्ट्रमाता इंदिरा प्राथमिक शाळा, भाई छन्नुसिंग चंदेले समाजकार्य महाविद्यालय, देशभक्त भाई छन्नुसिंग चंदेले माध्यमिक विद्यालय आणि अश्विनी ग्रामीण वैद्यकीय रुग्णालय कुंभारी यांच्या संयुक्त विद्यमाने रविवार २२ डिसेंबर रोजी सकाळी ११ वाजता जुना विडी घरकुल येथील एमएसईबी कपांउंडजवळील राष्ट्रमाता इंदिरा प्राथमिक शाळा येथे मोफत नेत्र तपासणी व आरोग्य शिबीराचे आयोजन मंगळवार २४ डिसेंबर रोजी सकाळी ९ वाजता राष्ट्रमाता इंदिरा प्राथमिक शाळा येथे रक्तदान शिबीरही घेण्यात येणार आहे. नेत्ररोग तपासणी, आरोग्य तपासणी शिबीराचा अधिकाधिक जणांनी लाभ घ्यावा. तसेच रक्तदान शिबीरात सहभागी होवून रक्तदान करावे, असे आवाहन हेमु चंदेले, रविंद्र मोकाशी, प्रा.विलास बेत, डॉ. कायल चंदेले, अंबादास शिंदे, प्रा. डॉ. रोझाताई चंदेले यांनी केले आहे.

# सशस्त्र सेवा ध्वजदिन निधी संकलनासाठी १ कोटी ७२ लाखांचे उद्दिष्ट

**उपजिल्हाधिकारी नाटेकर यांची माहिती**



**सोलापूर, दि. २० डिसेंबर-**

सोलापूर जिल्ह्यास सन २०२३ या वर्षीसाठी ०१ कोटी ५४ लाख ४१ हजार फक्त सशस्त्र सेना ध्वजदिन निधी संकलनाचे उद्दिष्ट दिले होते. जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांच्या मार्गदर्शनाखाली ध्वजदिन निधी संकलनाचे उद्दिष्ट रु १ कोटी ७२ लाखांचे म्हणजेच १०३.१०% उद्दिष्टपुर्ती करण्यात आली असल्याची माहिती उपजिल्हाधिकारी (महसूल) अमृत नाटेकर यांनी केले.

शहीद जवानांच्या कुटुंबियांच्या जीवनातील अडी-अडचणी दूर करुन त्यांचे दैनंदिन जीवन सुसह्य व्हावे, त्याचप्रमाणे युध्दात अपंगत्व प्राप्त झालेल्या आणि सशस्त्र दलातून निवृत्त झालेल्या जवानांच्या विविध कल्याणकारी योजना राबविण्यासाठी ध्वजदिन निधीचा विनियोग केला जात असल्याने संकलनात सर्वांनी योगदान करावे, असे आवाहन श्री. नाटेकर यांनी यावेळी केले.

सशस्त्र सेना ध्वजदिन निधी-२०२४ संकलन शुभारंभ व ध्वजदिन २०२३ चे उत्कृष्ट निधी संकलन केलेल्या कार्यालय प्रमुखांना पारितोषिक वितरणाचा कार्यक्रम बहुउद्देशीय सभागृह, जिल्हाधिकारी कार्यालयात संपन्न झाला. यावेळी मेजर मिलिंद देवदत्त तुंगार, जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी कमांडर अशोक कुमार, शिक्षणाधिकारी प्राथमिक कादर शेख, राज्य उत्पादन शुल्क निरीक्षक अविनाश घाटगे, माजी सैनिक संघटना अध्यक्ष अरुणकुमार तळीखेडे आदी उपस्थित होते. श्रुती कुलकर्णी यांनी आभार मानले. सुत्रसंचालन कुलदीप कमळे यांनी केले.

**खरेदीपुर्व जाहीर नोटीस**

तमाम लोकांस विशेषतः बार्शी शहर व आसपासचे लोकांस या खरेदीपूर्व जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की - शहर बार्शी येथील गट नंबर ८३९ याचा नविन गटनंबर ८४५ पैकी प्लॉट नं. ३४ याचे क्षेत्रफळ १६८ चो.मि. ही मिळकत प्रभाकर शिवाजी काशिद यांनी दि. २८/०४/२००० रोजी दस्त क्र. ११९३/२००० ने खरेदी केली असुन सदरची मिळकत त्यांचे मालकी व कब्जे वहिवाटीस आहे, असे सांगतात सदरील मिळकत प्रभाकर शिवाजी काशिद यांनी आमचे आशिलास रक्कम रुपये ५५,७५,०००/- कायम खुश खरेदी देणेचे ठरविले आहे. तसा दि. १४/११/२०२४ रोजी इसार पावतीचा दस्त प्रभाकर शिवाजी काशिद यांनी आमच्या आशिलाचे नावे लिहुन दिलेला आहे. आमच्या आशिलाने प्रभाकर काशिद यांना इसारादाखल र. रुपये ९,५०,०००/- रोख दिलेले आहेत खरेदी किंमतीपोटी राहिलेली रक्कम खरेदीखताच्या वेळेस देणेचे ठरलेले आहे. प्लॉटचा प्रत्यक्ष ताबा खरेदीखताच्या वेळी देणेचे ठरलेले आहे.

वरील प्रमाणे आमचे खालील सही करणारे आशिल व प्रभाकर काशिद यांचे मध्ये ठरलेले आहे. प्रभाकर काशिद यांनी आमचे आशिलास वरील मिळकत बोजाविरहित निर्वेध व निजोखमी असल्याचा निर्वाळा दिलेला असुन जमिन विक्रीबाबत खात्री व विश्वास दिलेला आहे. याही उपर वरील मिळकतीबाबत कोणाचाही कसल्याही प्रकारचा गहाण, दान, भाडेपट्टा अथवा कोणतेही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिध्द झालेपासून ३० दिवसाचे आत आमच्या आशिलास लेखी पुराव्यानिशी कळवावे मुदतीत कोणाचीही कसलीही तक्रार न आल्यास प्रभाकर शिवाजी काशिद यांच्याशी ठरलेप्रमाणे वरील मिळकतीचा व्यवहार आमचे आशिल दोन महिन्यांत पुर्ण करतील तदनंतर कोणाचीही कसलही तक्रार चालणार नाही. कोणाचीही फसगत होऊ नये म्हणून ही जाहीर नोटीस दिली असे ता. १८/१२/२०२४.

सही/-
श्री. सुभाष के. शिंदे,
बी.ए., एल.एल.बी., ॲडव्होकेट
(मोहम्मद इमरान जहांगीर काझी तर्फे ॲड)
मो.नं. ८२०८०५९२९२, मो. ९१४६८२३७७५

**खरेदीपुर्व जाहीर नोटीस**

तमाम लोकांस विशेषतः बार्शी शहर व आसपासचे लोकांस या खरेदीपूर्व जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की - शहर बार्शी येथील गट नंबर ८३९ याचा नविन गटनंबर ८४५ पैकी प्लॉट नं. ३४ याचे क्षेत्रफळ १६८ चो.मि. ही मिळकत प्रभाकर शिवाजी काशिद यांनी दि. २८/०४/२००० रोजी दस्त क्र. ११९३/२००० ने खरेदी केली असुन सदरची मिळकत त्यांचे मालकी व कब्जे वहिवाटीस आहे, असे सांगतात सदरील मिळकत प्रभाकर शिवाजी काशिद यांनी आमचे आशिलास रक्कम रुपये ५५,७५,०००/- कायम खुश खरेदी देणेचे ठरविले आहे. तसा दि. १४/११/२०२४ रोजी इसार पावतीचा दस्त प्रभाकर शिवाजी काशिद यांनी आमच्या आशिलाचे नावे लिहुन दिलेला आहे. आमच्या आशिलाने प्रभाकर काशिद यांना इसारादाखल र. रुपये ९,५०,०००/- रोख दिलेले आहेत खरेदी किंमतीपोटी राहिलेली रक्कम खरेदीखताच्या वेळेस देणेचे ठरलेले आहे. प्लॉटचा प्रत्यक्ष ताबा खरेदीखताच्या वेळी देणेचे ठरलेले आहे.

वरील प्रमाणे आमचे खालील सही करणारे आशिल व प्रभाकर काशिद यांचे मध्ये ठरलेले आहे. प्रभाकर काशिद यांनी आमचे आशिलास वरील मिळकत बोजाविरहित निर्वेध व निजोखमी असल्याचा निर्वाळा दिलेला असुन जमिन विक्रीबाबत खात्री व विश्वास दिलेला आहे. याही उपर वरील मिळकतीबाबत कोणाचाही कसल्याही प्रकारचा गहाण, दान, भाडेपट्टा अथवा कोणतेही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिध्द झालेपासून ३० दिवसाचे आत आमच्या आशिलास लेखी पुराव्यानिशी कळवावे मुदतीत कोणाचीही कसलीही तक्रार न आल्यास प्रभाकर शिवाजी काशिद यांच्याशी ठरलेप्रमाणे वरील मिळकतीचा व्यवहार आमचे आशिल दोन महिन्यांत पुर्ण करतील तदनंतर कोणाचीही कसलही तक्रार चालणार नाही. कोणाचीही फसगत होवु नये म्हणुन ही जाहीर नोटीस दिली असे ता. १८/१२/२०२४.

सही/-
श्री. सुभाष के. शिंदे,
बी.ए., एल.एल.बी., ॲडव्होकेट
(मोहम्मद इमरान जहांगीर काझी तर्फे ॲड)
मो.नं. ८२०८०५९२९२, मो. ९१४६८२३७७५

**जाहीर प्रसिध्दीकरण**

**पंढरपूर येथील मे. तहसिलदार साहेब यांचे कोर्टात**

**तानाजी तुकाराम ढोणे**
वय : ४४ वर्षे, धंदा शेती
रा. ढोणेवस्ती, टाकळी, पो. कोर्टी
ता. पंढरपूर, जि. सोलापूर — **अर्जदार**
विरुध्द
**मा. ग्रामसेवक ग्रामपंचायत, टाकळी (लक्ष्मी) - सामनेवाला**
**ता. पंढरपूर जि. सोलापूर**

तमाम लोकांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, अर्जदार यांनी पंढरपूर येथील मे. तहसिलदार साहेब यांचे कोर्टात अर्जदार यांचे नातेवाईक कै. कडाबाई नारायण खरात यांचा मृत्यु मौजे टाकळी (लक्ष्मी) ता. पंढरपूर येथे दि. ०२-०५-२००२ रोजी झाला असून येथील ग्रामपंचायत कार्यालयात मृत्युची नोंद मृत्यु नोंदणी रजिस्टरमध्ये होवून मिळणेसाठी सदरचा अर्ज न्यायालयात दाखल केलेला आहे.

तेव्हा सदर मृत्यु नोंदीचा आदेश होणेसंबंधी कोणाची कोणत्याही प्रकारची हरकत, तक्रार असल्यास या न्यायालयात हे जाहीर प्रसिद्धीकरण केलेपासून ३० दिवसाचे आत स्वतः आपले म्हणणे अथवा हरकत / तक्रार सक्षम हजर राहून अथवा वकिलामार्फत हजर राहून द्यावे.

वरील मुदतीत कोणाचेही म्हणणे अथवा हरकत न आल्यास सदरचे न्यायालय अर्जदार यांचे नातेवाईक कै. कडाबाई नारायण खरात यांच्या मृत्युची नोंद ग्रामपंचायत टाकळी (लक्ष्मी), ता. पंढरपूर येथील कार्यालयात होणेसंबंधी ग्रामसेवक, ग्रामपंचायत टाकळी (लक्ष्मी) ता. पंढरपूर यांना योग्य ते आदेश करतील, याची नोंद घ्यावी,

ही जाहीर नोटीस दिली तारीख २०/१२/२०२४

शिक्का
सही/-
तहसिलदार, पंढरपूर

### वालचंद कॉलेज रोडवर मोबाईल चोरीस

**सोलापूर, दि.२० डिसेंबर -**

वालचंद कॉलेज रोडवर तरूणाचा १५ हजार रुपये किंमतीचा मोबाईल चोरट्याने चोरून नेला. याबाबत विनोद व्यंकटेश वडलाकोंडा (वय २३, रा. एम एस नविन विडी घरकुल, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन जेलरोड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. १७ नोव्हेंबर रोजी सकाळी विनोद वडलाकोंडा हा त्याचा भाऊ यास घरी घेऊन जाण्यासाठी वालचंद कॉलेज रोडवर थांबला होता. त्यावेळी चोरट्याने त्याचा १५ हजार रुपये किंमतीचा मोबाईल चोरून नेला. याबाबत जेलरोड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस हवालदार माने पुढील तपास करीत आहेत.

### भगवान चवरे यांचे निधन



**माढा, दि. २० डिसेंबर-**

येथील सेवानिवृत्त आरोग्य कर्मचारी भगवान लक्ष्मण चवरे (वय ७९) यांचे अल्पशा आजाराने गुरुवारी निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, एक मुलगी, सुना व नातवंडे असा परिवार आहे. माढा प्रेस क्लबचे अध्यक्ष मदन चवरे यांचे ते वडील होत.

**नावात बदल**

मी शेख **सायराबानु महिबुब** W/o. **शेख मिनहाजुद्दीन अजिज** राहणार स्नेहआनंद फ्लॅट नं. १९ हॅपी कॉलनी लेन नं. १, कोथरुड, पुणे-४११०३८ माझे बदलेले नविन नांव **शेख साहीराबानु मिनहाजुद्दीन.**

**नोटरी क्र. २३५६**
**दि. २०/१२/२०२४**

Classifieds

**पाहिजेत**

**सिक्युरिटी गार्ड भरती चालू आहे. महिला व पुरुष ८ व १२ तासासाठी सोलापूर शहर व ग्रामीण मध्ये**
**9850702170**

दै. सोलापूर तरुण भारत मध्ये प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातींमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसारच प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही मजकुराच्या सत्यतेबाबत दै. सोलापूर तरुण भारत हमी घेऊ शकत नाही, याची वाचकांनी नोंद घ्यावी.

**रि-प्रेझेंटेटिव्ह दाव्याचे जाहीर सिध्दकरण**
पुढील ने. तारीख ०५/०२/२०२५
रे.मु. नंबर ६८९/२०२४ नि.०९

**बार्शी येथील मे. सिव्हील जज्ज ज्युनिअर डिव्हीजन साहेब यांचे कोर्टात**

**श्री मोहन विश्वनाथ काजळे**
वय ७९ वर्षे, धंदा - शेती
रा. गौडगाव. ता. बार्शी, जि सोलापूर — **वादी**
विरुध्द
**श्री. देविदास दिगंबर जोशी,**
वय ६५ वर्षे, धंदा - ज्योतिषशास्त्र अभ्यासक
रा. जोशी गल्ली, देशपांडे गल्ली बस स्टॅण्डजवळ, धाराशिव, — **प्रतिवादी**

यात वादी रि-प्रेझेंटेटीव्ह दाव्याचे जाहीर प्रसिध्दकरण खालील नमुद बाबीप्रमाणे करीत आहेत की, मौजे गौडगाव ते मौजे भालगाव या उत्तर दक्षिण चालीच्या डांबरी रस्त्यापासुन पुर्व पश्चिम चालीने प्रतिवादीचे मौजे गौडगाव येथिल गट नंबर ३८३ क्षेत्राच्या मध्य भागातुन पुर्वपश्चिम चालीने मौजे गौडगाव ते मौजे रुई शिवेवरील लक्ष्मीआई देवीच्या मंदिरापर्यंत तहसलदार बार्शी यांनी क्र.जमा/२/रस्ता/५/एस.आर./३९/२०२२ संगणक सांकेतांक ४२/२०२२ प्रमाणे दिनांक २२/०७/२०२२ रोजी मंजुर केलेला रस्ता व मामलेदार रिव्हीजन प्रमाणे देखिल मंजुर केलेला रस्ता हा पुर्व परंपरागत इजमेंट ऑफ नेसेसिटीच्या वहिवाटीचा रस्ता वादी व सदर भागातील अनेक समाजाच्या लोकांना, शेतक-यांना जाणे येणेचा जड वाहन रस्ता होता व आहे. असे जाहीर होवुन मिळणेचा रि-प्रेझेंटेटीव्हचा दाव्याचा विषय आहे. त्यासोबत स्वतंत्र तुर्तावर्त ताकीद अर्ज आहे. सदर वादीचे वकील ॲड. रणजित बब्रुवान काजळे, ॲड. सौ. क्रांती र. काजळे-पवार, ॲड. सौ. गायत्री अ. डोंगरे-गुंड, यांचे मार्फत दावा दाखल केलेला आहे. त्यामध्ये वर नमुद प्रतिवादी आहेत.

सबब, वर नमुद दाव्याचे कामी कोणाची काही हरकत अथवा म्हणणे असलेस हे प्रसिध्दकरण झालेपासुन ३० दिवसाचे आत किंवा नेमलेली तारीख ०५/०२/२०२५ रोजी वर नमुद दाव्याबाबत ज्याचे कोणाचे हीतसंबंध आहेत. अशी हितसंबंधीत व्यक्ती अथवा इतर व्यक्ती यांना वर नमुद दाव्याबाबत म्हणणे हरकत घ्यावयाचे असलेस ते वर नमुद स्वतः अथवा वकीलामार्फत तारखेस हजर राहु शकतात, सबब तसे कोणाचेही म्हणणे, हरकत न आलेस वादी हे रि-प्रेझेंटेटीव्ह दाव्यासाठी पात्र आहेत असे समजुन कोणाचीही सदर दाव्यास हरकत नाही असे समजुन दाव्याचे काम चालू करतील,

हे प्रसिध्दीकरण दि. १६/१२/२०२४ रोजी मे. न्यायालयाचे सही व कोर्ट शिक्यानिशी प्रसिध्दीकरण केले.

सही/- लिपिक
कोर्टाचा शिक्का
सही/- सह. अधिक्षक दिवाणी न्यायालय क स्तर, बार्शी

**माढा नगरपंचायत माढा**

जा.क्रं. बांध/१३११/२०२४ दि.२०/१२/२०२४

**ई-निविदा प्रसिध्दीकरण सुचना क्रं. MCMADHA/ /2024**

मुख्याधिकारी माढा नगरपंचायत यांचेकडून शासनाच्या **नगरपंचायत क्षेत्रात नागरी सेवा व सुविधेचे काम अंतर्गत अ.क्र ०१ ते १९** योजने अंतर्गत हाती घेण्यात आलेल्या विकासकामाची ई-निविदा शासनाकडील नोंदनीकृत अनुभवी ठेकेदार-अर्हता प्राप्त निविदा धारकाकडून तांत्रिक ब-१ नमुन्यात स्पर्धात्मक निविदा ई-निविदेद्वारे मागविण्यात येत आहे. सदरच्या ई-निविदेमध्ये एकूण १९ कामे आहेत. निविदा फॉर्म ऑनलाईन उपलब्ध **दि. २१/१२/२०२४ ते दि. ०६/०१/२०२५** पर्यंत सायं ०५ वाजेपर्यंत असुन कामाच्या किंमतीबाबत तसेच निविदा किंमत निविदा स्वीकृती अटी व शर्ती इत्यादींची माहिती **http//mahatenders.gov.in** या संकेस्थळावर उपलब्ध आहेत.

शिक्का
सही/-
मुख्याधिकारी
माढा नगरपंचायत, माढा

**कार्यालय नगर परिषद, रिसोड**
**बांधकाम विभाग**
**ई-निविदा सूचना**

मुख्याधिकारी नगर परिषद, रिसोड जि. वाशीम यांच्या वतीने बांधकाम विभागामार्फत रिसोड शहरामध्ये स्वच्छ महाराष्ट्र (ना.) २.० अंतर्गत रिसोड शहरात घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पामधील विविध बांधकाम करणे. या कामांच्या ई-निविदा सार्वजनिक बांधकाम विभागाच्या नोंदणीकृत कंत्राटदाराकडून मागविण्यात येत आहे. सदर निविदा केवळ ई-निविदा पद्धतीने सादर करावयाच्या आहेत. निविदेच्या विस्तृत नमुना अटी व शर्ती सह महाराष्ट्र शासनाच्या **www.mahatenders.gov.in** या वेबसाईटवर **दिनांक १९/१२/२०२४ पासून** पाहण्यास उपलब्ध आहेत.

स्वा/- (सतिश शेवदा)
मुख्याधिकारी
न.प. रिसोड

जा.क्र./बांधवि/ई-निसु/ /२०२४
दिनांक-२०/१२/२०२४

**IDFC FIRST Bank Limited**
(erstwhile Capital First Limited, amalgamated with IDFC Bank Limited and presently known as IDFC First Bank Limited) | CIN : L65110TN2014PLC097792
Registered Office: - KRM Towers, 8th Floor, Harrington Road, Chetpet, Chennai- 600031.
Tel : +91 44 4564 4000 | Fax: +91 44 4564 4022

**आर्थिक मालमत्तेचे सिक्युरिटायझेशन आणि पुनर्बांधणी आणि सिक्युरिटी इंटरेस्ट क्ट, २००२ च्या अंमलबजावणीच्या कलम १३ (२) अंतर्गत सूचना**

खालील कर्जदार आणि सह-कर्जदारांनी IDFC FIRST Bank Limited (पूर्वीचे कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, IDFC बँक लिमिटेडमध्ये एकत्र केलेले आणि सध्या IDFC फर्स्ट बँक लिमिटेड म्हणून ओळखले जाणारे) कडून खाली नमूद केलेल्या सुरक्षित कर्जाचा लाभ घेतला. खाली नमूद केलेल्या कर्जदार आणि सह-कर्जदारांची कर्जे त्यांच्या संबंधित मालमत्ता गहाण ठेवून सुरक्षित केले गेले आहेत. ते संबंधित कर्ज कराराच्या अटी व शर्तींचे पालन करण्यात अयशस्वी ठरले आणि ते अनियमित झाले असल्याने, त्यांच्या कर्जाचे ठइख मार्गदर्शक तत्त्वांनुसार छझ म्हणून वर्गीकरण करण्यात आले. IDFC FIRST Bank Limited (पूर्वीची Capital First Limited, IDFC Bank Limited सोबत विलीन झालेली आणि सध्या IDFC First Bank Limited म्हणून ओळखली जाणारी) त्यांना देय असलेली रक्कम खालील तक्त्यामध्ये अधिक विशेषतः वर्णन केलेल्या संबंधित नोटिसांनुसार नमूद केली आहे आणि या रकमेवरील पुढील व्याज देखील लागू होईल आणि ते त्यांच्या संबंधित तारखांपासून लागू असलेल्या कराराच्या दरानुसार आकारले जातील.

| अं. क्र. | कर्ज खाते क्र. | कर्जाचा प्रकार | कर्जदार आणि सह-कर्जदारांची नावे | कलम १३ (२) सूचना दिनांक | कलम १३ (२) सूचनेनुसार थकबाकीची रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 110902959 | मालमत्तेवर कर्ज | 1. जगदीश सुरेश सुर्यवंशी 2. संगीता सुरेश सुर्यवंशी | 14/11/2024 | INR 10,13,836.05/- |

**मालमत्तेचा पत्ता:** मालमत्ता क्रमांक 377 चा सर्व तुकडा आणि पार्सल, दगड, विटा आणि काँक्रीटने बांधलेले निवासी घर ज्याचे क्षेत्रफळ तळमजला = 1150.00 चौ. फूट., एकूण बिल्ट अप एरिया = 1150 चौ. फूट., गावात वसलेले: पुलज, ग्रामपंचायतीच्या रजिस्टरमध्ये नोंदणीकृत: पुलज, ता. पंढरपूर, जिल्हा: सोलापूर, महाराष्ट्र-413304, आणि सीमा: पूर्व - खुला भूखंड, पश्चिम: रस्ता, उत्तर : भारत तुकाराम वाघ, दक्षिण: रस्ता.

| अं. क्र. | कर्ज खाते क्र. | कर्जाचा प्रकार | कर्जदार आणि सह-कर्जदारांची नावे | कलम १३ (२) सूचना दिनांक | कलम १३ (२) सूचनेनुसार थकबाकीची रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| 2 | 117827261 | मालमत्तेवर कर्ज | 1. प्रमोद महादेव ताठे 2. स्वाती प्रमोद ताठे | 27/11/2024 | INR 10,40,850.58/- |

**मालमत्तेचा पत्ता :** मालमट्टा क्रमांक 405 चा सर्व तुकडा आणि पार्सल, दगड, विटा आणि काँक्रीटने बांधलेले निवासी घर ज्याचे क्षेत्रफळ तळमजला = 1332.00 चौ. फूट. एकूण अंगभूत क्षेत्र 1332.00 चौ. फूट., एकूण जमिनीचे क्षेत्रफळ 1556 चौ. फूट., गावात वसलेले: पुलज ता. पंढरपूर, जिल्हा: सोलापूर, महाराष्ट्र-413304, आणि सीमा:- पूर्व - सौदागर अच्युतराव गायकवाड, पश्चिम - कुबेर महादेव भोसले, उत्तर: रस्ता, दक्षिण: भजनदास पांडुरंग भोसले

| अं. क्र. | कर्ज खाते क्र. | कर्जाचा प्रकार | कर्जदार आणि सह-कर्जदारांची नावे | कलम १३ (२) सूचना दिनांक | कलम १३ (२) सूचनेनुसार थकबाकीची रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| 3 | 97679123 | मालमत्तेवर कर्ज | 1. रणजीत शरद पाखरे 2. अजित शरद पाखरे | 27/11/2024 | INR 5,23,634.15/- |

**मालमत्तेचा पत्ता :** घराचा तो सर्व तुकडा आणि पार्सल बिल्ट बेअरिंग मलमट्टा क्रमांक 37/2, 1500 चौ.फूट, ग्रामपंचायत सांगवीच्या रजिस्टरमध्ये, गाव सांगवी, तालुका पंढरपूर, जिल्हा सोलापूर, महाराष्ट्र-413302 मध्ये वसलेले आहे, आणि सीमा : पूर्वः ग्रामपंचायत खुला भूखंड, पश्चिम: दिलीप सर्जेराव जाधव, उत्तर: ग्रामपंचायत रस्ता, दक्षिण: खुला भूखंड

तुम्हाला याद्वारे IDFC FIRST Bank Limited (पूर्वीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेड आणि सध्या आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड या नावाने ओळखले जाणारे विलीनीकरण) तपशीलानुसार वरील तक्त्यामध्ये त्यांच्या संबंधित तारखांवरील व्याज दर आणि इतर खर्चासह दर्शविलेले, या प्रकाशनाच्या तारखेपासून 60 दिवसांच्या आत शुल्क इ., जे अयशस्वी झाले तर अधोस्वाक्षरीला प्रतिबंधित केले जाईल.

गहाण ठेवलेल्या मालमत्तेविरुद्ध, SRFESI कायद्याच्या कलम 13 (4) आणि कलम 14 अंतर्गत कार्यवाही सुरू करा IDFC FIRST Bank Limited (पूर्वी कॅपिटल फर्स्ट लिमिटेड) ची देय रक्कम वसूल करण्यासाठी येथे नमूद केले आहे. लिमिटेड, IDFC बँक लिमिटेडमध्ये विलीन केलेले आणि सध्या IDFC FIRST Bank Limited म्हणून ओळखले जाते). पुढे या कायद्याच्या कलम 13 (13) अंतर्गत तुम्हाला सुरक्षित मालमत्ता विक्री/लीज किंवा अन्यथा हस्तांतरित करण्यास मनाई आहे.

एसडी/-
अधिकृत अधिकारी
IDFC फर्स्ट बँक लिमिटेड
(पूर्वीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये विलीन झालेली आणि सध्या आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड

Date : 21.12.2024
Place : Solapur, Maharashtra

# सोलापुरात घडले २४ आंतरराष्ट्रीय व ४ राज्य पुरस्कार विजेते जलतरणपटू



## ▶▶ जलतरणपटूंच्या सरावात वारंवार येतोय व्यत्यय
## ▶▶ खाजगीकरणाच्या अट्टाहासामुळे जलतरण तलाव वारंवार बंद
## ▶▶ सोलापूरचे आमदार न्याय देतील का?


अजितकुमार संगवे
९८८११३३१०३


**जलतरणातील डायव्हिंग प्रकारातील सोलापूरचा पहिला आंतरराष्ट्रीय खेळाडू सुरेश देशमुख. त्यानंतर एक नाही, दोन नाही तर तब्बल २४ आंतरराष्ट्रीय खेळाडूंनी सोलापूरचे नाव जगभरात पोहोचविले. तसेच यशस्वीनी नारायणपेठकर, पुनम शहा, ऋतिका श्रीराम व दिव्यांग जलतरण खेळाडू सुयश जाधव हे ४ खेळाडू राज्य शासनाच्या शिवछत्रपती क्रीडा पुरस्काराचे मानकरी ठरले. सागरी जलतरण स्पर्धेतही कीर्ती भराडिया हिनेही अनेक विक्रम आपल्या नावावर केले आहेत. ते केवळ सोलापुरात असलेल्या ऑलम्पिक पातळीवरील जलतरण तलावामुळे.**



### एकमेव सुरु असलेला वीर सावरकर जलतरण तलाव खेळाडूंना सरावास उपयुक्त नाही

स्मार्ट सिटीच्या निधीतून अत्याधुनिक केलेला सर्वसामान्य नागरिक व खेळाडूंसाठी एकमेव पार्क चौकातील सावरकर जलतरण सराव सुरू आहे. हा जलतरणप्रेमीस उपयुक्त आहे. हा तलावही एके ग्रुप ग्रीफाइंस स्विमिंग ट्रेनिंग सेंटर या ठेकेदारास दिला आहे. हा तलाव छोटा आहे आणि एक मीटर ड्रायव्हिंगचा एकच बोर्ड आहे. परंतु खेळाडूंना तो सरावास उपयुक्त नाही. डायव्हिंग खेळाडूंना एक, तीन मीटर स्प्रिंग बोर्ड आणि ३ व ५ मिटर हायबोर्ड डायव्हिंग सुविधाची आवश्यकता आहे. तरी शासकीय जलतरण व मार्कंडेय जलतरण तलाव सुरू करणेबाबत सोलापूरचे नवनियुक्त आमदार सुभाष देशमुख, विजयकुमार देशमुख व देवेंद्र कोठे हे याचा पाठपुरावा करतील, अशी अपेक्षा जलतरणप्रेमी नागरिक व क्रीडाप्रेमीमध्ये आहे.



बंद असलेला मार्कंडेय जलतरण तलाव

### सोलापूरचे आंतरराष्ट्रीय खेळाडू

**सुदेश देशमुख** (१९८५, सहभाग), **ऋषिकेश गुल्लापल्ली** (१९९४, १९९५ एक रौप्य व एक कांस्य), **हरीश अन्नदालदास** (१९९४ व १९९७, २ कांस्य), **यशस्वीनी नारायणपेठकर** (१९९७, सहभाग), **गोपी मलपेद्दी** (१९९८, सहभाग), **तृष्णा पटेल** (२०००, ३ कांस्य), **रोहन सांब्राणी** (२००१, सहभाग ), **यतीन शहा** (२००१, सहभाग), **ऋतिका श्रीराम** (२००३ ते २०११, आठ स्पर्धेतून १ रौप्य व ४ कांस्य), **प्रेम पोटाबत्ती** (२००७, सहभाग), **केतन शिंदे** (२००९, सहभाग), **स्वाती विडप** (२००९, सहभाग), **आदित्य गिराम** (२००९, सहभाग), **जागृती सातारकर** (२००७, ३ कांस्य), **निहाल गिराम** (२०१५, सहभाग), **संकेत ढोले** (२०१५, सहभाग), **ओम अवस्थी** (२०१५, २०१६, २०२३ एक सुवर्ण, २ रौप्य), **बिलवा गिराम** (२०१५, एक सुवर्ण, २ रौप्य), **सृष्टी शेटे** (२०१२, सहभाग), **उमेश गोडसे** (दिव्यांग, २००५, सहभाग), **सुयश जाधव** (दिव्यांग, २००८ व २०१६, एक कांस्य), **रिया मुस्तारे** (२०१६, सहभाग), **ईशा वाघमोडे** (२०१६, दोन सुवर्ण), **श्रावणी सूर्यवंशी** (२०२४, चार स्पर्धेतून २ सुवर्ण, ३ रौप्य, १ कांस्य).



चार आंतरराष्ट्रीय पदकविजेती श्रावणी सुर्यवंशी व जलतरणपटू



तीन आंतरराष्ट्रीय पदक विजेता ओम अवस्थी

### बंद असलेला विजापूर रस्त्यावरील सुंदरनगर येथील शासकीय जलतरण तलावही २ वर्षांपासून बंद

गेल्या चार वर्षांपासून महापालिकेच्या ताब्यात असलेला विजापूर रस्ता सुंदरम नगर तलावात पाण्याची गळती मोठ्या प्रमाणात असल्यामुळे दुरुस्तीचा खर्च महापालिकेस परवडणार नाही, असे कारण दाखवून तलाव परत ताब्यात घ्या, असे पालिकेने क्रीडा कार्यालयास कळविले आहे. क्रीडा कार्यालय म्हणते, ''ताब्यात घेताना जी स्थिती होती, त्या स्थितीत ताब्यात द्या.'' या दोन कार्यालयाच्या टोलवाटोलवीमुळे गेल्या २ वर्षापासून हा तलाव बंद आहे. त्यात पाणी नसल्यामुळे त्यातील टाइल्स तडकण्याचे प्रमाण वाढले आहे. उन्हाळयात हे प्रमाण जास्त झाले आहे. जुळे सोलापूर भागात जिल्हा क्रीडा कार्यालयाने ३ कोटी रुपये खर्च करून निर्माण केलेल्या या वास्तूचा लाभ ना जलतरण प्रेमींना, ना खेळाडूंना होत आहे.




### तलाव बंद असतानाही खेळाडूंची कामगिरी

तलाव बंद असतानाही नुकत्याच राजकोट येथे झालेल्या शालेय राष्ट्रीय स्पर्धेतील खेळाडूंची कामगिरी कौतुकास्पद आहे. यातील पदक विजेत्यांचा सत्कार नुकताच आमदार देवेंद्र कोठे यांच्या हस्ते झाला. त्यावेळी त्यांनी तलाव सुरु करणेबाबत पाठपुरावा करू, असे आश्वासन दिले आहे. महापालिकेचे अधिकारी आमदारांचे तरी ऐकतील, अशी अपेक्षा आहे. कामगिरी केलेले खेळाडू : १४ वर्षाखालील - रणवीर खाडे (तीन सुवर्ण), मनस्वी माने (दोन सुवर्ण ) १७ वर्षाखालील - संकेत लिगाडे (दोन रौप्य). श्रावणी सूर्यवंशी (तीन सुवर्ण), हर्षदा गोली (एक कांस्य) १९ वर्षाखालील- गणेश उडता (तीन सुवर्ण) रितेश लिगाडे (कांस्य).



राजकोट येथे झालेल्या शालेय राष्ट्रीय स्पर्धेतील पदकविजेते, सहभागी खेळाडू, प्रशिक्षकांसह आमदार देवेंद्र कोठे.

### महापालिका, क्रीडा कार्यालयाची टोलवाटोलवी



महापालिका व जिल्हा क्रीडा कार्यालय ही दोन्ही कार्यालय एकमेकांवर लेखी पत्राने एकमेकावर आरोप करून टोलवाटोलवी करत आहेत. जिल्हा क्रीडा कार्यालयाने १४ फेब्रुवारी २४ पत्राने जलतरण तलाव दुरुस्तीसाठी ५५ लाख रुपये खर्च अपेक्षित आहे. हा खर्च तरी द्यावा किंवा तलाव दुरुस्त करून द्यावा, तेव्हा आम्ही ताबा घेऊ असे कळविले असल्याचे जिल्हा क्रीडा अधिकारी नरेंद्र पवार यांनी सांगितले. तर महापालिकेने ११ डिसेंबर २०२४ च्या पत्राने १५ डिसेंबर पासून ताबा सोडला आहे आणि सुरक्षा रक्षक ही काढून घेतले आहे, असे पत्र दिल्याचे महापालिका क्रीडा अधिकारी गोपाळ पिडगुलकर यांनी सांगितले. त्यामुळे तीन कोटीच्या या शासकीय जलतरण तलावास दोन्ही कार्यालयाने वाऱ्यावर सोडले आहे.

खेळाडू घडविण्याचे श्रेय प्रशिक्षक (स्व.)विजयकुमार नादरगी, श्रीकांत शेटे, मनीष भावसार, ऋषिकेश गुल्लापल्ली, हरीश अन्नदालदास गोपी मलपेद्दी, श्रीकांत दोरनाल व अंबादास नादरगी यांना जाते. जिल्हा जलतरण संघटनेचे झुबीन अमारिया, स्व. दत्तात्रय गुल्लापल्ली, पार्वतया श्रीराम यांचे सहकार्यही या कामगिरीसाठी मोलाचे ठरले.

तसा सोलापुरात हौशी लोकांसाठी पार्क मैदानावरील वीर सावरकर जलतरण तलाव असताना ऑलम्पिक साईचा जलतरण तलाव असावा, यासाठी सोलापूर जिल्हा जलतरण संघटनेने प्रयत्न केल्यानंतर २९ जुन १९८५ रोजी अशोक चौक येथे हा तलाव सुरु झाला. मार्कंडेय जलतरण तलाव असे नामकरण झालेल्या या तलावाचे उद्घाटन तत्कालीन विरोधी पक्षनेते व खेळावर सतत प्रेम करणारे राष्ट्रीय नेते खासदार शरदचंद्र पवार यांच्या हस्ते व तत्कालीन महापौर स्व. प्रा. डॉ. पुरणचंद्र पुंजाळ यांच्या उपस्थितीत या तलावाचे उद्घाटन झाले आणि सोलापूरचे खेळाडू डायव्हिंगमध्ये राज्य, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर चमकू लागले. पूर्वी दोन्ही तलाव महापालिका स्वतः चालवत होती. यासाठी महापालिकेचा क्रीडा विभागही कार्यरत आहे आणि हा विभाग दोन्ही जलतरण तलाव सक्षमपणे चालवत होता. दरम्यान जिल्हा क्रीडा कार्यालयाकडून विजापूर रस्त्यावरील सुंदरमनगर येथे दुसरा ऑलिंपिक जलतरण तलाव झाला. सुरुवातीस क्रीडा कार्यालयाने वर्षभर हा तलाव चालविला. महापालिकेस २ तलाव चालविण्याचा अनुभव असल्यामुळे क्रीडा कार्यालयाने महापालिकेस ३१ जानेवारी २०१९ रोजी हा तलाव म ोफत ५ वर्षासाठी करार तत्वावर दिला. तत्कालीन पालिका आयुक्त अविनाश ढाकणे आणि तत्कालीन जिल्हाधिकारी राजेंद्र भोसले यांच्यात झालेल्या करारानुसार हा तलाव महापालिकेने ताब्यात घेतला. वर्षभर चालविला आणि उत्पन्नही मिळविले. जबाबदारी घ्यायला नको म्हणून अधिकाऱ्यांच्या डोक्यात सुपीक कल्पना आली, ती खाजगीकरणाची. तत्कालीन महापालिका आयुक्त पी. शिवशंकर यांनी हे दोन्ही तलाव खाजगीकरणाने देण्यास सुरुवात केली. त्याला जलतरणप्रेमी व खेळाडूंनी विरोध केला. परंतु त्याचा काही उपयोग झाला नाही.

त्यांनी मार्कंडेय जलतरण तलाव व शासकीय जलतरण तलाव राणा ग्रुप या ठेकेदारास वार्षिक करार तत्वावर दिला. मार्कंडेय तलाव घेतला. मात्र लिकेज असल्याचे कारण दाखवून शासकीय जलतरण तलाव त्यांनी ताब्यात घेतला नाही. मार्कंडेय तलावाची अकरा महिन्यासाठी करार तत्वावर दिल्याची मुदत १ ऑगस्ट २३ रोजी संपणार होती. अनामत रक्कम वजा जाता ३१ मे अखेर ९.६४ लाखाची थकबाकी होती. आरोग्य, स्वच्छता आणि देखभालीकडे वारंवार दुर्लक्ष, उत्पन्न मिळविण्याकडेच लक्ष आणि ९.६४ लाखाची थकबाकी झाल्यामुळे दीड महिने अगोदरच ठेकेदाराकडून सोलापूर महानगरपालिकेने मार्कंडेय जलतरण तलाव ताब्यात घेतला.

त्यानंतर आलेल्या महापालिका आयुक्त शितल तेली-उगले यांनीही हाच कित्ता गिरवला. परत मार्कंडेय जलतरण तलाव येथील इरफान हुसेन शेख यांच्या एअरकूल सर्विसेसला ७ मार्च २०२४ रोजी ११ महिन्याच्या १९ लाख रुपये मिळण्याच्या करार तत्वावर दिला. उन्हाळ्याच्या सीझनमध्ये संबंधित ठेकेदाराने उत्पन्न कमावले. प्रति महिना एक लाख ७३ रुपये भरणे त्याने अपेक्षित होते. परंतु त्यानेही महापालिकेस फसविले. त्यामुळे परत हा तलाव महापालिकेने २१ ऑक्टोबर २०२४ पासून मुदतपूर्व ताब्यात घेतला.परंतु खाजगीकरणाचा बोऱ्या वाजल्यामुळे मार्कंडेय जलतरण तलाव २१ ऑक्टोबर २०२४ पासून बंद आहे. त्यामुळे सोलापूरचे खेळाडू या सरावापासून वंचित आहेत.

### पालकमंत्र्याचे प्रयत्नही अयशस्वी

जिल्हा क्रीडा संकुल समितीचे अध्यक्ष पालकमंत्री व जिल्हाधिकारी उपाध्यक्ष असतात. तत्कालीन पालकमंत्री चंद्रकांतदादा पाटील यांच्या उपस्थितीत ही बैठक झाली होती. यावेळी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद उपस्थित होते. परंतु आयुक्त तेली उगले अनुपस्थित असल्यामुळे निर्णय झाला नव्हता. परंतु तो तलाव महापालिकेने दुरुस्त करून द्यावा, असे निर्देशही पालकमंत्र्यांनी दिले होते. परंतु दोन्ही अधिकाऱ्याची अनास्था यात दिसून आली.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## संक्षिप्त वृत्त



### पंढरपुरात शिवसेना ठाकरे गटाचा निषेध

**पंढरपूर, दि. २० डिसेंबर-**

पंढरपुरात शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे सेनेकडून डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास अभिवादन करीत केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या विरोधात जोरदार नारे देत निषेध व्यक्त करण्यात आला. यावेळी पंढरपूर विभाग जिल्हा प्रमुख संभाजी शिंदे, तालुकाप्रमुख बंडू घोडके, काकासाहेब बुराडे, अर्जुन भोसले, इंद्रजित गोरे, रणजित कदम, संजय घोडके, नागेश रितुण्ड, नामदेव चव्हाण, उत्तम कराळे, समाधान गोरे, दिलीप उघाडे, भारत कदम, संजय पवार, विजय बागल, स्वप्नील गावडे, कल्याण कदम, अशपाक मुजावर, महेश कांबळे, आकाश माने, ऋषिकेश कवडे, जालिंदर शिंदे, सचिन मोरे, सचिन शिंदे, संजय पवार, सतीश पाटील, स्वप्नील गावडे यांच्यासह शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे सेनेचे विविध पदाधिकारी व शिवसैनिक उपस्थित होते.

### भाजपा राष्ट्रीय समर्थक मंचच्या जिल्हाध्यक्षपदी विशाल तोडकरी

**बार्शी, दि. २० डिसेंबर-**



बार्शी येथील रहिवासी हे मागील अनेक वर्षांपासून विविध क्षेत्रातील राजकीय व सामाजिक चळवळीमध्ये कार्यरत असून त्याच्या कार्याचा ठसा उमटवला आहे. सामाजिक कार्यातील त्याची तळमळ लक्षात घेऊन भाजपा राष्ट्रीय समर्थक मंचच्या सोलापूर जिल्हा अध्यक्षपदी त्यांची निवड करण्यात आली आहे. अखिल भारतीय भ्रष्टाचार निर्मूलन संघर्ष समिती ब्रिक्स ह्युमन राइट्स मानव अधिकार मिशन या सामाजिक संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रदीपबाबा खंडापूरकर यांच्या मार्गदर्शनाखाली सोलापूर जिल्हा कार्याध्यक्ष या पदावर कार्यरत आहेत. ब्रिक्स ह्युमन राइट्स मिशनच्या व संघटनेच्या माध्यमातून प्रशासनामध्ये पारदर्शकता व संविधानिक कार्य गतिमान होण्यासाठी अनेक प्रश्नांवर विशाल तोडकरी यांनी आवाज उठवलेला आहे. त्यांच्या सामाजिक कार्याची दखल घेऊन राष्ट्रीय संघटक महामंत्री दिपक श्रीवास्तव यांनी व वसंतराव देशमुख महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष यांनी विशाल तोडकरी यांना भाजपा राष्ट्रीय समर्थक राष्ट्रीय लोक मंचच्या सोलापूर जिल्हा अध्यक्षपदी नियुक्त केले.



### रंभापुरी जगद्गुरुंचा जन्मशताब्दी सोहळा

**वैराग, दि. २० डिसेंबर-**

मानेगाव (ता. बार्शी) येथे अखंड शिवनाम सप्ताहाचे आयोजन करण्यातत आले होते. या सप्ताहामध्ये विरसिंहासन रंभापुरी पिठाचे लिंगैक्य जगद्गु श्रीश्रीश्री १००८ प्रसन्न रेणूक विररुद्रसुनी शिवाचार्य महास्वामीजी यांच्या जन्मशताब्दीनिमित्त त्यांचे प्रतिमेस श्रीगुरु बृहन्मठाचे श्री. गुरु मुक्तेश्वर शिवाचार्य महास्वामी यांच्या सान्निध्याम ध्ये वीरशेव समाज बांधवां कडून १००८ दीपोत्सव लावण्यात येऊन अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी महास्वामीनी आपल्या आर्शीवचनातून मानव धर्माचा विजय असो. धर्मानिचच विश्वाला शांती मिळते यावर विवेचन केले. कार्यक्रम मोठ्या भक्तिमय वातावरणात पार पडला. सदर कार्यक्रमात सर्व लहान थोरांचा मोठा सहभाग होता. कार्यक्रमासाठी विरशैव सास्कृतीक सेवा मंडळ व ग्रामस्थ याचे सहकार्य लाभले.



### बुद्धीबळमध्ये ओजस्वी बोराळे अक्कलकोट तालुक्यात प्रथम

**सोलापूर, दि. २० डिसेंबर-**

बुद्धिबळमध्ये ओजस्वी बोराळे हिने अक्कलकोट तालुक्यात प्रथम क्रमांक पटकाविला. तिचे जिल्हास्तरासाठी निवड करण्यात आली आहे. जिल्हा परिषद प्राथमिक मराठी मुलींची शाळा वागदरीची ती विद्यार्थिनी आहे.गटशिक्षणाधिकारी प्रशांत आरबाळे यांच्या हस्ते प्रमाणापत्र व सन्माचिन्ह देण्यात आले. जिल्हा प्राथमिक शिक्षक सोसायटीचे माजी चेअरमन वीरभद्र यादवाड, केंद्रप्रमुख शिवाजी शिंदे, केंद्रप्रमुख धडके, बसवराज मुनोळी, मुख्याध्यापक बाळासाहेब बनसोडे, शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष गजानन सुरवसे यांनी यांनी तिचे अभिनंदन केले.

### वाणी येथे प्लॉट गळफास घेऊन आत्महत्या

**बार्शी, दि. २० डिसेंबर-**

वाणी प्लॉट येथे मिरगणे वीटभट्टीजवळ राहत्या घरात किरण दत्तात्रय मस्के वय ५५ यानी गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना दि. २० रोजी सकाळी ९.३० वाजता उघड झाली आहे. याबाबत मयताचे भाचा पांडुरंग सोमनाथ सोनवणे याने पोलिसांत खबर दिली. सदर मयत किरण मस्के हा घरात एकटाच राहत असल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. मयताचे कारण स्पष्ट नसून पोलीस अधिक तपास करीत आहेत.

# विधानभवनात नगरपरिषद निवडणुकीची साखर पेरणी

## ●आ. अभिजीत पाटलांनी पंढरपूर, माढ्याच्या विकासावर फोडली वाचा

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, माढा, दि.२० डिसेंबर-**

पंढरपूर आणि माढा विधानसभा मतदारसंघातील अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेले प्रश्न मार्गी लागावेत यासाठी नवनिर्वाचित आमदार अभिजीत पाटील यांनी सदस्य पदाची शपथ घेतल्यापासून शर्तीचे प्रयत्न सुरू केले आहेत.

बोले तैसा चाले या उक्तीप्रमाणे त्यांनी मतदार संघातील जनतेच्या प्रश्नांसाठी आमदार अभिजीत पाटील यांनी सकाळी साडेनऊ वाजले पासून जेवण न करता रात्री नऊ वाजेपर्यंत सभागृहात थांबून कळकळीने प्रश्नांची मांडणी केली. यातूनच त्यांचे कर्तृत्व सिद्ध होते. नागपूर येथे पार पडत असलेल्या हिवाळी अधिवेशनात सलग तिसऱ्या दिवशी आमदार अभिजीत पाटील यांनी 'अध्यक्ष महोदय' असे म्हणत



विधान भवनात पंढरपूर, माढा मतदार संघातील प्रश्नांवर गर्जना केली. यावेळी त्यांनी माढा म तदार संघाबरोबरच पंढरपूरच्या अनेक प्रश्नांवर वाचा फोडल्याने पंढरपूर नगरपालिकेची साखर पेरणी केल्याचे दिसून आले. यावेळी त्यांनी टेंभुर्णी नगरपंचायत संदर्भात अंतिम अधिसूचना काढण्यात यावी. माढा नगरपंचायत मधील जिल्हा परिषदेच्या जागेत शॉपिंग कॉम्प्लेक्स साठी निधी उपलब्ध करून दिल्यास या ठिकाणी व्यवसाय सुरू होऊ शकतील. तसेच शाळेसाठी कंपाउंड वॉल करावे, माढा तहसील कार्यालयाच्या फर्निचर साठी निधी उपलब्ध करून देण्यात यावा.

माढा शहरातील प्ले ग्राउंड गार्डनसाठी निधी उपलब्ध करून देण्यात यावा. माढा शहरांमध्ये छत्रपती शिवाजी महाराज अश्वारूढ पुतळा, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, महात्मा ज्योतिबा फुले, अण्णाभाऊ साठे, अहिल्यादेवी होळकर स्मारकासाठी निधी उपलब्ध करून देण्यात यावा. नाट्यगृह, एसटीपी प्लांट, माढेश्वरी देवी तीर्थक्षेत्रासाठी निधी उपलब्ध करून देण्यात यावा. पंढरपूर नगरपालिका मधील प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत घरांसाठी नागरिकांनी पैसे भरले असून २०२१ पासून काम बंद आहे, त्याबाबत तात्काळ दखल घेऊन कार्यवाही करण्यात यावी. पंढरपूर नाट्यगृह बांधकामातील भ्रष्टाचाराविषयी सखोल चौकशी करण्यात यावी. महाराष्ट्रातून तीर्थक्षेत्र म्हणून पंढरपूर येथे वारकरी येतात श्रद्धास्थान असलेल्या चंद्रभागेत स्नान करतात परंतू शहरातील सोडण्यात येणारे घाण पाणी चंद्रभागेच्या नदी पात्रात जाते. या पाण्यावर ट्रीटमेंट करून हे पाणी सोडले जाणे आवश्यक आहे. याबाबत प्रश्न उपस्थित केले. पंढरपूर येथे तीर्थक्षेत्र असून महाराष्ट्रातून भाविकांसाठी १००० खटांचे रुग्णालय सुरू करण्याबाबत जीआर निघाला असून त्याला मंजुरी देऊन जागा उपलब्ध करून देणे. तसेच मेडिकल महाविद्यालयास परवानगी देण्यात यावी. टेंभुर्णी येथे ग्रामीण रुग्णालयात उपकरणांसाठी निधी उपलब्ध करून देण्यात यावा.

### टेंभुर्णी, करकंब, मोडनिंबला नगरपंचायत करा

टेंभुर्णी, करकंब आणि मोडनिंब येथे नगरपंचायत करण्यात यावी. पंढरपूर तीर्थक्षेत्र म्हणून ओळखलं जातं परंतू लहान मुलांना खेळण्यासाठी (गार्डन) बागेसाठी निधी मिळून देखील कामाला सुरूवात झाली नाही. कामास सुरुवात करण्यात यावी. पंढरपूर येथील यमाई तलाव येथे लेझर शो साठी निधी उपलब्ध करून देण्यात यावा अशी मागणी केली.

# सहकार शिरोमणी साखर कारखान्यावर वेद्यमापन विभागाच्या भरारी पथकाकडून तपासणी

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. २० डिसेंबर-**

पंढरपूर तालुक्यातील भाळवणी येथील सहकार शिरोम णी वसंतराव काळे सहकारी साखर कारखान्यावर वैद्यमापन विभागाचे भरारी पथक आले असता, त्यांनी केलेल्या तपासणीत कारखान्याचे सर्वच वजनकाटे बरोबर असल्याचे आढळुन आले. त्यामुळे वजनात कोणताही गैरप्रकार नसल्याचे भरारी पथक व वैद्यमापन अधिकारी यांचेकडून शिक्कामोर्तब करण्यात आले.

कारखान्याचे चेअरमन कल्याणराव काळे यांच्या म ार्गदर्शनाखाली कार्यक्षेत्रातील व कार्यक्षेत्राबाहेरील ऊस पुरवठादार शेतकऱ्यांच्या ऊसाचे वजन आजतागायत पारदर्शक पध्दतीने करण्यात आलेले आहे, त्यामध्ये




कोणत्याही प्रकारचे गैरव्यवहार करण्यात आलेला नाही तसेच दरवर्षी वैद्यमापन विभागाचे भरारी पथक कारखान्यावर काटा तपासणीसाठी येत असते. चालु गळीत हंगामातही १० डिसेंबर २०२४ रोजी वैद्यमापन पथकाने अचानक कारखान्यावर भेट देवुन कारखान्याचे ६० व १० टनी प्रत्येकी दोन वजनकाट्यांची तपासणी करण्यासाठी वजनकाट्यावरुन वजने करुन गव्हाणीकडे गेलेल्या ट्रॅक्टर व बैलगाड्यांना परत बोलावुन फेरवजन केले. पुर्वी व दुबार वजन केलेल्या वाहनांच्या वजनामध्ये तफावत नसल्याचे आणि कारखान्याचे चारही वजनकाटे योग्य व बिनचुक असल्याचे या पथकास निदर्शनास आल्यामुळे काटा अचुक असल्याचे शिक्कामोर्तब केले.

या बरोबरच प्रत्येक २० किलोच्या प्रमाणित लोखंडी ६०० नगांच्या सह्याने वजनकाट्यांची पडताळणी करण्यात आली. विशेष म्हणजे तीही बरोबर व बिनचुक असल्याचा अहवाल या भरारी पथकाने दिल्यामुळे ऊस पुरवठादार शेतकऱ्यांची सहकार शिरोमणी कारखान्यावरील विश्वासहर्ता कायम राहिली आहे, अशी माहिती कार्यकारी संचालक पोपटराव घोगरे यांनी दिली. यावेळी भरारी वैद्यमापन पथकाम ध्ये उपनियंत्रक वैद्यमापन शास्त्र पुणे सतिश अभंगे, इंदापूर विभागाचे अंकुश इंगोले तसेच निरिक्षक वैद्यमापन शास्त्र पुणे टी.के.पाटील व खेड विभागाचे वैद्यमापन शास्त्र अधिकारी प्रदिप बागडे यांच्यासह शेतकरी, वाहनमालक उपस्थित होते. दरम्यान कारखान्याच्या काटा तपासणीवेळी कारखान्याचे प्र. कार्यकारी संचालक पी. डी. घोगरे, वर्क्स मॅनेजर पी. टी. तुपे, डेप्यु. जनरल मॅनेजर के. आर. कदम, शेती अधिकारी प्रतापराव थोरात, परचेस अधिकारी सी. जे. कुंभार, डी. डी. काळे, ज्ञानेश्वर कुंभार, मनसुब सय्यद उपस्थित होते.

# ई-पीक पाहणीव्दारे पिकाची नोंदणी करणे आवश्यक

## महसूल प्रशासनाने पीक नोंदणीसाठी शेतकऱ्यांना केले आवाहन

**तभा वृत्तसेवा,**
**मंगळवेढा, दि.२० डिसेंबर-**

मंगळवेढा तालुक्यात एकूण ८३ गावे असून, महाराष्ट्र शासनाकडील निर्देशानुसार सर्व शेतकर्यांनी स्वतःचे शेतामध्ये जाऊन स्वतः ई-पीक पाहणी व्दारे पिकाची नोंदणी करणे आवश्यक असल्याने ती तात्काळ करून घ्यावी असे आवाहन तहसीलदार मदन जाधव यांनी केले आहे.

सध्या देशात व राज्यात उदभवलेली नैसर्गिक परिस्थिती पाहता अतिवृष्टी व नैसर्गिक वादळे, अनैसर्गिक मौसमी अनियमितता निर्माण झाली आहे. परिणामी सध्या किंवा भविष्यात शासनाकडून अनुदान जाहीर केल्यास ते वाटप करणेसाठी सर्व शेतकर्यांनी पीक पेराची नोंद ई-पीक पाहणी अॅप वरुन करणे अत्यंत गरजेचे आहे. शेतकर्यांनी स्वतःचे शेतातील पीक पेराची नोंदणी ई-पीक पाहणी अॅप व्दारे न केलेस शासनाकडील अनुदान बाधित शेतकरी यांना मिळणार नाही याची दक्षता घ्यावी. महसूल प्रशासनाकडून जाहीर आवाहन करणेत येत आहे की, सर्व शेतकर्यांनी आपआपले शेतातील पीक पेराची नोंद तात्काळ ई-पीक पाहणी अॅप वरुन करून घ्यावी. या कामी अडचणी उदभवलेस संबंधित गावचे ग्राम महसूल अधिकारी(तलाठी), कृषी सहाय्यक, मंडळ कृषी अधिकारी, मंडल अधिकारी (महसूल), तालुका कृषी अधिकारी व तहसिल कार्यालय यांचेशी तात्काळ संपर्क साधावा असे आवाहन करण्यात आले आहे.

# महिलेची भरदिवसा पर्स हिसकावून चोरटे पळाले

## ●चोरट्यांचा पाठलाग करताना पतीला दुखापत

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी, दि. २० डिसेंबर-**

कुर्डूवाडी रोडवरील चोप्रा हॉटेलसमोर तोंडाला रुमाल व गमजा बांधलेल्या तिघा चोरट्यांनी भरदिवसा महिलेच्या हातातील पर्स हिसकावून पळ काढला. पर्समध्ये तब्बल ४३ ग्रॅम सोन्याचे दागिने व आधारकार्ड होते. पाठलाग करताना पतीला दुखापत झाल्याची घटना घडली आहे.

फिर्यादी शर्मिला उत्तमराव पाटील (वय ५४ वर्षे, व्यवसाय गृहिणी, रा. सन्मित्र हौसिंग सोसायटी, अलीपूर रोड, बार्शी) या पती उत्तमराव पाटील यांच्यासोबत दुपारी ३ वाजता बाजारात रेलिंगचे काम पाहण्यासाठी गेल्या होत्या. त्यानंतर सायंकाळी ४.१५ वाजता ते दोघे कुर्डुवाडी रोडवरील चोप्रा हॉटेल येथे आले. दुचाकी त्यांनी चोप्रा हॉटेलसमोर उभी करुन रिया स्टील रेलिंग या दुकानाकडे पायी चालत जात असताना, सुलाखे हायस्कूलकडून शिवाजी कॉलेजच्या दिशेने भरधाव वेगाने आलेल्या काळ्या रंगाच्या दुचाकीवर तोंडाला रुमाल व गम जा बांधलेल्या तिघा अज्ञात इसम ांनी हातातील चॉकलेटी रंगाची पर्स हिसकावून पळ काढला.

पर्समध्ये ३ तोळे ५ ग्रॅम वजनाचे सोन्याचे गंठण, ५ ग्रॅमची अंगठी व एक ३ ग्रॅमची अंगठी व आधारकार्ड आदी साहित्य असलेली पर्स हिसकावून चोरटे भरधाव वेगाने शिवाजी कॉलेजच्या दिशेने पसार झाले. या घटनेत उत्तमराव पाटील यांनी चोरट्यांचा पाठलाग केला. मात्र पळत असताना रस्त्यावर पडल्याने त्यांच्या उजव्या पायाच्या गुडघ्याला गंभीर जखम झाली तसेच उजव्या हाताला मुक्का मार बसला आहे. फिर्यादी शर्मिला पाटील यांनी दिलेल्या तक्रारीवरुन बार्शी पोलीस ठाण्यात तिघा अज्ञात चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून, पोलीस अधिक तपास करत आहेत. पर्समधील दागिने व साहित्य मि ळाल्यास ती मी ओळखू शकते, असे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. या घटनेमुळे परिसरात घबराट पसरली असून, भरदिवसा चोरीच्या घटनेने सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे.

# दामाजी कारखान्यात १ लाख मे. टन उसाचे गाळप

## ●अवघ्या २९ दिवसांचा कालावधी; चेअरमन शिवानंद पाटील यांची माहिती

**तभा वृत्तसेवा,**
**मंगळवेढा, दि.२० डिसेंबर-**

येथील श्री संत दामाजी सहकारी साखर कारखान्याचे चालू गळीत हंगाम २०२४-२५ मध्ये २९ दिवसांत १ लाख मे।टन ऊस गाळप शुक्रवार दिनांक २० डिसेंबर २०२४ रोजी पूर्ण झाल्याची माहिती कारखान्याचे चेअरमन शिवानंद यशवंत पाटील यांनी दिली. सरासरी साखर उतारा हा ९.३२ टक्के असा मिळाला आहे.

चालू गळीत हंगामात सर्व सभासद, ऊस पुरवठा करणारे शेतकरी, ऊस तोडणी व वहातूक ठेकेदार, मजूर, अंतर्गत ठेकेदार, कारखान्याचे सर्व खातेप्रमुख, विभागप्रमुख, कर्मचारी या सर्वांच्या योगदानातून इतक्या कमी दिवसात दामाजी कारखान्याने १ लाख गाळप पूर्ण केलेले आहे. ऊस तोडणी यंत्रणा पूर्ण क्षमतेने भरलेने कारखान्याचे रोज सरासरी ३७०० ते ३९०० मे.टन प्रतिदिन प्रमाणे गाळप होत आहे.चालू गळीत हंगामामध्ये ५.०० लाख मे.टनाचे गाळपाचे उध्दिष्ट ठेवुन तयारी केली आहे. कारखान्याचे सर्व सभासद बंधुनी आपला ऊस दामाजी कारखान्याचे



गळीतासाठी देवुन प्रगतीसाठी योगदान द्यावे. संचालक मंडळाने ठरविलेले गाळपाचे उद्दिष्ट निश्चीतच पूर्ण करणार असलेचा विश्वास व्हा.चेअरमन तानाजी खरात यांनी सदर प्रसंगी व्यक्त केला.

याप्रसंगी संचालक सर्वश्री मुरलीधर दत्तू, गौरीशंकर बुरकूल, गोपाळ भगरे, राजेंद्र चरणूकाका पाटील, भारत बेदरे, दयानंद सोंनगे, औदुंबर वाडदेकर, रेवणसिध्द् लिगाडे, भिवा दोलतडे, बसवराज पाटील, गौडाप्पा बिराजदार, दिगंबर भाकरे, महादेव लुगडे, तानाजी कांबळे, तानाजी काकडे, सुरेश कोळेकर, प्रा.कार्यकारी संचालक रमेश जायभाय, खातेप्रमुख, विभागप्रमुख उपस्थित होते.

# सरपंच देशमुख हत्या निषेधार्थ सोलापूर जिल्ह्यातील ग्रामपंचायती बंदला प्रतिसाद




**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २० डिसेंबर-**

मस्साजोग (ता.केज) येथील सरपंच संतोष देशमुख यांचे अपहरण करून निर्गुण हत्या करण्यात आली या प्रकरणी मुख्य सुत्रधार व संशयीत असलेल्या सर्व आरोपींना अटक करून कडक कारवाई करावी या मागणीसाठी व या घटनेच्या निषेधार्थ सरपंच परिषद सोलापूर जिल्हा यांच्या वतीने केलेल्या ग्रामपंचायत बंद आंदोलनास उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

मस्साजोग (ता.केज जि. बीड) येथील तरुण, लोकप्रिय सरपंच संतोष देशमुख यांनी अवैध व्यवसायास मज्जाव केल्यामुळे त्यांचे अपहरण करून, अमानुष छळ करून निर्गुण हत्या करण्यात आली या घटनेचे लोकसभा, विधानसभा, विधानपरिषद सभागृहात व राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात तिव्र लोकभावना व्यक्त होत आहेत, सरपंच परिषद सोलापूर जिल्हा पदाधिकाऱ्यांच्या वतीने या घटनेमधील सर्व संशयित आरोपीस अटक करून त्वरित कडक कारवाई करून देशमुख परिवारास न्याय देण्याची मागणी निवेदनाद्वारे जिल्हाधिकारी, जिल्हा पोलीस अधीक्षक, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे केली व या घटनेचे निषेधार्थ जिल्ह्यातील ग्रामपंचायतीचे काम बंद ठेवण्याचे आवाहन केले या आवहानास जिल्ह्यातील सरपंच, उपसरपंच, सदस्य व नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

यानंतर सरपंच परिषदेच्या वतीने सोलापूर जिल्ह्यातील सर्व ग्रामपंचायत बंद ठेवून तीव्र निषेध नोंदवला यावेळी जिल्हाध्यक्ष आदिनाथ देशमुख, कविता घोडके-पाटील, शिवानंद बंडे विकास साळुंखे- विकास माने, करण मोरे, संदीप बोटे, डॉ. अम ोल दुरांदे, रूपाली नवले, शिवाजी पाटील, डॉ. अमोल घाडगे, सरपंच योगेश सोरटे, सरपंच राजेंद्र भोसले, गणेश जाधवसह प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते

### ●SIT द्वारे चौकशी करून देशमुख परिवारास न्याय द्या : अॅड. जाधव

मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणाची डखढ नेमून चौकशी करून आरोपीवर कडक कारवाई करावी तसेच भविष्यात लोकप्रतिनिधींना गैरकारभार,गैरकृत्य अवैध व्यवसायाविरोधात धाडसांनी काम करता येईल असे मत सरपंच संघटनेचे राज्य उपाध्यक्ष अँड विकास जाधव यांनी केले.

### ●देशमुख हत्त्येमधील आरोपीवर कडक कारवाई करा : मिरा साळुंखे

विकास कामाच्या माध्यमातून लोकप्रियता मिळवलेले मस्सा गावचे सरपंच संतोष देशमुख यांचे हत्त्येचे मुख्य सुत्रधारासह सहभागी असलेल्या सर्व आरोपींना त्वरित अटक करून कडक कारवाई करुन देशमुख परिवारास न्याय देण्याची मागणी गुंजेगावचे सरपंच सौ मीरा साळुंखे यांनी केली.

### ●कवठे सरपंच जैनुनबी शेख यांचा शोधच लागला नाही याची खंत-शेख

मस्साजोग येथील सरपंच संतोष देशमुख यांची झालेली हत्या ही अत्यंत निषेधार्थ घटना असून यामधील आरोपींना त्वरित अटक करून कडक कारवाई केली पाहिजे तरच शासन व पोलिसावरील विश्वास वाढेल.आमचे कवठे गावाच्या सरपंच जैनुनबी उस्मान शेख या तीन वर्षापासून बेपत्ता आहेत मात्र या प्रकरणाचा पोलिसांना अद्याप तपास लागलेला नाही ही खंत देखील यावेळी ग्रामपंचायत सदस्य जैनुद्दीन शेख यांनी व्यक्त केली.

# फसवणूक प्रकरणी आरोपीची निर्दोष मुक्तता

**बार्शी, दि. २० डिसेंबर-**

आरोपी सलीम दस्तगीर शेख रा. वैराग, ता. बार्शी याची फसवणूक प्रकरणी बार्शी येथील प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी यांनी निर्दोष मुक्तता केली. यात हकीकत अशी की, फिर्यादी यास टेम्पो या वाहनावर वाहन कर्ज हवे होते. फिर्यादी यास आरोपी याने तो फायनान्सचा एजंट आहे असे सांगून याचेकडून कागदपत्र घेऊन एक लाख वीस हजार रुपयांचे कर्ज प्रकरण दाखल केले परंतु वाहन जुने असल्यामुळे तुम्हाला कर्ज मिळणार नाही असे सांगितले.

परंतु या आरोपी याने फिर्यादीस कागदपत्र परत न करता आरटीओ ऑफिसमधून वाहनाचे डुप्लिकेट कागदपत्रे प्राप्त करुन आरोपी याने विजय ऑटो फायनान्स हैदराबादम धून फिर्यादीचे परस्पर रक्कम रुपये एक लाख २५ हजार रुपये कर्ज घेऊन त्याचे स्वतःचे फायदे करता वापर केला. सदरची बाब फिर्यादी यास फायनान्समधून नोटीस आल्यानंतर समजली. त्यानंतर फिर्यादी याने आरोपीविरुद्ध वैराग पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल केला. सदर गुन्ह्याचा तपास वैराग पोलिसांनी करुन दोषारोपपत्र प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी बार्शी यांच्या कोर्टात दाखल केले. सदर कामे आरोपीचे वकिलांनी साक्षीमधील विसंगती कोर्टाच्या निदर्शनास आणून दिल्या व आरोपीच्या वकिलांचा युक्तिवाद ग्राह्य धरुन आरोपीची न्यायाधीश एच. यु. यु. पाटील यानी निर्दोष मुक्तता केली. आरोपीतर्फे अॅढ. मुजाहिद मुनीर तांबोळी यांनी काम पाहिले.

# स्वाधार योजनेसाठी मुदतवाढ

**सोलापूर, दि.२० डिसेंबर-**

सामाजिक न्याय विशेष सहाय्य विभागामार्फत अनुसूचित जाती व नवबौध्द प्रवर्गातील शासकीय वसतिगृहात प्रवेश न मिळालेल्या तथा शासकीय वसतिगृहात प्रवेश न घेतलेल्या विद्यार्थ्यांसाठी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेसाठी ३१ डिसेंबरपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. विद्यार्थ्यांनी ऑनलाइन अर्ज करण्याचे आवाहन आयुक्त समाज कल्याणचे सहाय्यक सुलोचना सोनवणे यांनी केले आहे.

अनुसूचित जाती व नवबौध्द प्रवर्गातील पात्र नवीन व नुतनीकरण झालेल्या जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी http://hmas.mahait.org या पोर्टलवर ३१ डिसेंबर २०२४ रोजी पर्यंत ऑनलाईन अर्ज सादर करावेत, असे आवाहन केले आहे.





# एसव्हीसीएस हायस्कूल येथे पालखीची भव्य मिरवणूक

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २० डिसेंबर -**

एसव्हीसीएस हायस्कूल एम आयडीसी येथे तपोरत्न योगीराजेंद्र शिवाचार्य महास्वामीजींच्या सातव्या पुण्याराधनानिमित्त भव्य पालखी मिरवणूक उत्साहाने व भक्तिभावाने संपन्न झाली . तपोरत्न योगीराजेंद्र शिवाचार्य महास्वामीजी यांच्या पालखीचे पूजन काशी जगद्गुरु डॉ.मल्लिकार्जुन विश्वाराध्य शिवाचार्य महास्वामीजी यांच्या अमृतहस्ते करण्यात आली.

यावेळी संस्थेची सचिव शांतया स्वामी संचालक डॉ. राजेंद्र गुली आदी उपस्थित होते. सर्वप्रथम मुख्याध्यापक संगप्पा म्हमाणे यांनी प्रशालेचा वतीने काशी पिठाचे परमपूज्य महास्वामीजीचे प्रशालेचा वतीने पुष्पमाला अर्पण करून शुभाशीर्वाद घेतले. त्यानंतर मिरवणुकीला सुरुवात झाली या मिरवणुकीत प्रशालेतील मुला मुलींचा लेझीम पथक, मुलींचा समूह नृत्य ढोल भगवेध्वज व रथा मध्ये महास्वामीजींची प्रतिमा, शंकर , पार्वती व महास्वामीजींची वेशभूषा परिधान केलेले विद्यार्थी सहभागी झाले होते ही मिरवणूक राजीव नगर, किसान नगर, साई नगर, मल्लिकार्जुन नगर या मार्गावरून काढण्यात आली. या परिसरातील पालक व भक्तगण यांनी मिरवणुकीचे स्वागत केले . मिरवणूक मार्गात भत्तांनी विद्यार्थ्यांना चहा व खाऊ वाटप केले. शेवटी वीर तपस्वी मंदिरात मिरवणुकीची सांगता झाली.यावेळी विद्यार्थ्यांना महाप्रसादाची सोय करण्यात आली होती. या मिरवणुकीत प्रशालेचे उपमुख्याध्यापक धनंजय नकाते पर्यवेक्षक संतोषकुमार तारके व संकुलातील सर्व कर्मचारी पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.





सोलापूर : के.लिंगराज वल्याळ मैदानावर शुक्रवारी सायंकाळी आ.देवेंद्र कोठे यांनी कै.तात्या विष्णुपंत कोठे प्रतिष्ठान सामुदायीक विवाह सोहळा आयोजित केला होता. त्याचे छायाचित्र. (छाया : केवल तिवारी)

# गोरज मुहूर्तावर बांधल्या २७ जोडप्यांच्या रेशीमगाठी

## ● स्व. विष्णुपंत कोठे प्रतिष्ठानचा सामुदायिक विवाह सोहळा उत्साहात

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २० डिसेंबर -**

सनईचे मंगल सुर, वऱ्हाडींची लगबग अन् प्रचंड उत्साहाने भारलेल्या वातावरणात शुक्रवारी गोरज मुहूर्तावर २७ जोडप्यांच्या रेशीमगाठी बांधल्या गेल्या. निमित्त होते स्व. विष्णुपंत कोठे प्रतिष्ठानतर्फे प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष आ. देवेंद्र कोठे यांनी आयोजित केलेल्या सर्वधर्मीय सामुदायिक विवाह सोहळ्याचे.

स्व. विष्णुपंत कोठे प्रतिष्ठानमार्फत स्व. खा. लिंगराज वल्याळ क्रीडांगणावर हा नयनरम्य सामुदायिक विवाह सोहळा संपन्न झाला. विवाह सोहळ्यासाठी येणाऱ्या वऱ्हाडींना गंध लावून आपुलकीने स्वागत करण्यात येत होते. मैदानात सर्व वधू-वरांना देण्यासाठीचा रुखवत सजवून ठेवण्यात आला होता. आ. देवेंद्र कोठे यांनी धर्मपत्नी मोनिका कोठे यांच्यासह कन्यादान केले. विवाहापूर्वी मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करण्यात आले. स्व. विष्णुपंत कोठे प्रतिष्ठानतर्फे वधू-वरांना कपाट, मणी मंगळसूत्र, संसारोपयोगी तब्बल २७ वस्तू, साडी, शालू, जोडवी, सफारी, जोधपुरी, चप्पल, बूट इतर आवश्यक वस्तू देण्यात आल्या. तसेच वधू-वरांकडील तब्बल १० हजार जणांच्या भोजनाचीही सोय करण्यात आली होती. वऱ्हाडी मंडळींना विवाह सोहळा पाहता यावा यासाठी मैदानात ५ ठिकाणी एलईडी स्क्रीन लावण्यात आले होते.विवाह सोहळ्यानिमित्त सजविलेल्या बग्गीतून वधू - वरांची दिमाखात मिरवणूक काढण्यात आली. अक्षता पडताच फटाक्यांची आतिषबाजी करण्यात आली.

पद्मशाली पुरोहित संघम् वेदपाठ शाळेच्या पुरोहितांनी विवाह सोहळ्याचे पौरोहित्य केले. या विवाह सोहळ्यातील वधू - वरांना आशिर्वाद देण्यासाठी ष. ब्र. अभिनव पट्टदेवरू (मैंदर्गी), पोलिस उपायुक्त विजय कबाडे, आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्या सुविद्य पत्नी शांभवी कल्याणशेट्टी, भाजपाचे ज्येष्ठ नेते किशोर देशपांडे, माजी महापौर महेश कोठे, माजी महापौर श्रीकांचना यन्नम, माजी आमदार नरसिंग मेंगजी, माजी नगरसेवक मधुकर आठवले, जयकुमार माने, विनायक कोंड्याल, भाजपाचे माजी शहर अध्यक्ष विक्रम देशमुख, प्रदेश कार्यकारिणी सदस्य शहाजी पवार, शिखर बँकेचे माजी संचालक अविनाश महागावकर, पद्मशाली शिक्षण संस्थेचे अध्यक्ष ड. श्रीनिवास क्यातम, पद्मशाली शिक्षण संस्थेचे सचिव दशरथ गोप, जनार्दन कारमपुरी, उद्योजक कुमार करजगी, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रदेश उपाध्यक्ष किसन जाधव, नागेश गायकवाड, डॉ. सूर्यप्रकाश कोठे, रामकृष्ण कोंड्याल, माजी उप महापौर दिलीप कोल्हे, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे शहर जिल्हा कार्याध्यक्ष संतोष पवार, काशिनाथ गड्डम, श्रीकांत डांगे, मिलन कल्याणशेट्टी, शिवाजी वाघमोडे, प्रथमेश कोठे, मोची समाजाचे अध्यक्ष करेप्पा जंगम, मोहन डांगरे, नागेश वल्याळ, राजकुमार हंचाटे, भाजप सरचिटणीस रोहिणी तडवळकर, प्रशांत बडवे, अंबदास मिठ्ठाकोल, प्रा. अजय दासरी, पद्मशाली ज्ञाती संस्थेचे सचिव संतोष सोमा, मनपा शिक्षण मंडळाचे माजी सभापती दत्तात्रय गणपा, इंदिरा कुडक्याल, कुमुद अंकारम, रामेश्वरी बिर्रू, राधिका पोसा, प्रतिभा मुदगल, शशिकांत कैंची, बाबा करगुळे आदी उपस्थित होते. गुरुशांत धुत्तरगावकर यांनी प्रास्ताविक तर श्वेता हुल्ले यांनी विवाह सोहळ्याचे सूत्रसंचालन केले. उपस्थितांनी विवाह सोहळ्याच्या उत्कृष्ट नियोजनाचे कौतुक केले.

### वऱ्हाडींनी घेतला सुरुची भोजनाचा आस्वाद

स्व. विष्णुपंत कोठे प्रतिष्ठानच्या मोफत सर्वधर्मीय सामुदायिक विवाह सोहळ्यास आलेल्या वऱ्हाडींसाठी प्रतिष्ठानतर्फे मधुर मिलन बुंदी लाडू, आलू मटार भाजी, पुरी, मसाला भात, आमटी, डिस्को भजी अशा चविष्ट पदार्थांचा समावेश असलेले सुरुची भोजन आयोजित करण्यात आले होते. यावेळी वऱ्हाडींनी या भोजनाचा आस्वाद घेतला.



# स्व. बिहारीलाल सुखदेव बलदवा फलकाचे उद्घाटन

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २० डिसेंबर -**

शहर उत्तर विधानसभा मतदारसंघातील कस्तुरबा मार्केट येथील आर्य समाज मंदिर समोरील आर्य समाज मंदिर ते तुळजापूर वेस या रस्त्याला स्वातंत्र्य सेनानी स्वर्गीय बिहारीलाल सुखदेव बलदवा यांचे नांव देण्यात आले. या नामकरण फलकाचे महापालिका तर्फे विभागीय अधिकारी अविनाश अंत्रोळीकर यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले.

यापूर्वी या रस्त्याला स्वर्गीय बाबुराव आण्णा चाकोते यांनी स्वर्गीय बिहारीलाल बलदवा मार्ग म्हणून सन २000मध्ये सोलापूर महानगरपालिके तर्फे फलकाचे नामकरण करण्यात आले होते. परंतु ते फलक जुने झाल्यामुळे व नादुरुस्त झाल्यामुळे ते फलक काढून त्याच ठिकाणी नवीन फलक महानगरपालिकेतर्फे बसवण्यात आले आहे. हे फलक बसविण्यासाठी आमदार विजयकुमार देशमुख, नगरसेवक आनंद चंदनशिवे, डॉ. किरण देशमुख, महापालिकेचे अधिकारी कारंजे यांचे सहकार्य लाभले. या कार्यक्रमास यावेळी शामसुंदर बलदवा, पुरुषोत्तम बलदवा, डॉ. मंगेश शहा, विमलाबाई बलदवा, नंदा करवा, यशोदा डागा, शंकर बिराजदार, गिरीश जकोटिया, मनीष बलदवा, सुनील बलदवा, विजय बलदवा, शरद कालानी, नंदकिशोर बलदवा, घनश्याम जकोठीया, नंदा करवा, नंदकुमार यल्ला आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन सातलिंग शटगार यांनी केले.

# महिलेच्या फसवणुकप्रकरणी बाँड रायटरसह सहाजणांविरुध्द गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २० डिसेंबर -**

महिलेच्या फसवणुकप्रकरणी बाँड रायअरसह सहाजणांविरुध्द सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत अर्चना श्रीधर देवसानी (वय ५०, रा. न्यु पाच्छा पेठ, सोलापूर) या महिलेच्या फिर्यादीवरुन दामोदर लक्ष्मीपती देवसानी, अमित दामोदर देवसानी, अनिल दामोदर देवसानी, निर्मला दामोदर देवसानी (रा. प्लॉट नं. ७८, विणकर वसाहत, अक्कलकोट रोड, सोलापूर), गंगाधर लक्ष्मीपती देवसानी (रा. न्यु पाच्छा पेठ, सोलापूर), गणेश पेंटा (रा. १४५ ए, सिध्देश्वर पेठ, सोलापूर) यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अर्चना देवसानी व दामोदर देवसानी आणि इतर सर्व आरोपी हे एकमेकांचे नातेवाईक आहेत तर




गणेश पेंटा हा बाँड रायटर आहे. ४ डिसेंबर २०२४ रोजी दामोदर देवसानी, अमित देवसानी, अनिल देवसानी, निर्मला देवसानी यांनी गंगाधर देवसानी यांच्या सूचनेप्रमाणे व मार्गदर्शनाप्रमाणे बाँड रायटर गणेश पेंटा यास हाताशी धरून एकत्र कुटुंबातील मिळकतीच्या वाटपाकरीता तीन बक्षिस पत्रावर सर्व कुटुंबियांच्या स्वाक्षऱ्या करून तो दस्त दुय्यम निबंधक कार्यालय वर्ग २ उत्तर ३ सोलापूर या कार्यालयात नोंदविण्यास दिला. नगर भूमापन क्र. ८४०१/२/७ प्लॉट नं..११/१४ पैकी क्षेत्र ४४६.४० चौमी या महत्वाच्या जास्त मिळकतीचा दस्त क्र. ८१९४ ने नोंदणीकरीता बक्षिसपत्राच्या अगोदर जाणूनबुजून बॉड रायटर गणेश पेंटा याने वर ठेवला व नोंदणी झाल्यानंतर भूमापन क्र. १०३९४/३२/३९७ व १०३९४/३२/३९६ या दोन मिळकतीच्या बक्षिस पत्राच्या नोंदणीच्या वेळेस दामोदर देवसानी व इतर आरोपींनी संगणमत करून ही मिळकत अर्चना देवसानी यांच्या नावे न करण्याच्या उद्देशाने नोंदणी दस्तवेळी बायोमेट्री व अंगुलीमुद्रा न देता परस्पर निघून जाऊन कट कारस्थान करून अर्चना देवसानी यांची फसवणुक केली. म्हणून सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस निरीक्षक लकडे पुढील तपास करीत आहेत.

# नवीपेठेत कपड्यांच्या दोन दुकानांना आग लागून लाखो रुपयांचे नुकसान

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २० डिसेंबर-**

शहरातील प्रमुख बाजारपेठ असलेल्या नवी पेठेतील जुन्या महापालिकेलगत असलेल्या कपड्यांच्या दोन दुकानांना गुरुवारी रात्री आग लागून लाखो रुपयांचे नुकसान झाले.

मनोहर दासरी आणि जय पवार यांच्या मालकीची ही दुकाने आहेत. शॉर्टसर्किटमुळे ही आग लागली, असे दुकानदारांचे म्हणणे आहे. आगीत दुकानातील कपडे जळून खाक झाले. त्याची झळ बाजूलाच असलेल्या दुकानांनापण बसली. मध्यरात्री झालेली ही घटना शुक्रवारी सकाळी सात वाजता उघडकीस आली. पोलिसांना ही बाब कळल्यावर त्यांनी अग्निशमन दलाला पाचारण केले. अग्निशामक दलाने आगीवर नियंत्रण मिळविल्याने इतर दुकानांचे नुकसान टळले. दुकान बंद असल्याने उशिरा हा प्रकार उघड झाला. तोपर्यंत कापड दुकान पूर्णतः जळून खाक झाले होते. आगीमध्ये लाखोंचा कापड माल जळून खाक झाला. मध्यरात्रीची घटना असल्यामुळे मोठी दुर्घटना टळली. २० लाखांचे नुकसान असल्याचे दुकान मालकांचे म्हणणे आहे. या दोन्ही दुकानाच्या जवळच विद्युत डीपी आहे. दुकानदारांनी दिलेल्या माहितीवरून वारंवार या ठिकाणी डीपीमध्ये शॉर्टसर्किट होते. यामुळेच ही आग लागल्याचे त्यांचे म्हणणे आहे. ही घटना सकाळी समजताच या ठिकाणी बघ्यांची मोठी गर्दी झाली होती. अग्निशमन दलाने सामुहिक प्रयत्न केल्याने आग आटोक्यात आली. त्यामुळे मुख्य बाजारपेठेतील मोठी दुर्घटना टळली. दोन्ही दुकानाचे झालेले आर्थिक नुकसान भरपाई महावितरण कंपनीने भरून द्यावे अन्यथा तीव्र आंदोलन करण्याचा इशारा व्यापारी जय पवार यांनी दिला आहे.



# सोलापूरातील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत विद्यार्थ्यांसाठी उपक्रम

**सोलापूर, दि. २० डिसेंबर-**

सीडीएसएल इन्व्हेस्टर प्रोटेक्शन फंडने सोलापूर येथील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रम आर्थिक साक्षरतेला चालना देण्यावर आणि गुंतवणूकदारांना भांडवली बाजारातील त्यांच्या गुंतवणुकीबाबत माहितीपूर्ण निर्णय घेण्यास सक्षम बनविण्यावर केंद्रित होता. तसेच याद्वारे गुंतवणुकीच्या मुख्य तत्त्वांची देखील माहिती देत होता. भांडवली बाजारातील आर्थिक समावेशन साध्य करण्यात गुंतवणूकदारांचे शिक्षण महत्त्वाची भूमिका बजावते. त्यामुळेच सीडीएसएल आयपीएफ चे उद्दिष्ट गुंतवणूकदारांना भांडवली बाजारातील गुंतागुंत आत्मविश्वासाने नेव्हिगेट करण्यासाठी आणि आत्मनिर्भर इन्व्हेस्टर होण्यासाठी आवश्यक असलेले ज्ञान आणि कौशल्ये प्रदान करणे हे आहे.

# खंडापूरकर लिखित 'जलसाक्षर शीला' पुस्तकाचे प्रकाशन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २०, डिसेंबर-**

मूळचे लातूर आणि ठाणे जिल्ह्यातील कल्याण येथे स्थायिक झालेले श्रीधर खंडापूरकर यांनी पाण्याचे महत्व विशद करणाऱ्या विषयावर लिहिलेल्या जलसाक्षरत शीला या पुस्तकाचे प्रकाशन तरुण भारतचे मुख्य संपादक प्रशांत माने यांच्या हस्ते संपन्न झाले.

सोलापुरातील हॉटेल लोटस येथे शुक्रवार, २० डिसेंबर रोजी पार पडलेल्या पुस्तक प्रकाशन कार्यक्रमास लेखक श्रीधर खंडापूरकर, शिला श्रीधर खंडापुरकर, तरुण भारतचे वृत्तसंपादक अजितकुमार संगवे, अविनाश मार्कंडेय, अलका मार्कंडेय, श्रीमती दीपा गोरे, अरुण मार्कंडेय, संध्या मार्कंडेय, मनिषा मार्कंडेय, सोनाली निलेश वैद्य, सायली अजिंक्य गोरे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.



सोलापूर : श्रीधर खंडापूरकर यांनी लेखन केलेल्या जलसाक्षर शीला या पुरस्काचे प्रकाशन दैनिक तरुण भारतचे संपादक प्रशांत माने यांनी केले. यावेळी वृत्त संपादक अजितकुमार संगवे, शिला श्रीधर खंडापुरकर, अविनाश मार्कंडेय, अलका मार्कंडेय , दीपा गोरे, अरुण मार्कंडेय, संध्या मार्कंडेय, सोनाली निलेश वैद्य, सायली अजिंक्य गोरे.

याप्रसंगी मनोगत व्यक्त करताना संपादक प्रशांत माने म्हणाले की, पाण्याला अनन्नसाधारण महत्व असून समाजातील प्रत्येक घटकाने पाण्याचे महत्व गांभीर्याने ओळखले पाहिजे. सोलापूरकर आणि लातूरकरांना पाण्याचे महत्व मोठे आहे. पाणी जपून वापरणे ही महिला आणि पुरुष दोघांचीही मोठी जबाबदारी आहे. ग्रामीण भागाप्रमाणे शहरी नागरिकांनीही पाण्याचे महत्व ओळखून ते जपून वापरण्यासाठी आवर्जुन प्रयत्न करणे काळाची गरज आहे. कौटुंबिक वातावरणात पार पडलेला पुस्तक प्रकाशनाचा कार्यक्रम नेटका आणि थाटात पार पडला.



**नागपूर : राष्ट्रीय स्वयंसेवक संघ ही आमची मातृसंस्था. संघाने आमच्यासारख्या स्वयंसेवकांच्या जीवनाला दिशा दिली. परं वैभवं नेतुमेतत् स्वराष्ट्र हे ध्येय दिले. सामाजिक आणि राजकीय जीवनात आमचे जे काही स्थान आहे, ते फक्त संघ संस्कारांमुळेच. रेशीमबाग येथे चंद्रकांत पाटील यांनी संघाचे संस्थापक आणि प्रथम सरसंघचालक परमपूज्य डॉ. हेडगेवार आणि द्वितीय सरसंघचालक परमपूज्य गोळवलकर गुरुजी यांच्या स्मृतीस्थळास अभिवादन केले. त्यांनी त्यांच्या संघ परिवारात व्यथीत केलेल्या आठवणींना उजाळा दिला.**

# 'भेंड'चा नागेश निघाला चतूर शेतकरी

## ● तुरीसह कांद्याच्या आंतरपिकाचे काढले 'विक्रमी उत्पन्न'

**तभा वृत्तसेवा । प्रथमेश पवार**
**मोडनिंब, दि. २० डिसेंबर-**

माढा तालुक्यातील भेंड गावामध्ये गेल्या वर्षीपासून भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा व इक्रिसॅट या आंतरराष्ट्रीय संस्थेच्या संयुक्त विद्यमाने जलसंधारण व पर्जन्यमानावर आधारित पीक पद्धती अशा नाविन्यपूर्ण प्रकल्पाची सुरवात झाली.

या प्रकल्पांतर्गत इक्रिसॅट संस्थेने कमी पाणी लागणाऱ्या पिकाच्या लागवडी अंतर्गत तुरीच्या बियाणांचे वाटप केले.



सबलाईन-इक्रिसॅट संस्थेने आयसीपीव्ही-२१३३३ हे तुरीचे वाण भेंड गावामध्ये उपलब्ध करून दिले. अन् या वाणाचा वापर करीत, याच तुरीत कांदा पिकाचे दहुरी उत्पन्न घेतल्याने भेंडच्या एका सामान्य शेतकऱ्यांनी एक वेगळा आदर्श निर्माण केला आहे. त्या शेतकऱ्याचे नाव आहे नागेश बजरंग दळवी. त्यांनी सदरचे वाण हे प्रथमतः लागवडीसाठी वापरले. यंदा पाऊस मान चांगले असल्याने शेतकऱ्यांचा याला प्रतिसाद चांगला मिळाला. यामुळे नागेशनेही अर्ध्या एकरावर साधारणतः २५० ग्राम बियाणे टोकन पद्धतीने लागवड केली. त्यामुळे बियाण्याची बचत झाली व दोन तुरीतील अंतर राखता आले. अत्यंत काटेकोर नियोजन व इक्रिसॅट अधिकाऱ्यांचे मार्गदर्शन तसेच इक्रिसॅट कडून दिलेले बोरॉन, झिंक व इमामेक्टीन आदी सूक्ष्म पोषक द्रव्ये यांचा यशस्वी वापर यामुळे या शेतकऱ्याने अर्ध्या एकरातून तब्बल ७ क्विंटल तुरीचे विक्रमी उत्पादन घेतले. तसेच यातील २ क्विंटल हिरव्या तूर शेंगा त्यांनी आठवडी बाजारात विक्री केल्या व त्यातून अधिकचे उत्पन्न घेतले.

या यशस्वी प्रयोगाबाबत दळवी म्हणाले, ज्यावेळेस त्यांनी तूर लागवड केली; त्यावेळेस त्या तुरीतील अंतर योग्य ठेवून त्यात कांद्याचे २२ क्विंटल आंतरपीक घेऊन दुहेरी उत्पन्नाचा लाभ घेतला. कांद्याबरोबर नाचणीचे सुद्धा जवळजवळ २५ किलो उत्पादन घेतले व तूर उत्पादक शेतकऱ्यांपुढे एक आदर्श निर्माण केला आहे. वरील तूर उत्पादनाकरिता नागेश यांचे ४ हजार रुपये औषध फवारणीसाठी व शेतीची मशागत यावर खर्च झाले. यामध्ये त्यांनी तूर पीक हे ५० दिवसाचे झाल्यावर त्याचा शेंडा खोडणे प्रक्रिया केली. त्यामुळे तुरीस अनेक फांद्या फुटून त्याचा उत्पन्न वाढीस फायदा झाला.

### बांधावर लावलेल्या तुरीलाही लगडल्या शेंगा

या गावातील दोन शेतकऱ्यांनी सदरचे वाण हे बांधावर लागवड करून पाहिले. या बांधावरील तुरीच्या झाडांनाही समाधानकारक उत्पादन झाले आहे. इक्रिसॅटच्या या वाणाच्या यशस्वी लागवडीमुळे व विक्रमी उत्पादन निघत असल्याने सर्वत्र समाधान व्यक्त होत आहे व भविष्यामध्ये तूर पिकाकडे एक हमखास उत्पन्न देणारे व कमी पाणी लागणारे पीक म्हणून पाहिले जाईल.

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी**. ● समूह मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे.** ● मुख्य संपादक :**प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi -** Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

सोलापूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## वाढदिवसादिवशी गिफ्ट का दिले म्हणून मुलीच्या वडीलांस मारहाण

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २० डिसेंबर -**

मुलीच्या वाढदिवसादिवशी गिफ्ट का दिले म्हणून विचारणा करणाऱ्या मुलीच्या वडीलांस मारहाण करून जखमी करण्यात आले. संतोष श्रीरंग कनेरी (वय ४५, रा. जाधववाडी, ता. माढा) असे जखमी वडीलांचे नाव आहे. १७ डिसेंबर रोजी सायंकाळी राहत्या घराजवळ जाधववाडी येथे मुलीच्या वाढदिवसादिवशी गिफ्ट का दिला म्हणून संतोष कनेरी हे विचारणा करण्यास गेल्यानंतर त्यांना वैभव महादेव चव्हाण व इतर तीन जणांनी मिळून लोखंडी पाईप व लाकडाने मारहाण केली. त्यामध्ये संतोष कनेरी यांच्या सर्वांगास मुका मार लागून जखमी झाल्याने त्यांना उपचारासाठी सोलापूरच्या शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.



## ▶▶ क्राईम वृत्त...

### रासायनिक प्राशन करून आत्महत्येचा प्रयत्न

**सोलापूर, दि. २० डिसेंबर-**

अंगणात सडा मारण्याचा पिवळा विषारी कलर प्राशन करून आत्महत्येचा प्रयत्न करणाऱ्यास उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल केले.इरण्णा सिद्राम पुडूर (वय ३९, रा. न्यु पाच्छा पेठ, सोलापूर) असे आत्म हत्येचा प्रयत्न करणाऱ्याचे नाव आहे. २० डिसेंबर रोजी सकाळी साडेआठच्या सुमारास राहत्या घरी अज्ञात कारणावरून इरण्णा यांनी सडा मारण्याचा विषारी पिवळा कलर पाण्यात घालून प्राशन केला. यामुळे इरण्णा यांना त्रास होऊ लागल्याने पत्नी राधिका पुडूर यांनी शासकीय रुग्णालयात दाखल केले. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.




### बुटाने मारहाण केल्याने मुलगी व वडील जखमी

**सोलापूर, दि. २० डिसेंबर-**

दिलमेश्वर (ता. करमाळा) येथे मुलगी व तिच्या वडीलांस बुटाने मारहाण करून जखमी करण्यात आले. भगवान जंगल मल्लाव (वय ५४) आणि पुजा भगवान मल्लाव (वय २६, रा. दिलमेश्वर) अशी जखमींची नावे आहेत. २० मे रोजी सकाळी ९ च्या सुमारास दिलमेश्वर मधील शिवाजी महाराज चौक येथे अज्ञात कारणावरून सचिन बाळू मोरे याने बुटाने व लाथाबुक्क्याने भगवान व त्यांची मुलगी पुजा या दोघांना मारहाण करून ढकलून दिले. त्यामध्ये दोघेही खाली पडून डोक्यास मार लागून जखमी झाल्याने त्यांना उपचारासाठी सोलापूरच्या शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

### पाणी समजून ॲसिड पिल्याने वृध्द अत्यवस्थ

**सोलापूर, दि. २० डिसेंबर-**

पाणी समजून ॲसिड पिल्याने वृध्द अत्यवस्थ झाल्याची घटना जामगाव (ता. मोहोळ) येथे घडली. केरप्पा नाना डवले (वय ८४, रा. जामगाव) असे उपचारासाठी दाखल करण्यात आलेल्या वृध्दाचे नाव आहे. २० डिसेंबर रोजी दुपारी गंगा नगर लक्ष्मी पेठ येथील नविन घराचे काम करीत असताना पाण्याचे बाटलीत ठेवलेले ॲसिड पाणी समजून केरप्पा डवले यांनी प्राशन केले. त्यामुळे त्यांना त्रास होऊ लागल्याने मुलगा अर्जुन यांनी केरप्पा यांना सोलापूरच्या शासकीय रुग्णालयात दाखल केले. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

### भाग्य लक्ष्मी पार्कमधून ५० हजारांचे साहित्य चोरीस

**सोलापूर, दि. २० डिसेंबर-**

जुळे सोलापुरातील भाग्य लक्ष्मी पार्क मधील रविशंकर पॅराडाईज नगर येथील घरातून चोरट्याने ५० हजार ४६५ रुपयांचे साहित्य चोरून नेले. याबाबत अजयकुमार झारखंडे सिंह (वय ४९, रा. मार्कंडेय नगर, कुमठा नाका, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन विजापूर नाका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अजयकुमार यांचे नविन घर रविशंकर पॅराडाईज नगर येथे आहे. १५ डिसेंबर ते १८ डिसेंबर या कालावधीत चोरट्याने अजयकुमार यांच्या शेजारच्याच्या घराच्या गच्चीवरून अजयकुमार यांच्या घरात प्रवेश करून २ सिल्क टॉवर नळ, ४ हॅन्डल शॉवर नळ, ४ बीब शॉवर नळ, ४ वॉश बेसिन टॉवर, १ बाथरूम शॉवर, ५ बेसनी नळ, २ लॉग बॉडी बिबिकॉक, ६ ब्रास युनियन, २ लाईट केबल वायर असा ५० हजार ४६५ रुपयांचे साहित्य चोरून नेले. याबाबत विजापूर नाका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस हवालदार भिसे पुढील तपास करीत आहेत.

### सम्राट हॉटेलसमोरून दुचाकी चोरीस

**सोलापूर, दि. २० डिसेंबर-**

शहरातील सम्राट हॉटेलसमोरून चोरट्याने ३० हजार रुपये किंमतीची दुचाकी चोरून नेली. याबाबत परशुराम शिवलिंग भंडारे (वय २९, रा. स्लॉटर हॉउस, बापूजी नगर, शास्त्री नगर, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन एम आयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. १७ डिसेंबर रोजी सायंकाळी सम्राट हॉटेलसमोर परशुराम भंडारे याने त्यांची एमएच १३ डीजी ४१९० क्रमांकाची दुचाकी हॅन्डल लॉक करून पार्क केली होती. ती चोरट्याने चोरून नेल्याची नोंद एमआयडीसी पोलिस ठाण्यात करण्यात आली आहे. पोलिस हवालदार पाटील पुढील तपास करीत आहेत.

# ‘पिकांची विविधता’ जोपासण्यात सोलापूर जिल्हा ‘राज्यात अव्वल’!

### जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी भोसले यांनी कथन केले ‘अनुभवाचे बोल’

### ‘उजनी’मुळेच जिल्ह्याची उत्क्रांती!

**तभा वृत्तसेवा । अविनाश गायकवाड**
**सोलापूर, दि. २० डिसेंबर-**

सर्वात कमी पर्जन्यमान असलेला जिल्हा म्हणून सोलापूर जिल्ह्याकडे पाहिले जात होते. परतीचाच पाऊस येथे पडत असल्याने येथे फक्त रब्बी हंगामाचीच पिके चांगली यायची. मात्र पर्जन्यमान कमी असलेल्या जिल्ह्यात तब्बल ११७ टीएमसी पाणी साठवणूक होणाऱ्या उजनी धरणाची निर्मिती झाली अन् कृषी क्षेत्रात मोठी उत्क्रांती निर्माण होवून शेतकरी बांधवांची आर्थिक उन्नती झाली. यामुळेच ‘पिकांची विविधता’ जोपासण्यात आपला सोलापूर जिल्हा सध्या राज्यात अव्वल ठरला असल्याचा निर्वाळा जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी शुक्राचार्य भोसले यांनी आज (दि. २०) दैनिक तरूण भारतशी खास संवाद साधताना दिला.


सोलापूर जिल्ह्यातील ‘शेती आणि शेतकरी’ या विषयावर आपल्या अनुभवाचे बोल विस्ताराने बोलताना भोसले म्हणाले की, उजनी धरण निर्माण होण्यापूर्वी सोलापूर जिल्ह्यात कायम दुष्काळाचे सावट होते. फक्त रब्बी हंगामातच काहीतरी पोटापुरते पिकायचे. मात्र उजनी धरणाच्या निर्मितीनंतर जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी आधुनिक शेती करण्याचा ध्यास घेतला. प्रत्येक शेतकरी रात्रंदिन आपल्या शेतात राबू लागला. शासनाच्या संबंधित यंत्रणेद्वारे उजनीद्वारे आवर्तने सोडल्याने येथील शेतकरी बांधवांनी जिल्ह्यात हंगामी पिकांबरोबर फळबागा, द्राक्षबागा, केळीबागा फुलविल्या. फळभाज्या, पालेभाज्या, फुलांचेही मार्केट शेतकऱ्यांनी काबीज करण्यास आरंभ केला. इतकेच नाहीतर सोलापूर जिल्ह्यात उजनीच्या कॅनॉलद्वारे दूरदूरवर पाणी जावू लागल्याने जिल्ह्यात ऊस क्षेत्र वाढू लागले आणि आजपर्यंत जवळपास ४० साखर कारखान्यांची निर्मिती झाली. या कारखान्यातून वर्षाकाठी १७० लाख मे. टन ऊस गाळप होतो आणि साखरेचे उत्पादनही त्याच तुलनेत होते. या साखर उत्पादनात आपला जिल्हा अवघ्या देशात कायम अव्वल आहे. जिल्ह्यात प्रतिवर्षी सरासरी ४६० मिमी इतका पाऊस असतो. यंदा मात्र सव्वासातशे मिमी इतका पाऊस झाला. जिल्ह्यात तब्बल १३४ टक्के पाऊस झाल्याने जिल्हाभरातील शिवार आज हिरवेगार दिसत आहे. जनावरांच्या चारा-पाण्याचा प्रश्न मिटला आहे. पाण्याच्या टँकरची सध्यातरी कोठेही गरज नाही. मुबलक पावसामुळे जिल्ह्यात यंदा ऊस लागवडीचाही टक्का वाढला आहे. यामुळे सध्या जिल्ह्यात एकूण ३ ते ४ लाख हेक्टर ऊस लागवड झाली आहे. मोहोळ, माढा, अकलूज, पंढरपूर, मंगळवेढा आदी भागात ऊस पट्टा, केळी लागवड वाढू लागली आहे. तर मोहोळ, शेटफळ, बार्शी भागात टोमॅटोची लागवड वाढत आहे. सांगोला, मंगळवेढा, पंढरपूर भागात यंदा डाळिंब क्षेत्रही वाढले आहे. आता दक्षिण सोलापूर, मोहोळचा काही भाग, उत्तर सोलापूर आणि अक्कलकोट तालुक्यात सोयाबीनचे मोठे उत्पन्न शेतकरी घेत आहेत. तर मंगळवेढा शिवारातील ज्वारी पिकाने तर जीआय मानांकन मिळविले आहे. आपल्या जिल्ह्यातील दाळिंब पिकानेही यापूर्वी जीआय मानांकन मिळविले होते. यंदा जिल्हाभरात कांदा लागवड ७० हजार हेक्टरच्या घरात गेली आहे. यामुळे जिल्ह्याच्या विविध भागात विविध प्रकारची पिके घेण्यासाठी सध्या शेतकरी बांधव झटतो आहे; जीवाचं रान करून आर्थिक क्रांती करताना दिसून येत आहे.











उजनीमुळे जिल्ह्याच्या बहुतांश भागात हिरवा पट्टा निर्माण झाल्याने पशुधन वाढले आहे. दुधदुभते वाढू लागल्याने दुग्धव्यवसायानेही उभारी धरल्याचे चित्र आहे.

शासनाच्या कृषी विभागाकडून विविध प्रकारच्या योजना आम्ही शेतकऱ्यांसाठी राबवित आहोत; त्याद्वारे मोठी सबसिडी देवून त्यांच्या आर्थिक प्रगतीला हातभार लावत आहोत. यामध्ये राष्ट्रीय कृषी विकास योजना, राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान, एकात्मिक फलोत्पादन विकास अभियान आदींसह इतरही योजनांद्वारे शेतकरी आणि शेतकरी कंपन्यांना सहकार्य करीत आहोत. यामध्ये सोलार पंप असो, शेततळी, पिकविमा, कोल्ड स्टोअरेज, पॉलिहाऊस, विविध कृषी विषयक औजारे, सवलतीच्या दरात ट्रॅक्टर्स देणे, माती नमुने तपासून शेतकऱ्यांना मार्गदर्शन करणे, खते, बि-बियाणे आदींचा शासनस्तरावरून मुबलक पुरवठा करणे आदींचा समावेश आहे. सोलापूर शहर आणि राज्यातील विविध ठिकाणच्या बाजारातही अत्याधुनिक शेतीसाठी विविध यंत्रे, तंत्रज्ञान येवू लागल्याने सोलापूर जिल्ह्यातील कृषी व्यवसाय करणारे शेतकरी आता डिजीटल शेतकरी होवू लागल्याचा आनंदही शेवटी भोसले यांनी व्यक्त केला.

### कृषी प्रदर्शनाद्वारे रोज १,२०० शेतकऱ्यांना मार्गदर्शन

सोलापूर येथील श्री सिध्देश्वर गड्डा यात्रेनिमित्त होम मैदानावर श्री सिध्देश्वर देवस्थान समितीच्या वतीने प्रतिवर्षीप्रमाणे यंदाही कृषी प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे. या प्रदर्शनात कृषी विभागाचेही दोन स्वतंत्र स्टॉल लावण्यात येणार आहेत. या स्टॉलमधून रोज ३ तालुक्यातील १२०० शेतकऱ्यांना आमचे कर्मचारी, अधिकारी मार्गदर्शन करणार आहेत. तर या प्रदर्शनात जिल्ह्यातील काही शेतकऱ्यांनी शेतात घेतलेल्या दर्जे दार पिकांचे नमुनेही ठेवण्यात येणार आहेत. एकंदरीत, शेतीबाबत प्रचार, प्रसिध्दी करण्याचे काम आम्ही या यात्रेद्वारे प्रतिवर्षी करीत असतो.

**- शुक्राचार्य भोसले, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, सोलापूर**

## पुढचं गारमेंट प्रदर्शन दिल्लीत भरवा, पंतप्रधानांना कार्यक्रमाला बोलवू



### आ. सुभाष देशमुख : आठव्या आंतरराष्ट्रीय गारमेंट फेअरचा समारोप

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २० डिसेंबर-**

सोलापूरच्या गारमेंट उत्पादकांनी पुढच्या वर्षी दिल्ली सारख्या मोठ्या शहरात गारमेंट फेअर भरवावा. प्रदर्शनाच्या उद्घाटनाला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना बोलवता येईल. जेणेकरून सोलापूरच्या गारमेंट उत्पादनांची मार्केटिंग आंतरराष्ट्रीय बाजारपेठांमध्ये करता येईल, अशी अपेक्षा आमदार सुभाष देशमुख यांनी व्यक्त केली.

सोलापूर गारमेंट मॅन्युफॅक्चरर असोसिएशनच्या वतीने आयोजित आठव्या आंतरराष्ट्रीय गारमेंट फेअरचे बेंगलुरु येथे शुक्रवारी समारोप झाला. येथील शृंगार पॅलेस ग्राउंडवर तीन दिवसीय फेअर सुरू होता. शुक्रवारी आमदार सुभाष देशमुख यांच्या हस्ते समारोप कार्यक्रम संपन्न झाला. प्रदर्शनात सहभाग घेतलेल्या १०४ गारमेंट स्टॉल धारकांचा यावेळी स्मृतिचिन्ह देऊन सन्मान करण्यात आला. यावेळी सोलापूर गारमेंट मॅन्युफॅक्चरर असोसिएशनचे अध्यक्ष निलेश शहा, फेअर कमिटीचे अध्यक्ष सुनील मेंगजी, सचिव व्यंकटेश मेंगजी, अमित जैन, प्रकाश पवार, सतीश पवार, अजय रंगरेज, रोहन बंकापुरे, विनायक माळगे, शैलेंद्र गणाते यांच्यासह इतर पदाधिकारी उपस्थित होते. अमित जैन यांनी सूत्रसंचालन तर प्रकाश पवार यांनी आभार मानले. यावेळी सहभाग घेतलेल्या स्टॉलधारकांनी त्यांचे मनोगत व्यक्त केले. पुढचं प्रदर्शन चेन्नईत भरविण्याची सूचना यावेळी काही स्टॉलधारकांनी केली.

## पुण्याच्या ‘टेकडी’कडून सोलापुरात आयटी पार्क सुरु

### ७ जणांना रोजगार, १० पट वाढविणार : सीईओ लवटे

### डब्ल्यूआयटीमध्ये डेव्हलपमेंट सेंटरचे उद्‌घाटन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २० डिसेंबर-**

टेकडी टेक्नॉलॉजी आपल्या मूल्यांनुसार तंत्रज्ञानाचा वापर समाजाच्या सक्षमीकरणासाठी करीत आली आहे. आजच्या युगात ग्रामीण व निमशहरी भागामधील मुलांचे सबलीकरण, त्यांना व्यावसाईक प्रशिक्षण आणि नोकरीची संधी त्यांच्या राहत्या ठिकाणीच उपलब्ध करून देण्याच्या कार्य पद्धतीला अनुसरून येथील वालचंद इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीमध्ये टेकडी टेक्नॉलॉजी या प्रतिथयश कंपनीचे इन्क्युबेशन आणि सॉफ्टवेअर डेव्हलपमेंट सेंटर सुरु करीत आहोत. या केंद्रात अभियांत्रिकी पदवी प्राप्त करणाऱ्या सोलापूर रहिवाशी विद्यार्थ्यांना आंतरराष्ट्रीय दर्जाच्या प्रकल्पांवर आधारित नोकरीच्या संधी उपलब्ध करून दिल्या जातील, असे प्रतिपादन टेकडी टेक्नॉलॉजीचे मुख्य कार्यकारी अधिकारी पार्थ लवटे यांनी केले.



सोलापूर : टेकडी टेक्नॉलॉजी इन्क्युबेशन डेव्हलपमेंट सेंटरचे माऊसवर क्लिक करून उद्घाटन करताना वालचंद शिक्षण समूहाचे विश्वस्त वैभव गांधी. यावेळी विश्वस्त भूषण शहा, प्राचार्य डॉ. विजय आठवले, सेंटरचे सीईओ पार्थ लवटे, अश्विन दाते.

वालचंद इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी आणि पुण्यातील टेकडी टेक्नॉलॉजी यांच्या संयुक्त विद्यमाने या सेंटरच्या उद्घाटनप्रसंगी श्री लवटे बोलत होते. ते म्हणाले, ‘‘सध्या ७ विद्यार्थ्यांना ही संधी दिली. यात दहा पट नवोदित इंजिनियर्सना ही संधी दिली जाणार आहे. अभियांत्रिकी पदवीच्या दुसऱ्या वर्षापासूनच आम्ही प्रशिक्षणार्थी म्हणून या विद्यार्थ्यांना संधी देणार आहोत. त्यामुळे पदवी प्राप्त केल्यानंतर त्यांना याचा अनुभव मिळणार आहे.’’

यावेळी वालचंद शिक्षण सम ूह विश्वस्त वैभव गांधी, विश्वस्त भूषण शहा, वैभव गांधी, टेकडी टेक्नॉलॉजीचे अश्विन दाते, म नाली कुमठेकर, हिमांगी लवटे, महेश कुलकर्णी डब्ल्यु.आय.टी. चे प्राचार्य डॉ. विजय आठवले उपस्थित होते. इलेक्ट्रॉनिक्सचे विभाग प्रमुख डॉ. सचिन गेंगजे यांनी सुत्रसंचालन केले.

### नोकरी देण्याच्या कंपन्यांचे स्वागतच

उच्चशिक्षणानंतरच्या चांगल्या नोकरीच्या संधी या सध्या फक्त महानगरातूनच उपलब्ध आहेत. त्यामुळे इतर शहरातील तरुणांना नाईलाजाने महानगरात स्थलांतर करावे लागत आहे. सोलापूरमध्ये उद्योगांचा विकास होणे आवश्यक आहे. टेकडी टेक्नॉलॉजी या माहिती व तंत्रज्ञान क्षेत्रातील कंपनीमुळे डब्ल्यू. आय.टी. मधील विद्यार्थ्यांना व्यावसायिक शिक्षणाची (इंटर्नशिप) व नोकरीची संधी महाविद्यालयातच उपलब्ध होणार आहे. यासारख्या इतर कंपन्यांचेही वालचंद शिक्षण समूह स्वागतच करेल. दर्जेदार उच्च शिक्षणाबरोबरच सोलापूरच्या विकासासाठी वालचंद शिक्षण समूह कटिबद्ध आहे.

**- वैभव गांधी, विश्वस्त, वालचंद शिक्षण समूह.**

# कुलसचिव म्हणतात बैठक झाली, समिती अध्यक्ष म्हणतात नाही

## खेळाडूंना आखूड ब्लेजर दिलेबाबतची समिती : तीन महिन्यानंतरही शून्य कार्यवाही



### सिनेट व व्यवस्थापन परिषद असतानाही दप्तर दिरंगाई

**तभा वृत्तसेवा । अजितकुमार संगवे**
**सोलापूर, दि. २० डिसेंबर-**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या क्रीडा दिनानिमित्त आंतर विद्यापीठ स्पर्धेत कामगिरी केलेल्या व सहभागी खेळाडूंचा गौरव २९ ऑगस्ट २०२४ रोजी क्रीडा दिनानिमित्त ब्लेजर देऊन केला होता. हे ब्लेझर ८२ खेळाडूंबरोबरच त्यांचे प्रशिक्षक, संघ व्यवस्थापक आणि विद्यापीठातील काही अधिकाऱ्यांनाही दिले होते. परंतु हे ब्लेझरच आखूड शिवले होते. याबाबत आधिसभा सदस्य ए. बी. संगवे यांनी २४ सप्टेंबर २०२४ रोजी झालेल्या आधिसभा बैठकीत प्रश्नोत्तराच्या तासात हा प्रश्न उपस्थित केला होता. यावेळी झालेल्या चर्चेनंतर संबंधित ठेकेदारावर काय कारवाई करायची यासाठी एक समिती गठित करण्यात आली होती. या घटनेला चार महिने होत आहेत. तरीही ही समिती गठीत केल्याचे किंवा समितीची बैठक असल्याचे पत्र संबंधिताना पाठविले नाही.

या संदर्भात समितीचे सदस्य श्री. संगवे यांनी या समितीची कार्यवाही कुठपर्यंत आली आहे, असे कुलगुरू व कुलसचिव यांना १७ नोव्हेंबर २०२४ रोजी लेखी कळविले होते. तसेच कुलगुरू प्रा. प्रकाश महानवर आणि कुलसचिव योगिनी घारे यांच्याकडे पाठपुरावा केला असता कुलसचिव घारे यांनी अशी माहिती दिली की, समिती स्थापन केली आहे. त्यांनी बैठका घेतल्या आहेत. लवकरच त्यांच्याकडून अहवाल सादर केला जाईल. त्यांना लवकरात लवकर अहवाल देण्याची विनंती केली आहे. परंतु प्रत्यक्षात समितीच्या बैठकाच झाल्या नाहीत. त्यामुळे कुलसचिव हे माहिती न घेताच खोटी उत्तरे देतात. विद्यापीठ प्रशासनावर सिनेट व व्यवस्थापन परिषद सदस्यांचे अंकुश असतानाही विद्यापीठाचे अधिकारी दप्तर दिरंगाई करीत आहेत.

### आखूड ब्लेझर, ट्रॅक सूटही नाही मिळाला

ब्लेजर दिलेल्या विद्यापीठ योगासन संघातील एका खेळाडूने अशी प्रतिक्रिया दिली की, आमचे माप घेऊनही आखूड ब्लेझर दिला. आंतर विद्यापीठ स्पर्धेत सहभागी होताना संघातील सर्व खेळाडूंना किट बरोबरच ट्रॅक सूटही दिला जातो. आम्ही विभागीय व अखिल भारतीय स्पर्धा खेळून आलो. आता दुसरे वर्ष चालू झाले आहे. अजूनपर्यंत आमच्या संघातील एकाही खेळाडूंना मागील वर्षाचा ट्रॅकसूट मिळाला नाही.

### विषयाचे गांभीर्य घेऊन उचित कार्यवाही अपेक्षित

समितीची मीटिंग झालीच नाही. मी या समितीचा अध्यक्ष आहे. कुलसचिव माहिती न घेता उत्तर देत आहेत. अधिसभेत, व्यवस्थापन परिषदेमध्ये अशा काही समित्या गठीत केलेल्या आहेत. त्यांच्या वेळेवर बैठका होणे अपेक्षित आहे, मात्र असे होत नाही. ब्लेझरच्या समितीबाबत व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत कुलसचिव व कुलगुरूंनाही विचारणा केली आहे. त्यांनी प्रक्रिया सुरु आहे, असे उत्तर दिले. मात्र, या विषयाला गांभीर्याने घेऊन उचित कार्यवाही झाली पाहिजे.

**-प्रा. सचिन गायकवाड, व्यवस्थापन परिषद सदस्य.**

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.
सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## ज्ञानामृत आनंदलहरी -९८१

**येवढा त्याचा छंद देवा । काय सेवा भक्ती ते ।।**

जगात शोधूनही असा माणूस सापडणार नाही की, ज्याला कोणाच्या प्रेमाची गरज नाही. अर्थात, प्रत्येकाला कोणाच्या का होईना पण प्रेमाची गरज असतेच. कारण प्रेम हा मानवी जीवनाचा आधारस्तंभ आहे. मुके प्राणीसुध्दा एकमेकांवर प्रेम करतात. मुलांचे आई-वडीलांवर, आई-वडीलांचे मुलांवर, विद्यार्थ्यांचे-गुरुजनांवर, गुरुजनांचे-विद्यार्थ्यांवर, नागरीकांचे देशावर असे अनेकांचे अनेकांवर प्रेम असते. ज्याच्या जीवनात प्रेमाला स्थानच नाही, त्याच्या जीवनाला अर्थच नाही, असे म्हटले तर चुकीचे होईल असे वाटत नाही. प्रेमाविना असलेला देह म्हणजे चालते-बोलते प्रेत होय. माणूस माणसांवर जसे प्रेम करतो तसे तो देवावरही करतो. भगवंतावर प्रेम करणाऱ्यांची संख्या कमी नाही. सर्व मानवजातींवर, प्राणीमात्रांवर प्रेम करणारा भगवंतावर आपोआप प्रेम करु लागतो. ज्याला जीवमात्रावर प्रेम नाही, त्याला भगवंतावर प्रेम असूच शकत नाही. माणूस जसा भगवंतावर प्रेम करतो तसा भगवंतही माणसांवर प्रेम करतो. माणसांप्रमाणे भगवंतही प्रेमाचा भुकेला आहे. प्रेमापोटी त्याला कसल्याही कार्याची, सेवेची लाज वाटत नाही. याची अनेक उदाहरणे आहेत. गोकुळातील ताक पिणारी गवळयांची पोरे भगवंतांनी खूप जवळ केली होती. त्यांच्यासाठी भगवंतांने वाट्टेल ते केले. या गवळयांच्या पोराएवढी भगवंतांनी कोणाचीही सेवा केली नाही. त्याने हे सर्व केवळ नि:स्वार्थ प्रेमापोटी केले. हे स्पष्ट करतांना तुकाराम महाराज म्हणतात,



**येवढा त्याचा छंद देवा । काय सेवा भक्ती ते ।।**

भगवंताला कांही दुष्काळ पडला होता की उपास घडला होता ? त्याने विदुराच्या कन्या का भक्षिल्या? कुब्जादासी अनेक ठिकाणी वाकडी होती, ती दिसायलाही विद्रुप होती. तरीपण भगवंताने तीची सेवा का केली. शबरीच्या उष्टया बोराची किंवा सुदामाच्या कोरडया पोह्याची त्याला प्रचंड किंमत वाटण्याचे कारण काय होते? महाराज म्हणतात की, या सर्व प्रश्नांची उत्तरे ही फक्त प्रेम हे होय. प्रेमासाठी भगवंत भक्तांची कांहीही सेवा करतो. स्वत:चे सर्वस्व, मोठेपण तो विसरुन जातो. त्याला धन-संपत्तीची कमी नाही. त्याला कमी आहे ती फक्त प्रेमाची. मानवी जीवनातही प्रेमाला असेच महत्व आहे. प्रेम मिळाले नाही तर मानवाला जगावे वाटत नाही. प्रेमासाठी अनेक लोक देह त्यागतात. देह त्यागणे चुकीचे आहे. आपणाला प्रेम मिळाले नाही म्हणून देह त्यागणे म्हणजेच स्वत:वर व आपल्या प्रेमावर जगणाऱ्यांवर, आपल्यावर प्रेम करणा-यांवर अन्याय करणे होय. आपणालाही माहिती नसते की, आपल्यावर कोण-कोण प्रेम करीत आहे. कोणी आपल्या स्वभावावर, कोणी वर्तनावर तर कोणी आणखी कशावर प्रेम करीत असते. प्रत्येकाजवळ इतरांना देण्यासारखे कांही तरी असतेच. इतरांना देण्याचा हा गुण प्रेमाची निर्मिती करतो. चांगले वागणाऱ्यांवर प्रेम करणारे कमी नाहीत. कांहींना तर इतरांकडून प्रेम स्विकारण्यास वेळही मिळत नाही. तरीपण लोक एकतर्फी प्रेम करीतच असतात. भगवंतांच्या बाबतीत मात्र असे घडत नाही. लाखों भक्तांनी प्रेम केले तरी तो सर्वांच्या प्रेमाचा स्विकार करतो, आणि तोही सर्वांवर प्रेम करतो. तो कोणाचेही प्रेम स्वत:कडे ठेवून घेत नाही. जेवढे दिले त्यापेक्षा जास्त परत करण्याचा त्याचा स्वभाव आहे. भगवंतावर प्रेम करायचे म्हणजे मानवतेची जोपासणूक करायची असते. प्राणीमात्रांवर नि:स्वार्थ प्रेम करायचे असते. अडी-अडचणीत सापडलेल्यांना मदत करायची असते. सर्वांवरचे प्रेम म्हणजेच भगवंतावरचे प्रेम होय. अशा प्रेमाने जीवनातील आनंदलहरी वाढत जातात. जीवन जगण्याला छानसा अर्थ मिळतो.

**जय जय रामकृष्ण हरी।**

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

| | |
|---|---|
| वार : शनिवार | दिनविशेष - |
| दि. २१ डिसेंबर २०२४ | उत्तरायणारंभ |
| विक्रम संवत् २०८०-८१ | चांगला दिवस |
| शके - १९४६ | ....राहू काल.... |
| संवत्सर - क्रोधी नाम | रविवार : दु.४.३० ते ६.०० |
| मास - मार्गशिर्ष | सोमवार : स. ७.३० ते ९.०० |
| कृ. षष्ठी - (१२.२०) | मंगळवार : दु. ३.०० ते ४.३० |
| ऋतु - वसंत | बुधवार : दु. १२ ते १.३० |
| नक्षत्र - पू.फाल्गुनी (३.१३) | गुरुवार : दु. १.३० ते ३.०० |
| योग - प्रीति (१८.२१) | शुक्रवार : स.१०.३० ते १२ |
| करण - विष्टि (२५.२१) | शनिवार : स. ९ ते १०.३० |

### राशीभविष्य

**मेष :** आपल्या पराक्रमामुळे समाजात व कुटुंबात आपली प्रतिष्ठा वाढणार आहे. मितभाषी राहील्याने आर्थिक फायदा होईल. व्यापारात नवीन प्रस्ताव मिळतील.

**वृषभ :** जीवनसाथीच्या आरोग्याची काळजी घ्या. आर्थिक समस्या येऊ शकते. निरर्थक कामात आज आपला वेळ जाणार आहे. स्थावर मालमत्तेबाबत अडचण येण्याची शक्यता आहे.

**मिथुन :** आपण घेतलेले निर्णय योग्य राहतील. सामाजिक प्रसिद्धी मिळेल. रोजगारात प्रगती राहील. मुलांच्या कामाबल संशय निर्माण होईल.

**कर्क :** केलेल्या कामाचे चीज होईल. आपल्या कलेचे सादरीकरण करण्याची संधी मिळेल. व्यापारत नवीन योजनेची सुरूवात कराल.

**सिंह :** महत्वपूर्ण व्यक्तिंचा संप येईल. व्यापार व्यवसाय चांगला चालेल. कौटुंबिक जीवन आनंदी राहील.

**कन्या :** आपण केलेल्या कामाची सुरूवात चांगली होईल. साहसीवृत्तीत वाढ होण्याची शक्यता आहे. कौटुंबिक समस्या सुटल्यामुळे मन प्रसन्न राहील. आपल्या व्यसनांना आवर घाला.

**तुळ :** जबाबदारीचे कामे वेळेत पूर्ण करण्याचा प्रयत्न करा. व्यापारात नवीन योजनेचा शुभारंभ होण्याचा योग आहे.

**वृश्चिक :** आरोग्य चांगले राहील. आर्थिक योग मध्यम आहेत. व्यापारिक प्रकरणात जबाबदारी वाढणार आहे. आपआपसातील वाद समझदारीने मिटवा. प्रवास करू नका.

**धनु :** आज आपल्या कामात आपल्याला उत्साह वाटणार आहे. बुद्धीचा उपयोग करून पैसा गुंतवणूक करा. कौटुंबिक सम स्येकडे दुर्लक्ष करू नका. सुखकर प्रवास होईल.

**मकर :** मनोधैर्य वाढेल. मुलांच्या प्रगतीमुळे प्रसन्न वातावरण राहणार आहे. नौकरीमध्ये अधिकाऱ्यांचे सहकार्य मिळेल. मागील कामात विशेष यश मिळेल. उतावीळपणा करू नका.

**कुंभ :** चैनी करण्याकडे मन झुकेल. आपल्या कामात बुध्दी चातुर्याचा उपयोग केल्यास फायदा होईल. आरोग्याची काळजी घ्या.

**मीन :** उत्पन्नात वाढ होण्याचे योग आहेत. मित्र, सहकारी यांची मदत मिळेल. व्यावसायिक यश मिळाल्याने आनंदी रहाल.

# अनाधिकृत जाहिरात फलक, होर्डिंग लावणाऱ्यांवर गुन्हे दाखल करावेत

## उपायुक्त आशिष लोकरे यांचे आदेश

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २० डिसेंबर-**

शहरात अनाधिकृत जाहिरात फलक बॅनर होर्डिंग वा तत्सम फलक लावणाऱ्या व्यक्ती वा संस्थावर गुन्हे नोंद करण्याचे आदेश महापालिका उपायुक्त आशिष लोकरे यांनी दिले. दरम्यान, या कामात विलंब, हलगर्जीपणा, निष्काळजीपणा आढळुन आल्यास संबंधितांवर शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल, अशा शब्द सूचनाही यावेळी उपायुक्त लोकरे यांनी दिल्या आहेत.

महानगरपालिका कौन्सिल हॉल येथे उपायुक्त आशिष लोकरे यांच्या अध्यक्षतेखाली सोलापूर म हानगरपलिकेच्या हद्दीतील खाजगी व महानगरपलिकेच्या अनाधिकृत जागेतील होर्डिंग, फ्लेक्स, डिजीटल बोर्ड व ॲडव्र्हटायझिंग बोर्ड निष्कासन याबाबत बैठक पार पडली. या बैठकीत उपायुक्त लोकरे यांनी संबंधित अधिकाऱ्यांना सक्त सुचना व आदेश दिले. महानगरपलिकेचे सहायक आयुक्त शशिकांत भोसले, विधान सल्लागार संध्या भाकरे, तसेच मंडई, भुमी व मालमत्ता कार्यालय आणि अतिक्रमण विभागाचे अधिकारी तसेच विभागीय कार्यालयाकडील सर्व विभागीय अधिकारी, कनिष्ठ अभियंता, मुख्य आरोग्य निरीक्षक, उपस्थित होते.

या बैठकीत अनाधिकृत होर्डिंग्ज, डिजीटल बोर्ड, जाहिराती फलक, एलईडी जाहिरात व इतर अनुषंगीक संरचना या पोलिस विभागकडून ना-हरकत प्रमाणपत्राशिवाय प्रक्षेपित करता येणार नाही. त्यांना विभागीय कार्यालयामार्फत परवानगी देण्यात येणार नाही. अशा सूचना देण्यात आल्या.

शहरातील विनापरवाना होर्डिंगबाबत ज्या त्या विभागाकडील नियुक्त कर्मचाऱ्यांनी पाहणी करुन तसा अहवाल विभागीय अधिकारी यांचेकडे सादर करणे, जाहिरातीचे छापणाऱ्या प्रिंटींग प्रेस यांना जाहिरातीवर जाहिरातीचा परवाना क्रमांक, कालावधी, दिनांक नमुद असणे व त्याचा क्युआर कोड असणे बंधनकारक असल्याबाबत पत्राद्वारे कळविणे, सर्व विभागीय कार्यालयाकडील नियुक्त सेवकांतर्फे धोकादायक स्थितीत असलेल्या होर्डिंगचे अहवाल व कारवाईबाबत विभागीय अधिकारी यांना सादर करणे, सदर कारवाई कामी अडचणी निर्माण झाल्यास संबंधित भागातील पोलिस चौकी, ठाणे अथवा पोलिस आयुक्त कार्यालय यांचेशी संपर्क साधून पुढील कारवाई करणे, होर्डिंग्ज व जाहिरातीचा परवाना देताना नो डिजीटल झोन वगळूनच परवाना देण्याची दक्षता घेणे, सर्व विभागीय कार्यालयानी परवाना नोंद रजिस्टर ठेवणे, तसेच होर्डिंग्ज / जाहिरातीबाबत काही तक्रारी उद्धवल्यास तक्रारी दाखल करणेकामी टोलफ्री नंबर उपलब्ध करुन देणे व अनाधिकृत जाहिरात फलक बॅनर होर्डिंग वा तत्सम फलक लावणाऱ्या व्यक्ती वा संस्थावर गुन्हे नोंद करण्याचे आदेश दिले. प्रस्तुत कामात विलंब, हलगर्जीपणा, निष्काळजीपणा आढळुन आल्यास संबंधितांवर शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल, अशा मार्गदर्शक सुचना उपायुक्त लोकरे यांनी दिल्या.



# ढोल-ताशांच्या गजरात विद्यार्थ्यांचे देखावे

## तपोरत्नं योगीराजेंद्र महास्वामीजींच्या पादुकांची मिरवणूक उत्साहात

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २० डिसेंबर-**

नेताजी सुभाषचंद्र बोस कन्नड भाषा व कन्नड संस्कृती संवर्धक कुंभार समाज शिक्षण प्रसारक मंडळाच्यावतीने श्री बृहन्मठ होटगी मठाचे परमपूज्य गुरुवर्य लिं. श्री. ष. ब्र.तपोरत्नं योगिराजेंद्र शिवाचार्य महास्वामीजी यांच्या सातव्यापुण्यस्मरणानिमित्त शुक्रवारी भक्तीमय वातावरणात मिरवणूक काढण्यात आली.

नेताजी संस्थेच्या अशोक चौकातील कार्यालयात 'श्रीं'च्या , पादुकांचे पूजन श्री व सौ. रुपाली विठ्ठल कुंभार यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी श्री गुरु पादुकास रुद्राभिषेक व सहस्त्र बिल्वार्चन हे विधी पार पडले. त्यानंतर संस्थाध्यक्ष अण्णाराव कुंभार यांच्या नेतृत्वाखाली श्री बृहन्मठ होटगी मठाचे परमपूज्य गुरुवर्य श्री. ष.ब्र. तपोरत्नं योगीराजेंद्र शिवाचार्य महास्वामीजी यांच्या पादुकांची पालखी निलम नगराकडे मार्गस्थ झाली. वाद्याच्या गजरात अशोक चौक, सत्तर फूट रोड, जुना कुंभारी नाका, आकाशवाणी केंद्र, श्रमजीवी नगर, गणेश मंदिर, शरण मठ मार्गे ही मिरवणूक निघाली. नेताजी कनिष्ठ महाविद्यालयाचे लेझीम पथक, राजराजेश्वरी प्राथमिक शाळेचे वेशभूषा सजीव देखावा पथक, राजराजेश्वरी माध्यमिक प्रशालेचे टिपरी, ढोल, लेझीम पथक, नेताजी इंग्लिश मीडियम स्कूल व प्राथमिक शाळेचे वेशभूषा पथक, नेताजी हायस्कूलचे लेझीम व ढोल पथक, बँड पथक, महास्वामीजींचे वेशभूषेतील विद्यार्थ्यांचे पथक, सनई, पुरवंत, महास्वामीजींची सजवलेली पालखी व पादुका, सुवासिनी आरती धारक पथक, कलशधारी पथक, महास्वामीजींची प्रतिमा या क्रमाने मिरवणूक निघाली. आदित्य बिराजदार हा रंभापुरी पीठाच्या जगद्गुरुच्या वेशभूषेत, विजय झिपटे हा उज्जैन पीठाच्या जगद्गुरुच्या वेशभूषेत, सार्थक चिंचोली हा केदार पीठाच्या जगद्गुरुच्या वेशभूषेत, समर्थ बनसोडे हा श्रीशैल पीठाच्या जगद्गुरुच्या वेशभूषेत, सुजय बाळी हा काशी पीठाच्या जगद्गुरुच्या वेशभूषेत, ऐश्वर्या राठोड ही शंकराची वेशभूषेतील सजीव देखाव्यात आकर्षण केंद्र बिंदू होते. नेताजी सुभाषचंद्र बोस हायस्कूलच्या सजीव देखाव्यात शिवशंकराच्या वेशभूषेत प्रथमेश श्रावण तर पार्वतीच्या वेशभूषेत वासंती कोंकत्ती खूप आकर्षक दिसत होते. मिरवणुकीत २५०० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

# विवेकाने वापरल्यास एआय तंत्रज्ञान मानवासाठी वरदान

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २० डिसेंबर-**

नवीन तंत्रज्ञानाला शत्रू न मानता ते समजून घेतले पाहिजे. विवेकाने वापरल्यास जगासमोर नव्याने येत असलेले एआय तंत्रज्ञान मानवासाठी वरदान ठरणार आहे , असे प्रतिपादन डॉ. दीपक शिकारपूर (पुणे) यांनी केले.

महाराष्ट्र साहित्य परिषद शाखा सोलापूर आणि शेठ लोणकरणजी जगन्नाथजी चंडक ट्रस्टतर्फे हिराचंद नेमचंद वाचनालयाच्या ॲम्फी थिएटरमध्ये आयोजित शेठ लोणकरणजी चंडक स्मृती व्याख्यानमालेचे दुसरे पुष्प बुधवारी डॉ. दीपक शिकारपूर यांनी डिजिटल युग : एआय आणि बरच काही या विषयावर

**डॉ. दीपक शिकारपूर : शेठ लोणकरणजी चंडक स्मृती व्याख्यानमाला**




गुंफले. याप्रसंगी व्यासपीठावर डॉ. दीपक शिकारपूर, मसाप सोलापूरच्या अध्यक्षा डॉ. श्रुतीश्री वडगबाळकर, शेठ लोणकरणजी जगन्नाथजी चंडक चॅरिटेबल ट्रस्टचे सचिव डॉ. गिरीष चंडक, विश्वस्त किशोर चंडक, समन्वयक ॲड. जे. जे. कुलकर्णी, मसापचे प्रमुख कार्यवाह डॉ. नरेंद्र काटीकर उपस्थित होते. व्याख्यानमालेचे यंदाचे २८ वे वर्ष आहे. याप्रसंगी डॉ. दीपक शिकारपूर यांच्या डिजिटल युग या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले. तसेच शाल, श्रीफळ, मानपत्र देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला. मसापच्या अध्यक्षा प्रा. डॉ. श्रुतीश्री वडगबाळकर यांनी प्रास्ताविक केले. प्रा. डॉ. नरेंद्र काटीकर यांनी सूत्रसंचालन तर प्रा.भीमगोंडा पाटील यांनी आभार प्रदर्शन केले.

# आदिवासी कोळी समाजाचा २९ डिसेंबरला राज्यस्तरीय वधू-वर मेळावा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २० डिसेंबर-**

येथील बटगेरी सामाजिक प्रतिष्ठान या संस्थेच्या वतीने आदिवासी कोळी समाजाचा १३ वा राज्यस्तरीय वधू-वर परिचय मेळावा रविवार दि. २९ डिसेंबर २०२४ रोजी सकाळी १०.३० ते दुपारी ४ वाजेपर्यंत 'मुळे सभागृह' हरिभाई देवकरण प्रशाला, होम मैदानासमोर, सोलापूर येथे आयोजित केला आहे, अशी माहिती अध्यक्ष शंकर बटगेरी यांनी पत्रकार परिषदेत दिली.

या मेळाव्यास प्रा. डॉ. शरण खानापूरे (कोल्हापूर) तसेच सेवानिवृत्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. भिमाशंकर जमादार प्रमुख पाहुणे उपस्थित राहणार आहेत. या मेळाव्यात कोळी समाजातील सर्व पोट जातीतील वधू-वर, पालक भाग घेणार आहेत. मेळाव्यात प्रथम वधू-वर, घटस्फोटीत, विधवा/विधूर या सर्वांची नाव नोंदणी करण्यात येणार आहे. मेळाव्यासाठी महाराष्ट्रातील तसेच शेजारील विजयपूर, कलबुर्गी, रायचूर, बिदर व हैद्राबाद येथील वधू-वर पालक उपस्थित राहणार आहेत.

या पत्रकार परिषदेत नागनाथ दोरनाळे, महादेव बेळ्ळे, लक्ष्मण कोळी, रेवणसिद्ध कोळी आदींसह पदाधिकारी उपस्थित होते.




# उद्धव बाळासाहेब ठाकरे सेनेकडून सोलापुरात निदर्शने

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २० डिसेंबर-**

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने आज महाराष्ट्रातील सर्व जिल्हा व तालुक्यातील महामानव डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यासमोर निषेध व निदर्शने कार्यक्रम आयोजित केला आहे त्याअंतर्गत सोलापूर शिवसेनेच्या वतीने सकाळी अकरा वाजता डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास अभिवादन करून नंतर निदर्शने करण्यात आली.

ना. अमित शहा माफी मागा अमित शहा यांच्या संसदेतील विधानाचा निषेध व धिक्कार असो अशा घोषणासह पार्क चौक दणाणून सोडला.

भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास सर्व शिवसेनेचे पदाधिकाऱ्यांनी गुलाब पुष्प अर्पण करून संपन्न झालेल्या या आंदोलनात उपजिल्हाप्रमुख प्रताप चव्हाण, दत्ता गणेशकर, शहर प्रमुख महेश धाराशिवकर, उत्तर विधानसभा प्रमुख बाळासाहेब गायकवाड, संघटक प्रकाश चव्हाण, जरगीस मुल्ला, विडी कामगार सेनेच्या श्रीमती पद्मा म्हंता, यंत्रमाग कामगार सेनेचे अजय खांडेकर, उपशहर प्रमुख चंद्रकांत मानवी, दत्ता खलाटे, शिवा ढोकळे, जगदीश कलकेरी, लहू गायकवाड, सुधीर संगेपांग धनराज जानकर, ओंकार चव्हाण, बंटी बेळमकर, विभाग प्रमुख सुरेश जगताप, सुरेश शिंदे, अण्णा गवळी, आबा सावंत, दीपक दळवी, मारुती खानापुरे, राहुल परदेशी, किरण रामटेके,महेश गवळी, कैलास जाधव, आतिश म्हेत्रे, राजू कोत्त, अतुल नागमोडे, उमेश वाघचौरे, राजू पानगावकर, युवासेना उपजिल्हाधिकारी राम वाकसे, युवतीसेना जिल्हाधिकारी पूजा खंदारे आदी उपस्थित होते.

# 'अभाविप' प्रदेश अधिवेशनाचे सोमवारी उद्‌घाटन

## विविध जिल्ह्यांतून येणार १५०० हून अधिक विद्यार्थी कार्यकर्ते; पद्मश्री मिलिंद कांबळे यांच्या हस्ते होणार उद्‌घाटन






**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २० डिसेंबर-**

अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेच्या पश्चिम महाराष्ट्राच्या सोलापुरात होणाऱ्या ५९ व्या प्रदेश अधिवेशनाचे उद्धाटन सोमवारी (दि.२३) सकाळी ११.१५ वाजता पद्मश्री मिलिंद कांबळे यांच्या हस्ते होणार आहे. या कार्यक्रमास अभाविपचे राष्ट्रीय सहसंघटन मंत्री देवदत्त जोशी यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे, अशी माहिती अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेचे प्रदेश सहमंत्री आदित्य मुस्के यांनी शुक्रवारी पत्रकार परिषदेत दिली.

हरीभाई देवकरण प्रशालेच्या प्रांगणात २३, २४ आणि २५ डिसेंबर दरम्यान हे अधिवेशन होणार असून या प्रांगणास पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर नगर असे नाव देण्यात आले आहे. या अधिवेशनात विविध शैक्षणिक व सामाजिक विषयांवरील सत्रांचे आयोजन करण्यात आले आहे. विद्यार्थ्यांना भेडसावणाऱ्या शैक्षणिक समस्या आणि त्यावरील उपाय, शिक्षण क्षेत्रात विद्यार्थ्यांचे योगदान आदी विषयांवर या प्रदेश अधिवेशनात मंथन केले जाणार आहे. तीन दिवसीय अधिवेशनात विविध शैक्षणिक आणि सामाजिक विषयांवर प्रस्ताव पारित करण्यात येणार आहेत. त्यासोबतच नूतन प्रदेश अध्यक्ष आणि प्रदेश मंत्री यांची निर्वाचन प्रक्रिया, 'देव, देश आणि धर्म, 'अभाविप सर्वस्पर्शी सर्वव्यापी काम', 'विकसित भारत २०४७', या विषयांवर भाषण सत्रे, माहितीपर समांतर सत्र, हुनरबाज, सांस्कृतिक कार्यक्रम, भव्य शोभायात्रा व जाहीर सभा आणि नूतन प्रदेश कार्यकारणी घोषणा होणार आहे. हे अधिवेशन निमंत्रित विद्यार्थी, विद्यार्थिनी कार्यकर्त्यांसाठी असून या अधिवेशनास उपस्थित रहावे, असे आवाहन अभाविपचे प्रदेश सहमंत्री आदित्य मुस्के यांनी केले. या पत्रकार परिषदेस प्रदेश अधिवेशन स्वागत समितीचे सचिव सुहास जोशी, महानगरमंत्री यश उडाणशिव, प्रांत जिज्ञासा संयोजक रजनी गायकवाड उपस्थित होते.

# बालकांना कामावर ठेवणाऱ्यांवर गुन्हे, सहा जणांची सुटका

## ऑपरेशन मुस्कान पथकाची कारवाई

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २० डिसेंबर-**

शहर पोलिस आयुक्त कार्यालयाकडून ऑपरेशन मुस्कान ही मोहीम राबवण्यात येत आहे. यामध्ये गुरुवारी दिवसभर शहरातील दुकानाची तपासणी केली आहे. यामध्ये सहा दुकानदारांनी बालकांना कामास ठेवल्याचे आढळून आले. त्या दुकानदारांवर सदर बझार पोलिसांत अल्पवयीन न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) कायदा २०१५ प्रमाणे एकूण ०६ गुन्हे दाखल करुन ०६ बालमजुरांची सुटका केली आहे.

हरवलेल्या बालकांच्या व महिलांच्या संदर्भात ऑपरेशन मुस्कान १३ ही विशेष शोधमोहिम ३१ डिसेबर पर्यंत राबविली जाणार आहे. या मोहिमेसाठी अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्ष सोलापूर शहर व पोलीस ठाणे निहाय पथक तयार केली आहेत. सदर बझार पोलीस स्टेशन मुस्कान पथक यांनी १९ डिसेंबर रोजी शहरात तपासणी केली.यामध्ये हॉटेल मालक, पान दुकान, मटन शॉप, इलेक्ट्रॉनिक दुकान, सोडा गाडी मालकाने बालकामगार म्हणून बालकांना कामावर ठेवून त्याचेकडून कष्टाची कामे करून घेवून त्याची पिळवणूक केल्याचे दिसून आले. ही कामगिरी पोलीस निरिक्षक महादेव राऊत यांचे मार्गदर्शनाखाली पोलिस उपनिरीक्षक संजीवनी वट्टे व अश्विनी काळे, सहा. फौजदार राजेंद्र बंडगर,अलका शिपुरे, अ.सत्तार पटेल, अकिला नदाफ, क्रांती कांबळे यांनी केलेली आहे.

**यांच्यावर गुन्हा नोंद**

रॉयल तंदरी बिर्याणी चालक -जुबरे अहमद महमद साईद शेख, किरणा दुकानदार- नासीर इसाक जमादार, पान दुकानदार जकरीया शफिक सय्यद,पाकीजा मटन स्टॉल -मालक नुरपापामिया आळंदकर, इलेक्ट्रॉनिक दुकानदार भाऊसाहेब बसप्पा हलकट्टी, सोडा गाडी- चालक महमद रफिक नूर कलादगी यांच्यावर सदर बझार पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल झाला.

**ही मोहीम ३१ डिसेंबरपर्यंत**

सर्व नागरिकांना आवाहन संशयीत, बेवारस बालकाबाबत तसेच बाल काम गाराबाबत काही माहिती प्राप्त झाल्यास डायल ११२ चाईल्ड लाईन १०९८ सोलापूर शहर तसेच नियंत्रण कक्ष सोलापूर शहर फोन नंबर ०२१७ -२७४४६०० येथे संपर्क साधून माहिती कळवावी आपली ओळख गोपनीय ठेवण्यात येईल. ऑपरेशन मुस्कान ही मोहीम ३१ डिसेंबरपर्यंत चालेल. आजपर्यंत एकूण ४२ बेपत्ता म हिला, अल्पवयीन लहान मुली ६, मुले ५ यांचा शोध लावला. ८ अल्पवयीन भिक मागणाऱ्या मुलांची सुटका केली. तसेच १२२ बालकामगार यांना बालकल्याण समिती समोर दाखल केले आहे.-

**-राजन माने, सहा पोलिस आयुक्त.**

# जीडीसी ॲण्ड ए आणि सीएचएम परिक्षेचा निकाल जाहीर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि.२० डिसेंबर-**

सहकार विभागामार्फत घेण्यात आलेल्या जीडीसी ॲन्ड ए व सहकारी गृहनिर्माण व्यवस्थापन प्रमाणपत्र परिक्षा २०२४ चा निकाल सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडून घोषीत करण्यात आला असल्याची माहिती सहकारी संस्थाचे जिल्हा उपनिबंधक किरण गायकवाड यांनी दिली.

निकाल https://gdca.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर परिक्षार्थ्यांना लॉगइन व पासवर्ड वापरुन पाहता येईल. तसेच पीडीएफ मध्ये https://sahakarayukata.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर महत्वाचे दुवे मधील जी. डी. सी. ॲन्ड ए मंडळ येथे पहावयास उपलब्ध राहील. तसेच फेरगुण मोजणी करण्यासाठी परीक्षार्थीना दि ५ जानेवारी २०२५ (रात्री २२.३०) पर्यंत वेबसाईटवर परिक्षार्थ्यांना लॉगइन व पासवर्डचा वापर करुन अर्ज करता येईल. फेरगुण मोजणी करण्यासाठी परिक्षार्थी यांनी फेरगुणमोजणी शुल्क भारतीय स्टेट बँकेच्या कोणत्याही शाखेत प्रत्येक विषयासाठी ७५ रुपये अधिक बँक चार्जेस याप्रमाणे चलनाद्वारे भरावे. बँक चलन ऑनलाईन प्राप्त करुन घेण्याची मुदत दिनांक ०५ जानेवारीपर्यंत राहील. सदर चलन बँकेत दिनांक ८ जानेवारी २०२५ पर्यंत या कालावधीत भरणा करावे. विहित तारखेनंतर प्राप्त होणा-या अर्जावर विचार करण्यात येणार नाही.

## संक्षिप्त वृत्त



### जि. प. प्राथमिक उर्दू शाळा मंद्रुपचे केंद्र व बीट क्रीडा स्पर्धेत वर्चस्व

**मंद्रुप, दि. २० डिसेंबर-**

जिल्हा परिषद प्राथमिक उर्दू शाळा मंद्रुपने केंद्र व बीट क्रीडा स्पर्धेत वर्चस्व मिळविले. मंद्रुप जि.प. शाळेतील खो खो मुले संघाने केंद्रावर एकही पराभव स्वीकारला नाही. हैदर अली मुजावर, असद शेख, इलियास शेख, समीर बालाभाई व इतर खेळाडूंनी उपस्थितांची मने जिंकली. बीट स्तरावर झालेल्या खो-खोच्या अंतिम सामन्यात मंद्रुप उर्दू संघाने आपले अप्रतिम प्रदर्शन करून प्रथम क्रमांक मिळविला. या विद्यार्थ्यांना क्रीडा प्रशिक्षक अख्तर शेख व मेहमूद नवाज, बदुनिस्सा सगरी यांनी मार्गदर्शन केले. त्यांचे मुख्याध्यापिका जहाँआरा तांबोळी, शिक्षिका फरझाना सय्यद, सुमैया शेख व शाळा व्यवस्थापन अध्यक्ष रसूल शि कलगर, सदस्य इलियास शेख यांनी अभिनंदन केले. कामगिरी : बीट स्पर्धा : खोखो मोठा गट मुले (प्रथम), लंगडी मोठा गट मुले (द्वितीय). केंद्र स्पर्धा : खो-खो मुले मोठा गट (प्रथम), लंगडी मुले मोठा गट (प्रथम), खोखो मुली मोठा गट (प्रथम), लंगडी मुली मोठा गट (द्वितीय), कबड्डी मुली मोठा गट (द्वितीय). वैयक्तिक : बुद्धिबळ: इलियास शेख व कौसर उस्ताद (द्वितीय).

### स्वामी कृपेमुळे नाट्य करिअरचा अल्पावधीतच मोठा विस्तार : बुगडे

**अक्कलकोट, दि.२० डिसेंबर-**

येथील श्री वटवृक्ष स्वामी समर्थांची महिमा अपार असून आम्ही सर्व छोट्या पडद्यावरील कलाकार मंडळी स्वामी समर्थांचे निस्सिम भक्त आहोत. श्री स्वामी समर्थांच्या कृपेमुळे मात्र रसिकांच्या औदार्यामुळे आम्हा कलाकारांच्या नाट्य करिअरचे अल्पावधीत मोठे विस्तार होऊन संपूर्ण राज्यातील रसिकांनी आमच्या कलेस वाव देत आहेत. स्वामी कृपेमुळेच आमच्या नाट्य करिअरचा अल्पावधीत मोठा विस्तार झाल्याचे



मनोगत छोट्या पडद्यावरील मराठी नाटक कलाकार चला हवा येवू द्या फेम श्रेया बुगडे यांनी व्यक्त केले. स्वामी समर्थांच्या दर्शनाकरिता अक्कलकोट वटवृक्ष मंदिरात आले असता त्या बोलत होत्या. याप्रसंगी वटवृक्ष मंदिर समितीच्या वतीने समितीचे चेअरमन महेश इंगळे यांनी श्रेया बुगडे यांचा श्रींचे कृपावस्त्र, प्रसाद, प्रतिमा देवून यथोचित सत्कार केला. यावेळी प्रथमेश इंगळे, मंदिर समितीचे सचिव आत्माराम घाटगे, विश्वस्त महेश गोगी, प्रविण देशमुख, दर्शन घाटगे, श्रीशैल गवंडी, स्वामीनाथ लोणारी, प्रसाद सोनार, गिरीश पवार, सागर गोंडाळ इत्यादी उपस्थित होते.

### अवैध वाळू वाहतुकीवर कारवाई दोन टिप्पर, एक पिकअप जीप जप्त

**पंढरपूर, दि. २० डिसेंबर-**

अवैध गौण खनिज उत्खनन व वाहतूकी विरोधात पंढरपूरच्या महसूल विभागाने धडक मोहीम हाती घेतली आहे. तालुक्यात महसूल विभागाच्या भरारी पथकाव्दारे गोपाळपूर (ता.पंढरपूर) येथील भीमा नदीपात्रात अवैध वाळू उत्खनन व वाहतुक करण्यासाठी वापरण्यात येणारे दोन टिपर व एक पिक अप जीप अशी तीन वाहने जप्त करण्यात आली असल्याची माहिती तहसिलदार सचिन लंगुटे यांनी दिली. पंढरपूर तालुक्यातील अवैध गौण खनिज उत्खनन रोखण्यासह वाळूची अवैध वाहतूक करणाऱ्यांच्या विरोधात कारवाई करण्यासाठी प्रांताधिकारी सचिन इतापे व तहसिलदार सचिन लंगुटे यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली. १९ डिसेंबर २०२४ रोजी गोपाळपूर येथील भीमा नदी पात्रात अवैध वाळू वाहतुक करण्यासाठी वापरण्यात येणारे दोन टिपर व एक पिक अप जीप अशी तीन वाहने जप्त करण्यात आली असून, सदर वाहने शासकीय धान्य गोदाम पंढरपूर येथे लावण्यात आली आहेत. या भरारी पथकात मंडळ अधिकारी विजय शिवशरण, राजेंद्र वाघमारे, पंकज राठोड, ग्राम महसूल अधिकारी साईनाथ अडगाळे, पियुष भोसले, प्रमोद खंडागळे, महेश सावंत, गणेश पिसे, संजय खंडागळे, समीर पटेल, मंगेश बनसोडे, रविकिरण लोखंडे, पी. पी. कोईडे, आर. बी. खंदारे व पंढरपूर तालुका ग्रामीण पोलीस स्टेशनचे अधिकारी सहभागी होते.



### सुर्वे बंधूंचे शैक्षणिक कार्य आदर्शवत : देशमुख

**मोडनिंब, दि. २० डिसेंबर-**

महाराष्ट्र राज्य शाळा कृती समितीच्या वतीने जिल्हास्तरीय कृतीशील शिक्षक पुरस्कार मिळाल्याबद्दल संगन बसवेश्वर शिवयोगी कन्या प्रशाला मोडनिंब येथील शिक्षक शेखर सुर्वे व आर. आर. पाटील विद्यालय, पेनूर येथील शिक्षक सतिश सुर्वे यांना मिळाल्याबद्दल त्यांचा मराठा सेवा संघ व संभाजी ब्रिगेड माढा तालुक्याच्या वतीने मोडनिंब (ता. माढा) येथे जिजाऊ प्रतिमा व पुरुषोत्तम खेडेकर लिखित शिवचरित्र पुस्तक भेट देऊन सत्कार करण्यात आला. निलेश देशमुख यांनी शेखर सुर्वे व सतिश सुर्वे यांनी शिक्षक म्हणून काम करत असतानाचा सकारात्मक दृष्टिकोन, नेहमीच विद्यार्थी हित समोर ठेवून केलेले अध्यापनाचे कार्य आदर्शवत असल्याचे सांगितले.यावेळी मराठा सेवा संघाचे तालुकाध्यक्ष निलेश देशमुख,तालुका उपाध्यक्ष अरुण जगताप, मोडनिंब वाहतूक शाखेचे उपनिरीक्षक किरण अवताडे, रामेश्वर पवार, शिवसेनेचे दीपक सुर्वे, संभाजी ब्रिगेडचे तालुका कार्याध्यक्ष बाळासाहेब वागज, शंकर नागणे, शशिकांत गिड्डे, उद्योजक सुधीर सुर्वे, देविदास मुळीक, देविदास परबत, किरण शिंदे आदी उपस्थित होते.

# बांधकाम पूर्ण; प्रवेशाला मुहूर्त मिळेना

### वैराग पोलिस ठाण्याचा कारभार जुन्याच इमारतीमधून; अधिकारी, कर्मचाऱ्यांसह नागरिकांनाही नव्या ठाण्याची उत्सुकता



**तभा वृत्तसेवा,**
**वैराग, दि.२० डिसेंबर-**

बार्शी तालुक्यातील सर्वात महत्वाचे असलेले वैराग पोलीस ठाणे इमारतीच्या बाबतीत अनेक वर्षांपासून दुर्लक्षितच राहिलेले होते. इमारतीसाठी अनेकवेळा शासनाकडे मागणी देखील करण्यात आलेली होती. मागणीची दखल घेत शासनाने सुमारे ४ कोटी ८९ लाख रुपये खर्चून सुसज्ज अशी नवीन पोलीस स्टेशनची इमारत उभी केली आहे. सध्या इमारत बांधून तयार असताना देखील पोलीस ठाण्याचा कारभार जुन्याच इमारतीतून सुरू आहे. दुसरीकडे पांगरी पोलीस ठाण्याची देखील नवीन इमारत तयार झाली असून त्यांचा कारभार नवीन इमारतीतून सुरू झाला आहे. मात्र वैरागमध्ये तसे नाही. त्यामुळे वैराग पोलीस ठाण्याचे नवीन इमारतीमध्ये हस्तांतरण कधी होते याकडे लक्ष लागून राहिले आहे.

वैराग पोलीस ठाण्याची इमारत ७० वर्षांपूर्वी जुनी आहे. त्यात जागाही अपुरी पडत असल्यामुळे अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना एकत्रित बैठकसुद्धा घेता येत नाही. त्यामुळे लोकसंख्या वाढीच्या प्रमाणात वैराग पोलीस ठाण्याकरिता राज्य शासनाच्या गृहमंत्रालयाच्या वतीने नवीन इमारत ९ मे २०२३ रोजी प्रत्यक्ष कामाला सुरवात करण्याचे आदेश दिले होते. नवीन इमारत उभारणीसाठी १२ महिन्यांचा अवधी देण्यात आला होता. त्यामुळे ही इमारत ८ मे २०२४ रोजी पूर्ण होणे क्रमप्राप्त होते. मात्र इमारतीचे काम पूर्ण होण्यास दोन ते तीन महिने ज्यादा कालावधी लागला तरी देखील डिसेंबर २०२४ मध्ये ही इमारत बांधून तयार झाली आहे. सर्व सोयीनुयुक्त सुसज्ज आणि यांत्रिकदृष्ट्या सक्षम बनवण्यात शासनाने कुठेही कसर ठेवलेली नाही. इमारत पूर्ण झालेली असतानादेखील अद्याप उद्घाटन करण्यात आलेले नाही. त्यामुळे येत्या नव्या वर्षात नवीन इमारतीचे उद्घाटन होऊ शकते. या इमारतीचे भूमिपूजन तत्कालीन पोलीस अधीक्षक शिरीष देशपांडे यांच्या शुभहस्ते करण्यात आले होते. या इमारतीकरिता सुमारे ४ कोटी ८९ लाख रुपये खर्च करण्यात आले आहेत. यामध्ये ११११.५५ चौमीचे आरसीसी फ्रेम स्ट्रक्चर, (तळ+पहिला मजला) फर्निचर इंटेरिअर वर्क, इलेक्ट्रिकल वर्क, फायर-फायटिंग वर्क, कंपाऊंड वॉल, सोलर वर्क आदींचा समावेश आहे. नवीन पोलीस ठाण्याच्या इमारतीमध्ये स्वागत कक्ष, पुरुष विश्राम कक्ष, स्त्री विश्राम कक्ष, मिटिंग हॉल, अपंगांसाठी शौचालय, प्रत्येक अधिकाऱ्यास स्वतंत्र कक्ष, सीसीटीएनएस कक्ष, पासपोर्ट विभाग, पिण्यासाठी स्वच्छ पाणी अशा विविध कक्षांची निर्मिती करण्यात आली असून दोन मजली सुसज्ज इमारत उभी करण्यात आली असून प्रत्येक कानाकोपऱ्यावरती आणि इमारतीच्या मुख्य ठिकाणांवरती सीसीटीव्ही बसवण्यात आलेले आहेत.

> नवीन वर्षामध्ये बार्शी तालुक्यातील वैराग, पांगरी आणि तालुका पोलीस ठाणे अशा तिन्ही नवीन इमारतींचे उद्घाटन करण्यात येईल.
>
> -जालिंदर नालकुल,
> उपविभागीय पोलीस अधिकारी

> वैराग पोलीस ठाण्याची इमारत बांधून तयार झाली आहे. लवकरच वरून आदेश मिळताच आम्ही नवीन इमारतीमध्ये स्थानांतरण करू.
>
> -नवृत्ती मोरे,
> पोलीस निरीक्षक, वैराग पोलीस ठाणे



## परितेच्या अभिनव स्कूलची बँक, पोस्ट, मंदिराला क्षेत्रभेट

**तभा वृत्तसेवा,**
**टेंभुर्णी, दि. २० डिसेंबर-**

परिते (ता. माढा) येथील अभिनव पब्लिक स्कूल अँड ज्युनिअर कॉलेजच्या प्राथमिक विभागाने गावातील सोलापूर जिल्हा मध्यवर्ती बँक, पोस्ट ऑफिस व ग्रामदैवत या ठिकाणी भेट देऊन गावातील अर्थव्यवस्था, शैक्षणिक कामकाज, ग्रामपंचायतीचे कामकाज, धार्मिक परंपरा कशा जपल्या जातात. संस्थापक राजेश शेळके यांच्या मार्गदर्शनाखाली मुलांना क्षेत्रभेटीतून देण्यात आली. गावातील नागरिक, शेतकरी, व्यावसायिक व नोकरदार वर्गातील लोकांचे बँकिंग व्यवहार कशाप्रकारे केले जातात. याप्रसंगी विद्यार्थ्यांनी स्वतः विड्रॉल भरून व डिपॉझिट रिसीट भरून प्रात्यक्षिकाद्वारे स्वतः अनुभव घेतला. शाखा व्यवस्थापक हनुमंत लामकाने यांनी मुलांना माहिती दिली. प्रत्येक विद्यार्थ्यांना आपल्या पालकांकडून बँकेमध्ये खाते काढून मासिक बचत करण्याचा सल्ला दिला. परिते येथील पोस्ट ऑफिसला भेट देऊन पत्रव्यवहार कसा चालतो हे प्रत्यक्ष पाहिले. यावेळी पोस्टमास्टर तांबोळी व पोस्टमन नागनाथ पावसे यांनी आपण लिहिलेले पत्र कशाप्रकारे पुढे जाऊन सॉर्टिंग होते व इच्छित स्थळी पोहोचते याबद्दल माहिती दिली. आपली ग्रामीण संस्कृती कशी जतन केली जाते. गावचे ग्रामदैवत या मंदिराचा इतिहास काय आहे, याबाबतची माहिती गावकऱ्यांनी मुलांना दिली. यावेळी संस्थापक राजेश शेळके, मुख्याध्यापिका रुपाली शेळके, पर्यावरण शास्त्र विभाग प्रमुख सोनाली सरडे व मनीषा नागणे विद्यार्थी व पालक उपस्थित होते.

## स्थानिक भूजल समस्या, व्यवस्थापनावर विद्यामंदिरमध्ये प्रशिक्षण

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. २० डिसेंबर-**

भारत सरकार जलशक्ती मंत्रालय, जलसंपदा नदी विकास व गंगा पुनरुज्जीवन विभाग केंद्रीय भूजल मंडळ, नागपूर यांचेकडून माझा युवा भारत कार्यक्रम अंतर्गत एक दिवस प्रशिक्षण कार्यक्रमात स्थानिक भूजल समस्या व भूजल व्यवस्थापन याविषयी सांगोला विद्यामंदिर प्रशाला व ज्यु. कॉलेज येथे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले.



प्रशिक्षण उद्घाटन प्रसंगी सां. ता. शि. प्र. मंडळाचे अध्यक्ष प्रा. प्रबुद्धचंद्र झपके, भूजल शास्त्रज्ञ जी. एस. लोंढे, भू भौतिक शास्त्रज्ञ एस. एस. पुरती, प्राचार्य अमोल गायकवाड, उपमुख्याध्यापिका शहिदा सय्यद, उपप्राचार्य प्रकाश म्हमाणे, प्रशिक्षण व्याख्याते भूजल शास्त्रज्ञ अमरनाथ, उज्वलकुमार, दिलीपकुमार मीना उपस्थित होते.

यावेळी प्रा. प्रबुद्धचंद्र झपके यांनी आपण सर्व शेती संस्कृतीशी निगडित आहे. त्यामुळे प्रत्येकाचा जिव्हाळ्याचा विषय पाणी यासंदर्भात जलशक्ती मंत्रालय भारत सरकारकडून सांगोला विद्यामंदिरची निवड करून यासंदर्भात भूजल समस्या व भूजल व्यवस्थापन याविषयी प्रशिक्षणमध्ये मिळणारे अनमोल मार्गदर्शन महत्त्वपूर्ण आहे असे सांगत प्रशिक्षण विषयाच्या संदर्भात विद्यार्थ्यांमध्ये सजगता निर्माण केली व आयोजकांचे कौतुक केले. अमोल गायकवाड यांनी पाणी प्रश्न महत्त्वाचा असून या प्रशिक्षणातून यासंबंधीचे विचार विद्यार्थी आत्मसात करून आपल्या कुटुंबीयांमध्ये व गावामध्ये मांडतील व त्यातून या प्रशिक्षणाचा हेतू साध्य होईल असा विश्वास व्यक्त केला.

प्रशिक्षणामध्ये उज्वलकुमार यांनी बेसीक हायड्रोजियोलॉजी, अमरनाथ यांनी सांगोला तालुक्यातील जल उपलब्धता, व्यवस्थापन आणि संवर्धनाची जलविज्ञान स्थिती व महाराष्ट्र जलव्यवस्थापन म निटरिंग हायड्रोलॉजी व दिलीपकुमार यांनी एक्सप्लोरेशनमधील जिओफिजिकल सर्वेक्षण या संदर्भात अनमोल मार्गदर्शन केले. सूत्रसंचालन प्रा. धनाजी चव्हाण यांनी केले.

## विद्यार्थ्यांच्या सर्व कलागुणांना वाव मिळतो

### संस्था सचिव पटवर्धन : द. ह. कवठेकर प्रशालेत पालक सहविचार सभा

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. २० डिसेंबर-**

येथील प्रसिद्ध द.ह. कवठेकर प्रशालेत मंगळवारी पालक सहविचार सभा संपन्न झाली. या सभेमध्ये विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाबाबत बऱ्याच तज्ञ मार्गदर्शकांनी मार्गदर्शन केले.

सध्याच्या काळात विद्यार्थी फक्त परीक्षार्थी न बनता अष्टपैलू विद्यार्थी बनवा यासाठी द.ह.कवठेकर प्रशाला नेहमीच प्रयत्न करते.यावर्षी तर प्रशालेत संगीत विषयक सुद्धा क्लास सुरू झालेले आहेत. त्याबरोबरच किमान कौशल्य विकसित चे कोर्सेसही द.ह.कवठेकर प्रशालेत सुरू करण्यात आले आहेत अशी माहिती संस्थेचे सचिव सुधार पटवर्धन यांनी दिली.

कार्यक्रमाच्या सुरवातीला सर्व अभ्यागतांचे स्वागत व प्रास्ताविक जेष्ठ शिक्षक आर. एस. कुलकर्णी यांनी केले. प्रास्ताविकात त्यांनी पालक शिक्षक संघाच्या कार्याचे महत्त्व वर्णन केले. प्रशालेचे कर्तव्यदक्ष आदर्श मुख्याध्यापक व्ही.एम. कुलकर्णी यांनी प्रशालेत झालेल्या सर्व सुधारणा पालकांसमोर सांगून भविष्यातल्या योजना देखील व्यवस्थित मांडल्या. सर्व विद्यार्थी उपयोगी योजना राबवण्यासाठी पालक बंधूंना ही शारीरिकबरोबर आर्थिक म दतही करण्याचे आव्हान केले. विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास हेच प्रमुख ध्येय असल्याचे मुख्याध्यापक यांनी सांगितले. पालक शिक्षक संघांचे उपाध्यक्ष वगरे व शिंदे यांनी प्रशालेस सर्वतोपरी मदत करण्याचे आश्वासन दिले. शालेय व्यवस्थापनाच्या उपाध्यक्ष दिपाली सतपाल यांनीही प्रशालेच्या सर्व उपक्रमांना मदत करण्याचे आवाहन पालक वर्गाला केले. पालक वर्गातून ज्या सूचना आल्या त्याची अंमलबजावणी करण्याची खात्री मुख्याध्यापक कुलकर्णी यांनी दिली. आभार प्रदर्शन प्रशालेचे उपमुख्याध्यापक रुपनर यांनी केले. पालक शिक्षक संघाच्या सहसचिवा सीमा कुलकर्णी यांनी विद्यार्थी हिताच्या सर्व योजना राबवण्यास प्राधान्य देण्याची सांगितले. या कार्यक्रमासाठी पालक वर्ग मोठ्या प्रमाणात हजर होते.

## माढ्याच्या शौर्य रोंगचे डॉ. होमी भाभा बाल वैज्ञानिक स्पर्धेत उत्तुंग यश

**तभा वृत्तसेवा,**
**माढा, दि. २० डिसेंबर-**

माढा येथील सहकार महर्षी गणपतराव साठे जिल्हा परिषद प्रशालेचा इयत्ता सहावी मधील विद्यार्थी शौर्य अजितसिंह रोंगे याने डॉ. होमी भाभा बाल वैज्ञानिक स्पर्धेत इयत्ता सहावीच्या गटामध्ये उत्तुंग यश प्राप्त केलेले आहे.

ग्रेटर बॉम्बे सायन्स टीचर असोसिएशन, मुंबई यांच्या वतीने बालवैज्ञानिक स्पर्धा घेतली जाते. लेखी व प्रात्यक्षिक अशा स्वरूपाची ही परीक्षा दोन लेव्हलवर घेतली जाते. महाराष्ट्रातील अनेक परीक्षा प्रकारापैकी सर्वात जास्त काठीण्य पातळी असणाऱ्या या परीक्षेत त्याने लेखी परीक्षेत सुयश संपादन केलेले असून त्याची प्रात्यक्षिक परीक्षेसाठी निवड झालेली आहे. त्याला वडील अजितसिंह रोंगे, आई प्रगती पाटील-रोंगे व वर्गशिक्षिका साधना जगताप यांचे मार्गदर्शन लाभले. शौर्य याने यापूर्वी पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा (इयत्ता पाचवी), सायन्स ऑलिंपियाड स्पर्धा परीक्षेमध्ये स्पेशल प्राईज, इस्रो शैक्षणिक सहलीसाठी निवड, त्याचबरोबर सैनिकी स्कूल चंद्रपूर व कारीकिली (आंध्र प्रदेश), सैनिक स्कूल कपुरताळा (पंजाब) यासाठी निवड अशी विविध स्पर्धा परीक्षांमध्ये उत्कृष्ट कामगिरी करत सुयश संपादन केलेले आहे.



त्याच्या या यशाबद्दल माढा व परिसरात त्याचे कौतुक केले जात आहे. तसेच शिक्षणाधिकारी (प्राथमिक) चे कादर शेख, गटविकास अधिकारी महेश सुळे, गटशिक्षणाधिकारी विकास यादव, माढ्याच्या नगराध्यक्ष ॲड. मिनलताई साठे, प्रशालेचे मुख्याध्यापक नागेश खेडकर, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष धैर्यशील भांगे, उपाध्यक्षा माधुरीताई साठे व सर्व सदस्य, सर्व शिक्षक स्टाफ यांनी अभिनंदन केलेले आहे.

## आ. डॉ. बाबासाहेब देशमुखांनी उठवला प्रलंबित कामांवर आवाज

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. २० डिसेंबर-**

आ. डॉ. बाबासाहेब देशमुख यांनी विधानसभेत सांगोला तालुक्यातील प्रलंबित विकास कामांवर आवाज उठवत सामाजिक व सर्वसामान्य जनतेच्या जिव्हाळ्याचे प्रश्न मांडले.

अरबी समुद्रात छत्रपती शिवाजी महाराज यांचे आंतरराष्ट्रीय स्मारक बांधण्यासाठी १३ विभागांनी ना हरकतप्रमाण पत्र दिले असून त्याचे भूमीपूजनही झाले आहे. परंतु या स्मारकाची उभारणी करण्यासंबंधी राज्यपालांच्या अभिभाषणात उल्लेख नसल्याचे तसेच शेतकरी कामगार पक्षाच्या माध्यमातून सांगोला मतदारसंघाचे ११ वेळचे आ. स्व.गणपतराव देशमुख यांचे स्मारक विधीमंडळाच्या आवारात उभारण्याची मागणी अनेक लोकप्रतिनिधींनी केली. यामध्ये मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही मागणी केली होती अशी आठवणदेखील आ. डॉ. देशमुख यांनी सभागृहात सांगितली.



मागच्या ५ वर्षामध्ये लोणारी समाज, होलार समाज, रामोशी समाज आर्थिक विकास महामंडळाची घोषणा झाली. या महामंडळांना लवकरात लवकर निधी वर्ग करुन या समाजांना दिलासा देवून आर्थिक सहकार्य करावे, सांगोला शहरात ट्रामा केअर उभे केले आहे. ते ट्रामा केअर लवकरात लवकर सुरु करा, त्याचप्रमाणे सांगोला तालुक्यात आरोग्य विभागात अपुरा कर्मचारी वर्ग असल्याने आरोग्य सेवा मिळण्यात अडथळे येत आहेत आरोग्य केंद्रातील रिक्त पदे लवकरात लवकर भरावीत, अशीही मागणी आ. डॉ. देशमुख यांनी केली.

## वडशिवणेचे सुपुत्र डॉ. भगवंत पवार एमबीबीएसमध्ये गोल्ड मेडलचे मानकरी

**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा, दि. २० डिसेंबर-**

करमाळा तालुक्यातील वडशिवणेचे भगवंत पवार यांनी एमबीबीएस परीक्षेत विशेष प्रावीण्य मिळवत उत्तीर्ण झाले आहेत. त्यांची फायनल परीक्षा डिसेंबर २०२४ मध्ये पार पडल्या असून त्याचा रिझल्ट १९ डिसेंबर रोजी आलेला आहे फायनल परीक्षेमध्ये डॉ. भगवंत यांनी सर्व विषयांमध्ये विशेष प्राविण्य मिळवत जनरल सर्जरी विषयांमध्ये गोल्ड मेडल मिळवले आहे.

डॉ. भगवंत पवार यांचे प्राथमिक व माध्यमिक शिक्षण वडशिवणे तालुका करमाळा येथे मराठी माध्यमातून झाले असून गावातील प्राथमिक व माध्यमिक शाळेच्या स्थापनेपासूनचा ते पहिला डॉक्टर विद्यार्थी ठरले आहेत. दहावी मध्ये त्यांनी ९५.२० टक्के गुण मिळवले आहेत. अकरावी बारावी सायन्स सोनवणे कॉलेज उरूळगाव येथे झाले आहे बारावी बोर्ड मध्ये ९१.२३ टक्के गुण मिळवून त्यानंतर वैद्यकीय प्रवेश परीक्षा नीट २०२० मध्ये पहिल्याच प्रयत्नामध्ये ६४५ गुण मिळवून ते एम्स हैदराबाद या ठिकाणी प्रवेश पात्र ठरले एमबीबीएसच्या पहिल्या वर्षात तीन गोल्ड मेडल मिळवले दुसऱ्या वर्षी ब्रॉंझ मेडल मिळवत शेवटच्या फायनल परीक्षेमध्ये सर्व विषयांमध्ये विशेष प्राविण्य मिळवत जनरल सर्जरी या विषयांमध्ये गोल्ड मेडलचे मानकरी ठरले. वैद्यकीय शिक्षण चालू असताना मध्यंतरी वेल्लोर (तामिळनाडू), चेंगलपट्टू (तामिळनाडू), एम्स भोपाळ (मध्य प्रदेश), एम्स भुवनेश्वर (ओरिसा), कानपूर (उत्तर प्रदेश) या पाच ठिकाणी कॉलेजतर्फे स्पर्धेसाठी उपस्थित राहून प्रथम क्रमांक मिळवत यश संपादन केले. नोव्हेंबर २०२४ मध्ये कानपूर येथे बालरोग शास्त्र (पीडियाट्रिक्स) या विषयात पाच राज्यांच्या झोनलमधून ते प्रथम आलेले आहेत.



> ### केंद्र सरकारकडून शिष्यवृत्ती
>
> शैक्षणिकदृष्ट्या मागास अशा वडशिवण सारख्या छोट्याशा गावामध्ये मराठी माध्यमातून शिक्षण घेत उच्च प्रतीचे यश मिळवण्याचे काम भगवंत पवार यांनी केलेले आहे. विशेष म्हणजे गुणवत्ता असेल तर शिक्षणासाठी पैसा लागत नाही हे भगवंत यांनी दाखवून दिलेले आहे त्यांच्या संपूर्ण एमबीबीएसच्या शिक्षणाची फी हॉस्टेलसह केवळ ५८५६ रुपये होती. त्यांना गुणवत्तेमुळे ओएनजीसी या केंद्र सरकारच्या कंपनीतर्फे प्रतिवर्ष ४८ हजार रुपये शिष्यवृत्ती मिळाली. त्यांचे एकूण शिक्षणच मोफत झाले.

आपला जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

# अक्कलकोटमध्ये सहा बटूंवर उपनयन संस्कार

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि.२० डिसेंबर-**

अक्कलकोट शहर व तालुका गुरव समाज मंडळ व श्री मल्लिकार्जुन गुरव समाज संस्था, मुंढेवाडी यांच्या संयुक्त विद्यमाने सहा बटूंचे मोफत सामुदायिक उपनयान सोहळा पार पडला.

यावेळी हभप काशिनाथ गुरव महाराज, धर्मगुरू रमेश स्वामी, गुरव समाज मंडळ अध्यक्ष शिवानंद फुलारी, तात्याराव पाटील, एकनाथ पाटील, संस्थाध्यक्ष उद्धवराव पाटील, सवीता गुरव, गोपाल पाटील, बंटी पाटील, अश्विनी गुरव, सोनाली हुगार, योगिता पाटील, श्रेया पाटील, बापू पाटील, अप्पू नागरसे, विद्याधर गुरव, रमेश फुलारी, प्रशांत गुरव, स्वामींनाथ गुरव, बसवराज फुलारी, सुरेश बालगाव, श्रीधर गुरव, वेदेश गुरव, करुणा गुरव, रोहिणी फुलारी, राणी पाटील, श्रुती पाटील यांनी परिश्रम घेतले. संकेत पाटील, शिवानंद गुरव, तुषार पुजारी, श्रेयश पुजारी, निखिल अवटे, निशांत अवटे या सहा बटूंवर उपनयन संस्कार करण्यात आले.





## संक्षिप्त वृत्त...



### टॅलेंट हंट स्पर्धेत शेळगाव शाळेचे यश

**वैराग, दि. २० डिसेंबर-**

सोलापूर जिल्हा परिषद, पंचायत समिती बार्शी अंतर्गत आयोजित टॅलेंट हंट क्रीडा स्पर्धेत पहिली ते पाचवी या लहान गटात क्रीडा प्रकारात शेळगाव शाळेने बार्शी तालुक्यात सर्वाधिक बक्षीसे मिळवून प्रथम क्रमांक पटकावला. लहान गट वैयक्तिक बुद्धीबळ स्पर्धेत राजवीर रवींद्र गवळी तालुक्यात पहिला आला. निंबधलेखन स्पर्धेत युवराज सज्जन गायकवाड या विद्यार्थ्यांचा तालुक्यात पहिला क्रमांक आला. वक्तृत्व स्पर्धेत सीफा रमजान शेख या विद्यार्थ्यांनीचा तालुक्यात प्रथम क्रमांक आला. १०० मी. धावणे या स्पर्धेत श्लोक सूर्यकांत निचळ या विद्यार्थ्यांचा तालुक्यात दुसरा आला. १०० मी. व २०० मी. धावणे या दोन्ही प्रकारात उत्कर्षा दत्तात्रय गवळीचा तालुक्यात दुसरा क्रमांक आला. सांघिक खेळात शेळगाव शाळेच्या कबड्डी संघाने तालुक्यात प्रथम क्रमांक पटकावला. विविध प्रकारात तालुक्यात सर्वाधिक बक्षीसे मिळवणाऱ्या शेळगाव शाळेचे गटशिक्षणाधिकारी बालाजी नाटके, केंद्रप्रमुख धनाजी जाधवर, ज्ञानेश्वर जाधव, दिपक कापसे आदिंनी अभिनंदन केले. स्पर्धेत यशस्वी होण्यासाठी वर्गशिक्षक वैशाली नावगुडे, रुपाली बिडवे, मुख्याध्यापक शैलजा उकिरडे, दीपक शेळके, दत्तात्रय सावंत, अमिता क्षीरसागर, स्वाती चव्हाण, पल्लवी भालशंकर यांनी मार्गदर्शन केले.



### सांगोला रोटरीतर्फे पेन्शनर्स डे साजरा

**सांगोला, दि. २० डिसेंबर-**

दि.१७ डिसेंबर रोजी पेन्शनर्स डेचे औचित्य साधून सांगोला रोटरी क्लबने क्लब मधील पेन्शनर सदस्य इंजि. विकास देशपांडे, महादेव बोराळकर, प्रा. राजेंद्र ठोंबरे, नीलकंठ लिंगे, माणिक भोसले, डॉ. मच्छींद्र सोनलकर, कमले यांचा सत्कार केला. यावेळी निसार इनाम दार, कोळेकर, श्रीपती आदलिंगे, महेश गवळी उपस्थित होते. यावेळी प्रा. राजेंद्र ठोंबरे यांनी या दिवसाचे महत्त्व सांगून पेन्शन साठी लढा देणारे डी. एस. नाकारा यांच्याविषयी कृतज्ञता व्यक्त केली. माणिक भोसले यांनी पेन्शनर लोकांनी सामाजिक बांधिलकी जपणे गरजेचे आहे. आपल्या मिळकती मधील काही भाग समाजासाठी दिला पाहिजे असे सांगितले. आभार इंजि. विलास बिले यांनी मानले.



### गुरसाळे शाळेच्या मुलींच्या गटाचा तालुकास्तरीय कबड्डी स्पर्धेत प्रथम क्रमांक

**नातेपुते, दि. २० डिसेंबर-**

२०२४ रोजी लवंग सेक्शन येथे झालेल्या तालुकास्तरीय जिल्हा परिषद शाळेच्या कबड्डी स्पर्धेत जिल्हा परिषद प्राथमिक शाळा गुरसाळे येथील मुलींच्या मोठया गटातील संघाने अत्यंत चुरशीचा खेळ दाखवून तालुक्यात प्रथम क्रमांक पटकावला. सर्व खेळाडू मुलींचे, शिक्षक व मार्गदर्शक यांचे तालुक्याचे गटशिक्षणाधिकारी प्रदिप करडे, शिक्षण विस्ताराधिकारी सुषमा महामुनी केंद्र प्रमुख मधुकर वनसाळे व शाळा व्यवस्थापन समिती यांनी अभिनंदन केले. गुरसाळे शाळेतील शिक्षक चंद्रशेखर शिवगुंडे, रियाज तांबोळी, विजय साळवे, प्रमोद भोसले, मनिषा शिवगुंडे-बळे, माया काटे-साळवे, लता मोरे, मुख्याध्यापक भारत आतार यांनी अभिनंदन केले.

### वळसंगमध्ये बाबानगरे परिवारातर्फे वृक्षवाटिका भेट

**वळसंग, दि. २० डिसेंबर-**



वळसंग (ता. दक्षिण सोलापूर) येथील चिमुकली प्राही राकेश बाबानागरे हिच्या प्रथम वाढदिवसानिमित्त आलेल्या सर्व नागरिकांना एक वृक्ष वाटिका देत वृक्षारोपणाची संकल्प पोलीस उपनिरीक्षक राकेश बाबानगरे यांनी केला. वळसंग पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक अनिल सनगल्ले, पोलीस उपनिरीक्षक सागर पाटील यांच्या हस्ते रोपांचे वाटप करण्यात आले. आई प्रतिमा राकेश बाबानगरे आपल्या बाळाची प्रथम वाढदिवसानिमित्त रांगोळीमध्ये सुंदर चित्र साकारले होते. वृक्षारोपण संकल्प खरच आदर्शपूर्वक आहे.

# छत्रपती शिवरायांना रोज अभिषेक अन् पूजा

## पंढरपुरातील मावळ्याचा दिनक्रम; १० वर्षांमध्ये कधीच पडला नाही खंड

**तभा वृत्तसेवा । महेश भंडारकवठेकर**
**पंढरपूर, दि.२० डिसेंबर-**


शहरातील छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वारुढ तसेच छत्रपती संभाजी महाराजांच्या पुतळ्यास दररोज अभिषेक व दैनंदिन नित्यपूजा येथील एक तरुण गेल्या आठ ते दहा वर्षांपासून अखंडपणे करीत आहे. प्रतापसिंह कमलाकर साळुंखे असे त्या तरुणाचे नाव आहे. त्याच्या या उपक्रमाचे संपूर्ण शहरात कौतुक होत आहे. विशेष म्हणजे त्याच्या या उपक्रमातून प्रेरणा घेऊन शहरातील अनेक तरुण देखील स्वत:च्या वाढदिवसाचे ओचित्य साधुन महाराजांच्या पुतळ्यांचे स्वहस्ते पुजन करुन आपल्या वाढदिवसाच्या दिवसाची अनोख्या पध्दतीने सुरुवात करण्यासाठी पुढे सरसाऊ लागलेले पहावयास मिळत आहे. सर्वात महत्वाचे म्हणजे महाराजांच्या पुतळ्याच्या पुजनासाठी दिवसेंदिवस मिळत असलेल्या तरुणांच्या वाढत्या प्रतिसादामुळे वर्षभरातील (म्हणजे ३६५ दिवस किंवा बारा महिन्यातील) साधारणपणे दोन ते तीन महिने अशा उत्साही तरुणांच्या उपस्थितीत छत्रपतींच्या पुतळ्याचे आता पूजन होऊ लागले आहे ही कौतुकाची बाब आहे.

शिवाजी चौकातील छत्रपती शिवाजी महाराज आणि बेलीच्या महादेवाजवळील संभाजी महाराजांच्या पुतळा परिसरात तुम्ही सकाळी फेरी मारल्यास तुम्हाला २३ ते २५ वयाचा तरुण नित्याभिषेक करताना दिसेल, गेल्या तीन ते चार वर्षांपासून हे नित्याचे दृष्य आहे. प्रतापसिंह साळुंखे याला हा छंद लागला आहे. सूर्य उगवायच्या आत थोरल्या तालमीच्या मैदानावर थोडी मेहनत करून तो घरी परततो. अंघोळ उरकून हंडाभर पाणी व पूजेचे साहित्य घेऊन स्वारी थेट छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वारुढ पुतळ्याच्या पूजनासाठी रवाना होते. पुतळा परिसराची साफसफाई करतो. पुतळ्याला जलाभिषेक, नित्यपूजा करतो. त्या नंतर शिवाजी महाराजांची आरती आणि प्रेरणामंत्राचे पठण होते.

शिवाजी महाराजांच्या पुतळ्याची नित्यपूजा झाल्यानंतर बेलीच्या महादेवाजवळील संभाजी महाराजांच्या पुतळ्याकडे स्वारी निघते. संभाजी महाराजांच्या पुतळ्यालाही जलाभिषेक, सालंकृत पूजा करून पुतळ्यासमोर संभाजी हृद्यस्त्रोतांचे पठण, ध्येयमंत्र आणि प्रेरणा मंत्र होतो. हा संपूर्ण दिनक्रम दररोज पूर्ण करताना केवळ छत्रपतींचे आम्ही सेवक या भावनेतून नि:स्वार्थीपणे केलेली ही आपली नित्यसेवा, दिनचर्येतील सर्वात महत्त्वाचे कार्य म्हणून आपण याकडे बघतो. बोलण्यापेक्षा स्वत:पासून सुरुवात करतो, असे प्रामाणिक मत प्रतापसिंह व्यक्त करतो. शिवप्रतिष्ठान प्रतिहिंदुस्थानचा विभाग प्रमुख म्हणून प्रतापसिंह कार्यरत आहे. देव, देश आणि धर्मासाठी आपण कटिबद्ध असल्याची भावना तो बाळगतो आणि परमपूज्य भिडे गुरुजींच्या शब्दाशी प्रामाणिक राहण्याचा प्रयत्न करतो, असेही मोठ्या अभिमानाने तो सांगतो. शिवप्रतिष्ठानचे काम करीत असतानाच तो संसारातील सर्व जवाबदाऱ्या मोठ्या खुबीने पार पडतो. शेतीची कामे आणि तहसील कचेरीमध्ये स्टॅम्पव्हेंडरचे तो काम करतो.

### प्रतापसिंहाचे इतर उपक्रम

या शिवाय छत्रपती संभाजी महाराजांच्या बलिदान मासानिमित्त सध्या एक महिनाभर प्रतापसिंह दररोज सायंकाळी सात वाजता संभाजी महाराज बलिदान दिनानिमित्त महाराजांच्या बलिदानाची स्मृती जतन करत असताना एकत्र धारकऱ्यांसमवेत श्लोक तसेच प्रेरणामंत्राचे सामुदायिक पठण करतो. याबरोबरच नवरात्रामध्ये दररोज पहाटे शहरातून दुर्गा माता दौड, धारातीर्थी दुर्ग मोहीम,रायगडावरील शिवपुण्यतिथी दिनी शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास जलाभिषेक घालताना सोहळ्यामध्ये तो सक्रिय असतो.



# नरखेड येथे बिबट्याच्या हल्ल्यात शेळी ठार

## परिसरात भीतीचे वातावरण; वनविभागाच्या अधिकाऱ्यांनी घटनास्थळाला भेट देऊन केली पाहणी

**तभा वृत्तसेवा,**
**मोहोळ, दि. २० डिसेंबर-**

नरखेड (ता. मोहोळ) परिसरातील अनगर रस्त्यावरील यशवंत लोणारी या शेतकऱ्याच्या शेळीवर बिबट्याने शुक्रवार दि. २० रोजी रात्री दोन वाजता हल्ला केला. ही शेळी जागेवरच गतप्राण झाल्यामुळे परिसरामध्ये घबराटीचे वातावरण पसरले आहे.

मागील दोन दिवसापासून खैराव, बुद्रुकवाडी भागात बिबट्या असल्याच खात्री वन विभागाने केली होती. त्यातच नरखेड येथे बिबट्याने हल्ला केला. शेतकऱ्यांमध्ये घाबरटीचे वातावरण पसरले आहे. वनविभागाच्या अधिकाऱ्यांनी घटनास्थळी भेट देऊन पहाणी केली असता ते ठसे बिबट्याचे असल्याचे त्यांनी सांगितले.वनविभागाने तातडीने पावले उचलून त्या बिबट्याचा बंदोबस्त करावा अशी मागणी शेतकऱ्यांतून होत आहे. मागील दोन दिवसापासून माढा तालुक्यातील खैराव, बुद्रकवाडी, भैरववाडी या भागात बिबट्याचा वावर असल्याची चर्चा होत होती.



वन विभागाच्या अधिकाऱ्यांनी त्या ठिकाणी प्रत्यक्ष जाऊन पाहणी केली असता बिबट्याचे ठसे असलेचे निदर्शनास आले होते. सध्या या भागातील सर्व साखर कारखाने चालू असल्याने ऊसतोड मोठ्या प्रमाणात सुरू आहे. भोगावती सीना या नद्यांना भरपूर पाणी असल्याने शेतकरी वर्ग सध्या ऊस लागवडीमध्ये व्यस्त आहे. काही भागात महावितरणच्या माध्यमातून रात्रीचा वीज पुरवठा होत असल्याने ऊस लागवड चालू आहे. त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये पुन्हा घाबरटीचे वातावरण पसरले आहे.

गुरुवारी दिवसभर बिबट्या इकडे दिसला.. तिकडे दिसला.. अशा चर्चा असतानाच गुरुवारी रात्री दोन वाजता नरखेड -अनगर रस्त्यावरील अनगर बंधाऱ्याच्या अलीकडे असलेल्या लोणारी वस्तीवरील यशवंत लोणारी यांच्या वस्तीवर घरासमोर बांधलेल्या शेळीवर बिबट्याने हल्ला केला. त्यावेळी शेळी व इतर जनावरे ओरडू लागल्याने यशवंत लोणारी हे आपल्या मुलांसह बॅटरी घेऊन बाहेर येऊन पाहिले असता बिबट्याने शेळीच्या गळ्याला धरले होते. लोणारी व त्यांच्यासोबत असलेल्या कुत्र्याने आरडाओरड केल्याने बिबट्याने त्या शेळीला सोडून शेजारी असलेल्या शेतातील तुरीमध्ये धाव घेतली.त्यानंतर संबंधित वनविभागाच्या अधिकाऱ्यांना या घटनेची माहिती दिल्यानंतर तातडीने वनरक्षक शुभांगी कोरे वनरक्षक मोहोळ, बापू वाघमोडे, रावसाहेब माने वनमजूर यांनी घटनास्थळाची पाहणी केली असता बिबट्या सदृश्य प्राण्याचे ठसे मिळून आले आहेत. शेळीवर झालेला हल्ला हा जखमा मोठ्या व खोलवर असल्याने बिबट्यानेच हा हल्ला केल्याची खात्री झाली आहे.शेतकऱ्यांनी सतर्क राहून जनावरांना सुरक्षित ठिकाणी बांधण्याचे आवाहन केले आहे.

### ठसे बिबट्याचेच; वन विभागाचा निष्कर्ष

नरखेडमधील लोणारी वस्तीतील यशवंत लोणारी यांच्या शेळीवर केलेल्या हल्ल्याची पाहणी करून शेजारी असलेल्या तुरीत गेलेल्या ठशाची पाहणी केली असता ते ठसे बिबट्याचेच आहेत. शेतकऱ्यांनी विविध उपाययोजना कराव्यात असे आवाहन वनरक्षक शुभांगी करे यांनी केले.



## करमाळा तालुकास्तरीय बुद्धिबळ स्पर्धेत आकांक्षा क्षीरसागर प्रथम

**करमाळा, दि. २० डिसेंबर-**

सोलापूर जिल्हा परिषदेंतर्गत नुकत्याच केम येथे पार पडलेल्या करमाळा तालुकास्तरीय क्रीडा स्पर्धेत मुली मोठा गट बुद्धिबळ या क्रीडा प्रकारात जि.प.शाळा पोफळज (ता. करमाळा) ची विद्यार्थिनी आकांक्षा तानाजी क्षीरसागर हिने प्रथम क्रमांक पटकावला. तिची जिल्हा स्तरीय बुद्धिबळ स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

आकांक्षाला पोफळजच्या आदर्श शिक्षिका रेखा शिंदे-साळुंके मॅडम यांचे मार्गदर्शन मिळाले.चिखलठाण केंद्रप्रमुख वंदना पांडव यांनी आकांक्षाला रोख रकमेचे बक्षीस देऊन तिचा गौरव केला. या यशाबद्दल विजेती बुद्धिबळपटू आकांक्षा क्षीरसागर व मार्गदर्शक शिक्षिका रेखा शदे-साळुंके, मुख्याध्यापिका मुमताज फकीर,शिक्षिका शुभांगी बोराटे,सहशिक्षक जहांगीर सय्यद, निलेश जाधवर,विवेक पथरुडकर यांचेसह गटशिक्षणाधिकारी जयवंत नलवडे, यश कल्याणीचे अध्यक्ष प्रा. गणेश करे-पाटील, नितीन कदम, पोफळजचे सरपंच कल्याण बापू पवार, माजी सरपंच दत्तात्रय गव्हाणे, उपसरपंच राणी बिभिषण गव्हाणे, चिखलठाण केंद्रप्रमुख वंदना पांडव, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष राहुल धुमाळ, दत्तात्रय पवार, मारुती पवार, मेजर सचिन पवार, अरुण पवार, अक्षय कुलकर्णी, उत्तरेश्वर कांबळे, विस्ताराधिकारी मिनीनाथ टकले, केंद्रप्रमुख भारत पांडव, केंद्र प्रमुख वैशाली महाजन, केंद्र प्रमुख रमाकांत गटकळ, केंद्र प्रमुख संजय मुंडे यांनी अभिनंदन केले.

## ग्रामपंचायत अधिकाऱ्यास मारहाण; दोघांविरूध्द गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा,**
**मंगळवेढा, दि. २० डिसेंबर-**

तू आमच्या गावामध्ये खूप चोरी केली आहे. तसेच बोगस कामेही केली आहेत असे म्हणून एका ग्रामपंचायत अधिकार्यास मारहाण करून शासकिय कामात अडथळा आणून पत्नीला छेडछाड केल्याचा गुन्हा दाखल करण्याची धमकी दिल्याप्रकरणी प्रकाश पवार,अक्षय इंगोले (रा. खोमनाळ) या दोघांविरूध्द गुन्हा दाखल झाला आहे.

फिर्यादी अभिजीत अशोक लाड हे ग्राम पंचायत अधिकारी असून ते १३ ऑक्टोबर २०२३ ते २९ मे २०२४ या कालावधीत खोमनाळ ग्रामपंचायत येथे ग्रामपंचायत अधिकारी म्हणून नेमणूकीस होते.सदर नेमणूक कालावधीत ग्रामपंचायत अधिकारी यांनी केलेल्या विकास कामाबद्दल आरोपी प्रकाश पवार यांनी गटविकास अधिकारी कार्यालयाकडे तक्रारी अर्ज केला होता.सदर अर्जाच्या चौकशीच्या अनुषंगाने फिर्यादी अभिजीत लाड यास विस्ताराधिकारी हरीदास नरळे यांनी चौकशीसाठी खोमनाळ ग्रामपंचायत कार्यालयात बोलावले होते. दि.१८ डिसेंबर रोजी विस्ताराधिकारी चौकशी करीत असताना ११.३० वा. विस्ताराधिकारी हरीदास नरळे, विद्यमान ग्रामपंचायत अधिकारी श्रीमती इंगोले, ग्रामपंचायत कर्मचारी अजीत लंगडे, ग्रामपंचायत ऑपरेटर अयोध्या शिंदे, सरपंच बायडाबाई मदने, ग्रामस्थ बाबासाो बिले, राजेंद्र मदने, निखील सरवदे, अशोक चौंडे, राहुल कसबे यांचेसह आरोपी प्रकाश पवार आदी सर्वजण हजर असताना दुपारी १२.०० वा. आरोपीने तु आमच्या गावामध्ये खूप चोरी केली आहेस. बोगस कामे केली आहेत असे म्हणून शिवीगाळी करून फियार्दीची कॉलर पकडून हाताने मारहाण करून शासकिय कामात अडथळा केला. यावेळी आरडाओरड ऐकून आरोपी अक्षय इंगोले यानेही ग्रामपंचायत कार्यालयात येवून शिवीगाळ केली. तसेच उपस्थित लोकांनी सोडवासोडव केल्यानंतर ते दोघे तेथून निघून जात असताना फिर्यादीस तु आमच्या विरोधात पोलिसात तक्रार केल्यास मी सुध्दा तुझ्यावर माझे पत्नीस छेडछाड केल्याचा गुन्हा दाखल करेन अशी धमकी देवून ते दोघे तेथून निघून गेल्याचे लाड यांनी दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे याचा अधिक तपास पोलिस करीत आहेत.

**खोमनाळ ग्रामपंचायतमधील प्रकार**

# दर जाहीर केल्याशिवाय कारखान्यांना ऊस देऊ नका

## शिवसेना उबाठा अक्कलकोट तालुका प्रमुख आनंद बुक्कानुरे यांचे शेतकऱ्यांना आवाहन

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. २० डिसेंबर-**

अनेक साखर कारखानदाऱ्यांनी धुराडी पेटून महिना उलटून गेला तरी अद्याप ऊसदर जाहीर केले नाहीत. यामुळे शेतकऱ्यांनी सर्व साखर कारखानदार योग्य भाव जाहीर करेपर्यंत कोणत्याही कारखान्याला घाई करून ऊस देऊ नये. तुमचा हक्काचा लढाई लढवून योग्य भाव मिळवून देण्यासाठी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष खंबीर आहे. असे आवाहन शिवसेना तालुका प्रमुख आनंद बुक्कानुरे यांनी शेतकऱ्यांना केला आहे.



अक्कलकोट विधानसभा मतदार संघातील अनेक साखर कारखानदाऱ्यांनी धुराडी पेटून महिना उलटून गेला तरी अद्याप कारखानदाऱ्यांनी ऊस दर जाहीर केले नाहीत.त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये संभ्रमाचे वातावरण निर्माण झाला आहे.मागील वर्षी शेतकऱ्यांना एफआरपी प्रमाणे एकरकमी दोन हजार सातशे रुपयांचा दर दिला होता. यंदा हा दर साधारण तीन हजार पर्यंत जाहीर होईल. असे अंदाज असताना कारखानदाऱ्यांनी ऊसदराचा आकडा अद्यापपर्यंत जाहीर केलेला नाही. त्यामुळे ऊस उत्पादक शेतकऱ्यांमध्ये संतप्त भावना निर्माण होत आहे.या पूर्वी साखर संचालकांच्या बैठकीत कारखान्यांनी १५ डिसेंबरला दर जाहीर करणार असल्याचे सांगितले होते. मात्र जिल्ह्यातून चार कारखाने वगळता इतरांनी दर जाहीर केले नाही. त्यामुळे चांगला दर मिळणार की नाही.या बाबत चिंता शेतकऱ्यांमध्ये सुरु आहे. निवडणूक संपली असतानाही राजकीय नेते व कारखानदार ऊसदरा बाबत बोलण्यास तयार नाहीत. साखर कारखान्यांनी तातडीने उसाचा दर जाहीर करावा, अशी मागणी शेतकऱ्यांकडून होत आहे. काही दिवसांपासून ऊस तोडणी मजुरांच्या टोळ्या शेताच्या फडात दाखल झाल्या आहेत.

अनेक शेतकऱ्यांच्या ऊसतोडी होऊन पूर्ण बाहतूकही झाली आहे; मात्र काही कारखान्याने अद्याप ऊसदराची घोषणा केली नाही.

> गेल्या आठवड्यात तालुक्यातील तडवळ येथील ओंकार शुगर विरोधात शिवसेनेने शेतकऱ्यांना सोबत घेऊन आंदोलन छेडून कारखाना बंद पाडून योग्य उसाचे दर जाहीर करण्यास भाग पाडले आहे. याप्रमाणे सर्व साखर कारखाना विरोधात शिवसेना मोठे आंदोलन उभे करून प्रसंगी साखर कारखाना बंद पाडून एकेक कारखाना कडून योग्य दर जाहीर करायला भाग पाडू. शेतकऱ्यांनी घाई करून कोणत्याही कारखान्याला तात्काळ ऊस देऊ नये.
>
> - **आनंद बुक्कानुरे**, तालुका प्रमुख, शिवसेना उबाठा, अक्कलकोट

धाराशिव दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## सिद्धाराम शिवाचार्य महास्वामींच्या ४६ व्या पुण्यतिथीनिमित्त कार्यक्रम

**तभा वृत्तसेवा**
**जळकोट, दि.२० डिसेंबर -**
तुळजापूर तालुक्यातील जळकोट येथील श्री सिद्धेश्वर कट्टीमठ संस्थान ट्रस्टचे मठाधिपती ष. ब्र. सिद्धाराम शिवाचार्य महास्वामीजी यांच्या ४६ व्या पुण्यतिथीनिमित्त जळकोट येथील मठात विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

जळकोट येथील श्री सिद्धेश्वर देवस्थान कट्टीमठ संस्थान ट्रस्टच्या मठात सिद्धाराम शिवाचार्य यांच्या पुण्यतिथीनिमित्त मठाचे मठाधिपती श्री.श्री.श्री.१०८ ष.ब्र. शिवानंद शिवाचार्य महास्वामीजी यांच्या दिव्य नेतृत्वाखाली व कलकेरी येथील श्री.ष.ब्र. चरपट्टाध्यक्ष सिद्धाराम शिवाचार्य हिरेमठ यांच्या कृपाशीर्वादाने विविध धार्मिक कार्यक्रम पार पडणार आहेत. यात शनिवार (दि.२१) रोजी सकाळी सात वाजता लोककल्याणासाठी होमहवन व रात्री नऊ वाजता शिवजागरण कार्यक्रम पार पडणार आहे. (दि.२२) रोजी श्री.ष.ब्र. चरपट्टाध्यक्ष सिद्धाराम शिवाचार्य हिरेमठ यांच्या अमृतहस्ते सिद्धाराम शिवाचार्य महास्वामीजींच्या समाधीस्थळावर रुद्राभिषेक करण्यात येणार आहे. सकाळी दहा वाजता पालखी उत्सव काढण्यात येणार आहे. दुपारी बारा वाजता महाप्रसादाचे वाटप करण्यात येणार आहे. या धार्मिक कार्यक्रमांचा व महाप्रसादाचा सदभक्त मंडळी व ग्रामस्थांनी लाभ घ्यावा, असे आवाहन श्री. सिद्धेश्वर देवस्थान कट्टीमठ संस्थान ट्रस्टने केले आहे.


https://dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com
सोलापूर तरुण भारत

### संक्षिप्त वृत्त...




### सावित्रीबाई फुले विद्यालयात गाडगेबाबांना अभिवादन

**कळंब, दि.२० डिसेंबर -**
सावित्रीबाई फुले माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात संत गाडगेबाबा यांना अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाचे मुख्याध्यापक तथा प्राचार्य काकासाहेब मुंडे तर प्रमुख पाहुणे म्हणून उच्च माध्यमिक विद्यालयाच्या उपप्राचार्य डॉ. मीनाक्षी शिंदे या होत्या. यावेळी विद्यालयाचे सहशिक्षक जीवनसिंह ठाकूर यांनी संत गाडगेबाबा यांच्या विषयी आपले विचार मांडले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सांस्कृतिक विभाग प्रमुख परमेश्वर मोरे यांनी केले तर आभार प्रदर्शन ज्ञानेश्वर तोडकर यांनी मानले. यावेळी शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

### तुगाव येथे २५ डिसेंबरला धम्म परिषदेचे आयोजन

**उमरगा, दि.२० डिसेंबर -**
तालुक्यातील तुगाव येथे त्रिरत्न बुध्द विहार समितीच्या वतीने २५ डिसेंबर रोजी नवव्या अखिल भारतीय धम्म परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. गेल्या आठ वर्षांपासून तुगाव येथे प्राचार्य डॉ. कमलाकर कांबळे यांच्या महद्दर्शना खाली धम्म परिषदेचे आयोजन त्रीरत्न बुध्द विहार समितीच्या वतीने केले जाते. या परिषदेत विविध कार्यक्रम घेतले जातात. याप्रसंगी दिलीप माने (मुंबई), अजित गायकवाड (सोलापूर), पंचशील डावकर (लातूर), दिपक जोमदे (सरपंच, तुगाव), संजय बिराजदार (उपसरपंच, तुगाव) हे मान्यवर उपस्थित राहणार आहेत. यावेळी धम्मदेशना करण्यासाठी भदंत नागसेन बोधी (उदगीर), भदंत धम्मसार थेरो (किल्लारी),भदंत सुमंगल (कराळी), भदंत शिवली अंगुलीमाल (जालना), भदंत काश्यप (भालकी, कर्नाटक) इत्यादी उपस्थित राहणार आहेत. तुगाव येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२५ व्या जयंती हीरक महोत्सवी वर्ष याचे औचित्य साधून अखिल भारतीय बौध्द धम्म परिषदेचे आयोजन करण्यात येत आहे. कार्यक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन संयोजन समितीच्या वतीने अध्यक्ष नंदकुमार गायकवाड व सचिव राजकुमार कांबळे यांनी केले आहे.





### जि.प. शाळेत संत गाडगेबाबा यांची पुण्यतिथी साजरी

**कळंब, दि.२० डिसेंबर -**
तालुक्यातील जिल्हा परिषद आदर्श प्राथमिक शाळा माळकरंजा येथे संत गाडगे महाराज यांची पुण्यतिथी साजरी करण्यात आली. यावेळी शाळेतील सहशिक्षक हनुमंत रामभाऊ घाडगे यांनी गोपाला गोपाला देवकीनंदन गोपाला असे मंत्रमुग्ध भजन गात संत गाडगेबाबा यांच्या जीवन कार्याचा परिचय उपस्थित विद्यार्थ्यांना करून दिला. यावेळी शाळेतील मुख्याध्यापक संतोष भोजने यांनीही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सहशिक्षक संजय ओव्हाळ, भारती सूर्यवंशी व मुख्यमंत्री युवा प्रशिक्षणार्थी मंजुश्री कराड यांनी परिश्रम घेतले.

## शहरात गर्दी नियंत्रणासाठी अत्यावश्यक सर्विस रोडचे कामे शहराबाहेर...

# १० रुपयांसाठी नगरपालिका अन् एक किलो फळासाठी पोलीसांकडून भाविकांचा जीव धोक्यात?

**तुळजापूर शहरात सर्विस रोडवर अतिक्रमणे ! लाखो रुपयांचे भाडे वसूल करून शासनाला चुना ! शासनाच्या जमिनीवर खाजगी लोकांकडून भाडे वसुली मोठ्या प्रमाणात...**






### सर्विस रस्ते शहरातून बाहेर करणे आवश्यक असताना बाहेरून शहराकडे करण्याचा हेतू गुलदस्त्यात

**तभा वृत्तसेवा / सचिन ताकमोघे**
**तुळजापूर, दि.२० डिसेंबर -**
नगर पालिका फिरीवाल्यांकडून दैंनदिन १० रूपयांची पावती फाडते. तर पोलीस हे याच फेरीवाल्यांना अभय देत त्यांच्याकडून १ किलो फळांची मागणी करून अप्रत्यक्षरित्या त्यांना अतिक्रमण करण्यासाठी प्रोत्साहित करतात.? असे कांहीचे चित्र तुळजापूर शहरात पहावयास मिळत असून याच फेरीवाल्यांच्या अतिक्रमणांने शहरातील मुख्य रस्ते फुल्ल झाल्याचे दिसून येत आहे.

महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियानांतर्गत शहरात १५८ कोटी रुपयांचे विविध रस्ते विकास कामे चालू झाली आहेत. धाराशिव आणि नळदुर्ग रोडवरील सर्विस रस्त्यांचे कामे शहरात होणारी भाविकांची गर्दी लक्षात घेता शहरातून बाहेर करणे आवश्यक असताना हे कामे गर्दी नसलेल्या ठिकाणी म्हणजे शहरा बाहेरून शहराकडे होत आहेत. शहरात सर्वत्र सर्विस रोडला लागून प्लॉट असणाऱ्या प्लॉट धारकांनी मुरूम टाकून सर्विस रोडवर अतिक्रमण केले आहे.

**तुळजापूरातील मुख्य रस्ते अतिक्रमणांनी फुल्ल...**

रोडच्या लेवलने सर्विस रोड भरून घेतले आहेत आणि शॉपिंग सेंटर दुकाने टपऱ्या पत्र्याचे शेड उभे केले आहेत. शासनाच्या जागेवर खाजगी लोकांकडून लाखो रुपयांचे भाडे वसूल केल्याचे दिसून येत आहे तरीही शासनाचे याकडे पूर्णपणे दुर्लक्ष आहे नगरपरिषदचा कारभार आणि शहराचा विकास होणार कसा हा प्रश्न सर्वसामान्य नागरिकांना पडल्याचा दिसून येत आहे. शहरात झालेले अतिक्रमणे काढून सर्वप्रथम शहरातून सर्विस रोड होणे आवश्यक होती पण तसे न करता ही सर्विस रोड शहराबाहेर करण्याचा हेतू गुलदस्त्यात असल्याचे समजते नगरपरिषद कर्मचाऱ्यांसह नेते पुढारी यांच्याकडून शासकीय जागेवर अतिक्रमण धारकाकडून भाडे वसुली करून शासनाला चुना लावला जात असल्याची चर्चा देखील सर्वसामान्य नागरिकांतून ऐकण्यास मिळत आहे. तुळजाभवानी देवीच्या दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांची गर्दी आणि शहरातील नागरिकांच्या गर्दीचा विचार करून होणारे सर्विस रोड धाराशिव रोड ते नळदुर्ग रोड न खंडित करता पूर्ण करणे गरजेचे आहे.

आता होणारे रस्ते हे धाराशिव कडून करत येणारा रस्ता हा तुळजापूर खुर्द कडे जाणाऱ्या रोड पर्यंत तर समोरील दुसऱ्या बाजूस अपसिंगा रोड पासून आठवडा बाजारच्या पुढून शहरात एन्ट्री करण्याच्या रस्त्यापर्यंत होणार असल्याचे समजते. नळदुर्ग रोड वरील रस्ता मंठाळकर मंगल कार्यालयापासून पुढे हेलीपॅड पर्यंत तर समोरील बाजूस क्सिस बँके पासून सपकाळ प्लॉटिंग पर्यंत होणार असल्याचे कळते. तुळजापूर खुर्द पासूनच्या पुढे क्सिस बँक पर्यंत आणि आठवडा बाजारच्या पुढील शहर एंट्री पासून मंठाळकर पर्यंतच्या रस्त्यावरच नागरिकांची मोठ्या प्रमाणात गर्दी असते. हा रस्ता सोडून शहराबाहेरील रस्त्यावर सर्विस रोड विकास कामे करणे म्हणजे पुन्हा शहरात भाविकांची आणि शहरातील नागरिकांच्या वाहनांची गर्दी मोठ्या प्रमाणात होण्याचे संकेत दिसून येत आहेत.

त्यामुळे कुठेही खंडित न करता धाराशिव बायपास ते नळदुर्ग रोडवरील सपकाळ प्लॉटिंग पर्यंत सर्विस रोड करण्याची जनसामान्याची मागणी जोर धरत आहे.

> रस्त्यांची कामे पीडब्ल्यूडी मार्फत सुरू असून त्यांच्याकडे याबाबत सविस्तर माहिती मिळेल सध्या जे शहरात १५८ कोटीची रस्ते विकास कामानुसार जी सर्विस रोडची कामे चालू आहेत ती लेआउट आणि डीपी प्रमाणे चालू आहेत.
>
> **-अतुल तोंडारे**
> **अभियंता. नगरपरिषद, तुळजापूर**

> शहरात होणाऱ्या कुठल्याही विकास कामावर शासनाने सूचना दिल्याप्रमाणे कामाबाबत कामाच्या ठिकाणी कुठलेही बोर्ड लावले जात नाहीत. त्यामुळे सामान्य नागरिक नगर परिषदेच्या कारभाराबाबत संशयास्पद पाहत आहेत पारदर्शक कारभार नसल्यामुळे शासनाच्या कुठल्याही नियमाचे पालन केले जात नसल्याची चर्चा करताना सर्वत्र शहरात नागरिक दिसतात.

## 'स्वआधार'ला जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धात 'चॅम्पियन ट्रॉफी'

**समाजाने नाकारलेल्या मानसिक विकलांग, अनाथ मुलींची सलग दहा वर्षांपासून दैदिप्यमान कामगिरी....**



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२० डिसेंबर -**
समाज कल्याण विभाग जिल्हा परिषद धाराशिव यांच्या संयुक्त विद्यमाने दिव्यांगांच्या विशेष शाळेतील विद्यार्थ्यांच्या जिल्हास्तरीय क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धेमध्ये तुळजाई प्रतिष्ठान बहुउद्देशीय संस्था पानगाव संचलित स्वआधार मतिमंद मुलींचे बालगृह सलंग्न शाळा आळणी (ता. जि. धाराशिव) दि..१७ व १८ डिसेंबर रोजी या बालगृहाने नेत्रदीपक कामगिरी करून सलग १० वर्ष जिल्हा चॅम्पियन ट्रॉफी पटकवण्याचा मान मिळवला.

तुळजाभवानी स्टेडियम धाराशिव येथे अंध, अस्थिव्यंग, मूकबधिर, मतिमंद या प्रवर्गातील जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धा पार पडल्या. या कार्यक्रमाचे अध्यक्ष मैनाक घोष (मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद धाराशिव तथा जिल्हाधिकारी धाराशिव) यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले.

सुनील खमीतकर (जिल्हा समाज कल्याण अधिकारी, धाराशिव) यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना दिव्यांगासाठी राबवल्या जाणाऱ्या विविध योजनांची माहिती सांगून कार्यक्रमाची सुरुवात केली. या स्पर्धेमध्ये जिल्ह्यातील एकूण २८ शाळा व ७५० दिव्यांग विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला.

यामध्ये गोळाफेक, लांब उडी, बादलीत बॉल टाकणे, थ्रो बॉल, स्पॉट जंप, इत्यादी खेळ प्रकार घेण्यात आले.

स्वआधार मतिमंद मुलींच्या बालगृहाने ३१ सुवर्ण, २८ रौप्य, २५ कास्य, आशा एकूण ८४ पदकांची कमाई करत जिल्हास्तरावर मतिमंद प्रवर्गातून प्रथम विजेतेपद पटकावून घवघवीत यश संपादन केले.

तसेच स्वआधार प्रकल्पातील अनाथ एकुण ३१ मुलींची राज्य पातळीसाठी लांब उडी, गोळा फेक, स्पॉट जंप, ५० मी. धावणे १०० मी. धावणे, २०० मी. धावणे, २५ मी.चालणे सॉफ्ट बॉल थ्रो, लगोर फोडणे, बादलीत बॉल टाकणे या खेळ प्रकारात मतिमंद प्रवर्गातून निवड करण्यात आली.

तसेच सांस्कृतिक कार्यक्रमांमध्ये महाराष्ट्रातील बदलापूर येथील 'बाल लैंगिक शोषण' या संवेदनशील प्रकरणावर सामाजिक संदेश देणारी सुंदर अशी थीम व पिचली माझी बांगडी या गाण्यावर नृत्य सादर करून मतिमंद प्रवर्गातून स्वआधार प्रकल्पाने प्रथम क्रमांक मिळवला. सर्व यशस्वी खेळाडूंना क्रीडा विभाग प्रमुख पवार, पोपळे तसेच सांस्कृतिक विभाग प्रमुख सरवदे, साळुंखे, मिटकरी यांचे मार्गदर्शन लाभले.

सर्व विजेत्या खेळाडूंचे व सांस्कृतिक कला सादर करणाऱ्या विद्यार्थ्यांचेशहाजी चव्हाण (सचिव, तुळजाई प्रतिष्ठान), स्वआधार प्रकल्पाचे मुख्याध्यापक गुरुनाथ थोडसरे यांनी कौतुक करून अभिनंदन केले.

## संत मीरा पब्लिक स्कूलमध्ये 'आनंद मेळावा' उत्साहात



### १४० विद्यार्थ्यांकडून १३३ स्टॉलची उभारणी...

**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.२० डिसेंबर -**
परंडा येथील संत मीरा पब्लिक स्कूल व डॉ. वेदप्रकाश विद्यामंदिर या शाळेत संस्थापक डॉ. प्रतापसिंह पाटील यांच्या संकल्पनेतून दरवर्षी प्रमाणे याही वर्षी 'फन-फेअर' हा विद्यार्थ्यांच्या विविध कला-गुण व कौशल्यानां वाव मिळावा हा मनोरंजनात्माक व आनंददायी उपक्रम घेतला जातो. मोठ्या प्रमाणात शालेय विद्यार्थी व पालकांनी प्रतिसाद दिल्याने हा कार्यक्रम अतिशय उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.

यावेळी या 'आनंद मेळाव्यात 'एकूण १४० विद्यार्थ्यांनी १३३ वेगवेगळे स्टॉल लावले होते. यात विद्यार्थ्यांनी स्वतःचे कौशल्य दाखवत हजारो रुपयांची उलाढाल केली. या स्पर्धात्मक उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांना १०० पैकी गुण देण्यात येणार आहेत, विजेत्या विद्यार्थ्यांना बक्षीस देण्यात येणार आहे. या कार्यक्रमाचे उदघाटन पोनि. विनोद इज्जपवार, उनि. प्रवीण सिरसाठ, गीतांजली जगदाळे, ॲड. संतोष सूर्यवंशी, ॲड. साजिदा शेख, गुरूदास कांबळे, दीपक दुबळे, आशा लावंड, प्रज्ञा काळे, संजय बनसोडे, रमेश परदेशी, अण्णा शिंदे, शरद काळे, राहुल बनसोडे, परमेश्वर नाईकनवरे, श्रीमंत कातुरे, जहीर चौधरी, दीपक भांडवलकर, अश्विनी भांडवलकर, नानासाहेब पवार, डॉ. नितीन मोरे, रणजीत सूर्यवंशी, बापूराव गायकवाड, पंकज पाटील, दत्तात्रय भांडवलकर, प्राचार्य संतोष भांडवलकर व दिनेश मेटकरी इ. मान्यवरांच्या हस्ते झाले.

# निम्न तेरणा उपसा सिंचन योजनेसाठी निधीची तरतूद; लवकरच निविदा आणि कामही सुरु होईल : आ. राणाजगजितसिंह पाटील

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२० डिसेंबर -**
हिवाळी अधिवेशनातील पुरवणी मागण्यात निम्न तेरणा उपसा सिंचन योजनेच्या दुरुस्तीसाठी टोकन प्रोव्हिजन अर्थात लेखाशीर्षकात निधीची तरतूद करण्यात आली आहे. त्यामुळे आता लवकरच निविदा प्रक्रिया आणि त्यानंतर प्रत्यक्ष दुरुस्ती कामासही सुरुवात होईल. डॉ. पद्मसिंह पाटील साहेबांनी मोठ्या भगीरथ प्रयत्नाने सुरू केलेला हा प्रकल्प पुन्हा कार्यान्वित करण्याची जबाबदारी आपली असल्याची निवडणुकीपूर्वीच सांगितले होते, त्यानुसार तीन तालुक्यातील २३ गावांसाठी महत्वपूर्ण असलेल्या आज अशक्यप्राय वाटणाऱ्या या दुरुस्तीच्या कामासाठी आपल्या महायुती सरकारने निधीची तरतूद केली असल्याची माहिती आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी दिली आहे.

तुळजापूर, धाराशिव आणि औसा या तीन तालुक्यातील २३ गावांतील सहा हजार हेक्टर क्षेत्रासाठी अत्यंत महत्वपूर्ण असलेल्या निम्न तेरणा उपसा सिंचन योजनेच्या दुरुस्ती खर्चास महायुती सरकारने विधानसभा निवडणुकीपूर्वीच ११३ कोटी रूपयांची प्रशासकीय मान्यता दिली होती. ठाकरे सरकारच्या उदासीन भूमिकेमुळे सुरुवातीच्या अडीच वर्षात या प्रकल्पाच्या दुरूस्ती बाबत काहीच हालचाल झाली नाही. मात्र आता ११३ कोटी रूपयांच्या दुरूस्ती प्रस्तावास आपण केलेल्या पाठपुराव्यामुळे सुरुवातीला तांत्रिक मान्यता मिळाली.

अशक्यप्राय वाटणाऱ्या या योजनेच्या दुरुस्ती कामास महायुती सरकारच्या माध्यमातून प्रशासकीय मान्यताही आपण मिळवून घेतली. ११३ कोटी रुपयांच्या दुरूस्तीस प्रशासकीय मान्यता मिळाल्यानंतरच निम्न तेरणा उपसा सिंचन योजना दृष्टीपथात आली होती. डॉ. पद्मसिंह पाटील यांनी भगीरथ प्रयत्नाने सुरू केलेला हा प्रकल्प पुन्हा कार्यान्वित करण्याची जबाबदारी आपली असल्याचे आपण जाहीरपणे सांगितले होते.

त्यानुसार ११३ कोटी रुपयांच्या या दुरुस्ती कामासाठी हिवाळी अधिवेशनात पुरवणी मागण्यात टोकन प्रोव्हिजन करण्यात आले असल्याने निविदा प्रक्रियेचा मार्ग आता सुकर झाला असल्याचेही आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी सांगितले आहे.

या महत्वपूर्ण योजनेच्या दुरुस्तीसाठी राज्याचे मुख्यमंत्री तथा तत्कालीन उपमुख्यमंत्री आणि जलसंपदामंत्री देवेंद्रजी फडणवीस यांची आपण स्वतः भेटून घेऊन या महत्वपूर्ण योजनेच्या दुरुस्तीसाठी निधी उपलब्ध करून देण्यासंबंधी नोव्हेंबर २०२२ मध्ये विनंती केली होती. त्यानुसार उपमुख्यमंत्री ना. देवेंद्र फडणवीस यांनी त्याचवेळी जलसंपदा विभागाच्या अप्पर मुख्य सचिवांना कार्यवाही करण्याचे निर्देशही दिले होते.

पाच टप्प्याची असणारी ही योजना मागील अनेक वर्षे बंद असल्याने स्थापत्य, विद्युत व यांत्रिकी या तिन्ही विभागाची दुरुस्ती आवश्यक होती. या तिन्ही विभागांचा सुसमन्वय साधून या तिन्ही विभागांकडून एकत्रित अंदाजपत्रक तयार करून घेणे मोठे जिकिरीचे काम होते.

अनेक त्रुटींची पूर्तता करून या तिन्ही विभागाच्या समन्वयाने निम्न तेरणा उपसा सिंचन योजनेच्या दुरुस्ती कामासाठी ११३ कोटी रुपयांच्या अंदाजपत्रकीय किमतीच्या कामास तांत्रिक मान्यता मिळवून घेतली. आणि त्यानंतर सलग पाठपुरावा करून प्रशासकीय मान्यताही मिळवून घेतली.

जलसंपदा विभागात कोणत्याही प्रकल्प दुरूस्तीसाठी एकूण तरतुदीच्या कमाल १० टक्के निधी खर्च करता येतो. निम्न तेरणा उपसा सिंचन योजनेच्या दुरूस्तीसाठी मात्र तब्बल ११३ कोटी रूपयांची आवश्यकता होती. त्यामुळे या प्रस्तावास खास बाब म्हणून मंजुरी मिळवून घेण्यासाठी मोठे प्रयत्न करावे लागले.

पाठपुरावा सुरूच ठेवला आणि अशक्यप्राय वाटणारे काम आपल्या सर्वांच्या पाठबळावर निधीच्या तरतुदीपर्यंत आणले असल्याने आता लवकरच निविदा प्रक्रिया आणि त्यानंतर प्रत्यक्ष कामास सुरुवात होईल असा विश्वासही आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी याप्रसंगी व्यक्त केला आहे.

### सहा नव्हे, नऊ हजार हेक्टर क्षेत्र येणार सिंचनाखाली...



भविष्यात ज्या उपसा सिंचन योजना कार्यान्वित होणार आहेत, त्या सर्व बंद पाईपलाईनद्वारेच राबविण्याचा धोरणात्मक निर्णय महायुती सरकारने यापूर्वीच घेतलेला आहे. त्यामुळे आता निम्न तेरणेचे पाणी बंद पाईपलाईनद्वारे थेट शेतकरी बांधवांच्या शिवारात दाखल होणार आहे. त्यामुळे पाण्याचा अपव्यय मोठ्या प्रमाणात टळणार आहे. त्यामुळे सिंचनक्षेत्र सहा हजार हेक्टरवरून नऊ हजार हेक्टर होणार आहे. सिंचनात दीडपट वाढ होणार आहे. त्यामुळे तीन तालुक्यातील २३ गावातील शेतकरी बांधवांना मोठा लाभ होणार आहे. डॉ. पद्मसिंह पाटील साहेबांच्या दूरदृष्टीमुळे यापूर्वीच निम्न तेरणा उपसा सिंचन योजनेसाठी पाण्याचे आरक्षण करण्यात आले आहे. या योजनेसाठी ४२ दलघमी पाणी आरक्षित करून ठेवण्यात आले आहे. त्यात काहीही बदल झालेला नाही आणि होणारही नसल्याचे आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी स्पष्ट केले आहे.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

# शेतकऱ्यांना लागणाऱ्या खत व औषधावरील जीएसटी रद्द करावा : आ. कैलास पाटील

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२० डिसेंबर -**

शेतकऱ्यांना पिकासाठी आवश्यक असणाऱ्या खत, औषध व साधनसामग्रीवर १८ ते २८ टक्के जीएसटी घेतला जातो. एवढ्या मोठया प्रमाणात घेतला जाणारा जीएसटीमुळे शेतकरी अडचणीत असून त्यातून शेतकऱ्यांना दिलासा द्यावा अशी महत्वाची मागणी आमदार कैलास पाटील यांनी हिवाळी अधिवेशनात केली. ते पुरवणी मागण्यावर बोलत होते.

यावेळी आमदार कैलास पाटील म्हणाले की, कृषी विभागाच्या भाऊसाहेब फुंडकर फळबाग योजनेचे अनुदान २०१९ पासून दिलेले नाही. तसेच पंतप्रधान कृषी सिंचन योजना, कृषी यांत्रिकीकरण योजना, राष्ट्रीय कृषी विकास योजना याचेही अनुदान दिलं गेलेलं नसल्याची बाब आमदार पाटील यांनी निदर्शनास आणून दिली.

महाराष्ट्र आता थांबणार नाही म्हणणाऱ्या मंडळींनी हे अनुदान का थांबवलं असा प्रश्न आमदार पाटील यांनी सरकारला विचारला. डीबीटी साठी दिल्या जाणाऱ्या पूर्वसंमती का थांबवल्यात याचेही उत्तर त्यांनी मागितलं.

शेतकऱ्यांना पिकासाठी लागणाऱ्या खत,औषध व साधनसामुग्रीवरील आकारला जाणारा जीएसटी रद्द करावा, तसेच सद्या द्राक्षबागाचे मोठं नुकसान झाले असून त्यांनाही अनुदान देऊन काहीप्रमाणात दिलासा मिळावा अशी मागणी आमदार पाटील यांनी केली.

दुधाला अनुदान देण्याची घोषणा केली असली तरी फॅट व एसएनएफ ची अव्यवहार्य अट लावल्याने ९० टक्के दूधउत्पादक या अनुदानास पात्र ठरत नाही. त्यामुळं ती अट काहीशी शिथिल केल्यास त्या सर्व ९० टक्के दूधउत्पादकास त्याचा लाभ मिळेल.

धनगर बांधवासाठी राजे होळकर महामेष योजना लागू केली असून त्यासाठी ९१ हजार अर्ज आले आहेत. त्यासाठी गरज अठराशे कोटीची आहे मात्र तरतूद फक्त २९ कोटी करण्यात आली असल्याचे सांगून आमदार पाटील यांनी या प्रश्नाकडे सभागृहाचे लक्ष वेधले.



वडगाव एम आयडीसी साठी २०१३ साली जमिनीच भूसंपादन करण्यात आले असून आज अकरा वर्ष होऊनही अद्याप त्याचा मोबदला त्या शेतकऱ्यांना मिळालेला नाही. दहा वर्षानंतर यातील काही क्षेत्र वगळण्याचा प्रस्ताव प्रशासनाने दिला असून तस न करता नियमानुसार त्या सर्व क्षेत्राचा समावेश करून ठरलेला मावेजा देण्यात यावा अशी मागणी आमदार कैलास पाटील यांनी केली. तसेच तालुका क्रीडा संकुलासाठी एमआयडीसी ने जागा उपलब्ध करून दिली होती पण स्थगिती सरकारकडून याला स्थगिती दिली आहे.

ती उठवून याठिकाणी सुसज्ज व अद्ययावत क्रीडा संकुल उभा करण्याची मागणी त्यांनी केली.

रस्ते विकास आराखडा करण्याचे काम थांबलेल आहे, यात शेतकऱ्यांच्या जमिनी रजिस्ट्री करण्याचा नियम केल्यानं ही अडचण बनली आहे.

त्याऐवजी शेतकऱ्यांकडून शंभर रुपयाच्या स्टॅम्पवर संमती पत्र घेतल्यास ही मोठी समस्या सुटण्यास मदत होईल व रस्त्याचा विकास करणे देखील सोयीचं होईल असं कैलास पाटील यांनी सरकारला सुचवले. त्याचप्रमाणे शेगाव - पंढरपूर हा रस्ता अर्धवट अवस्थेत आहे याकडेही पाटील यांनी लक्ष वेधत पाच वर्षांपासून या मार्गवरील मांजरा नदीवर असणाऱ्या पुलाच काम झालेलं नाही.

शिवाय येरमाळा, कन्हेरवाडी येथेही काम झालेलं नाही. याठिकाणी मोठया प्रमाणावर लूटमारीच्या घटना होत असून हे काम लवकर पूर्ण करावे.

या कामाचा गुत्तेदार पळून गेला असून त्याची जमा असलेली अनामत रक्कम जप्त करून हे काम पूर्ण करावे अशी मागणी आमदार कैलास पाटील यांनी यावेळी केली.

# रुईभर सोसायटी चेअरमनपदी बाबासाहेब कोळगे व व्हा. चेअरमनपदी प्रसन्न तीर्थकर



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२० डिसेंबर -**

विविध कार्यकारी सेवा सोसायटी चेअरमन पदी बाबासाहेब कोळगे व व्हायचेअरमन पदी प्रसन्न तीर्थकर यांची सर्वानुमते बिनविरोध निवड करण्यात आली.

निवडणूक निर्णय अधिकारी रेडेकर एन.टी. यांनी काम पाहिले. गटसचिव म्हणून श्री नानासाहेब कदम यांनी काम पाहिले.

नूतन चेअरमन व व्हायचेअरमन यांचा मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार घालून सत्कार करण्यात आला.

माजी चेअरमन पांडुरंग कुंडलिक कोळगे यांनी मार्गदर्शन करताना म्हणाली की, आपल्या संस्थेचे उत्तरोत्तर प्रगती व्हावी या दिशेने सर्वांनी सहकार्य करावे व कामात सातत्य ठेवून सभासदांना सहकार्याची भावना ठेवून सर्वांनी जबाबदारी ओळखून काम करण्याची अपेक्षा याप्रसंगी व्यक्त केली.

याप्रसंगी डॉ. आंबेडकर बाल विकास शिक्षण संस्थेचे अध्यक्ष शिक्षण महर्षी सुभाष कोळगे, माजी सरपंच पांडुरंग आबा कोळगे, भगवान गिरी महाराज, माजी मंडल अधिकारी किसन मते, माजी मुअ आगतराव भोईटे, भाजप किसान मोर्चाचे सचिव रामदास आण्णा कोळगे, राजारामबापू कोळगे, माजी सरपंच बालाजी कोळगे, गोपाळ निंबाळकर, प्रकाश भणगे, धनाजी चव्हाण, मारुती कस्पटे, निलावती वडवले, नवनाथ गव्हाणे, अशोक गव्हाणे, राजेंद्र भणगे, पोपट पाडुळे, दत्ता स्वामी, अशोक सिरसाठे, दत्तात्रय बनसोडे, विकास वडवले, शिवाजी काकडे, नामदेव कोळगे, नेताजी कोळगे, महादेव शिंपले, हनुमान जगताप, पंडित जगताप, किशोर कोळगे, भागवत परीट, मारुती कोळगे, रमेश कलाल, कालिदास कोळगे, गोपीनाथ कोळगे, नरेंद्र आगळे, हरिदास गव्हाणे यांच्यासह आदि मान्यवर मोठ्या संख्येने याप्रसंगी उपस्थित होते.

शेवटी सर्व उपस्थितांचे आभार नानासाहेब पवार यांनी मानले.

# शिक्षण परिषद म्हणजे नाविन्याचा स्वीकार करणे : अमोल ताकभाते



**तभा वृत्तसेवा**
**मंगरूळ, दि.२० डिसेंबर -**

शिक्षण परिषद म्हणजे नाविन्याचा स्वीकार करून विद्यार्थ्यांनी सर्वांगीण प्रगती साधुन आपले आपल्या गावाचे व जिल्ह्याचे नाव राज्यभर लौकिक करावे असे प्रतिपादन तुळजापूर पंचायत समितीचे गट विकास अधिकारी अमोल ताकभते यांनी मंगळवार १७ डिसेंबर रोजी खोताचीवाडी जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत केले.

तीर्थ खुर्द केंद्राची शिक्षण परिषद जिल्हा परिषद प्राथमिक शाळा खोताचीवाडी येथे आयोजित करण्यात आली होती.

यावेळी केंद्रप्रमुख तानाजी महाजन, सरपंच मोहिनीताई क्षीरसागर, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष नवनाथ शिंदे, तीर्थ खुर्द केंद्राच्या केंद्रीय मुख्याध्यापिका अंजली कावरे, मुख्याध्यापक जमदाडे, तज्ञ मार्गदर्शक उंडे, खोताचीवाडी शाळेचे मुख्याध्यापक खडके, सहशिक्षिका मनिषा क्षीरसागर, युवा प्रशिक्षणार्थी ज्योती जाधव हे उपस्थित होते.

या शिक्षण परिषदेमध्ये हॅकेथॉन उपक्रम, मराठी वाचन, उर्दू वाचन, मराठी वाचन अध्ययन स्तरानुसार समज पूर्वक वाचन, शाळेची टक्केवारी काढणे, PT-२, सन २०२३-२४ पासून प्राप्त शैक्षणिक साहित्याची सद्यस्थिती अभ्यासणे यावर सखोल असे मार्गदर्शन करण्यात आले.

खोताचीवाडी येथील या शिक्षण परिषदेस ओंकार गायकवाड शिक्षण गटविकास अधिकारी, काळे विस्ताराधिकारी, राऊत विस्ताराधिकारी यांनी भेट दिली.

यावेळी खोताचीवाडी शाळेतील विद्यार्थी यांनी लेझीम द्वारे वेलकम आणि पथनाट्य सादर करून सर्व उपस्थितांचे लक्ष वेधून घेऊन सर्वांची वाह वाह मिळवत दाद मिळवली.

मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा सन २०२४- २५ या स्पर्धेत जिल्ह्यात प्रथम क्रमांक आल्याबद्दल तीर्थ खुर्द केंद्रातील सर्व शाळेतर्फे प्रिंटर संच, शाल व बुके देऊन शाळेचे मुख्याध्यापक अशोक खडके, सहशिक्षिका मनीषा क्षीरसागर, युवा प्रशिक्षणार्थी ज्योती जाधव, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष नवनाथ शिंदे, सरपंच मोहिनीताई क्षीरसागर यांचा गटविकास अधिकारी पंचायत समिती ताकभाते यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

# तेरणा अभियांत्रिकी महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमानाने विधी साक्षरता शिबिर संपन्न



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२० डिसेंबर -**

येथील जिल्हा विधी सेवा प्राधिकरण आणि अभियांत्रिकी महाविद्यालय धाराशिव यांच्या संयुक्त विद्यमानाने नुकतेच विधी साक्षरता शिबिर घेण्यात आले. या विधी साक्षरता शिबिरासाठी दिवाणी न्यायाधीश मा. वसंत यादव (वरिष्ठ स्तर तथा सचिव जिल्हा विधी सेवा प्राधिकरण) मुख्य न्यायरक्षक ॲड. अमोल गुंड, ॲड भाग्यश्री रणखांब, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विक्रमसिंह माने, कार्यक्रम समन्वयक डॉ. उषा वडणे, महिला तक्रार निवारण समितीच्या अध्यक्ष प्रा. सुनीता गुंजाळ यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी

दिवाणी न्यायाधीश वसंत यादव मार्गदर्शन करताना म्हणाले की विविध स्तरावर जिल्हा विधी सेवा प्राधिकरण अंतर्गत सामाजिक समस्या सोडवण्याचा प्रयत्न केला जात असून यामध्ये अगदी बालविवाह पासून ते कुठल्याही महिलेवर लैंगिक अत्याचार किंवा अन्य समस्यांनी त्या ग्रस्त असतील तर जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाला त्या २४ तास केव्हाही फोन करून आपली अडचण, समस्या सांगून त्या सोडवू शकतात. यामुळे महत्त्वाचे म्हणजे महिलांमध्ये एक प्रकारे आत्मविश्वास येत असून त्यांनी आपल्या अडचणी निसंकोच पुणे तात्काळ सोडवाव्यात. असेही त्यांनी आवाहन केले. मुख्य न्यायरक्षक ॲड. अमोल गुंड यांनी पोक्सो कायद्याअंतर्गत जे गुन्हे घडतात त्या पाठीमागची पार्श्वभूमी सांगून यावरील विविध कायदे आणि त्यावर असलेली उपाययोजना, दंडात्मक कार्यवाही याविषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. तसेच रॅगिंग प्रतिबंधक कायदे किती कडक आहेत याविषयी सुद्धा विद्यार्थ्यांमध्ये जाणीव जागृती केली. ॲड. भाग्यश्री रणखांब यांनी कार्यालयीन क्षेत्रांमध्ये महिलांचा होत असलेला लैंगिक छळ याविषयी विस्तृत माहिती देऊन, चुकूनही कोणी अशा कचाट्यात सापडत असेल तर त्यांनी त्वरित याविषयी सजग राहून गुन्हेगारांना जरब बसवण्यासाठी कायद्याचा वापर केला पाहिजे, याविषयी सविस्तर अशी माहिती दिली. हे समजून सांगताना त्यांनी देशात घडलेल्या अनेक घटनांचा उल्लेख केला.

यावेळी बोलताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विक्रमसिंह माने म्हणाले की, आमच्या महाविद्यालयामध्ये पूर्वीपासूनच महिला तक्रार निवारण समिती अंतर्गत महिलांना, मुलींना वेळोवेळी कायद्याविषयी सज्ज करण्यासाठी आम्ही शिबिरे आयोजित करतो. जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाने राबविलेला हा उपक्रम स्तुत्य उपक्रम असून निश्चितपणे सर्व महाविद्यालयाला याचा फायदा होत असल्याबद्दल सर्व उपस्थित मान्यवरांचे आभार व्यक्त केले. कार्यक्रम समन्वयक डॉ. उषा वडणे यांनीही यावेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून कायदेविषयक सजग असणे ही काळाची गरज आहे असे प्रतिपादन केले. शेवटी महिला तक्रार निवारण समितीच्या अध्यक्ष प्रा. सुनीता गुंजाळ यांनी उपस्थित सर्वांचे मार्गदर्शन केल्याबद्दल आभार मानले.

या कार्यक्रमासाठी फर्स्ट इयर विभागाच्या कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ॲड. विमल म्हेत्रे यांनी केले.

# कळंब तालुका पत्रकार संघाचे पुरस्कार जाहीर

**तभा वृत्तसेवा**
**खामसवाडी, दि.२० डिसेंबर -**

सालाबादप्रमाणे कळंब तालुका पत्रकार संघाचे मानाचे पुरस्कार जाहीर करण्यात आले असून या वर्षी सोलापूर येथील एम.जे. प्रथम मानव सेवा संस्थेला तर मुंबई येथील विशाल परदेशी, कळंब येथील शिवाजी सावंत, सुभाष घोडके, आदर्श शिक्षक पुरस्कार ईटकुर जिल्हा परिषद शाळेतील उपक्रमशील शिक्षक अनिल शिरसागर, सुभाष कुलकर्णी, चंद्रकांत करडे यांना जाहीर करण्यात आले आहेत. कळंब पत्रकार संघाचे पुरस्काराचे हे २६ वे वर्ष आहे.

जानेवारीत २०२५ मान्यवरांच्या उपस्थितीत या पुरस्काराचे वितरण होणार असल्याची माहिती कळंब तालुका पत्रकार संघाचे अध्यक्ष अशोक शिंदे यांनी दिली. कळंब तालुका पत्रकार संघाच्या सदस्यांची बैठक पत्रकार भवन येथे अशोक शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली.

यावेळी विविध विषयावर चर्चा करण्यात येवून यावर्षीचे पुरस्कार जाहीर करण्यात आले.

# शिक्षण यशाची गुरुकिल्ली : डॉ. जीवन पवार

## तुळजाभवानी महाविद्यालयात अभिनव प्रयोगास तुळजापूरकरांचा शैक्षणिक विकासासाठी पाठींबा

### आम्ही तुळजापूरकर शिक्षणासाठी एक पाऊल पुढे अभियान..

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.२० डिसेंबर -**

शिक्षण यशाची गुरुकिल्ली आहे, हे ओळखून शिक्षणाच्या माध्यमातून राष्ट्रीय चारित्र्याचे नागरिक घडणे आवश्यक असल्याचे मत प्राचार्य डॉ. जीवन पवार यांनी शिक्षणासाठी एक पाऊल पुढे या अभियानात व्यक्त केले.

शैक्षणिक क्षेत्रातील समस्या या समाजासमोर आल्या पाहिजेत, महाराष्ट्राची कुलस्वामिनी आई जगदंबेमुळे तुळजापूर नगरीचे नाव देशाच्या नकाशावर दिसते अगदी त्याच प्रमाणे शिक्षणाचा बाबतीत सुध्दा तुळजापूर नगरीचे नाव आले पाहिजे यासाठी तुळजाभवानी महाविद्यालयात आम्ही तुळजापूरकर... शिक्षणासाठी एक पाऊल पुढे या अभिनव उपक्रमाचे उद्घाटन प्रमुख मान्यवरांच्या हस्ते संपन्न झाले. संस्था प्रार्थनेने कार्यक्रमाचा प्रारंभ झाला. पुढे बोलताना डॉ. पवार म्हणाले की, तुळजापूर तालुक्यातील विद्यार्थी गुणवत्ताधारक व होतकरू आहे. सदर उपक्रम हा महाविद्यालयापर्यंत मर्यादित नाही. त्याची व्यापकता समाजाने समजून घेणे गरजेचे आहे, जर आपले विद्यार्थी शिक्षणासाठी शहराबाहेर जात असतील तर आपण ही कुठेतरी यासाठी जबाबदार आहोत याची जाणीव आपणांस गरजेची आहे. ही बाब आपण लक्षात घेणे गरजेचे आहे. भविष्याचा विचार करून विद्यार्थ्यांना शिक्षण देणे गरजेचे आहे आणि यासाठीच या अभिनव उपक्रमाचे आयोजन करण्यात आल्याचे यावेळी प्राचार्य डॉ. जीवन पवार यांनी सांगितले. यावेळी पालक संवाद सत्रामध्ये महिलांसाठी उद्योजकता प्रशिक्षण, शाळा बहाय मुलांना शिक्षण देणे, बालकांसाठी मैदान उपलब्ध करून देणे, बदलत्या जीवनशैलीच्या पध्दतीने शैक्षणिक सुविधा निर्माण करणे, नवीन लोकांचे गेस्ट लेक्चर्स आयोजित करणे, भविष्यात मेडिकल कॉलेज, नर्सिंग कॉलेज स्थापन करुन ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक संधी मोठ्या प्रमाणात उपलब्ध करून देणे, कॉपी मुक्त परीक्षा घेणे, विज्ञान शाखा सुरु करणे, नाईट कॉलेज सुरू करणे, व्यसनमुक्ती साठी प्रयत्न करणे, स्पर्धा परीक्षा तयारीसाठी पुस्तके आणि अभ्यासिका उपलब्ध करून देणे या बाबी समोर ठेवून एक शैक्षणिक आराखडा तयार करण्यात यावा अशा आवश्यक मागण्या पालकांच्या आणि उपस्थितांच्या माध्यमातून मांडण्यात आल्या.

यावेळी कार्यक्रमास सामाजिक व राजकीय क्षेत्रातील सर्व नागरीक उपस्थित होते. कार्यमासाठी डॉ. आनंद मुळे यांचे सहकार्य लाभले कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. बाबर यांनी तर आभार प्रा. धनंजय लोंढे यांनी मानले.

# छत्रपती शिवाजी विद्यालयात गुणवंत विद्यार्थी सत्कार सोहळा उत्साहात संपन्न



**तभा वृत्तसेवा**
**वाशी, दि.२० डिसेंबर -**

छत्रपती शिवाजी विद्यालय, वाशी येथे गुणवंत विद्यार्थी सत्कार सोहळा उत्साहात संपन्न झाला.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जयकुमार शितोळे खजिनदार श्री. शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ,बार्शी तर प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. राजाभाऊ टेकाळे प्राचार्य बी.जी.पी. एस. महिला बी.एड. महाविद्यालय, छत्रपती संभाजी नगर,सोमनाथ घोलप गटशिक्षणाधिकारी, गटशिक्षण कार्यालय वाशी, विजयाताई गायकवाड नगराध्यक्ष, नगरपंचायत वाशी, सुरेश कवडे, उपनगराध्यक्ष नगरपंचायत वाशी, अमर चेडे, पोलिस उपनिरीक्षक विनोबा भावे नगर पोलिस स्टेशन कुर्ला मुंबई, तानाजी शिनगारे चेअरमन शालेय समिती, प्राचार्य डॉ. अरुण गंभीरे व मुख्याध्यापक संतोष माने उपस्थित होते.

गुणवंत विद्यार्थी सत्कार सोहळा या कार्यक्रमात वाशी गावातील व परिसरातील विविध शिक्षणप्रेमी व दानशूर व्यक्तींनी रोख रकमेच्या स्वरूपात देण्यात आलेली पारितोषिके गुणवंत विद्यार्थ्यांना वितरित करण्यात आली. शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मध्ये एस.एस.सी. परीक्षेत विद्यालयातील प्रथम क्रमांक प्राप्त मोराळे प्रेमराज लक्ष्मण (९९.४०% गुण) या विद्यार्थ्याला एकूण पारितोषिक रक्कम रुपये १४७५०, एक सायकल, एक पुस्तक व सन्मान चिन्ह इ.पारितोषिक मान्यवरांच्या हस्ते वितरित करण्यात आली.

द्वितीय क्रमांक प्राप्त व विद्यालयातून मुलीतून प्रथम फारणे अनुजा शशिकांत (९८.२०% गुण) या विद्यार्थिनीला एकूण पारितोषिक रुपये १०६९७, दोन पुस्तक,एक सन्मानचिन्ह इ. पारितोषिके वितरण करण्यात आली. तसेच द्वितीय क्रमांक प्राप्त विद्यार्थी अथर्व उमेश चेडे (९८.२०% गुण) या विद्यार्थ्याला ३०४० रुपये, पुस्तक व सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला.

तृतीय क्रमांक प्राप्त विद्यार्थिनी कवडे मदुरा जयंत (९८.००% गुण) या विद्यार्थिनीला एकूण पारितोषिक रुपये ५४३० पुस्तक व सन्मानचिन्ह देऊन मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. त्याचबरोबर एस.एस.सी. परीक्षेत ९०% पेक्षा अधिक गुण घेणाऱ्या २१ विद्यार्थ्यांना डॉ.बी.वाय. यादव, अध्यक्ष श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ बार्शी यांच्या वतीने रोख पारितोषिक देऊन सन्मानीत करण्यात आले. याचबरोबर पूर्व उच्च प्राथमिक व पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परिक्षा, नवोदय प्रवेश परीक्षा व एन.एम.एम.एस. परीक्षेत यश संपादन केलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांना रोख पारितोषिक देऊन गौरव करण्यात सदरील कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी विद्यालयाच्या मुख्याध्यापिका एस.व्ही. गाढवे, पर्यवेक्षक बी.एम. सावंत यांचे मार्गदर्शन लाभले. या कार्यक्रमासाठी संदीप कवडे, उपाध्यक्ष शाळा व्यवस्थापन समिती, नेताजी नलवडे, उपाध्यक्ष शिक्षक-पालक संघ यांचे सहकार्य लाभले. विद्यालयातील सर्व शिक्षक, शिक्षिका, शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी परिश्रम घेतले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन धारकर एस.एस., देशमुख जी.एम., वाघेरे ए.बी. यांनी तर आभार पर्यवेक्षक बी.एम.सावंत यांनी मानले.

# जळकोट येथे तेजग्रंथ रथयात्रेचे स्वागत

**तभा वृत्तसेवा**
**जळकोट, दि.२० डिसेंबर -**

पुणे येथील तेजज्ञान फौंडेशन (हॅप्पी थॉट्स) या संस्थेचे सर्वेसर्वा सरश्री तेजपारखीजी यांच्या अथक परिश्रमाने उच्चतम विकसित समाज निर्माण करण्यासाठीचे उच्च कार्य अविरतपणे गेले २५ वर्षे विनामुल्य कार्य सुरू आहे. तेजग्यान संस्थेतर्फे उच्चतम विचारसरणी वाढीस लागावी व समाजाला उच्च ज्ञानदानाचा लाभ व्हावा. या उद्देशाने तेजग्रंथ रथयात्रा काढण्यात आली आहे. तेजग्रंथ रथयात्रा जळकोट येथे आली असता, जळकोट येथील तेजसाधक व मान्यवरांच्या हस्ते स्वागत करण्यात आले.

यावेळी तेजज्ञान संस्थेच्या रथयात्रेचे जळकोट येथील साधक आणि पत्रकार मेघराज किलजे आणि नागरीक मोठ्या संख्येने उपस्थित होते. सदर रथयात्रा संपूर्ण महाराष्ट्रात तेजगुरू सरश्री तेजपारखीजी लिखित पुस्तकांचे प्रचार आणि प्रसार करण्यासाठी रथयात्रा काढली असल्याचे रथयात्रेसोबत असणारे तेजसाधक आनंद जाधव (कोल्हापूर) यांनी सांगितले. यामध्ये विचार नियम, गर्भ संस्कार, मूर्ती पूजा करावी की करु नये, आजची स्त्री आत्मनिर्भर कशी बनेल, मानवी जीवनाचे संपूर्ण लक्ष, अंतर्मनाच्या शक्ती पलीकडील आत्मबळ, स्वास्थ्य प्राप्तीसाठी विचार नियम, ध्यान साधना कशी करावी,द मन,शोध ईश्वराचा, भगवद्गगिता अशी हजारो विषयावर सरश्री लिखित पुस्तकांचे प्रदर्शन यावेळी मांडण्यात आले होते. याचा लाभ अनेकांनी यावेळी घेतला.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

# इस्मालवाडी येथील तरुण शेतकऱ्याची सततची नापीकी व कर्जबाजारीपणाला कंटाळुन गळफास घेउन आत्महत्या

**तभा वृत्तसेवा**
**वलांडी, दि.२० डिसेंबर -**

तालुक्यातील इस्मालवाडी येथील सोमेश्वर खंडु मुगळे वय ३३ या तरुण शेतकऱ्यांने गळफास घेत आपली जिवनयात्रा संपवली आहे.



सोयाबीनचे घटलेले बाजारभाव, गेल्या तीन वर्षापासुनची दुष्काळी स्थीती, सततची नापीकी, यावर्षी पावसाच्या लहरीपणामुळे वाया गेलेला खरीप हंगाम, खर्च अन उत्पन्नाचा न बसत असलेला मेळ, कर्जाचे वाढत चाललेले चक्र यामुळे इस्मालवाडी गावातील तरुण व उमद्या शेतकऱ्यांने टोकाचे पाऊल उचलत आत्महत्या केली. गेल्या अनेक दिवसापासुन ते विमनस्क अवस्थेत होते. दोन एकर शेतीत कुंटुबाचा उदरनिर्वाह कसा भागवावा अन तीन लेकरांचे शिक्षण त्यांच्या गरजा पुरेशा करण्यात येत असलेल्या अडचणी, कर्जाचा वाढता डोंगर याला कटांळत दोन दिवसापुर्वी ते अचानक निघुन गेल्याने कुंटुबीय व ग्रामस्थांना त्यांचा शोध घेतला. गुरुवारी भांतब्रा (ता. भालकी, जिल्हा बिदर) येथे त्यांनी गळफास घेउन आत्महत्या केल्याचे निदर्शनास आले.

त्याच्या पार्थिवाचे भालकी येथील शासकीय रुग्नालयात शवविच्छेदन करण्यात आले असुन भालकी पोलीस ठाण्यात नोंद करण्यात आली आहे. त्याच्या पश्च्यात पत्नी, तीन मुली, आई, वडील एक भाऊ असा परिवार आहे.

## शिवाजी महाविद्यालयात आरोग्य तपासणी शिबिर संपन्न



**तभा वृत्तसेवा**
**उदगीर, दि.२० डिसेंबर -**

शिवाजी महाविद्यालय उदगीर आणि धन्वंतरी आयुर्वेदिक महाविद्यालय व हॉस्पिटल उदगीर यांच्या संयुक्त विद्यमाने मोफत' आरोग्य तपासणी शिबिराचे' यशस्वी आयोजन करण्यात आले. सदरील शिबिराचे आयोजन भारत सरकारच्या 'प्रकृती परीक्षण अभियानांतर्गत 'करण्यात आले होते.

या शिबिराचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर.एम. मांजरे हे होते कार्यक्रमाचे उद्घाटक पृथ्वीराज पाटील तर प्रमुख उपस्थिती धन्वंतरी आयुर्वेदिक महाविद्यालल्याचे प्राचार्य डॉ. दत्तात्रय पाटील, डॉ.व्ही.एम. पवार, डॉ.ह.वा. कुलकर्णी, डॉ.आर.बी. एडतकर, डॉ.डी.बी. कोनाळे यांची आणि धन्वंतरीचे तज्ज्ञ डॉक्टर्स यांची होती. प्राचार्य डॉ. दत्तात्रय पाटील यांनी आपण आणि आपले आरोग्य कसे सांभाळावे या अनुषंगाने उपस्थितांना आयुर्वेद चिकित्सा पद्धती बाबत प्रबोधन केले. कार्यक्रमाचे उद्घाटक पृथ्वीराज पाटील यांनी, आरोग्य ही काळाची गरज आहे पैसा कमवणारे आपणच आहोत.

परंतु पैशापेक्षा आरोग्याला महत्त्व दिले पाहिजे याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. अध्यक्षीय समारोपप्रसंगी प्राचार्य डॉ. मांजरे म्हणाले, विद्यार्थ्यांनी सर्वप्रथम आरोग्य सांभाळावे,मोबाईल पासून दूर राहावे, व्यायाम करावा. यावेळी महाविद्यालयातील विद्यार्थी विद्यार्थिनी, प्राध्यापक, कार्यालयीन कर्मचारी, शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी शिबिरात सक्रिय सहभाग नोंदवून आरोग्य तपासणी करून घेतली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन, प्रास्ताविक राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी प्रा. बालाजी सूर्यवंशी यांनी केले तर आभार डॉ. विष्णू पवार यांनी मानले.

## नाथ सोहळ्यातील संतूर वादनाने भाविक रसिक मंत्रमुग्ध



**तभा वृत्तसेवा**
**औसा, दि.२० डिसेंबर -**

पद्मश्री सतीश व्यास यांच्या संतूर वादन मैफलीचा शहरातीलच नव्हे तर तालुका व कर्नाटक,आंध्र, तामिळनाडूसह राज्यातील भाविकांनी आस्वाद घेतला. शहरात पहिल्यांदाच होत असलेल्या या संतूर वादन कार्यक्रमाने भाविकांसह रसिकही मंत्रमुग्ध झाले. तर माजीमंत्री बसवराज पाटील मुरुमकर यांनी या सोहळ्यात हजेरी लावून या वादन कार्यक्रमाचा आनंद घेतला.

अंगावरील ऊबदार कपड्यानंतरही अंगात हुडहुडी भरणाऱ्या कडाक्याच्या थंडीत या वर्षीचा संगीत सोहळा रसिकांसाठी मेजवानी ठरला आहे. रविवार दि.१५ रोजी सायंकाळी दहीहंडी फोडून महाप्रसादाने या तीन दिवशीय महोत्सव सोहळ्याची सांगता करण्यात आली. श्री सचिदानंद सद्गुरू विरनाथ मल्लिनाथ महाराज नाथ संस्थानचे चौथे पिठाधिपती समर्थ सद्गुरु श्री ज्ञानेश्वर महाराज औसेकर यांच्या २५ व्या पुण्यस्मरण सोहळा व दत्तजयंतीचे औचित्य साधून तीन दिवशीय कार्यक्रमाचे आयोजन पिठाधिपती गुरुबाबा महाराज औसेकर यांच्या अधिपत्याखाली व पंढरपुर येथील विठ्ठल रुक्मिणी मंदीर समितीचे सहअध्यक्ष गहिणीनाथ महाराज औसेकर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले होते. या उत्सव काळात सकाळ, संध्याकाळ पारंपरिक अभंग, हरिपाठ, सायंकाळी प्रासादिक चक्रीभजन, हरिकिर्तन व हरिजागर असा दैनंदिन कार्यक्रम झाला.

या संगीत व शास्त्रीय गायन कला सेवा दरबार सोहळ्याचे उद्घाटन माजी मंत्री बसवराज पाटील, पिठातीपती गुरूबाबा महाराज औसेकर, हभप गहिनीनाथ महाराज औसेकर, गोरखनाथ महाराज औसेकर, बसवंत देशमुख देशमुख, मच्छिंद्रनाथ महाराज यांच्या हस्ते मान्यवरांच्या उपस्थितीत करण्यात आले. रविवारी सायंकाळी ५ वा. सुमारास औसा, महाराष्ट्र, आंध्र, कर्नाटक व तामिळनाडू राज्यातील शेकडो भाविकांनी सद्गुरूंच्या दर्शनासाठी व काल्याचा महाप्रसादासाठी गर्दी केली होती.

## संगत चांगल्या लोकाची धरा, वाईट गुण लागणार नाहीत : हभप. मनोहर महाराज

**तभा वृत्तसेवा**
**येरोळा, दि.२० डिसेंबर -**

शहरासह ग्रामिण भागात आरजकता माजली आहे. गावोगाव प्रत्येकाच्या जीवनात संतांचे फार मोठे समर्पण आहे. या जगामध्ये उद्धाराला कारणीभूत जर कोण असेल तर संत आहे. म्हणून जीवनामध्ये संतांची संगत धरा, संगतीने माणूस घडत असतो आणि वाइट संगतीने माणूस बिघडत असतो. ढेकणाच्या संगे हिरा जो भंगाला कुसंगे नाडीला साधू जैसा, असे हभप. मनोहर महाराज सायखेडे नाशिककर यांनी सांगितले. निर्व्यसनी बनावे, परमार्थ करावा, उद्योग करावा आणि आपल्या जीवनाचे सार्थक करून घ्यावे, असाही संदेश मनोहर सायखेडे महाराजांनी दिला. यावेळी प्रनेते हभप. सुरेश महाराज सारसेकर यांनी मानाची घोंगडी शालश्रीफळ देऊन समाजातील प्रगतशिल शेतकरी, भजनकरी व उद्योजक यांचा सत्कार केला.

## दैठणा येथील कॉंग्रेस पार्टीच्या कार्यकर्त्यांच्या राजकीय विचारांचे सांत्वन

**तभा वृत्तसेवा**
**दैठणा, दि.२० डिसेंबर -**

अभय साळुंके यांच्याकडून दैठणा येथील आपल्या कॉंग्रेस पक्षांच्या राजकीय कार्यकर्त्यांची भेट घेऊन त्यांच्या मनाचे सांत्वन करण्यात आले. अनेक राजकारणातील उमेदवार आपल्याला अपयश आल्यानंतर सहसा पुन्हा त्या मतदारसंघांमध्ये वेळ देत नाहीत. पण सगळ्यापेक्षा वेगळेच असे या निलंगा विधानसभा मतदारसंघातील पराभूत उमेदवार अभय दादा साळुंके, यांच्याकडून जे आतापर्यंत कोणाकडून घडलेले नाही ते या ठिकाणी घडलेले दिसून येत आहे.



आपण या निवडणुकीत स्वतः पराभूत झालो पराभूत होणे हा गुन्हा नाही शेवटी खेळ हा जन आशीर्वादाचा असतो आपल्याला थोडाफार आशीर्वाद कमी पडला म्हणून काय झाले. येणाऱ्या काळामध्ये आपण पुनश्च प्रयत्न करू आज आपण हरलो म्हणून हार म्हणायचे नाही. कारण आपल्या प्रयत्नाने हार पत्करलेली नाही तुमच्या प्रत्येक संकटात मी २४ तास तुमच्यासोबत आहे. कधीही माझ्याशी संपर्क करा. अशा प्रकारचा आपल्या समर्थकांना अभय दादा साळुंके यांच्याकडून शब्द देण्यात आला. याबद्दल यांचे दैटना गावात आज गावभर कौतुक होत असताना दिसून येत आहेत.

याप्रसंगी कॉंग्रेस पार्टीचे कार्यकर्ते विजयकुमार पाटील, अजित माने हे सोबत होते, आणि याचप्रमाणे दैटना गावातील, प्रवीण सांगवे, आशिष बिरादार, सुखदेव पाटील, दिलीप बिरादार उर्फ मेजर, अर.बी. मुळे, विनायक महाराज, आकाश बिरादार व पंकज सूर्यवंशी हे सर्वजण सोबत होते.

## पालकांनी आपल्या पाल्यासाठी वेळ द्यावे : डॉ. ज्ञानोबा मुंढे




**तभा वृत्तसेवा**
**उदगीर, दि.२० डिसेंबर -**

विश्वनाथ चलवा प्राथमिक विद्यालय, उदगीर येथे आयोजित केलेल्या पालक मेळाव्याच्या कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून बोलत असताना गट साधन केंद्र उदगीर येथील विषय साधनव्यक्ती डॉ. ज्ञानोबा मुंढे यांनी पालकांनी आपल्या पाल्यासाठी वेळ द्यावे, असे मत व्यक्त केले.

यावेळी व्यासपीठावर पालक प्रतिनिधी प्रा. राठोड, हरिविजय देशपांडे, एन.व्ही. सोमवंशी हे उपस्थित होते. सदरील कार्यक्रमाचे अध्यक्ष शाळेचे मुख्याध्यापक आलट डी.एम. हे होते. पुढे बोलताना डॉ. ज्ञानोबा मुंढे म्हणाले की, आई हा बालकाचा पहिला गुरु आहे. तर कुटुंब ही पहिली शाळा आहे. विद्यार्थी हे शाळेत फक्त आठ तास राहतात, तर पालकांच्या संपर्कात म्हणजे आपल्या घरी सोळा तास राहतात. त्यासाठी पालकांनी आपल्या पाल्यावर योग्य संस्कार करणे, त्यांच्यासाठी वेळ देणे, त्यांच्या अभ्यासाचा आढावा घेणे, अत्यंत महत्त्वाचे आहे.

पालकांनी आपल्या लेकरांच्या आवडीनिवडीचा विचार करून त्यांना शिक्षण द्यावे. त्यांच्या कलागुणांना व्यासपीठ मिळवून द्यावे. बऱ्याच वेळा शाळेने आयोजित केलेल्या पालक सभेसाठी पालक उपस्थित राहत नाहीत. ते आम्हाला वेळ नाही असं सांगतात.

जर आपल्या पाल्यासाठी वेळ द्यायला आपल्याकडे वेळ नसेल तर ही अत्यंत दुर्दैवी बाब आहे. त्यासाठी पालक मेळाव्याला पालकांनी उपस्थित राहणे गरजेचे आहे. पालकांनी जागरूक होणे महत्त्वाचे आहे. पालकांनी काळानुसार बदलणे गरजेचे आहे.जर आपला बालक घडवायचा असेल तर आपल्या पाल्यासाठी प्रत्येक पालकांनी वेळ द्यावा. असे मत डॉ. ज्ञानोबा मुंढे यांनी व्यक्त केले.

यावेळी शिक्षक प्रतिनिधी म्हणून दाडगे एस.डी. यांनी मनोगत व्यक्त केले.अध्यक्षीय समारोपाच्या भाषणात डी.एम. आलट म्हणाले की, आमच्या पालकांचे आम्हाला खूप सहकार्य आहे. त्यांच्या मदतीनेच आम्ही शाळेमध्ये विविध उपक्रम राबवून मुलांना आनंददायी शिक्षण देत असतो. पालकांनी आपल्या अडीअडचणी सांगाव्यात. आम्ही त्या निश्चितपणे सोडविण्याचे काम करू. असे आश्वासन अध्यक्षीय समारोपाच्या माध्यमातून डी एम आलट यांनी दिले.

यावेळी प्रमुख पाहुण्यांचा परिचय तांबोळी जी.बी. यांनी करून दिला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक ए.आर. मोरे यांनी मांडले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन एन.व्ही. सोमवंशी यांनी केले, तर कार्यक्रमाचे आभार यु.बी. बोळेगावे यांनी व्यक्त केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शाळेतील सर्व शिक्षकांनी सहकार्य केले.

## गणेश विद्यालयात विज्ञान प्रदर्शन साजरे



**तभा वृत्तसेवा**
**औसा, दि.२० डिसेंबर -**

औसा तालुक्यातील उजनी येथील श्री गणेश विद्यालयातील शालेय विज्ञान प्रदर्शनाचे उद्घाटन श्री गणेश शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव धनराज पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. या प्रदर्शनात ४१ स्पर्धकांनी सहभाग घेतला होता.

विद्यालयाचे मुख्याध्यापक पी.पी कोपरकर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. संस्था सदस्य काशिनाथ कदम यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी विद्यालयातील इयत्ता पाचवी ते दहावीच्या विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवला. या प्रदर्शनात ४१ प्रकल्प या प्रदर्शनात विद्यार्थ्यांनी मांडले होते. त्यासाठी विज्ञान शिक्षक डोकडे, टापरे, वाघमारे, भालेकर, मुळे, गावित, शिवराज पाटील यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. विद्यालयाचे पर्यवेक्षक मोहन ठाकूर तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी विज्ञान प्रदर्शनात सहभाग नोंदवलेल्या विद्यार्थ्यांचे भरभरून कौतुक केले. यामध्ये थ्रीडी होलोग्राम व अन्न पचन सादरीकरण करणारे मॉडेल असे अनेक प्रयोग या प्रदर्शनाचे आकर्षण ठरले. या प्रसंगाचे औचित साधून शाळेचे ग्रंथपाल दिपक कोपरकर यांनी शाळेस ३००० रू चे पुस्तक भेट म्हणून दिले. तसेच अनेक पालक व जि.प.प्रा.शाळा उजनी येथील विद्यार्थ्यांनी या विज्ञान प्रदर्शनास भेट दिली.

## जिल्हा परिषद प्रशालेत भरला आनंद बाजार; तीन तासांतच लाखांची उलाढाल

### व्यावसायिक बनले जिल्हा परिषदेचे विद्यार्थी

**तभा वृत्तसेवा**
**वलांडी, दि.२० डिसेंबर -**

शाळेत खेळण्या बागडण्याच्या वयात पुस्तकी ज्ञानासोबतच व्यवहार काय असतो, आपला माल विक्री कसा करायचा अन् हिशोबाने पैसे कसे कमवायचे याचा अनुभव देण्यासाठी देवणी तालुक्यातील जवळगा येथील येथील जिल्हा परिषद प्रशालेत आनंद बाजार भरला होता.



आनंद बाजार एक अभिनव प्रयोग राबविण्यात आला. या बाजारात पालक, ग्रामस्थ हे ग्राहक झाले अन् मुले विक्रेते. विद्यार्थ्यांनी भरविलेल्या या बाजारात तीन तासांतच लाखांची उलाढाल खरेदी विक्रीचा व्यवहार झाला. यानिमित्ताने चिमुकल्यांनी व्यावहारिक ज्ञानाचा अनुभव घेतला.

प्रशालेत स्काऊट गाईड अभियान अंतर्गत आनंद मेळावा भरला होता. शाळेतील पहिली ते दहावीच्या विद्यार्थ्यांनी विविध पदार्थांची सुमारे ऐंशीच्यावर दुकाने व स्टॉल लावले.

या बाजाराचे उद्घाटन डॉ. जनार्धन बिरादार यांच्या हस्ते करण्यात आले. तर यावेळी शालेय व्यवस्थापन अध्यक्ष अनिल पाटील, सरपंच प्र. विजयकुमार वामनराव पाटील ग्रामपंचायत सदस्य, पालक तसेच ग्रामस्थ उपस्थित होते.

तसेच ग्रामपंचायत कार्यालयाकडून प्रथम येणाऱ्या स्टॉल ला प्रोत्साहनपर बक्षीस देण्यात येणार आहे.

या बाजारात विद्यार्थ्यांनी पालक, वांगे, बटाटे, टोमॅटो, कोथिंबीर, बीट, पपई, भोपळा, विविध फळे, इडली, दोसा, पोहे, अप्पे, वडापाव, सुशिला, रोटी भज्जी, मिरची भजे, भेळ, पाणीपुरी, पावभाजी, डोसा, मसालेदार, मसाला पापड, चणे, चहा, गोळ्या, बिस्किटे, चॉकलेट व कुरकुरे यांची दुकाने लावली होती.

गावातील लहान थोर नागरिकांसह महिला व तरुणांनी उत्स्फूर्तपणे प्रतिसाद देत व खरेदी केल्याने १ लाख ३ हजार ४३० रुपयांची उलाढाल झाली.बाजारात चिमकल्यांकडून खरेदी करण्यासाठी ग्राहकांची गर्दी झाली होती.

याप्रसंगी ग्रामस्थांनी आवडीने खाऊचा आस्वाद घेतला. यामुळे विद्यार्थ्यांना गणिती संकल्पना, नफा-तोटा,व्यवहारज्ञान कौशल्य, विद्यार्थ्यांना अनुभवातून शिकायला मिळाले. बाजारात चिमुकले दुकानदार आणि खरेदीदार यांच्या चेहऱ्यावर आनंद दिसून येत होता.

प्रशालेचे प्रभारी मुख्याध्यापक दत्तात्रय कदम, उपक्रमशील शिक्षक लक्ष्मण चिंते, पांडुरंग येलमटे, बाळासाहेब कांबळे, विठ्ठल केंद्रे, शिवकुमार बिरादार, मंजुषा सुडे, राजकुमार सोनकांबळे, सुनिता सावंत आदींनी या उपक्रमाचे नियोजन केले होते.

## क्राईम वृत्त...



### लालबहादूर शास्त्री विद्यालयातील अपूर्वा शेंडगे हिचे वक्तृत्व स्पर्धेत घवघवीत यश

**उदगीर, दि.२० डिसेंबर -**

सरदार वल्लभभाई पटेल प्राथमिक विद्यालय उदगीर येथे घेण्यात आलेल्या वक्तृत्व स्पर्धेत लालबहादूर शास्त्री विद्यालयातील अपूर्वा रमेश शेंडगे हिचा तृतीय क्रमांक आला. ही स्पर्धा दोन गटात घेण्यात आली होती. पाचवी ते आठवी गटामधून अपूर्वाने तृतीय क्रमांक पटकावला. स्पर्धेचा विषय आधुनिक आई कुटुंबासाठी शाप की वरदान असा होता. तिच्या यशाबद्दल तिचे कौतुक करताना स्थानिक समन्वय समितीचे अध्यक्ष मधुकरराव वट्टमवार कार्यवाह तथा केंद्रीय कार्यकारणी सदस्य शंकरराव लासुणे, शालेय शिक्षण समितीचे अध्यक्ष सतनप्पा हुरदळे, मुख्याध्यापक बालासाहेब केंद्रे, उपमुख्याध्यापक अरुण पत्की, पर्यवेक्षक कृष्णा मारावार, पर्यवेक्षक किरण नेमट, शालेय समितीचे सदस्य संतोषराव कुलकर्णी, वक्तृत्व स्पर्धा प्रमुख अंबिका पारसेवार, सहाय्यक करुणा गायकवाड व शाळाबाह्य स्पर्धा परीक्षा प्रमुख नीता मोरे यांनी शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी पाचवी ते आठवी विभागातील सर्व शिक्षक कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.



### लालबहादुर शास्त्री प्राथमिक शाळेत संत गाडगेबाबा यांची पुण्यतिथी साजरी

**उदगीर, दि.२० डिसेंबर -**

येथील भारतीय शिक्षण प्रसारक संस्था, अंबाजोगाई द्वारा संचलित लालबहादुर शास्त्री प्राथमिक विद्यालयात विद्यार्थ्यांना थोर समाजसुधारक, स्वच्छता अभियानाचे जनक संत गाडगेबाबा यांच्या कार्याची माहिती व्हावी म्हणून त्यांच्या पुण्यतिथीनिमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमासाठी अध्यक्ष म्हणून मुख्याध्यापक अंकुश मिरगुडे तर, प्रमुख वक्ते म्हणून सचिन आगलावे उपस्थित होते. मान्यवर पाहुण्यांच्या हस्ते प्रतिमा पूजन व दिपप्रज्वलन करण्यात आले. गुलाबपुष्प देऊन शाळेच्या वतीने मान्यवर पाहुण्यांचे स्वागत करण्यात आले. प्रमुख वक्ते सचिन आगलावे यांनी संत गाडगेबाबा यांनी दिन-दलितांसाठी शाळा काढल्या. अन्नक्षेत्र सुरू केले. ते गावोगावी फिरुन, आपल्या किर्तनातून शिक्षणाचे महत्त्व व स्वच्छतेचा संदेश देत असत. विद्यार्थ्यांना स्वच्छतेची प्रतिज्ञा दिली. संत गाडगेबाबांच्या महान कार्याविषयी सविस्तरपणे माहिती विद्यार्थ्यांना दिली. अध्यक्षीय समारोपपर भाषणात मुख्याध्यापक अंकुश मिरगुडे यांनी संत गाडगेबाबांनी सांगितल्याप्रमाणे अंधश्रद्धा बाळगू नका. आपले घर जसे स्वच्छ ठेवतो, त्याप्रमाणे आपल्या घराचा परिसर, वर्ग, शालेय परिसर स्वच्छ ठेवण्याचा संकल्प करण्याचे आवाहन केले. सुत्रसंचलन सौ मंजुषा पेन्सलवारबाईंनी केले.



### डॉ.भाभा बाल वैज्ञानिक परीक्षेत यशवंतविद्यालयाचे यश

**अहमदपूर, दि.२० डिसेंबर -**

टीचर्स असोसिएशन मुंबई यांच्या वतीने डॉक्टर होमी बाबा बाल वैज्ञानिक परीक्षा दि.२९ नोव्हेंबर रोजी होऊन त्यात यशवंत विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी नेत्र दीपक यश संपादन केलेले आहे. सदरची परीक्षा नववी आणि सहावी इयत्तेसाठी असून नववी मध्ये कुमारी फड वैष्णवी शिवशंकर, वलसे अर्जुन बालाजी, हंगरगे सतेज शंकर यांनी तर सहावीतील आरदवाड आयुष्य अंगद सेकंड लेव्हल साठी पात्र ठरलेले आहेत. या विद्यार्थ्यांना विज्ञान विषयाचे सहशिक्षक अमोल लगड, विवेकानंद हुडे आणि यशवंत कोटा पॅटर्न यांचे विशेष मार्गदर्शन लाभले होते. या चारही गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार शालेय प्रार्थने मध्ये प्राचार्य गजानन शिंदे यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी उपमुख्याध्यापक माधव वाघमारे, पर्यवेक्षक राम तत्तापुरे, शिवाजीराव सूर्यवंशी, कोटा पॅटर्नचे प्रमुख खय्युम शेख यांच्यासह मान्यवरांची उपस्थिती होती. या नेत्र दीपक यशाबद्दल गुणवंत विद्यार्थी आणि मार्गदर्शक शिक्षकांचे टागोर शिक्षण संस्थेचे अध्यक्ष डॉ. अशोकराव सांगवीकर, सचिव शिक्षण महर्षी डी.बी. लोहारे गुरुजी, उपाध्यक्ष डॉ. भालचंद्र पैके, सहसचिव प्राध्यापक डॉ. सुनिता चवळे यांनी अभिनंदन केले आहे.

### ॲड. अनंतराव सबनीस यांचे निधन

**निलंगा, दि.२० डिसेंबर -**



निलंगा न्यायालयातील ज्येष्ठ विधिज्ञ अनंतराव बाबाराव सबनीस यांचे शुक्रवार दि.२० डिसेंबर रोजी सकाळी ९ वाजता निलंगा येथील राहत्या घरी वृध्दापकाळाने ९४ व्या वर्षी निधन झाले. साधारण ७० वर्षे त्यांनी वकीली व्यवसाय केला. ते विद्वान व शिस्तबद्ध विधिज्ञ म्हणून विख्यात होते. अफाट वाचन, अध्यात्माचा अभ्यास व असलेले ज्ञान इतरांना सांगणे, मोठा जनसंपर्क हे त्यांचे गुण वैशिष्ट्य होते. त्यांच्या पश्चात दोन मुले, एक मुलगी, चार सूना व नातवंडे असा परिवार आहे.

# लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.




# स्मृती दिनी संत गाडगेबाबा यांना अभिवादन

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २० डिसेंबर-**
संत गाडगेबाबा चौकात थोर समाजसुधारक संत गाडगेबाबा यांच्या ६८ व्या स्मृती दिनानिमित्त संत गाडगेबाबा यांच्या प्रतिमेस लातूर शहर महानगरपालिका माजी उपमहापौर चंद्रकांत बिराजदार,माजी नगरसेवक आनंत गायकवाड ,लातूर शहर पूर्व भाग नागरी कृती समितीचे अध्यक्ष दीपक गंगणे , सचिव बाबासाहेब बनसोडेयांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन केले. यावेळी संत गाडगेबाबा चौक फलकाचे अनावरण करण्यात आले.

या वेळी प्रस्तविकात प्रा. गिरीधर तेलंगे यांनी लातूर शहर महानगरपालिका कडून स्क्राप मार्केट गोरक्षण मार्गे रींग रोड चौकास संत गाडगेबाबा चौक नावाचा ठराव घेऊन तसे फलक बसवण्यात आले होते. नुकतेच राष्ट्रीय मार्ग यांच्याकडून बाय पास रींग रोड विकास कामात सदरील फलक काढण्यात आला होता. शुक्रवारी संत गाडगेबाबा यांच्या स्मृती दिनानिमित्त चंद्रकांत बिराजदार यांच्या हस्ते संत गाडगेबाबा नावाच्या फलकाचे अनावरण करण्यात आले .

या वेळी प्रमुख पाहुणे चंद्रकांत बिराजदार यांनी आपल्या भाषणात थोर समाज सुधारक संत गाडगेबाबा यांनी, माणसात देव शोधून मानवाचे शत्रू अंधश्रद्धा, अशिक्षितपणा,व अस्वच्छते विरोधात प्रबोधन करीत स्वतः स्वच्छता अभियान राबवित समाजाला स्वछतेचे महत्व पटवून दिल्याचे सांगितले. या वेळी ग्यानदेव तेलंगे, गणपतराव तेलंगे, प्रा वैजनाथ जाधव, प्रशांत सुरवसे,सुधाकर सुरवसे, कृष्णा तेलंगे आदी उपस्थित होते.

## संक्षिप्त वृत्त...

### लातूर तालुक्याच्या विज्ञान प्रदर्शनाचे उद्‌घाटन उत्साहात संपन्न

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २० डिसेंबर-**
शिक्षण विभाग, पंचायत समिती, लातूर व श्री राजगुरु प्राथमिक विद्यालय, लातूर यांचे संयुक्त विद्यमाने आयोजित ५२ वे तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनाचे उद्‌घाटन लातूर जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शिक्षणाधिकारी वंदना फुटाणे व माध्यमिक शिक्षणाधिकारी नागेश मापारी हस्ते श्री राजगुरु प्राथमिक विद्यालय, लातूर येथे उत्साहात संपन्न झाले.

या उद्‌घाटन कार्यक्रमाचे अध्यक्ष उमाकांत होनराव, श्री. संगमेश्वर चॅरिटेबल ट्रस्ट, लातूर यांनी लातूर तालुक्याचे प्रयोग राज्यस्तरापर्यंत जातील अशी अपेक्षा व्यक्त करुन लातूर तालुक्यातून राज्यस्तरावर प्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यांस बक्षीस जाहीर केले. लातूर गटविकास अधिकारी तुकाराम भालके व गटशिक्षणाधिकारी निवृत्ती जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली विज्ञान विभाग प्रमुख रविंद्र पाटील व राजगुरु प्राथमिक विद्यालयाचे अध्यक्ष ओंकार होनराव, संचालिका ऐश्वर्या होनराव यांच्या सुक्ष्म नियोजनामुळे विज्ञान प्रदर्शन यशस्वीरित्या संपन्न झाले.

### कर्णबधिरांना श्रवण यंत्र शिबीर : २०० विद्यार्थ्यांच्या कानाची तपासणी

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २० डिसेंबर-**
प्रसिद्ध गायिका अनुराधा पौडवाल यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यरत मुंबईच्या सूर्योदय फाउंडेशन व जीवन विकास प्रतिष्ठानच्या वतीने दिव्यांग सप्ताहाअंतर्गत दोनशे विद्यार्थ्यांचे श्रवण यंत्र मोजमाप शिबीर नुकतेच घेण्यात आले. या अंतर्गत लवकरच या कर्णबधिरांना श्रवण यंत्र मिळणार आहे.

एमआयडीसी येथील जीवन विकास प्रतिष्ठान सभागृहात ॲड. विजयगोपाल अग्रवाल मूकबधिर विद्यालय व सुशिलादेवी देशमुख निवासी मुलींच्या मूकबधिर विद्यालयातील विद्यार्थ्यांची यावेळी तपासणी करण्यात आली. जवळपास ४० लाख रुपयांचे श्रवण यंत्र लवकरच वितरित केले जाणार आहेत. या शिबिरास संस्थेचे संचालक अभय शहा, सूर्योदय फाउंडेशनचे विठ्ठल जाधव, जिशांत परमार, रवींद्र शेजवळ यांची उपस्थिती होती. यशस्वितेसाठी मुख्याध्यापक गौतम जोगदंड, वाचा उपचार तज्ज्ञ निर्मला मुसळे, सोपान घुले, मीरा काकडे, सुचिता गवळी, मनोज जाधव, सचिन बनसोडे, संतोष देशमुख, अर्चना सूर्यवंशी, परमेश्वर शिंदे, राम काटे, शेख यांनी परिश्रम घेतले.

### वाहतुकीस अडथळा आणल्या प्रकरणी ऑटो चालकावर पोलीस ठाण्यात गुन्हा

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २० डिसेंबर-**
शहरातील विवेकानंद चौक पोलिस ठाण्यासमोरील सार्वजनिक रस्त्यावर एका ऑटो चालकाने वाहन उभे करून स्वतःच्या आणि इतरांच्या जीवितास धोका निर्माण केल्याचे आढळून आले. या प्रकरणी विवेकानंद चौक पोलिसात गुन्हा नोंद आहे. विवेकानंद चौक पोलिस ठाण्यासमोरील रस्त्यावर एमएच २४, एटी ४२९४ क्रमांकाच्या ऑटो चालकाने वाहन उभे केले होते. त्यामुळे स्वतःच्या आणि इतरांच्या जीवितास धोका निर्माण होईल, अशी परिस्थिती निर्माण झाली होती. या प्रकरणी पोहेकॉ. मुन्वरखान तैमूरखान पठाण यांच्या फिर्यादीवरून गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### संतोष देशमुख हत्येतील आरोपींवर कठोर कारवाई करा : जिजाऊ ब्रिगेड

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २० डिसेंबर**-बीड जिल्ह्यातील मस्साजोग येथील सरपंच संतोष देशमुख यांची निघृण हत्या करण्यात आली होती. या घटनेतील आरोपींना कठोर शासन व्हावे अशी मागणी राज्यातून होत आहे. लातूर येथील जिजाऊ ब्रिगेडच्यावतीनेही निवासी जिल्हाधिकारीमार्फत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना आरोपींना कठोर शासन करण्याची मागणी गुरुवारी (दि. १९) केली आहे. मस्साजोग येथे माणुसकीला काळीमा फासणारी असून यामागे खरा सुत्रधार कोण? तसेच अशा प्रवृत्तीला वेळीच आवर घातला नाहीतर प्रशासकीय यंत्रणेवरील विश्वास राहणार नाही. त्यामुळे या गुन्ह्यातील सर्व आरोपींना कठोर शासन करण्याची मागणी जिजाऊ ब्रिगेडच्या वतीने मुख्यमंत्र्यांकडे करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे परभणी येथील आंदोलन कर्ते व संविधान रक्षक सोमनाथ सूर्यवंशी यांचा देखील पोलीस कोठडीत मृत्यू झाला. या दोन्ही प्रकरणातील दोषींना शिक्षा व्हावी अशी मागणी करण्यात आली आहे.

# जिल्हा बँकेच्या अद्ययावत आय. टी. विभागाचा शुभारंभ

## ग्राहकांच्या डिजिटल व्यवहाराची माहिती अधिक सुरक्षित राहण्यासाठी होणार मदत



**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २० डिसेंबर-**
जिल्हा मध्यवर्ती बँकेने टी. सी. एस. संगणक प्रणाली डिसेंबर २०२३ लागू केली असून जिल्हा बँकेच्या मुख्यालय व १२२ शाखेच्या माध्यातून लातूर जिल्ह्यात बँकिंग ग्राहक सेवा तत्परतेने देणारी अग्रगण्य बँक म्हणून लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचा उल्लेख प्रामुख्याने केला जातो. त्यात प्रामुख्याने आर टी जी एस एटीएम, आय एम पी एस, युपी आय, मोबाईल बँकिंग इंटरनेट बँकिंग इत्यादी सेवेचा समावेश आहे.

लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने ग्राहकांना राष्ट्रीयकृत बँकेसारख्या ऑनलाइन सुविधा करून दिलेल्या असल्याने त्याचा लाभ असंख्य ग्राहकांना होत आहे. अशा परिस्थितीत दैंनदिन डिजिटल व्यवहार अधिक सुरक्षित राहावे व त्याची माहिती कोणालाही हॅंग करता येवू नये यासाठी लातूर जिल्हा बँकेने बँकेचे चेअरमन धीरज देशमुख यांच्या सूचनेनुसार बँकेत आय टी विभाग कार्यान्वित करण्यात आला असून त्याचा शुभारंभ राज्याचे माजी मंत्री दिलीपराव देशमुख व बँकेचे चेअरमन धीरज देशमुख यांच्या हस्ते बंकेचे व्हॉईस चेअरमन ॲड प्रमोद जाधव संचालक मंडळ यांच्या उपस्थितीत करण्यात आला.

यावेळी जिल्हा बँकेचे संचालक पृथ्वीराज शिरसाठ संचालक राजकुमार पाटील संचालक दिलीप पाटील नागराळकर, संचालक भगवानराव पाटील तळेगावकर, संचालक मारोती पांडे, संचालिका सौ स्वयंप्रभा पाटील, संचालिका श्रीमती लक्ष्मीबाई भोसले संचालिका सौ सपना कीसवे सौ अनिता केंद्रे, कार्यकारी संचालक हणमंतराव जाधव मान्यवर उपस्थित होते .

# डॉ. बाबासाहेबांच्या पुतळ्यासाठी भरीव निधी उपलब्ध करा

## आ. अमित देशमुख यांची मागणी

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २० डिसेंबर-**
लातूर शहरातील मध्यवर्ती ठिकाणी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्क येथे स्टॅच्यू ऑफ नॉलेज भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा ७० फुट उंचीच्या पुतळा उभारणी तसेच शिवछत्रपती वाचनालय इमारतीची पुर्नबांधणी, हुतात्मा स्मारक व मराठावाडा मुक्ती स्मारकांचा पुर्नविकास, विलासराव देशमुख मार्गाचा दुसरा टप्पा यासह विविध प्रकल्पासाठी त्वरीत निधी उपलब्ध करुन दयावा, त्याच बरोबर, कृषी महाविद्यालयाच्या जागेवर लातूर जिल्हा रुग्णालय व विलासराव देशमुख शासकीय वैदयकीय महाविद्यालयाच्या वतीने पटेल चौक येथे उभारावयाच्या मदर ॲन्ड चाइल्ड रुग्णालयाच्या जागेचा प्रश्न त्वरीत सोडवावा, अशी मागणी माजी मंत्री आमदार अमित देशमुख यांनी आज विधानसभेत केली.

नागपूर येथे सुरू असलेल्या महाराष्ट्र विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनादरम्यान आज नगर विकास व सार्वजनीक आरोग्य विभागाच्या पुरवणी मागण्यावरील चर्चेत सहभागी होताना लातूर शहरासह व राज्यातील महत्वाकांक्षी प्रकल्पा बाबत माजी मंत्री आमदार देशमुख यांनी आपली भुमिका मांडून मागणी नोंदवली. विधीमंडळाच्या नागपूर येथील हिवाळी अधिवेशनादरम्यान शुक्रवारी विधानसभेत पुरवणी मागण्यावरील चर्चेत सहभागी होतांना आमदार अमित देशमुख म्हणाले की, महिलांसाठी सिटीबस मधून मोफत प्रवास योजना सुरू करणारी लातूर ही राज्यातील पहीली मनपा आहे. ही योजना पूढे सुरू राहण्यासाठी राज्य शासनाने लातूर मनपाला पुरेसा निधी उपलब्ध करुन दयावा. एसटी प्रवासात महीलांना सवलतीची योजना लागू केलेली आहे त्या धर्तीवर राज्यातील सर्व महानगरात महीलांना सिटीबस मधून मोफत प्रवास योजना लागू करावी.

लातूर शहरात उभारण्यात येणाऱ्या स्टॅच्यू ऑफ नॉलेज भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ७० फुट उंचीच्या पुतळा उभारणीसाठी व परिसर विकासासाठी आवश्यक असणारा निधी उपलब्ध करून द्यावा. लातूर येथील विलासराव देशमुख शासकीय महाविद्यालयाच्या वतीने लातूर शहरातील पटेल चौक येथे उभारावयाच्या मदर अँड चाइल्ड रुग्णालयासाठी नगर विकास विभागाची जागा प्रति एक रुपया चौरस मीटर एवढ्या नाममात्र भाड्याने उपलब्ध करून द्यावी. लातूर शहरातील मुख्य रस्त्याला समांतर पद्धतीने बांधण्यात येत असलेल्या विलासराव देशमुख मार्गाच्या दुसऱ्या टप्प्यातील कामासाठी निधी उपलब्ध करून द्यावा. लातूर शहरात उभारण्यात येत असलेल्या नाट्यगृह बांधकामासाठीचा उर्वरित निधी उपलब्ध करून द्यावा. लातूर शहरात मनपाच्या वतीने एका शादीखानाचे बांधकाम पूर्ण केले आहे.

दुसऱ्या शादीखानाचे बांधकाम अपूर्ण अवस्थेत आहे, त्या शादीखाना इमारतीसाठी आवश्यक असणारानिधी त्वरित उपलब्ध करून द्यावा अशी ही मागणी त्यांनी केली.

# अल्पसंख्याकांच्या कायदेशीर हक्काबाबत जनजागृती हवी



**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २० डिसेंबर-**
राष्ट्रीय, वांशिक, धार्मिक व भाषिक अल्पसंख्यांकांना त्यांच्या घटनात्मक व कायदेशीर हक्का विषयी जनजागृती करून द्यायला हवी असे प्रतिपादन रासेयो कार्यक्रमाधिकारी प्रा. किसनाथ कुडके यांनी केले. ते येथील महात्मा बसवेश्वर महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्यावतीने आयोजित अल्पसंख्यांक हक्क दिवस साजरा करताना प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते.

हा कार्यक्रम महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. संजय गवई यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न झाला असून विचार मंचावर दुग्धशास्त्र विभाग प्रमुख डॉ. गुणवंत बिरादार, रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ. रत्नाकर बेडगे, डॉ. शिवप्रसाद डोंगरे, डॉ. नीता खानापुरे आणि संजय सोनवणे यांची उपस्थती होती.

पुढे बोलताना प्रा. कुडके म्हणाले की, धर्म, भाषा, राष्ट्रीयत्व किंवा जात यावर अल्पसंख्यांक आधारित असतात. अल्पसंख्यांकांना त्यांच्या हक्काचे संरक्षण व्हावे, अल्पसंख्यांकांना त्यांची प्रगती साधता यावी असेही ते यावेळी म्हणाले. यावेळी अनेक मान्यवरांचे मार्गदर्शन झाले.

## मंत्री पाटील लातूर दौऱ्यावर

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २० डिसेंबर-**
राज्याचे मंत्री बाबासाहेब पाटील हे रविवार, २२ डिसेंबर २०२४ रोजी लातूर जिल्हा दौऱ्यावर येत आहेत. त्यांचा दौरा कार्यक्रम पुढीलप्रमाणे आहे. दि. २२ डिसेंबर रोजी सकाळी १०.३० वाजता अहमदपूर तालुक्यातील सांगवी फाटा येथे आगमन होईल. त्यानंतर भक्तीस्थळ येथे राष्ट्रसंत शिवलिंग शिवाचार्य महाराज समाधी दर्शन घेतील. साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे चौक, टिपू सुलतान स्मारक येथे त्यांचे स्वागत, सत्कार समारोह होईल. त्यानंतर स्वातंत्र्यवीर वि. दा. सावरकर यांच्या पुतळ्यास अभिवादन, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास अभिवादन यासह विविध कार्यक्रमांना ते उपस्थित राहतील.

## तक्रारीच्या निवारणासाठी जिल्ह्यात सुशासन सप्ताहाचे आयोजन

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २० डिसेंबर-**
शासकीय कार्यालयात असलेल्या प्रलंबित तक्रारींचे निवारण युद्ध पातळीवर करण्यासाठी १९ ते २४ डिसेंबर २०२४ या काळात लातूर जिल्ह्यात सुशासन सप्ताह राबविण्यात येत असल्याची माहिती जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत देण्यात आली आहे.

या अंतर्गत जिल्ह्यात प्रशासन गाव की ओर हे अभियान राबविण्यात येणार आहे. या अभियानाचे उद्घाटन प्रभारी जिल्हाधिकारी तथा जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनमोल सागर यांच्या उपस्थितीत गुरुवारी जिल्हाधिकारी कार्यालयात झाले.

प्रभारी अपर जिल्हाधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी केशव नेटके, उपजिल्हाधिकारी प्रियांका आयरे, अहिल्या गाठाळ, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी रमेश जाधव यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी, कर्मचारी यावेळी उपस्थित होते.

प्रशासनिक सुधार तथा लोक शिकायत विभाग कार्मिक, लोक शिकायत और पेंशन मंत्रालय यांच्या निर्देशानुसार हा सप्ताह राबविण्यात येत आहे. या अभियानात विविध शासकीय कार्यालयात प्रलंबित विविध तक्रारीचे निवारण युद्ध पातळीवर करण्यात येणार आहे. तसेच विविध सेवा पुरविणेबाबत विशेष शिबिराचे आयोजन करण्यात येणार आहे. अभियानात सहभागी होण्यासाठी नागरिकांना आपले सरकार पोर्टल, सीपीजीआरएएमएस इत्यादी पोर्टलवरील तक्रारी नोंदविता येतील अशी माहिती देण्यात आली.

# अमित शहांनी पदाचा राजीनामा द्यावा



**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २० डिसेंबर-**
केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याविषयी केलेल्या असंविधानिक वक्तव्याचा निषेध नोंदवत अमित शहा यांनी आपल्या पदाचा राजीनामा द्यावा तसेच केलेल्या वक्तव्याबद्दल देशाची माफी मागावी, अशी मागणी गुरुवारी (दि.१९) ठाकरे सेनेचे जिल्हाप्रमुख संतोष सोमवंशी यांच्या नेतृत्त्वाखाली शिष्टमंडळाने जिल्हाधिकाऱ्यांकडे निवेदनाद्वारे केली आहे.

संविधानाचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याबाबत अमित शहा यांनी जे वक्तव्य केले ते लोकशाही, देशासाठी घातक आहे. या वक्तव्यावरून देश हुकुमशाहीकडे वाटचाल करत असल्याचे दिसत आहे. लोकशाहीला मानणाऱ्या व लोकशाहीचे संवर्धन करणाऱ्या नागरिकांमध्ये अस्वस्थता निर्माण झाली आहे. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याबद्दल अवमानकारक वक्तव्य केल्याबद्दल अमित शहा यांनी देशाची माफी मागून आपल्या पदाचा राजीनामा द्यावा, अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे.

शिष्टमंडळात सहसंपर्क प्रमुख नामदेव चाळक, महिला जिल्हा संघटक जयश्री उटगे, सुनीता चाळक, महानगर प्रमुख सुनील बसपुरे, युवती प्रमुख ॲड. श्रध्दा जवळगेकर, युवा सेना प्रमुख दिनेश जावळे, निलंगा तालुकाप्रमुख अविनाश रेशमे, उपजिल्हाप्रमुख हरिभाऊ सगरे, संतोष सूर्यवंशी, शेतकरी सेनेचे जिल्हाध्यक्ष विलास लंगर, सहकार सेना जिल्हाध्यक्ष किशोर जाधव, औसा खरेदी-विक्री संघाचे उपसभापती शेखर चव्हाण, देवणी तालुकाप्रमुख मुकेश सुडे शिवाजी चव्हाण, व्यापारी आघाडी जिल्हाध्यक्ष बसवराज मंगरूळे आदींचा समावेश होता.

## ‘दयानंद’ मध्ये पारितोषिक वितरण समारंभ



**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २० डिसेंबर-**
दयानंद कला महाविद्यालयात इयत्ता बारावीच्या निवडक विद्यार्थ्यांचा पारितोषिक वितरण समारंभ प्राचार्या डॉ. भागीरथी गिरी यांच्या हस्ते संपन्न झाला. यावेळी भविष्यातील करिअरच्या दृष्टीकोनातून मार्गदर्शनही करण्यात आले.

विद्यार्थ्यांनो स्वप्न मोठी पहा, त्या स्वप्नांचा पाठलाग करा आणि वास्तवात उतरवून अधिकारी व्हा. मुलांच्या भौतिक क्षमता प्रत्येक पिढीगणिक वाढलेली पाहायला मिळते आहे. त्याची कास धरून विद्यार्थ्यांनी कृत्रिम बुद्धिमत्तेमध्ये करिअरच्या दृष्टिकोनातून आपली वेगळी वाट निर्माण करण्याचे आवाहन यावेळी डॉ. गिरी यांनी केले. प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड यांनी अध्यक्षीय मनोगत व्यक्त केले. व्यासपीठावर उपप्राचार्या डॉ. अंजली जोशी, उपप्राचार्य डॉ. दिलीप नागरगोजे, पर्यवेक्षक डॉ. प्रशांत दीक्षित व परीक्षा विभाग प्रमुख डॉ. गोपाल बाहेती उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सानिका पांचाळ व आभार आशा राठोड हिने मानले कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रा. जिगाजी बुद्रुके व प्रा. दशरथ ननवरे यांनी परिश्रम घेतले.



## अपहृत मुलीला शोधण्यात यश

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २० डिसेंबर-**
ऑपरेशन मुस्कान अंतर्गत पोलिसांच्या अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षास आणखीन एका अपहृत अल्पवयीन पीडित मुलीचा पुण्यात शोध लावण्यात यश आले आहे. पीडित मुलीस तिच्या पालकांच्या स्वाधिन करण्यात आले आहे तर यातील आरोपीवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

१६ वर्षीय अल्पवयीन मुलीस अज्ञाताने पळवून नेल्याप्रकरणी चाकूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. चाकूर पोलीस व अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षाकडून याचा समांतर तपास सुरू होता. अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षाच्या पथकाने गुप्त व तांत्रिक माहितीचे संकलन करून सदर अल्पवयीन मुलगी पुणे येथे असल्याची खात्री पटवली. पथकाने पुणे येथे जाऊन पीडित मुलगी व आरोपीचा शोध घेऊन त्यांना ताब्यात घेतले. पीडित मुलगी व आरोपी यांना चाकूर पोलीस ठाण्यात हजर करण्यात आले. यानंतर मुलीला तिच्या पालकांच्या ताब्यात देण्यात आले तर आरोपीवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

वरिष्ठांच्या मार्गदर्शनात सदर कक्षाच्या पोलीस निरीक्षक बबिता वाकडकर, पोलीस उपनिरीक्षक सुभाष सूर्यवंशी, पोलीस अंमलदार सदानंद योगी, महिला अंमलदार सुधामती यादव व चालक विशाल चव्हाण यांनी ही सेवा बजावली.

# अल्पसंख्याक समाजाचे मागण्यांसाठी धरणे आंदोलन

## कल्याण समितीची पुनर्रचना करण्याची मागणी

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २० डिसेंबर-**
अल्पसंख्याक विकास विभाग व त्याच्याशी संलग्न संस्था, मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळ, वक्फ बोर्ड, ऊर्दू अकॅडमी, अल्पसंख्याक आयोग, अल्पसंख्याक संशोधन प्रशिक्षण संस्थेस आर्थिक तरतूद वाढवावी. संबंधित कार्यालयातील रिक्त पदे भरावीत. राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात अल्पसंख्याक कल्याण समितीची पुनर्रचना करून नियमित बैठका घ्याव्यात, यासह अन्य मागण्यांसाठी शहरातील महात्मा गांधी चौकात अल्पसंख्याक हक्कदिनानिमित्त युथ मूव्हमेंट ऑफ महाराष्ट्र, शाखा लातूरच्यावतीने धरणे आंदोलन करण्यात आले. जिल्हाधिकाऱ्यांमार्फत मुख्यमंत्र्यांना मागण्यांचे निवेदन पाठविण्यात आले.

आंदोलनात युथ मूव्हमेंट ऑफ महाराष्ट्रचे प्रदेशाध्यक्ष रफिक शेख, शहराध्यक्ष अहेमद हाश्मी, मोहसीन खान, एम. आय. शेख, फैसल कायमखानी, डॉ. असद पठाण, खदीर खान, अजहर शेख, शकील शेख, सुलतान शेख, नदीफ शेख, मुजीब शेख, अमीन पठाण, अजहर शेख, लतीफ पठाण, मोहसीन मनियार, इरफान शेख, सलीम शेख, मुजाहिद पटेल, मुदस्सीर शेख, अथर पठाण, ॲड. किरण जाधव, कैलास कांबळे, लक्ष्मण कांबळे, वाय. एस. मशायक आदी सहभागी झाले होते.

प्रत्येक जिल्ह्यात वसतिगृह उभारण्यात यावे राज्यात प्रत्येक जिल्ह्यात अल्पसंख्याक समाजाच्या मुला-मुलींसाठी वसतिगृह इमारत, ऊर्दू घर (शैक्षणिक संकुल) उभारण्यात यावीत. प्रधानमंत्री १५ कलमी कार्यक्रम, दप्तर दिरंगाई कायदा व लोकसेवा अधिनियमच्या तरतुदी अन्वये अल्पसंख्याक योजनांवर अंमलबजावणीसाठी नियोजन करून संबंधितांवर जबाबदारी निश्चित करावी, आदी मागण्यांचा निवेदनात समावेश आहे.